
सप्टेबर २०१२ | किंमत ₹ १०

# लोकराज्य

## साथ सहकाराची प्रगती महाराष्ट्राची



# सहकारावर दृष्टिक्षेप



- सहकारी संस्थांची संख्या २.२४ लाख
- संस्थांमधील एकूण उलाढाल रुपये ३.०० लाख कोटींपेक्षा जास्त
- सहकारी संस्था सभासद संख्या ५.५० कोटी
- राज्यातील ५०% लोकसंख्या सहकारी संस्थांचे सभासद
- प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती -२० लाख
- जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका -३१
- नागरी बँका -५२६
- विविध कार्यकारी सहकारी संस्था – २१,४०२
- पतसंस्था – १५,५७५
- सहकारी गृहनिर्माण संस्था – ८५,३३५
- सहकारी साखर कारखाने – २०२
- पणन सहकारी संस्था – १,२२७
- जिनिंग प्रेसिंग सहकारी संस्था – २५६
- ग्राहक सहकारी संस्था – ३,१११
- प्रक्रिया सहकारी संस्था – ६५७
- इतर सहकारी संस्था – ८६,०६७

## ऊस प्रक्रिया संकुल-सहवीज निर्मिती

- ११२६.९ मे. वॅट वीज निर्मिती क्षमता
- ६० सहकारी साखर कारखान्यांचा सहभाग
- ६० कारखान्यांच्या ११२६.९ मे. वॅट प्रकल्पासाठी रु. ४४०० कोटींची मान्यता.
- एकूण ३५ कारखान्यांना १०८.८३ कोटींचे शासकीय भागभांडवल
- ३७ कारखान्याकडून ६११.४ मे. वॅट वीजनिर्मिती

## दूध संस्था

- एकूण संस्था : ११,९६२
- सभासद संख्या सुमारे ४० लाख
- प्रतिदिन दूध संकलन सुमारे ४० लाख लीटर्स
- कर्जमाफी/कर्जपरतफेड सवलत योजना २००९
- अंतर्गत एकूण ३४.०३ लाख शेतकऱ्यांना
- ४००८.४८ कोटी रुपयांचा लाभ देण्यात आला.

वर्ष ६४ वे | अंक ६ | सप्टेंबर २०१२

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

# लोकराज्य


- मुख्य संपादक — प्रमोद त्र्यं. नलावडे
- व्यवस्थापकीय संपादक — प्रल्हाद जाधव
- संपादक — सुरेश वांदिले
- कार्यकारी संपादक — प्रभाकर मुराळकर
- उपसंपादक — किरण केंद्रे
- प्रशासन व वितरण अधिकारी — दिगंबर पालवे
- वितरण अधिकारी — विलास बोडके
- साहाय्य — सुधाकर गायकवाड, विद्या कदम
- मुखपृष्ठ — राभा
- मांडणी, सजावट — संदीप पवार
- मुद्रण — एच. टी. मीडिया लि. दिघे, ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई


■ संपादकीय पत्ता ■
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक, दालन क्र. ३३, तळ मजला, मंत्रालय, मुंबई-३२.
संपादकीय संपर्क : ०२२-२२८८२८८८

e-mail : lokrajya@dgipr.maharashtra.gov.in
lokrajya2011@gmail.com

ई-लोकराज्यसाठी
Website : http://dgipr.maharashtra.gov.in

वर्गणीदार व तक्रार निवारणासाठी संपर्क - ०२२-२२०२१५३०
वितरण संपर्क - ०२२-२२०२३९५७

e-mail : lokvitran@dgipr.maharashtra.gov.in
lokrajyavitaran@gmail.com

# अंतरंग



## आव्हान आणि प्रतिसाद — ११

संयुक्त राष्ट्रसंघाने सन २०१२ हे आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष म्हणून जाहीर केले आहे. 'चांगल्या विश्व निर्मितीसाठी सहकार' हे या आंतरराष्ट्रीय वर्षाचे ब्रीदवाक्य असून, या क्षेत्रातील आव्हानांचा सामना करीत पुढे गेल्यास भविष्य निश्चित उज्ज्वल आहे.

## साखर पेरणी — १३

राज्यात सहकारी साखर कारखान्याचे जाळे तयार झाल्यावर राज्य शासनाने आवश्यक ते अर्थसाहाय्य उपलब्ध करून दिले. त्यामुळे ग्रामीण महाराष्ट्रात आर्थिक स्थैर्य निर्माण झाले. साखर उद्योगामुळे ग्रामीण भागात स्थिर स्वरूपाच्या रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहेत.




## यशकथा — ४१

सहकाराच्या क्षेत्रात अनेक संस्थांनी मानदंड स्थापित केले आहेत. या संस्थांची आजवरची वाटचाल इतर अनेक संस्थांना प्रेरणादायी अशीच ठरली आहे. महाराष्ट्राच्या सहकार क्षेत्रावर आपली मुद्रा उमटवणाऱ्या निवडक संस्थांचा परिचय...

## कर्तृत्वाचे दशक... — २९

कुशल प्रशासक, दूरदृष्टी असलेला राजकीय नेता, हजरजबाबी वक्ता आणि दिलखुलास व्यक्तिमत्त्व असलेले माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांचे नुकतेच निधन झाले. महाराष्ट्राच्या विकासाभिमुख वाटचालीत त्यांचा मोलाचा वाटा आहे. सर्वाधिक काळ मुख्यमंत्रीपदावर राहणारे दुसरे मुख्यमंत्री म्हणून त्यांचा गौरव केला जातो. विलासराव देशमुखांच्या आठवणींना दिलेला हा उजाळा..



## याशिवाय


| | | | |
|---|---|---|---|
| सहकार चळवळीची ताकद | ६ | संधी आणि समृद्धी | ३६ |
| सहकार क्षेत्र अधिक सक्षम करावयाचे आहे (सहकार मंत्री हर्षवर्धन पाटील यांची मुलाखत) | ७ | परिवर्तनाच्या टप्प्यावर | ३८ |
| | | सहकाराचे गुरुकुल | ३९ |
| सहकाराचे सामर्थ्य | १० | गुरुजींची बँक | ४१ |
| सातासमुद्रापलीकडचा सहकार | १६ | साताऱ्याची सुवर्णमुद्रा | ४२ |
| अर्थकारणातील सहकार | १८ | वारणा मॉडेल | ४४ |
| कर्ज, सवलत आणि शेतकरी | २० | सुवर्ण महोत्सवी गोकूळ | ४६ |
| वैदर्भीय सहकार | २२ | प्रयोगातून प्रगतीकडे | ४८ |
| मराठवाड्याचा गोडवा | २४ | आदिवासींसाठी दीपस्तंभ | ४९ |
| कोकणचो सहकार | २७ | औरंगाबाद नवी झळाळी | ५१ |
| मानसिक बदलाची आवश्यकता | ३३ | भूमी पराक्रमाची | ५५ |
| सारे काही घरासाठी | ३४ | आपलं राज्य : आपली माणसं | ५८ |


**'लोकराज्य'मधील लेखांचे पुनर्मुद्रण केल्यास आम्हाला आनंदच होईल...**

वार्षिक वर्गणी - वरिष्ठ सहायक संचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, बॅरेक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई-४०००२१ या पत्त्यावर मनीऑर्डरने पाठवावी किंवा 'लेखाधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई' यांच्या नावे मुंबई येथे वटणाऱ्या शाखेचा डिमांड ड्राफ्ट पाठवावा. लोकराज्य अंकाच्या वर्गणीदारांनी नूतनीकरणासाठी वार्षिक वर्गणी पाठवताना आपला वर्गणी क्रमांक कळवावा. (प्रति अंक मूल्य १० रुपये, वार्षिक वर्गणी रु. १००/-)

*या अंकात व्यक्त केलेल्या मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.

# सहकाराचा समर्थ आविष्कार



**म**हाराष्ट्राच्या गावागावात पोहचलेल्या आणि महाराष्ट्रीय माणसांच्या मनावर अधिराज्य गाजविणाऱ्या लोकराज्यचा सप्टेंबर महिन्याचा अंक आपल्यापुढे सादर करताना मला विशेष आनंद होत आहे.

सप्टेंबर महिन्याची सुरुवात होताच शिक्षक दिनाची चाहूल लागते. माता-पित्यांसोबत गुरुजनांना देवासमान मानण्याची परंपरा आपण जोपासली आहे. आदर्श शिक्षक म्हणून ख्यातकीर्त असलेले डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन् देशाचे सर्वोच्च पद असलेल्या राष्ट्रपतीपदावर विराजमान झाले. ५ सप्टेंबर हा त्यांचा जन्म दिवस गुरू परंपरेचा सन्मान करण्यासाठी 'शिक्षक दिन' म्हणून साजरा केला जातो. या वर्षातील सप्टेंबर महिन्याचे वैशिष्ट्य म्हणजे मराठी कालगणनेनुसार येणारा अधिक मास ! सणांची रेलचेल असलेल्या या मासात 'जावईबापू'चे सत्कार करण्याची परंपरा ग्रामीण महाराष्ट्रात आजही पाळली जाते.

महाराष्ट्राचा सण म्हणून ओळखला जाणारा 'गणेशोत्सव' याच महिन्यात साजरा होत आहे. लोकमान्य टिळकांनी १२० वर्षांपूर्वी सुरू केलेल्या गणेशोत्सवाचे राष्ट्रीय उत्सवामध्ये रुपांतर झाले. महाराष्ट्राच्या सामाजिक परंपरेचे वैभव म्हणून गणेशोत्सवाकडे पाहिले जाते. विघ्नहर्त्या गणेशाच्या आगमनाने महाराष्ट्रात चैतन्य आणि उत्साहाचे वातावरण निर्माण होते. यावर्षी गणरायाच्या आगमनाची चाहूल लागताच पर्जन्यराजानेही महाराष्ट्रावर जोमाने बरसायला सुरूवात केली. एकंदरीत सप्टेंबर महिना महाराष्ट्राच्या दृष्टीने आनंददायी ठरला.

या अंकात महाराष्ट्राच्या सहकार क्षेत्रातील विविध पैलूंवर प्रकाश टाकणाऱ्या लेखांचे नियोजन करण्यात आले आहे. २०१२ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष' म्हणून साजरे केले जात आहे. भारतातील सहकार चळवळीला दीर्घ इतिहास आहे. १९०४ साली सहकारी संस्थांसाठी कायदा अस्तित्वात आला. १९१२ मध्ये सहकार कायद्यातील तरतुदी व्यापक करण्यात आल्या. केंद्र सरकारकडे असलेला हा विषय प्रांतिक सरकारकडे सोपवला गेला. त्यावेळी मुंबई प्रांताने १९२५ साली आपला स्वत:चा सहकारी कायदा संमत केला. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर १९६० साली महाराष्ट्र शासनाने संमत केलेला सहकार कायदा हा आज अस्तित्वात असलेल्या सहकारी संस्थांचा पाया समजला जातो.

महाराष्ट्रातील ग्रामीण भागाची जडणघडण लोकशाही तत्त्वांवर आधारित सहकार चळवळीमुळे झाली. सध्या अस्तित्वात असणाऱ्या २ लाख ३० हजार सहकारी संस्था महाराष्ट्राच्या प्रगतीच्या वाटचालीतील महत्त्वाचा टप्पा मानला जातो. ग्राम पातळीवर विविध सहकारी संस्थांचे जाळे महाराष्ट्रात सर्वदूर विणले गेले आहे. सहकाराच्या माध्यमातून शेती व बिगरशेती संस्था, साखर कारखाने, सूत गिरण्या अशा विविध सहकारी संस्था महाराष्ट्रातील ग्रामीण/शहरी भागात स्थापन झाल्यामुळे सर्वसामान्यांना दिलासा मिळाला. याशिवाय ग्रामीण व नागरी अर्थव्यवस्था प्रवाही राहण्यास उपयुक्त वातावरण निर्मिती झाली. सहकार क्षेत्रातील संस्थामधील विविध ठेवी व कर्जाची गुंतवणूक १ लाख कोटी रुपयांच्या वर असून २० लाख लोकांना रोजगार प्राप्त झाला आहे. सहकारी संस्था म्हणजे 'महाराष्ट्राची अर्थवाहिनी' असे चित्र दृष्टोत्पत्तीस येते.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि सहकारी साखर कारखाने हे महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचे मानदंड आहेत. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांद्वारे शाश्वत पत पुरवठ्यासाठी शेतकऱ्यांची हक्काची यंत्रणा गेल्या ५० वर्षांपासून उभी आहे. महाराष्ट्रातील सहकारी चळवळीमध्ये सहकारी साखर कारखान्यांनी अनन्यसाधारण भूमिका बजावली आहे. या कारखान्यांमुळे सर्वसामान्य शेतकऱ्यांना स्वत:मधील सुप्त शक्तींची जाणीव झाली. विकास व प्रगतीच्या व्यापक कृतीशीलतेचे ते प्रत्यक्ष भागीदार होऊ शकले. ही कारखानदारी केवळ कारखानदारीपुरती मर्यादित राहिली नसून ती एक जीवनशैली बनल्याचे दिसून येते. या कारखानदारीने ग्रामीण महाराष्ट्राचा केवळ आर्थिक विकास घडविला असे नाही तर मानसिकताही बदलल्याचे दिसून येते. आर्थिक सुबत्ता, जीवनशैली आणि राहणीमानातील बदल, रोजगार-स्वयंरोजगाराच्या निर्माण झालेल्या संधी, आधुनिक शैक्षणिक सुविधा अशी चौफेर स्थित्यंतरे ग्रामीण महाराष्ट्र अनुभवत आहेत.

ऊस उत्पादनावर आधारित साखर कारखानदारीने उप-उत्पादनांच्या उद्योगाला चालना दिली. सूत गिरण्यांच्या सहकारीकरणाचा प्रयत्न महाराष्ट्राच्या काही भागांमध्ये यशस्वी झाला. जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर सहकारी क्षेत्रातील साखर उद्योग, सूत गिरण्या यांना स्पर्धेस तोंड द्यावे लागत असून हे व्यवसाय स्थित्यंतरातून जात आहेत. गुणवत्ता आणि व्यावसायिकता यावर भर देऊन ही चळवळ जोमाने पुढे जाईल, याची खात्री वाटते. सहकारी कायद्यातील बदल, पीक कर्ज वाटपात वाढ, किसान क्रेडिट कार्ड वितरणात वाढ, कार्यक्षम नागरी सहकारी बँका व पतसंस्थांचे बळकटीकरण आदी योजना महाराष्ट्राच्या आगामी सहकार धोरणामध्ये समाविष्ट आहेत. २०१५ पर्यंत पीककर्ज २० हजार कोटीपर्यंत वाढविण्याचा महत्त्वाकांक्षी संकल्पही करण्यात आला आहे. यामुळे राज्यातील शेती आणि शेतीवर आधारित उद्योग व्यवसायांना आणखी गती मिळू शकेल, अशी आशा करण्यास हरकत नाही. 'विना सहकार नही उद्धार' या ब्रीद वाक्याने सुरू झालेल्या सहकार चळवळीमुळे समृद्धीचा नवा अध्याय सुरू झाला. त्यामुळे हे ब्रीदवाक्य सत्य स्वरुपात आल्याचे आपण अनुभवू शकतो. महाराष्ट्राचे शिल्पकार स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी वर्षात आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष साजरे केले जात असल्याने दुग्धशर्करा योग जुळून आला आहे.

या अंकात दिलेल्या सहकार क्षेत्रातील यशोगाथांचे वर्णन स्फूर्तीदायक ठरेल, असा विश्वास वाटतो. या अंकाच्या निर्मितीसाठी सहकार विभागाचे सचिव श्री.राजगोपाल देवरा आणि अतिरिक्त आयुक्त श्री.दिनेश ओऊळकर यांनी सहकार्य केले. त्यांचे मन:पूर्वक आभार. या अंकाचे नेहमीप्रमाणे आपण स्वागत कराल, अशी आम्हाला खात्री आहे.

**प्रमोद त्र्यं. नलावडे**
मुख्य संपादक तथा महासंचालक
(माहिती व जनसंपर्क महासंचालनालय)
संपर्क : ०२२-२२०४१५८५/२२०२७९५६
dg@dgipr.maharashtra.gov.in

# ग्रामीण अर्थव्यवस्थेचा आधार



**महाराष्ट्राचे शिल्पकार स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी वर्षातच आपण आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष साजरे करीत आहोत. हा एक योगायोगच आहे. राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या सहकार चळवळीसमोर जागतिकीकरणाच्या प्रक्रियेनंतर अनेक आव्हाने उभी राहिली. या आव्हानांची उत्तरे आपणाला शोधावी लागणार आहेत... सांगत आहेत, मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण.**

उद्योग क्षेत्रामध्ये आपल्या राज्याने अगदी पहिल्यापासून आघाडी मिळविलेली असली तरी अद्यापही ग्रामीण महाराष्ट्र हा कृषिप्रधान आहे. या सगळ्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा सहकार चळवळ हाच आहे. महाराष्ट्राच्या प्रगतीत सहकार क्षेत्राचा वाटा लक्षणीय आहे.

नवमहाराष्ट्राचे शिल्पकार स्व. यशवंतरावजी चव्हाण यांनी संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाल्यावर सहकार क्षेत्राकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले. ग्रामीण भागातून नवे राजकीय आणि सामाजिक नेतृत्व उभे करायचे असेल तर त्यासाठी सहकार क्षेत्रच महत्त्वाचे ठरेल, हे त्यांनी धोरणीपणाने ओळखले होते. म्हणूनच त्यांच्या काळात सहकाराच्या एका नव्या पर्वाची सुरुवात झाली. त्या काळात जे राजकीय नेतृत्व उदयाला आले, त्या सर्वाचा पाया सहकार क्षेत्रच होते, असे बारकाईने पाहिल्यास लक्षात येईल. आज परिस्थिती नेमकी उलटी झाली आहे. आधी राजकीय स्थान मिळवायचे आणि मग त्याचा आधार घेऊन सहकारी संस्था काढायच्या, एवढे मोठे स्थित्यंतर या क्षेत्रात झाले आहे.

यशवंतरावांच्या कार्याचा, विचारांचा आणि धोरणांचा केंद्रबिंदू सर्वसामान्य माणूस हा होता व त्यांचे जीवनमूल्य हे लोकशाही मूल्य होते. या दोन्हींचा मिलाफ सहकारात झालेला आहे. कारण सहकार चळवळीच्या धोरणांचा, विचारांचा केंद्रबिंदू माणूसच आहे आणि या संस्थांचा कारभारही लोकशाही पद्धतीने चालविला जातो. त्यामुळे सहकाराची कार्यपध्दती ही यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वाशी जवळीक साधणारी आहे.

सर्वसामान्यांच्या विकासाचे मूलभूत उद्दिष्ट नजरेसमोर ठेवून स्व. यशवंतराव चव्हाण यांनी सहकार चळवळ गतिमान केली. पद्मश्री विखेपाटील, स्व.वसंतदादा पाटील यांनी ती वाढविली. त्यांच्या सांघिक प्रयत्नांतून सहकार म्हणजे महाराष्ट्र असे चित्र राज्यात गेल्या ५० वर्षांत निर्माण झाले. देशातील एकूण सहकारी संस्थांपैकी ७० टक्के संस्था एकट्या महाराष्ट्रात आहेत. याचे श्रेय याच नेत्यांना जाते. सहकाराच्या माध्यमातून साखर कारखानदारी कशी यशस्वी करता येईल, याचा स्व. यशवंतराव चव्हाण यांनी अभ्यास केला आणि सहकारी साखर कारखानदारीला राज्यात सर्वत्र पोषक वातावरण तयार केले.

वैकुंठभाई मेहता यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेची झालेली वाटचाल आणि त्यातून शेतकऱ्यांची सावकारशाहीतून होत असलेली सुटकाही स्व. यशवंतराव चव्हाण यांनी अनुभवली व त्यातून ग्रामीण व नागरी सहकारी पतपुरवठा चळवळीला चालना दिली.

राज्याला सहकार चळवळीची १०० वर्षाहून अधिक काळाची परंपरा लाभली आहे. सर्वसामान्य शहरी आणि ग्रामीण माणूस, शेतकरी, लघुउद्योजक, कुटीरउद्योग करणाऱ्या महिला आदी वर्गाला सहकार चळवळीने आर्थिक प्रगतीचा मार्ग दाखविला.

राज्यात प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या सहकार चळवळीशी निगडीत असलेल्यांची संख्या सुमारे साडेपाच कोटीच्या घरात आहे. म्हणजेच राज्यातील निम्मी जनता सहकाराशी संबंधित आहे.

जागतिकीकरण, आर्थिक उदारीकरण आणि खासगीकरणामुळे १९९१ नंतर सहकार क्षेत्राचे चित्र बदलू लागले. अनेक आव्हाने उभी झाली. या पार्श्वभूमीवर सन २०१२ हे वर्ष आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष म्हणून साजरे करतांना या वर्षाच्या निमित्ताने बदलाचे वारे सहकार क्षेत्रात सुरू व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त करणे उचित ठरेल. सहकार चळवळीस भविष्यात खडतर अशा स्पर्धेस सामोरे जावे लागणार आहे. या पार्श्वभूमीवर ही चळवळ अधिक सक्षम, निकोप आणि व्यापक करणे ही या क्षेत्रातील प्रत्येकाची जबाबदारी ठरणार आहे.

९७व्या घटनादुरुस्तीमुळे सहकार क्षेत्रात एक नवा अध्याय सुरू होणार आहे. राज्याच्या सहकार कायद्यातही सहकारी संस्थांची व्याख्या केलेली नव्हती. घटना दुरूस्तीमध्ये पहिल्यांदाच सहकारी संस्थांची व्याख्या केली जात आहे. यातील काही तरतुदींमुळे संस्थांचे भविष्यात निर्गुंतवणुकीकरण होणार नाही, तसेच व्यावसायिक भागीदारांना घेऊनही या संस्था चालविता येणार नाहीत. त्यामुळे आपल्या सक्षमीकरणाचे मार्ग या संस्थांना स्वत:च शोधायचे आहेत. सहकार क्षेत्रात शिरलेल्या काही अपप्रवृत्ती संपविणेही आवश्यक आहे. या क्षेत्राच्या निकोप वाढीसाठी या प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी सर्वांनीच पुढे आले पाहिजे.

सहकार चळवळ ही मर्यादित प्रमाणात स्वायत्त असावी, असे मलाही वाटते. ज्यावेळी सहकारी संस्थेमध्ये एखादा गैरप्रकार सहकारी चळवळीला हानी पोहोचवत असेल अशा वेळी हस्तक्षेप करण्याचे पूर्ण अधिकार राज्य शासनाला असणे आवश्यक आहे. जागतिक परिस्थितीमुळे सहकार मोठ्या कठीण परिस्थितीतून वाटचाल करीत आहे. या चळवळीला मदत करण्याचे राज्य सरकारचे धोरण आहे. संकटकाळी सरकार नेहमीच सहकार आणि शेतकऱ्यांच्या पाठीशी राहील. ग्रामीण भागातील लक्षावधी शेतकरी, युवक, उद्योजक आणि सर्वसामान्यांच्या आयुष्याला मोलाची साथ देणारी सहकार चळवळ हे महाराष्ट्राचे आगळेवेगळे वैशिष्ट्य आहे. ते कायम टिकविणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे.

**शब्दांकन : सतीश लळीत,**
**संपर्क : ९४२२४१३८००**

# सहकार चळवळीची ताकद



अजित पवार, उपमुख्यमंत्री

महाराष्ट्रात सहकार चळवळ रुजवण्या आणि वाढवण्यात महत्त्वाचं योगदान देणाऱ्या आदरणीय यशवंतराव चव्हाण साहेबांची जन्मशताब्दी आणि आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष एकत्रितपणे साजरं होणं हा 'दुग्धशर्करा योग' आहे.

आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष संपूर्ण जगभर साजरं होत असताना, जगभरातील सहकार चळवळीला दिशा देणारी अत्यंत महत्त्वपूर्ण घटना आपल्या देशात घडली आहे. सहकारी संस्था स्थापण्याच्या अधिकाराला घटनेतच मूलभूत अधिकाराचा दर्जा देणारी ९७वी घटनादुरुस्ती अलीकडेच मंजूर करण्यात आली आहे. सहकाराच्या क्षेत्रातील हा आजवरचा सर्वांत क्रांतिकारी निर्णय म्हणता येईल. केंद्रीय कृषिमंत्री आदरणीय शरद पवार साहेबांची दूरदृष्टी आणि त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळेच ९७वी घटनादुरुस्ती केंद्रात मंजूर होऊ शकली.

सहकारी संस्था स्थापण्याच्या अधिकाराला आता घटनेतच मूलभूत अधिकाराचा दर्जा मिळाल्यामुळे राज्यातील सहकार कायद्यातही अनेक बदल आणि सुधारणा करणं आवश्यक झालं असून त्यासंदर्भातील कार्यवाही राज्य शासनानं सुरूही केली आहे.

सहकार चळवळीचा उदय पाश्चिमात्य देशांमध्ये झाला आणि सुमारे १०० वर्षांपूर्वी ब्रिटिशांनी भारतात सहकाराचा पाया घातला, असं सांगितलं जातं. असं असलं तरी आपल्या देशात आणि महाराष्ट्रातही सहकाराची संकल्पना प्राचीन काळापासूनच चांगली रुजलेली होती. त्यामुळे भारतातील सहकार चळवळीला शंभर वर्षांचा नव्हे, तर हजारो वर्षांचा गौरवशाली इतिहास आहे, असं म्हटलं तर ते चुकीचं ठरणार नाही. आपल्याकडे ग्रामीण भागात पूर्वापार चालत आलेली सहकारी तत्त्वावरील शेतीची पद्धत, बलुतेदार पद्धती किंवा वस्तूंच्या देवाणघेवाणीतून होणारी व्यवहाराची पद्धत यामुळे आपल्या देशातल्या सहकार चळवळीचं आणि या चळवळीच्या यशाचं मूळ दडलेलं आहे. आज, आपल्या देशातली सहकार चळवळ ही जगातली सर्वांत मोठी लोकचळवळ असून देशातल्या सहकार चळवळीत महाराष्ट्र सर्वांत आघाडीवर आहे. आपल्या राज्यात असं एकही गाव नसेल ज्या ठिकाणी सहकार चळवळ पोहोचली नाही.

आपल्या देशात सहकारी कायदा १९०४ मध्ये पहिल्यांदा अस्तित्वात आला आणि त्यानंतर सहकार चळवळीच्या शिस्तबद्ध वाढीस सुरुवात झाली. सहकार चळवळ ही देशातल्या अर्थकारण आणि समाजकारणाचं अविभाज्य अंग बनली. संपूर्ण महाराष्ट्र सहकाराच्या जाळ्यानं विणला गेला. सहकारी पतसंस्था, बँका, साखर कारखाने, सूत गिरण्या, खरेदी-विक्री संघ, पणन संस्था, उत्पादन संघ, उपसा जलसिंचन योजना, पाणीपुरवठा, वाहतूक, सहकारी गृहनिर्माण संस्था अशा विविध सहकारी संस्थांच्या माध्यमातून राज्यातील कोट्यवधी नागरिक या सहकार चळवळीशी जोडले गेले. समाजातील सर्वच घटकांच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनात आमूलाग्र बदल घडवण्याचं काम सहकार चळवळीनं केलं.

शेतकऱ्यांना अल्प दरानं पीककर्ज, साखर कारखाने तसंच सूत गिरण्यांना निधी उपलब्ध करून देणं, उद्योग-व्यवसायांसाठी आर्थिक मदत करणं, अशी अनेक कार्ये आज सहकार चळवळीचा कणा असलेल्या सहकारी बँका आणि पतसंस्थांसारख्या संस्थांच्या माध्यमातून होत आहेत. राज्यातील शेतकरी, कष्टकरी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनात बदल घडवून आणण्याच्या दृष्टीनं या संस्थांची भूमिका खूपच महत्त्वाची आहे. राज्य सहकारी बँकेपासून अगदी छोट्या-मोठ्या स्तरावरील सुमारे दोन ते अडीच लाख सहकारी संस्था विविध क्षेत्रात कार्यरत असून राज्याच्या विकासात योगदान देत आहेत. या सर्व संस्थांची संपूर्ण माहिती या वर्षअखेरपर्यंत संगणकाच्या एका क्लिकवर आपल्या सर्वांसाठी उपलब्ध होणार आहे.

कृषी क्षेत्राला होणारा अर्थपुरवठा हा प्रामख्याने सहकारी वित्तसंस्थांच्या माध्यमातूनच होतो. राज्याची शिखर बँक, जिल्हा बँका आणि कृषी पतसंस्थांच्या त्रिस्तरीय यंत्रणेतून सहकार चळवळ दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा पतपुरवठा शेतकऱ्यांना करीत असते. शेतकऱ्यांना अर्थपुरवठा करण्याबाबत खासगी आणि राष्ट्रीय व्यापारी बँकांचं धोरण काहीसं उदासीन असताना सहकारी वित्तसंस्था मात्र शेतकऱ्यांच्या पाठीशी नेहमीच ठामपणे उभ्या राहिलेल्या दिसतात. या सहकारी वित्तसंस्थांचं अस्तित्व हे निसर्गाची साथ आणि शेतीमालाला मिळणारा भाव या दोन घटकांवर अवलंबून आहे. हे घटक अनेकदा प्रतिकूलच ठरत असतात. त्यामुळे सहकारी संस्था अडचणीत येतात. कधीकधी तोट्यात जातात. तसं असलं तरी शेतकऱ्यांना कर्ज देण्याची बांधिलकी या संस्थांनी नेहमीच पार पाडली आहे, त्यामुळे अन्य कुठल्याही संस्थांपेक्षा सहकारी संस्था या शेतकऱ्यांना आणि सर्वसामान्य जनतेला नेहमीच आपल्या वाटत आल्या आहेत. हे सहकारी चळवळीचं सर्वांत मोठं यश आहे.

साधारणपणे चार-पाच वर्षांपूर्वी संपूर्ण जगभर आर्थिक मंदीची मोठी लाट उसळलेली आपण सर्वांनी पाहिली, काहींनी ती अनुभवलीसुद्धा. त्या लाटेत काही जणांना नोकऱ्या गमवाव्या लागल्या. उद्योग-व्यवसायांवर विपरित परिणाम झाले. परंतु, त्या लाटेतही सहकार क्षेत्राला अजिबात धक्का बसला नाही. युरोप-अमेरिकेतील सहकारी बँकांच्या वृद्धींचे प्रमाण ५० टक्क्यांनी वाढलं. आपल्या देशातही काहीसं तसंच चित्र होतं. आपल्या देशातल्या आणि राज्यातल्या अनेक सहकारी संस्थांची कामगिरी पारदर्शक कारभार, प्रामाणिकपणा, सचोटी आणि निष्ठेने कार्य करणे यामुळे अत्यंत चांगली आहे. विशेषत: कृषी आणि कृषी क्षेत्राशी संबंधित, पणन, कृषी उत्पादन प्रक्रिया म्हणजे कृषी प्रक्रियेसारख्या क्षेत्रातील सहकारी संस्थांनी सातत्याने चांगली कामगिरी केली आहे. कृषी क्षेत्राच्या विकासाला मोठा हातभार लावला आहे.

मध्यंतरी, आपल्याकडे सहकारी क्षेत्रात काही अपप्रवृत्ती आल्या. त्यामुळे काही सहकारी संस्था बंद पडल्या. परंतु, त्या घटना अपवादात्मक होत्या. एकट्या-दुकट्या पदाधिकाऱ्याच्या चुकीच्या वागण्याने किंवा एखाद-दुसऱ्या संस्थेतील भ्रष्टाचारामुळे संपूर्ण सहकार चळवळीला बदनाम करून संपूर्ण चळवळच मोडीत काढण्याचा प्रयत्न करणं योग्य होणार नाही. सहकार चळवळीत काही अपप्रवृत्ती असल्यास त्या जरूर दूर केल्या पाहिजेत; परंतु, संपूर्ण चळवळीस वेठीस धरून चालणार नाही. समाजातील कमकुवत वर्गाला, सर्वसामान्य शेतकऱ्याला, कष्टकऱ्याला मदत करण्याची ताकद केवळ सहकार चळवळीतच आहे, त्यामुळे ही चळवळ जगली पाहिजे.

**शब्दांकन : संजय देशमुख**

**संपर्क : (०२२) २२८३५७५९**

# सहकार क्षेत्र अधिक सक्षम करावयाचे आहे

**- सहकारमंत्री हर्षवर्धन पाटील**

**यंदाच्या दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना मदतीचा हात देण्यासाठी सहकारी बँका, राष्ट्रीयीकृत बँका, ग्रामीण बँका यांच्यामार्फत कर्ज उपलब्धता कशा प्रकारे करून देण्यात येणार आहे?**

या वर्षीचे (२०१२-१३) अल्पमुदत कर्जवाटपाचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. त्याप्रमाणे पीक कर्जवाटप सुरू आहे. यामध्ये कोणतीही अडचण नाही. सर्व बँकांना मिळून एकूण २४,६२९ कोटी रुपयांचे खरीप/रब्बी पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट घालून दिले आहे. त्या उद्दिष्टात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना ११,१८४ कोटी रुपये म्हणजे ४५.४१ टक्के तर, राष्ट्रीयीकृत बँकांना १२,०२७ कोटी रुपये म्हणजे ४८.४३ टक्के एवढे तसेच प्रादेशिक ग्रामीण बँकांना १,४१८ कोटी रुपये म्हणजे ५.७६ टक्के उद्दिष्ट आहे. यापैकी खरीप उद्दिष्ट १८,८६४ कोटी रुपये ठरविण्यात आले असून त्यापैकी कर्ज वाटप १५,५९३ कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत. सप्टेंबर २०१२ अखेरपर्यंत कर्ज वाटप सुरू राहणार आहे.



दुष्काळामुळे अल्पमुदत कर्जाची परतफेड होण्यास अडचणी निर्माण होतात म्हणून मागील वर्षीच्या अल्पमुदत कर्जाचे मध्यम मुदत कर्जात रूपांतर करून चालू हंगामात दुष्काळी भागात कर्ज उपलब्ध करून देण्यात येते. शेतकऱ्यांनी व्याजाची रक्कम भरणा केल्यानंतर अल्पमुदत कर्जाचे मध्यम मुदत कर्जात रूपांतर करण्यात येते. कर्जाचे समान तीन वार्षिक हप्ते करण्यात येतात. बँकांनी रूपांतरित केलेल्या कर्जापोटी बँकांना नाबार्डकडून ६० टक्के, राज्य सहकारी बँकेकडून १५ टक्के, संबंधित जिल्हा बँकेकडून १० टक्के व राज्य शासनाकडून १५ टक्के सहभाग कर्ज स्वरूपात देण्यात येतो. १५ टक्के कर्ज स्वरूपात वर्ष २०११-१२ मध्ये राज्य शासनाने खरीप आणि रब्बीची एकूण ७,००० गावे दुष्काळी म्हणून जाहीर केली. या गावांतील सहकारी कर्ज वसुली स्थगित करण्यात व अल्पमुदत कर्जाचे रूपांतर मध्यम मुदत कर्जात करण्याचे निर्देश संबंधित बँकांना देण्यात आले आहेत.

**काही जिल्हा मध्यवर्ती बँका रिझर्व्ह बँकेच्या नियमांचे पालन करण्यात कमी पडल्यामुळे त्यांना ठेवी स्वीकारण्यास मनाई करण्यात आली आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना पतपुरवठा करण्यात अडचणी निर्माण झाल्या आहेत. याबाबत कोणता निर्णय घेण्यात आला आहे?**

परवाना नसलेल्या सहा बँकांच्या कार्यक्षेत्रातील नागपूर, वर्धा, बुलढाणा, जालना, उस्मानाबाद, धुळे आणि नंदुरबार या सात जिल्ह्यांमधील शेतकऱ्यांना या बँकांकडे स्वनिधी उपलब्ध नसल्यामुळे आणि नाबार्डकडून पुनर्वित्त उपलब्ध नसल्याने कर्जवाटपात अडचणी निर्माण झाल्या होत्या.

नाबार्डकडून पुनर्वित्त उपलब्ध होईल, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून फेरकर्ज मर्यादेपोटी उचल मिळेल या अपेक्षेवर या बँकांनी २०१२-१३ हंगामाच्या सुरुवातीस त्यांच्याकडील स्वनिधीतून शेतकऱ्यांना खरीप अल्पमुदत पीक कर्ज पुरवठा दिलेला आहे. तथापि, नाबार्ड कर्ज पुनर्वित्त उपलब्ध न झाल्याने या बँकांनी शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करणे बंद केले. राज्य सहकारी बँकेने राज्य शासनाच्या निर्देशावरून या जिल्हा बँकांना फेरकर्ज मर्यादा उपलब्ध करून दिली आहे. तसेच या जिल्हा बँकांचे उर्वरित उद्दिष्ट राष्ट्रीयीकृत व ग्रामीण बँकांकडे वर्ग करण्यात आले आहे.

**अलीकडेच मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली पावसाळा सुरू होण्यापूर्वी राज्यस्तरीय बँकर्स समितीची विशेष बैठक बोलाविण्यात आली होती. यावेळी या बँकांनी शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात अनुकुलता दर्शविली आहे का?**

दि. १४ जून २०१२ रोजी मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय बँकर्स समितीची विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार उपरोक्त सहा बँकांच्या कार्यक्षेत्रातील जिल्ह्यांसाठी ठरवून दिलेले पीककर्ज वाटपाचे उर्वरित उद्दिष्ट संबंधित जिल्ह्यातील राष्ट्रीयीकृत व प्रादेशिक

**दुष्काळी परिस्थितीचा कर्जवाटपावर कोणताही परिणाम झालेला नाही. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी ८,७४३ कोटी रुपये खरीप उद्दिष्ट असताना ९,४४९ कोटी रुपये म्हणजे १०८ टक्के वितरित केले आहेत. राष्ट्रीयीकृत बँकांनी ८,९६६ कोटी रुपयांचे उद्दिष्ट असताना ५,२२५ कोटी रुपये वितरित करून ५८ टक्के उद्दिष्ट साध्य केले आहे. प्रादेशिक ग्रामीण बँकांनी ११५५ कोटींच्या उद्दिष्टापैकी ९१९ कोटी रुपये म्हणजे ८० टक्के कर्ज वाटप केले आहे.**

**– ना. हर्षवर्धन पाटील**

ग्रामीण बँकांना पुनर्वाटप (रिअलोकेशन) करून देण्यात आले आहे. या बँकांकडे त्यांच्या शाखांची कमी संख्या व मनुष्यबळ कमी असल्याने या बँकांना शेतकऱ्यांचे कर्ज मागणी अर्ज भरून उपलब्ध करून देण्यासाठी सहकार विभागाची संपूर्ण क्षेत्रीय यंत्रणा मदतीस देण्यात आली आहे. राष्ट्रीयीकृत व प्रादेशिक ग्रामीण बँकांकडून कर्ज वाटपाची प्रक्रिया सुरू आहे.

**सहकार कायद्यातील प्रस्तावित बदलांमुळे सहकार क्षेत्रात नजीकच्या काळात मोठी क्रांती होईल अशी अपेक्षा व्यक्त करणे योग्य ठरेल का?**

केंद्र शासनाने भारतीय संविधानात ९७ वी घटनादुरुस्ती केली आहे. ही घटनादुरुस्ती सहकारी संस्थांसंबंधी आहे. सहकारी संस्थांची नोंदणी करणे हा मूलभूत अधिकार म्हणून ठरविण्यात आला आहे. सहकारी संस्थांचे व्यवस्थापन स्वायत्त, लोकशाही पद्धतीने, व्यावसायिक दृष्टिकोन ठेवून करणे असा या दुरुस्तीमागील उद्देश आहे. संस्थांच्या व्यवस्थापक समितीवरील संचालकांची संख्या अधिकतम २१ व संचालक मंडळाचा कालावधी ५ वर्षे राहील अशी तरतूद करण्यात आली आहे. संस्थांच्या व्यवस्थापक समितीच्या निवडणुकीसाठी स्वतंत्र यंत्रणा उभारण्याची तरतूद आहे. संस्थांची व्यवस्थापक समिती कोणत्या कारणासाठी, किती कालावधीसाठी निष्प्रभावित करता येईल याची तरतूद करण्यात आली आहे. संस्थांचे वार्षिक लेखा परीक्षण करण्याची पद्धती व त्यासाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्याची तरतूद आहे. संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्याची मुदत व त्यात समाविष्ट करावयाचे विषय याचा समावेश आहे. सभासदांना संस्थेची माहिती उपलब्ध करून घेण्याचा अधिकार, संस्थांनी निबंधकांकडे सादर करावयाच्या माहिती व गुन्हे आणि शासकीय या संबंधीची तरतूदही आहे. राज्य घटनेतील वरील सुधारणांच्या अनुषंगाने संबंधित राज्य सरकारांनी आपल्या राज्याच्या सहकार कायद्यात आनुषंगिक बदल विहित मुदतीत (१५ फेब्रुवारी २०१३ पूर्वी) करावयाचे आहेत. या अनुषंगाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये कोणते बदल करणे अपेक्षित आहे, यासंबंधी अभ्यास करून अधिनियमातील सुधारणेचा मसुदा सादर करण्यासाठी सहकार आयुक्त व निबंधक महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली ५ जून २०१२ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे तज्ज्ञांच्या समितीचे गठन करण्यात आले आहे. समितीचे काम प्रगतिपथावर आहे.



**सहकार संजीवनी योजना म्हणजे नेमके काय आहे?**

केंद्र शासनाने अल्प मुदत सहकारी पत संरचनेच्या बळकटीकरणासाठी नेमलेल्या वैद्यनाथन् समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी करण्याचा राज्य शासनाने निर्णय घेतला. या समितीच्या शिफारशींनुसार प्राथमिक सहकारी व कृषी पतसंस्थांचे (P A C S) व्यावहारिक तोटे भरून काढणे व त्यांची आर्थिक स्थिती मजबूत करणे हा उद्देश होता. यासाठी राज्यातील २०,७९१ पॅक्सपैकी १५,०५३ पॅक्स पॅकेज अंतर्गत अर्थसाहाय्यासाठी पात्र ठरविण्यात आल्या. ५,७३८ पॅक्स अपात्र ठरविण्यात आल्या. या लगतच्या अर्थक्षम पॅक्समध्ये विलिनीकरण करण्यात याव्यात अथवा अवसायनात घेऊन रद्द करण्यात याव्यात अशी पॅकेजची अट आहे. या संस्थांची पुनर्रचना करताना ज्या संस्थांचे स्वबळावर पुनरुज्जीवन होऊ शकेल अशा पॅक्स, ज्या पॅक्सना काही अंशी आर्थिक पाठबळ देऊन पुनरुज्जीवन करणे शक्य आहे अशा पॅक्स व ज्या पॅक्सचे कोणत्याही परिस्थितीत पुनरुज्जीवन होणे शक्य नाही असे वर्गीकरण करण्यात आले आहे व त्याप्रमाणे कार्यवाही सुरू आहे. विदर्भातील शेतकरी आत्महत्याग्रस्त सहा जिल्ह्यांतील (अमरावती, बुलढाणा, यवतमाळ, अकोला, वाशिम, वर्धा) पॅकेजसाठी अपात्र ठरलेल्या सर्व पॅकसाठी प्रायोगिक तत्त्वावर राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत सहकार संजीवनी योजना लागू करण्याचा निर्णय राज्य शासनाने २० सप्टेंबर २०११ रोजी घेतला. या योजनेनुसार ज्या पॅक्स नवीन वर्षात मागील वर्षाच्या तुलनेत वाढीव कर्जपुरवठा व कर्जाची वाढीव वसुली करतील त्यांना वाढीव कर्ज वाटपाच्या दोन टक्के अथवा अधिकतम ५०,००० रुपये तसेच वाढीव कर्ज वसुलीच्या दोन टक्के व अधिकतम ५०,००० रुपये यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम 'प्रोत्साहनपर' अनुदान म्हणून देण्यात येते. त्याचप्रमाणे वाढीव कर्जवाटप व वाढीव कर्ज वसुलीसाठी संस्थेच्या ज्या गटसचिवाने प्रत्यक्ष योगदान दिले असेल त्यांना संस्थेला मिळालेल्या एकूण अनुदानाच्या १० टक्के रक्कम अथवा अधिकतम १०,००० रुपये याप्रमाणे अनुदान देण्यात येणार आहे. ही योजना २०११-१२ पासून राबविण्यात येत आहे.

**२०१२ हे 'आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष' साजरे करण्यात येत असल्याने सहकार क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी केलेल्या संस्थांना पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. या पुरस्कारांबद्दल माहिती द्या.**

सहकार क्षेत्रात उत्कृष्ट काम करीत असलेल्या व सहकार चळवळीच्या निकोप वाढीसाठी योगदान देत असलेल्या सहकार संस्थांचा, सहकार महर्षी, सहकार भूषण व सहकार निष्ठ असे ३१ पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार आहे. उत्कृष्ट सहकारी संस्थांना गौरविल्यामुळे भविष्यात अधिक चांगले काम करण्यास त्या प्रेरित होतील व उत्कृष्ट काम करणाऱ्या सहकारी संस्थांचे अनुकरण करण्यासाठी इतर सहकारी संस्थांना प्रोत्साहन मिळेल. शासनाने हा निर्णय २० एप्रिल २०१२ रोजी घेतला आहे.

सहकार महर्षी पुरस्काराची संख्या एक असून राज्यात उत्कृष्ट काम करणारी म्हणून निवड झालेल्या सहकारी संस्थेस एक लाख रुपये रकमेचा धनादेश, स्मृतिचिन्ह आणि प्रशस्तिपत्र प्रदान करण्यात येणार आहे. सहकार भूषण पुरस्काराची संख्या दहा असून प्रत्येक विभागातून उत्कृष्ट कामकाज करणारे म्हणून निवड झालेल्या प्रत्येक सहकारी संस्थेस व राज्यस्तरीय सहकारी संस्थांमधून निवड झालेल्या एका सहकारी संस्थेस ५१ हजार रुपये रकमेचा धनादेश, स्मृतिचिन्ह आणि प्रशस्तिपत्र प्रदान करण्यात येणार आहे. सहकारनिष्ठ पुरस्काराची संख्या २० असून प्रत्येक विभागातून उत्कृष्ट कामकाज करणारी म्हणून निवड झालेल्या प्रत्येकी दोन सहकारी संस्था व राज्यस्तरीय संस्थांमधून निवड झालेल्या दोन

सहकारी संस्था यांना प्रत्येकी २५ हजार रुपये रकमेचा धनादेश, स्मृतिचिन्ह, प्रशस्तिपत्र देण्यात येणार आहे. सहकार मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली अंतिम निवड व मान्यता समिती गठित करण्यात आली आहे. राज्यात महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अंतर्गत नोंदणी झालेल्या व कार्यरत असलेल्या सर्व सहकारी संस्था या पुरस्कारासाठी प्रस्ताव दाखल करण्यास पात्र राहतील. राज्यात कार्यरत असलेल्या कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे प्रस्तावदेखील पुरस्कारासाठी विचारात घेतले जाणार आहेत.

**हातमाग उद्योगाचे पुनरुज्जीवन व सुधारणा यासाठी पुनर्रचना पॅकेजमध्ये कोणत्या बाबी समाविष्ट आहेत?**

केंद्र सरकारच्या वस्त्रोद्योग मंत्रालयाने राज्य शासनाच्या प्रत्यक्ष सहभागाने ३ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेचे 'हातमाग उद्योगाचे पुनर्जीवन, सुधारणा, पुनर्रचना पॅकेज' जाहीर केले आहे. पॅकेजवरील ८० टक्के खर्च नाबार्डच्या माध्यमातून केंद्र सरकार करणार आहे. राज्य शासनाचे दायित्व केवळ २० टक्के आहे. २०१२-१३ या आर्थिक वर्षापासून राज्यात याची अंमलबजावणी होणार आहे.

**ऊसतोडणी वेळेवर होण्यासाठी ऊसतोडणी यंत्र खरेदीदारास कोणते साहाय्य करण्यात येते?**

राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत ऊसतोडणी यंत्र खरेदीसाठी सहकारी साखर कारखाने व खाजगी साखर कारखाने हे ऊसतोडणी यंत्रांच्या एकूण किमतीच्या २५ टक्के अथवा २५ लाख रुपये यापैकी जी रक्कम कमी असेल इतक्या रकमेच्या अनुदानास पात्र राहतील. याकरिता कारखान्यांचे नक्त मूल्य अधिक असणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांच्या समूह गटास अथवा स्वयंसहायता गटास हे अनुदान मिळेल. मात्र, ज्या कारखान्याच्या कार्यक्षेत्रात ते काम करणार आहेत, त्या कारखान्याचे संमतीपत्र आवश्यक राहणार आहे.

**राज्याच्या नवीन वस्त्रोद्योग धोरणामुळे किती प्रमाणात रोजगार निर्मिती होणार आहे?**

महाराष्ट्र राज्याचे वस्त्रोद्योग धोरण (२०११-१७) एप्रिल महिन्यात जाहीर करण्यात आले. शेती व्यवसायानंतर या उद्योगात जास्तीत-जास्त रोजगार निर्माण करण्याची क्षमता आहे. पुढील पाच वर्षांत राज्यात शिल्लक राहणाऱ्या ४५ लाख गाठी रुईवर विविध स्तरावरील मूल्यवर्धनाच्या प्रक्रिया करणाऱ्या वस्त्रोद्योग घटकाच्या उभारणीसाठी या क्षेत्रात एकूण ४० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आकर्षित करणे व ११ लाख नवीन रोजगार निर्मिती करणे हे या धोरणाचे उद्दिष्ट्य आहे. या धोरणांतर्गत विदर्भ, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्र येथील नवीन वस्त्रोद्योग प्रकल्पांना भांडवली गुंतवणुकीच्या १० टक्के अनुदान देण्यात येणार आहे.

**व्हिजन २०१५ची वैशिष्ट्ये काय?**

**❊ सहकार कायद्यात सुधारणा**
**❊ किसान क्रेडिट कार्डाचे वाटप ❊ कार्यक्षम नागरी सहकारी बँका चालू ठेवणे**
**❊ कार्यक्षम पतसंस्था चालू ठेवणे**
**❊ पीक कर्जपुरवठा २० हजार कोटी रुपयांपर्यंत वाढविणे.**

**उसाच्या चिपाडापासून सह वीजनिर्मिती धोरणाचे वैशिष्ट्य काय?**

एकीकडे उसाचे विक्रमी उत्पादन तर दुसरीकडे साखरेचे उतरलेले दर त्यामुळे कारखाने दुहेरी संकटात सापडले आहेत. यावर मात करण्यासाठी सह वीजनिर्मिती प्रकल्प घेणे आवश्यक झाले आहे. राज्यातील साखर कारखान्यांची गाळप क्षमता व सध्या असणारी उसाची उपलब्धता लक्षात घेता सह वीजनिर्मितीसाठी काही कारखान्यांना आर्थिक मदत मिळाल्यास असे प्रकल्प कार्यान्वित होऊन कारखान्याच्या आर्थिक उत्पन्नात भर पडेल. वीज नियामक मंडळाने दिलेला दर व सवलती पाहता कारखान्याचे वीज हे मुख्य उत्पादन व साखर हे उप उत्पादन होऊ शकेल. पर्यायाने कारखान्याची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होईल. राज्यातील विजेची समस्या व कारखान्याच्या आर्थिक संकटावर मात करण्यासाठी व ग्रामीण भागात रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध करण्याच्या व्यापक दृष्टिकोनातून, कारखान्याच्या सह वीजनिर्मिती प्रकल्पांना प्रोत्साहन देण्यासाठी शासनाने हा निर्णय घेतला आहे. सहकारी साखर कारखान्यांनी स्वतःचे १० टक्के भागभांडवल प्रथम उभे करावयाचे आहे. त्यापैकी शासनाकडून जास्तीत जास्त ५ टक्क्यांपर्यंत भागभांडवल महाऊर्जा आणि राज्य शासन यांनी ग्रीन सेसमधून उपलब्ध करून द्यावयाचे आहे. त्यानंतर साखर कारखान्यांनी बँका किंवा वित्तीय संस्थाकडून ६० टक्के रक्कम कर्ज स्वरूपात मंजूर करून घ्यावयाची आहे.

**गाळप हंगाम २०११-१२ साठी शासनाने साखर कारखान्यांना किती पूर्व हंगामी कर्ज दिले आहे?**

गाळप हंगाम २०११ - १२ मधील उसाची जास्त उपलब्धता विचारात घेता, कारखान्यांनी गाळप क्षमतेचा पूर्ण विचार करण्याच्या दृष्टीने आर्थिक अडचण येऊ नये म्हणून १८ सहकारी साखर कारखान्यांना पूर्व हंगामी कर्ज म्हणून २७ कोटी ८८ लाख रुपये व पूर्व हंगामी खर्चासाठी ११८ कोटी ९५ लाख असे एकूण १४६ कोटी ८३ लाख देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. ५० टक्क्यांपेक्षा अधिक ऊस उपलब्धता, नक्त मूल्य उणे, पूर्व हंगामी, अल्प मुदत कर्ज व ऊस दराची देय बाकी नसलेल्या राज्य बँकेकडे ८ व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडील १० अशा एकूण १८ कारखान्यांना हे कर्ज उपलब्ध करून देण्यात आले आहे. उपलब्ध असलेल्या संपूर्ण उसाचे गाळप करणे कारखान्यांना सोईचे व्हावे या दृष्टिकोनातून हा निर्णय घेण्यात आला.

**शब्दांकन : सुबोधिनी घरत**
संपर्क :(०२२) २२७९३७५१



# सहकाराचे सामर्थ्य



**सहकार राज्यमंत्री श्री. प्रकाश सोळंके यांची मुलाखत**

**खाजगी क्षेत्राच्या स्पर्धेत टिकाव धरून राहावे म्हणून सहकारी संस्थांत काय बदल व्हावेत असे आपल्याला वाटते?**

शेतकऱ्याला खाजगी सावकारांच्या तावडीतून सोडविण्यासाठी आपल्या देशात सहकार चळवळीचा जन्म झाला. गरजेपोटी जन्मलेल्या या चळवळीचे पाहता पाहता विशाल वटवृक्षात रूपांतर झाले आणि जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात सहकार चळवळीचा शिरकाव झाला. त्यामुळे सहकारी चळवळीतील वातावरण निकोप, पारदर्शक राहण्याच्या दृष्टीने शासन विविध माध्यमातून प्रयत्न करीत आहे. खाजगी क्षेत्रातील अर्थकारण, शिस्तबद्ध आणि नियोजनपूर्ण असते. खाजगी क्षेत्रात ग्राहकांना आवश्यक असलेल्या तत्काळ सेवा उपलब्ध करून दिल्या जातात. सहकार क्षेत्रालाही या स्पर्धेत टिकून राहायचे असेल तर सहकारी संस्थांनी उत्तम व्यवस्थापन अवगत करणे आवश्यक आहे. संस्थांचा कर्मचारी वर्ग हा आधुनिक तंत्रज्ञानाने प्रशिक्षित असायला हवा. ठेवीदार तसेच ग्राहकांना आकर्षित करू शकतील आणि सहकार क्षेत्राला अधिक बळकटी आणि लाभदायक ठरू शकतील असा व्यावसायिक दृष्टिकोन ठेवून संस्थांनी नवीन नवीन उपक्रम हाती घेणे, त्यांचे चांगले नियोजन करणे आवश्यक आहे. सहकारी संस्थांच्या सभासदांनी प्रत्यक्ष व्यवहारात भाग घेतला पाहिजे. सहकार अंतर्गत सहकार, लोकशाही व्यवस्थापन, किमान नफा, सेवाभावी वृत्ती, सामाजिक जबाबदारी, किमान लाभांश या सहकाराच्या मूलतत्त्वांप्रमाणे संस्थेची कार्यपद्धती असली पाहिजे.

**शेतकऱ्यांना सुलभ आणि जलद तसेच कमी व्याजदराने कर्ज मिळावे म्हणून कोणत्या योजना आहेत?**

ग्रामीण अर्थव्यवस्थेतील सावकारांचे प्राबल्य कमी करण्यासाठी संस्थात्मक पतपुरवठ्याचे जाळे उभे करणे आवश्यक आहे. त्यानुसार राज्यात त्रिस्तरीय सहकारी पतसंरचना कार्यरत आहे. शिखर स्थानावर राज्य सहकारी बँक कार्यरत आहे. जिल्हास्तरावर ३१ जिल्हा बँका तर ग्रामीण स्तरावर सुमारे २२ हजार प्राथमिक सहकारी कृषी पतसंस्था कार्यरत आहेत. या यंत्रणेकडून राज्यातील एकूण कृषी पतपुरवठ्याच्या सुमारे ६० टक्के कर्जपुरवठा करण्यात येतो. सन २०११-१२ मध्ये सहकारी पतसंरचनेकडून ९ हजार ३८५ कोटी रुपये वाटप करण्यात आले. सन २०१५ पर्यंत सहकार अंतर्गत २० हजार कोटी रुपये कर्जवाटपाचे उद्दिष्ट आहे. कर्जवाटपासाठी सुलभ व स्वस्त व्याजदराने शेतकऱ्याला ६ टक्के व्याजाच्या दराने पीक कर्ज उपलब्ध करून देण्याचे शासनाचे धोरण आहे. त्यासाठी राज्य शासन बँकांना १ टक्का दराने व्याजाची भरपाई करून देते. तसेच मुदतीत कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना तीन लाख रुपये कर्जापोटी व्याज सवलत देण्यात येते. त्यापैकी एक लाख रुपये कर्जावर तीन टक्के व त्यापुढील तीन लाख रुपयांपर्यंत कर्जफेडीवर २ टक्के व्याज सवलत देण्यात येते.

ज्या वर्षी राज्यात दुष्काळ असतो व शेतकरी अल्पमुदत कर्जाची परतफेड करू शकत नाही, असे कर्ज मध्यम मुदतीच्या कर्जात रूपांतरित करण्यात येते. या रूपांतरीत कर्जापोटी नाबार्डकडून ६० टक्के, राज्य सहकारी बँकाकडून १५ टक्के, जिल्हा बँकाकडून १० टक्के आणि राज्य शासनाचा कर्ज स्वरूपात १५ टक्के सहभाग असतो.

**सावकारांवर कठोर कारवाई करण्यासाठी नव्याने सावकारी कायदा कधी लागू होणार आहे?**

ग्रामीण भागातील अवैध सावकारी नियंत्रित करण्यासाठी महाराष्ट्र सावकारी (नियमन) विधेयक २०१० विधिमंडळात पारित करून घेण्यात आले आहे. ते सध्या केंद्र सरकारकडे मंजुरीसाठी विचाराधीन आहे. १९४६ च्या कायद्याच्या तुलनेत या प्रस्तावित कायद्यात अधिक प्रभावी व कडक तरतुदी करण्यात आलेल्या आहेत.

**सहकारी संस्थांमध्ये महिलांसाठी आरक्षण असणे हे सहकार चळवळीला कशा प्रकारे उपयुक्त ठरत आहे?**

सध्याच्या महाराष्ट्र सहकारी अधिनियमात महिलांच्या आरक्षणाबात स्वतंत्र तरतूद आहे. राज्य घटनेत झालेल्या ९७ व्या घटना दुरुस्तीमध्ये महिलांसाठी आरक्षणाची तरतूद आहे. प्रत्येक संस्थेवर दोन महिला सभासदांसाठी आरक्षण आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र सहकारी अधिनियमात आवश्यकतेनुसार सुधारणा करण्यात येणार आहेत. महिलांना आरक्षण दिल्यामुळे सहकारातील त्यांचा सहभाग वाढेल व महिलांसाठी विविध प्रकारच्या स्वतंत्र संस्था स्थापन करणे व त्यांचे बळकटीकरण करणे हे हेतू साध्य होतील.

**सहकार क्षेत्रातील आव्हानांशी मुकाबला कसा कराल?**

सहकारी क्षेत्राची विश्वासार्हता जपणे महत्त्वाचे आहे. मुळातच ही चळवळ नीतिमूल्यावर आधारित आहे. ही नीतिमूल्य व्यवस्थापक, सभासद आणि कर्मचारी यांनी जपली पाहिजेत. व्यवहारामध्ये सक्रिय सहभाग घेतला पाहिजे. पारदर्शक व्यवहार, सहकाराच्या मूलतत्त्वांप्रमाणे संस्थेची कार्यपद्धती असली पाहिजे. कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार होणार नाही, यासाठी नियंत्रण व्यवस्था तसेच खाजगी क्षेत्राशी स्पर्धा करू शकेल यासाठी कार्यक्षम कर्मचारी वर्गाची निर्मिती याकरिता कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण इत्यादीवर भर देण्यात येत आहे.

**आंतरराष्ट्रीय सहकार वर्षात महाराष्ट्राची सहकार चळवळ अग्रगण्य ठरण्यासाठी कोणते नियोजन करण्यात येणार आहे?**

ही चळवळ अधिकाधिक मजबूत करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. सहकार कायद्यात बदल, पीक कर्ज वाटपात वाढ, किसान क्रेडिट कार्ड वितरणात वाढ, कार्यक्षम नागरी सहकारी बँका व पतसंस्था ठेवणे व कमकुवत बँका व पतसंस्था निकाली काढणे इत्यादी उद्दिष्ट निश्चित करण्यात आली आहेत आणि ती उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासन प्रयत्नशील राहील.


विदर्भ, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्रातील नवीन वस्त्रोद्योग घटकांसाठी अनुदान देण्यासाठी नवीन योजना सुरू करणे, निम्न मानव विकास निर्देशांक असलेल्या जिल्ह्यांमध्ये विशेष घटक व आदिवासी उपयोजनेंतर्गत टेक्सटाईल पार्क उभारण्यासाठी अर्थसाहाय्य कसे देता येईल त्याचप्रमाणे अनुसूचित जाती, जमाती व अल्पसंख्याक समाजाच्या सहकारी तत्त्वावरील यंत्रमाग संस्थांना अर्थसाहाय्य देणे आणि यंत्रमाग घटकाच्या आधुनिकीकरणाच्या प्रकल्पास बँकेची मान्यता प्राप्त झाली असेल अशा घटकांना इतर स्रोताकडून मिळणाऱ्या सवलतीव्यतिरिक्त यंत्रसामग्रीवरील भांडवली गुंतवणुकीच्या १० टक्के अनुदान देणे इत्यादी बाबींचा समावेश असून त्यासंदर्भात संबंधित विभागाच्या सल्ल्याने स्वतंत्र निर्णय घेतले जाणार आहेत.

(पान १७ वर)

# आव्हान आणि प्रतिसाद

**सहकार चळवळीचे देशाच्या आर्थिक विकासातील महत्त्व ओळखून ९७ व्या घटनादुरुस्तीद्वारे सहकारी संस्था स्थापण्यास मूलभूत अधिकाराचा दर्जा प्राप्त करून दिला आहे. सहकारी चळवळीच्या इतिहासातील हा एक क्रांतिकारक टप्पा होय. केंद्र शासनाने ही घटनादुरुस्ती करून सहकारी चळवळीला नैतिक बळ दिले आहे.**

संयुक्त राष्ट्रसंघाने सन २०१२ हे आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष म्हणून जाहीर केले आहे, संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेमध्ये दिनांक १८ डिसेंबर, २००९ रोजी मंजूर झालेल्या ठरावानुसार, दिनांक ७ जुलै हा 'जागतिक सहकार दिन' म्हणून साजरा करण्यात यावा असे जाहीर करण्यात आले आहे. या निमित्ताने 'चांगल्या विश्व निर्मितीसाठी सहकार' हे ब्रीदवाक्य घोषित केले आहे. आमसभेचे अध्यक्ष श्री. नासिर अब्दुल अझिद अल नाशिद यांनी म्हटले आहे की, ''सामाजिक संघटना एकत्र येऊन विकास तसेच रोजगार व उत्पादनांच्या साधनातून सहकार चळवळीतील लोकसमूहाला अधिक बळकट करतील. अशी क्षमता असलेल्या सहकार क्षेत्राला प्रेरणादायी म्हणून आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाचा निश्चित उपयोग होईल.'' सामाजिक बदलासंबंधात जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये सहकार क्षेत्राने वेळोवेळी दिलेले महत्त्वपूर्ण योगदान, त्यासंबंधात केलेले प्रयत्न, रोजगार निर्मितीसाठी बजावलेली कामगिरी आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील आर्थिक घडामोडीमध्ये वेळोवेळी मात करताना बजावलेली सार्थ भूमिका लक्षणीय ठरली आहे. जगभरामध्ये सहकार क्षेत्राने उंच भरारी घेतली आहे.



सहकारी चळवळ आंतरराष्ट्रीय सहकार वर्षात एका निर्णायक टप्प्यावर येऊन पोहोचली आहे. सद्य:स्थितीत भांडवलशाही अर्थव्यवस्थेत सर्वसामान्य जनतेसाठी सहकारी चळवळीशिवाय पर्याय नाही.

### ९७ वी घटनादुरुस्ती

सहकारा संबंधातील ९७ वी घटनादुरुस्ती १२ जानेवारी, २०१२ रोजी जारी झाली आहे. आंतरराष्ट्रीय सहकार वर्षातील ही सर्वांत महत्त्वाची घटना होय. या घटनादुरुस्तीचा मुख्य हेतूच सहकारी संस्था अधिक सभासदभिमुख व व्यावसायिक व्हाव्यात व त्यांचा कारभार लोकशाही पद्धतीने चालावा हा आहे. या कायद्याने सहकारी संस्थांना खऱ्या अर्थाने स्वायतत्ता लाभणार आहे. सहकारी संस्थांवरील सरकारी नियंत्रण कमी करून / काढून टाकून सहकारी संस्थांनी स्वावलंबी व्हावे, सरकारचे भांडवल पूर्णत: किंवा अंशत: परत करावे, संचालक मंडळाच्या रचनेमध्ये बँकिंग, व्यवस्थापन, अर्थ व सहकारी संस्थांतील कामाचा अनुभव असणाऱ्या तज्ज्ञ व्यक्तींचा समावेश असावा इ. अनेक मार्गदर्शक तत्त्वांचा स्वीकार प्रस्तावित कायद्यामध्ये करण्यात आलेला आहे. सहकारी संस्थांनी त्यांची उत्पादने आणि सेवा सभासदांना देण्याबद्दल तसेच सभासदांनी संस्थेला भांडवलाचा आधार देण्याबाबत काही बंधनकारक नियम आणि सूचना या कायद्यामध्ये करण्यात आलेल्या आहेत.

### घटनादुरुस्तीतील ठळक बाबी

- सभासदांचे लोकशाही पद्धतीने नियंत्रण, सभासदांचा आर्थिक सहभाग आणि स्वायत्तता या सहकार विषयक तत्त्वांवर आधारित सहकारी संस्थांची स्थापना (नोंदणी), नियमन आणि त्या बंद करणे, (अवसायानात) – इत्यादी तरतुदी कायद्यामध्ये करणे आवश्यक राहील.
- कोणत्याही परिस्थितीत सहकारी संस्था संचालक मंडळाची मुदत निवडून आल्यापासून पाच वर्षे एवढी मर्यादित राहील. पाच वर्षांची मुदत संपण्यापूर्वी निवडणूक घ्यावी लागेल.
- संचालक मंडळ निवडणूक घेण्यासाठी राज्य शासनाने कायद्याद्वारे स्वतंत्र यंत्रणा उभी करावयाची आहे, त्यास निवडणुका घेण्यासंदर्भातील सर्व अधिकार राहतील.
- सहकारी संस्था संचालक मंडळ सदस्य संख्या जास्तीत जास्त २१ एवढी राहील. संचालक मंडळात अनुसूचित जाती किंवा जमातीसाठी एक जागा व महिलांसाठी दोन जागा आरक्षित असतील. या आरक्षित जागा या प्रवर्गातील व्यक्तिगत सभासदांपैकी असेल.
- संस्थेच्या संचालक मंडळावर वाणिज्य, बँकिंग, कायदा, व्यवस्थापन किंवा संस्थेच्या

**जगातील ९६ देशांतील एक अब्ज नागरिक या सहकारी संस्था चळवळीचे सदस्य आहेत. या संस्थांची वार्षिक उलाढाल अंदाजे ११० अब्ज डॉलर्स एवढी आहे. अडीचशे वर्षांपूर्वी सुरू झालेल्या या चळवळीने बँकिंग क्षेत्राशिवाय कृषी पतपुरवठा, पणन, प्रक्रिया, घरबांधणी, पर्यटन, विमा, मासेमारी आणि रोजगार निर्मिती, उत्पादनापासून ते विपननापर्यंत तसेच प्रक्रिया क्षेत्रातदेखील उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. जागतिकीकरणाच्या रेट्यात आणि आर्थिक मंदीच्या लाटेत अनेक देशांतील सहकारी संस्थांनी उत्पादन, वितरण, संकलन, बचत आणि संघटन या क्षेत्रात संघटित प्रयत्नाद्वारे आपला प्रभाव कायम राखला आहे. समाजाच्या सामुदायिक पद्धतीने जगण्यासाठीची चांगली व्यवस्था निर्माण करणे ही सहकाराची महत्त्वाची भूमिका ठरली आहे. त्यामुळे सहकार ही केवळ चळवळ नसून आर्थिक व्यवस्था आहे.**

उद्दिष्टाशी निगडित क्षेत्रातील दोन तज्ज्ञ संचालकांची नेमणूक स्वीकृत सदस्य म्हणून करावयाची आहे. त्यामुळे संस्थेच्या कारभारात व्यावसायिकता येईल. या स्वीकृत सदस्यांना पदाधिकारी निवडणुकीत उभे राहण्याचा किंवा निवडणुकीत मतदान करण्याचा अधिकार राहणार नाही.

- सहकारी संस्थेला त्याच्या संचालक मंडळात विशिष्ट कार्यासाठी कार्यरत संचालक (functional directors) म्हणून संबंधित व्यक्तीचा विशिष्ट व्यावहारिक उपयोग लक्षात घेऊन समावेश करता येईल.
- आर्थिक वर्ष संपल्यापासून ६ महिन्यांच्या आत सहकारी संस्थांची वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्यात येईल.
- क्रियाशील सभासद याचा अर्थ संस्थेच्या कामकाजामध्ये हितसंबंध असणाऱ्या व व्यवस्थापनामध्ये सहभागी होणाऱ्या म्हणजेच कर्जदार, ठेवीदार इत्यादींचा समावेश राहील. संस्थेच्या सभासदाने किमान किती सभांना उपस्थित राहिले पाहिजे, तसेच संस्थेच्या किमान सेवा सुविधा वापरण्याबाबत कायद्यात तरतूद असेल.
- सहकारी संस्था संचालक मंडळ विशिष्ट परिस्थितीत बरखास्त वा निलंबित करण्याचा कालावधी जास्तीत जास्त (फक्त) ६ महिने एवढाच राहील
- प्रशासकाची कारकीर्द सहा महिने एवढ्या कालावधीपुरती मर्यादित राहील.
- संस्थेच्या प्रत्येक सभासदास त्याच्या संबंधीची माहिती, त्याच्या खात्यातील दैनंदिन व्यवहाराची माहिती व हिशोब पाहता येतील. सहकारी संस्था सदस्यांना माहिती मिळवण्याचा अधिकार राहील. तसेच, सहकार शिक्षण व प्रशिक्षण देण्यासंबंधीची तरतूदही असेल.
- सहकारी संस्थांच्या कामकाजाशी संबंधित विवरणपत्रे तसेच हिशोब पत्रे विशिष्ट मुदतीत मिळवण्याचा म्हणजेच कागदपत्रे मागण्याचा व तपासण्याचा अधिकार राज्य शासनास राहील.
- सहकारी संस्थांच्या नियमबाह्य कृती व कायद्यातील तरतुदींच्या उल्लंघनाबाबत (अपराध)/दंडात्मक कारवाई करण्याचे राज्य शासनास अधिकार राहतील.
- या घटनादुरुस्तीतील तरतुदी आंतरराज्य सहकारी संस्थांना तसेच केंद्रशासित प्रदेशातील सर्व सहकारी संस्थांना लागू राहतील.

**सहकारी चळवळीची प्रदीर्घ परंपरा**

देशामध्ये ७.८ लाख एवढ्या संख्येने सहकारी संस्था कार्यरत आहेत. हजारो कोटी रुपयांची उलाढाल करणाऱ्या या संस्था देशातील १०० टक्के खेड्यापर्यंत पसरलेल्या आहेत. अंदाजे २४ कोटी सभासद असलेल्या या संस्थांमध्ये २५ टक्के वर्गीकृत जाती, ९ टक्के वर्गीकृत जमाती, २१ टक्के सीमान्त शेतकरी आणि ६ टक्के ग्रामीण कारागिरांचा समावेश आहे.

सहकारी चळवळीला मध्यंतरीच्या काळात जागतिकीकरणाच्या व खुल्या अर्थव्यवस्थेच्या स्पर्धेत गतिमान राहता आले नाही; तसेच उदारीकरणाच्या प्रक्रियेत कॉर्पोरेट व खाजगी क्षेत्राशी स्पर्धाही करता आली नाही. आधुनिक तंत्रज्ञान, बँकिंगविषयक आधुनिक संकल्पना, व्यावसायिक व्यवस्थापन आणि वैश्विक सुधारणामुळे सहकारी संस्थांना अपुऱ्या भांडवलाचा आणि कुशल मनुष्यबळाचा फटका बसला आहे. नव्या आर्थिक पर्यावरणातील आव्हानामुळे सहकार क्षेत्र आज अडचणीत आल्यासारखे दिसत आहे. आर्थिक धोरणाचे उदारीकरण, सरकारचा घटता हस्तक्षेप, तीव्र स्पर्धा, यामुळे अनेक सहकारी संस्था आजारी पडल्या आहेत किंवा त्यांच्या नियंत्रणाबाहेरील काही कारणामुळे आजारी पडू लागल्या आहेत. तरीही सहकारी कार्यकर्ते हे जनतेतून उभे राहिलेले नेतृत्व असल्यामुळे त्यांनी

**राज्यातील सहकारी चळवळीचा इतिहास आता शंभर वर्षांचा होऊन गेलेला आहे. महाराष्ट्राला सहकारी चळवळीची प्रदीर्घ परंपरा आहे. महाराष्ट्रातील सहकारी चळवळ हा देशाच्या अभिमानाचा विषय आहे. या चळवळीच्या माध्यमातून राज्यामध्ये विविध ५३ हून जास्त प्रकारच्या २.२४ लाख सहकारी संस्था कार्यरत आहेत. राज्यातील निम्म्याहून अधिक लोकसंख्या या सहकारी चळवळीशी निगडित असून या संस्थांचे ५.५० कोटींहून जास्तीचे सभासद आहेत. या संस्थांच्या माध्यमातून २० लाखाहून जास्त लोकांना रोजगाराची संधी उपलब्ध करून दिली आहे. या सर्व सहकारी संस्थांची वार्षिक उलाढाल २.३७ लाख कोटी रुपयांहून जास्त आहे.**



येणाऱ्या जोखमींचा अंदाज घेऊन स्वतःला बदलण्याची सवय करून घेतली आहे. त्यांनी कामाच्या पूर्वापार कार्यशैलीमध्ये अडकून न राहता चळवळीला गतिमान ठेवण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वेळीच पुरस्कार करण्याची तयारी दर्शविली ही सर्वांत मोठी घटना होय.

सहकार चळवळ एका संघर्षमय विचित्र परिस्थितीतून वाटचाल करीत असताना शासनस्तरावर घेतलेल्या काही निर्णयांमुळे, सहकार कायद्यातील येऊ घातलेल्या बदलामुळे आणि चळवळीतील नेतृत्वाने ठेवलेल्या दृढ संकल्पामुळे/निर्णयामुळे याही परिस्थितीतून चळवळीला दिशा सापडली, सहकारी चळवळीपुढील प्रश्नांना वाचा फुटली आणि अंतिमतः सहकारी चळवळ आंतरराष्ट्रीय सहकार वर्षात एका निर्णायक टप्प्यावर येऊन पोहोचली आहे. सहकारी संस्थांपुढील थकबाकीची जटिल समस्या, वाढता एनपीए व त्या आनुषंगाने नफा काढण्यापूर्वी कराव्या लागणाऱ्या तरतुदी, नवीन तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आलेले अपयश, तीव्र व्यावसायिक स्पर्धेतील संस्थांचा अल्प सहभाग, राजकीय हस्तक्षेप, नियंत्रणाचा ढिलेपणा, कायद्याचा धाक नसणे, ग्राहकसेवांचा दर्जा उंचविण्यात आलेले अपयश, खुली अर्थव्यवस्था व उदारीकरणाच्या प्रक्रियेत झालेली होरपळ व त्यामुळे खर्चातील झालेली वाढ इ. अनेक कारणांनी बँकिंग विषयक सुधारणांचा व्यवस्थापनामध्ये पुरेशा प्रमाणात वापर करण्यास संस्था मागे पडलेल्या आहेत, ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. त्यामुळेच व्यावसायिक व्यवस्थापन, पारदर्शक कामकाज व कार्यक्षम कारभार आणि आर्थिक शिस्त याद्वारे सुप्रशासनाची प्रतिमा निर्माण करण्यात संस्थांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे

देशातील सहकारी संस्थांची वाढती संख्या व त्यामध्ये लाखो सभासदांचा सहभाग विचारात घेता सध्याच्या आर्थिक परिस्थितीत सहकारी संस्थांनी प्रभावी भूमिका बजावण्यासाठी या संपूर्ण चळवळीचे पुनरुज्जीवन होण्याची कधी नव्हे ती गरज आज निर्माण झाली आहे.

**बी. एन. महाजन**
**संपर्क : ९८२३२२३११५**




# साखर पेरणी

महाराष्ट्रात सहकारी तत्त्वावर उभारण्यात आलेल्या साखर कारखान्याकडे राज्य शासनाने विकासाचे माध्यम म्हणून पाहण्याची दृष्टी ठेवल्यामुळे या उद्योगास राजाश्रय प्राप्त झालेला आहे. शासनाने भागभांडवल, कर्ज, अनुदान आणि शासनाची थकहमी देऊन या उद्योगाच्या विकासासाठी सर्वांगीण मदत करण्याचे धोरण शासनाने अवलंबिले आहे.

राज्यात सहकारी साखर कारखान्यांचे जाळे तयार झाल्यावर व राज्य शासनाने आवश्यक ते अर्थसाहाय्य उपलब्ध करून दिल्याने ग्रामीण महाराष्ट्रात आर्थिक स्थैर्य निर्माण झाले व साखर उद्योग हा एक स्थिर ग्रामीण रोजगार म्हणून उदयास आलेला आहे.

**महाराष्ट्रातील साखर उद्योगाची पार्श्वभूमी**

महाराष्ट्रामध्ये सन १९५० मध्ये सहकारी साखर उद्योगाची सुरुवात झालेली आहे. आज महाराष्ट्रामध्ये सुमारे २०२ नोंदणीकृत सहकारी साखर कारखाने असून त्यापैकी सुमारे १६८ सहकारी साखर कारखान्यांची उभारणी पूर्ण झालेली आहे. तसेच सुमारे ९ सहकारी साखर कारखाने उभारणीखाली असून ते नजीकच्या काळात प्रत्यक्ष साखर उत्पादनास सुरुवात करतील. सहकारी साखर कारखान्यांबरोबरच राज्यामध्ये सुमारे ५१ खाजगी साखर कारखाने प्रत्यक्ष उत्पादनाखाली आहेत.

महाराष्ट्रामध्ये साखर उद्योगामुळे ग्रामीण भागाचा सर्वार्थाने पुढीलप्रमाणे विकास झालेला आहे.

- सर्वसामान्य ऊस उत्पादक शेतकऱ्याला आपल्या ऊसाला चांगला दर मिळण्याची खात्री मिळाली आहे.
- साखर कारखान्याशी संलग्न पूरक उद्योग आणि साखर उद्योगामधून ग्रामीण भागामध्ये मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती झालेली असून या उद्योगामधून सुमारे १.५ लाख प्रत्यक्ष रोजगार आणि ७ लाख अप्रत्यक्ष रोजगार निर्माण झालेले आहेत.
- या उद्योगातून केंद्र व राज्य शासनाला प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करामधून महसूल प्राप्त होत आहे. त्यातून ग्रामीण भागामध्ये विविध योजना राबवणे शासनास शक्य झालेले आहे.
- रस्त्यांचा विकास करणे शक्य झालेले आहे. या कारखान्याकडून ग्रामीण भागामध्ये साखर शाळा चालविण्यात येत असल्यामुळे शिक्षणाच्या चांगल्या सुविधा ग्रामीण भागात निर्माण झाल्या आहेत.
- ग्रामीण भागामध्ये मोठ्या प्रमाणावर वैद्यकीय सुविधा पुरविण्यात येत आहेत.
- सामान्य जनतेसाठी आवश्यक असणारी विविध उत्पादने उदा. साखर, खांडसरी, गूळ, वीज, मद्य, इथेनॉल, अल्कोहोल आणि कागद इत्यादी बाबी मोठ्या प्रमाणावर उत्पादित करण्यात येतात.
- राज्यातील वीजटंचाई विचारात घेता सहकारी साखर कारखान्यांमार्फत राबविण्यात येणाऱ्या सह वीजनिर्मिती प्रकल्पातून उपलब्ध होणाऱ्या विजेमुळे राज्यातील भारनियमन काही अंशी कमी होण्यास मदत होणार आहे.

**प्रारंभीच्या अपयशाची कारणे**

सुरुवातीच्या काळातील साखर उद्योगासमोरील अडचणी/ आव्हाने याचा साकल्याने विचार करता सर्वसाधारणपणे खालील महत्त्वाच्या कारणांमुळे साखर उद्योग आर्थिकदृष्ट्या अपेक्षेइतका



किफायतशीर ठरला नाही.

१. आधुनिक तंत्रज्ञान, अद्ययावत प्रशिक्षण आणि यंत्रसामग्री यांचा वापर आवश्यकतेप्रमाणे झाला नाही.

२. उसाच्या हेक्टरी जास्त उत्पादन देणाऱ्या आणि जास्तीत जास्त साखर उतारा देणाऱ्या सुधारित वाणांच्या संशोधनाचा आणि प्रत्यक्ष वापराचा अभाव.

३. साखर उद्योगाच्या विकासासाठी दूरगामी प्रभावी उपाययोजना आणि त्यांची अंमलबजावणी यांचा अभाव.

४. साखर उद्योगामधील उपपदार्थांचे उत्पादन घेण्याबाबत विशेष पाठपुरावा नसणे.

५. उसाची लागवड आणि तोडणी व वाहतुकीचा प्रभावी कार्यक्रम राबविण्याबाबत अनास्था.

६. आवश्यकतेपेक्षा जादा कामगार भरती व व्यावसायिक व्यवस्थापनाचा किमान वापर.

७. व्यावसायिक व्यवस्थापन, कौशल्यामध्ये सुधारणा, क्षमता विकास आणि आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करण्याबाबत आवश्यक ते प्रयत्न झाले नाहीत.

८. कार्यक्षेत्रामध्ये कारखान्यांकडून गरजेइतका ऊस उपलब्ध होण्याकरिता ऊस विकास योजना राबविण्याबाबत आवश्यक ते प्रयत्न झालेले नाहीत.

**महाराष्ट्रातील साखर उद्योगाची सद्यःस्थिती**

भारतामध्ये उत्तर प्रदेश हे राज्य ऊस उत्पादनात अग्रेसर असले तरी हेक्टरी ऊस उत्पादकता, साखर उत्पादन यात महाराष्ट्र अग्रेसर आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी साखर उद्योग हा खऱ्या अर्थाने संजीवनी ठरलेला आहे. विविध करांच्या रूपाने साखर उद्योगामधून केंद्र व राज्य शासनास सन २०११-१२ या आर्थिक वर्षात अंदाजे रु. १६०३.५१ कोटी इतका महसूल प्राप्त झालेला आहे.

**साखर उद्योगासमोरील आव्हाने**

साखर उद्योगाचा विकास होण्यामध्ये खालील आव्हाने आहेत.

१. उसाच्या प्रगत जातींचा विकास व प्रसार.

२. पट्टा पद्धत, सेंद्रिय खतांचा वापर, पाणी व माती परीक्षण, एक डोळा पद्धतीने उसाची लागवड, योग्य आंतरपीक निवड, पाचट व्यवस्थापन.

३. ठिबक सिंचनाचा वापर करून उसाची उत्पादकता वाढविण्यासाठी प्रभावी ऊस विकास कार्यक्रम राबविण्याबाबत व्यवस्थापनाचा पुढाकार.

४. आवश्यकतेइतकीच कर्मचारी भरती आणि व्यावसायिक व्यवस्थापन.

५. कार्यक्षेत्रामध्ये गाळपासाठी पुरेसा ऊस उपलब्ध होण्याकरिता ऊसविकास कार्यक्रम.

६. आधुनिक तंत्रज्ञान आणि यंत्रसामग्री यांच्या वापराबाबत प्रचार व प्रसार.

७. साखर उद्योगाचे नियमित परिव्यय लेखापरीक्षण, ऊर्जा लेखापरीक्षण, प्रदूषण लेखापरीक्षण.

८. साखर उद्योगामध्ये व्यावसायिक पद्धतीचे व्यवस्थापन करण्याकरिता आवश्यक असणाऱ्या ज्ञानाचा वापर.

९. उद्योगासाठी आवश्यक असणाऱ्या विविध खरेदी व विक्री प्रक्रियेकरिता ई-टेंडरिंग, ई-ऑक्शन व ऑनलाइन सेल यासारख्या प्रगत पद्धतीचा वापर.

१०. कार्यक्षेत्रामध्ये ऊस विकास योजना राबविण्याकरिता स्वतंत्र ऊस विकास विभागाची निर्मिती.




साखर उद्योगामधील सर्व आवश्यक माहिती सर्वसामान्यांना उपलब्ध करून देण्याकरिता साखर आयुक्तालयाने www.mahasugarcom.gov.in हे संकेतस्थळ विकसित केलेले आहे. त्याचबरोबर महाराष्ट्र शुगर इन्फर्मेशन सिस्टीम विकसित करून साखर उद्योगाला दैनंदिन कामकाज आधुनिक पद्धतीने करण्याकरिता सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. ऑनलाइन साखर विक्रीबाबतचे सॉफ्टवेअर विकसित करण्याचे कामही अंतिम टप्प्यात आहे.

**शासन स्तरावरून उपलब्ध करून देण्यात आलेल्या सुविधा**

राज्यातील सुमारे १७० सहकारी व खाजगी साखर कारखान्यांनी सन २०११-१२ मध्ये प्रत्यक्ष गाळप घेतलेले आहे. साखर उद्योगामध्ये साखर उत्पादनाबरोबरच सह वीजनिर्मिती, अल्कोहोल निर्मिती, इथेनॉल निर्मिती, देशी/विदेशी मद्यनिर्मिती, कागद/पार्टीकल बोर्ड उत्पादन, जैविक खत उत्पादन, बायोगॅसनिर्मिती यासारखे बरेच उपपदार्थ उत्पादित करण्यात येत आहेत.

राज्यातील सहकारी साखर उद्योगाच्या विकासाकरिता राज्य शासनाने खालील विविध मार्गांनी साखर उद्योगास मदतीचा हात दिलेला आहे.

१. सहकारी साखर कारखान्यांना सह वीजनिर्मिती प्रकल्प उभारण्याकरिता प्रकल्प खर्चाच्या ५% इतके शासकीय भागभांडवल देण्याबाबतचा धोरणात्मक निर्णय.

२. अडचणीच्या वेळी ऊस खरेदी कराचे बिनव्याजी कर्जात रूपांतर करण्याची योजना.

३. सह वीजनिर्मिती प्रकल्प उभारणी करण्यासाठी सहकारी साखर कारखान्यांना ऊस खरेदी करातून सवलत.

४. आर्थिकदृष्ट्या अडचणीत आलेल्या सहकारी साखर कारखान्यांना वित्तीय संस्थांकडून पूर्वहंगामी व अल्पमुदती कर्ज घेण्यासाठी थकहमी.

५. कार्यक्षेत्रातील ऊस वाहतुकीसाठी रस्ते विकसित करण्याकरिता रस्ते अनुदान.

६. संशोधन आणि प्रशिक्षणाचे काम करणाऱ्या वसंतदादा साखर संशोधन संस्थेस शासनाकडून दरवर्षी व्यवस्थापकीय अनुदान.

७. गाळप हंगामामध्ये अतिरिक्त उसाचा प्रश्न उद्भवल्यास शासनाकडून संपूर्ण उसाचे गाळप करण्याकरिता प्रयत्न.

८. साखर उतारा घट अनुदानाच्या माध्यमातून मदत.

९. ऊसतोड कामगारांची कमतरता विचारात घेऊन ऊस तोडणीकरिता यांत्रिक पद्धतीचा वापर.

१०. ऊसतोडणी यंत्र खरेदी करणाऱ्या व्यक्ती/संस्थेस प्रति ऊस तोडणी यंत्र रु. २५.०० लाख इतके अनुदान.

११. अतिरिक्त ऊस उत्पादनामुळे ऊस उत्पादकांचा ऊस गाळपाअभावी शेतामध्ये शिल्लक राहिल्यास उभ्या उसाला अनुदान.

१२. साखर उद्योगाकडून केंद्र शासनाने कारखानानिहाय उपलब्ध करून दिलेल्या कोट्याप्रमाणे साखर निर्यात करणाऱ्या साखर कारखान्यांना शासनाकडून प्रोत्साहन म्हणून साखर निर्यात अनुदान.

१३. साखर उद्योगामध्ये नव्याने येणाऱ्या संकल्पना आणि नवीन तंत्रज्ञान व्यवस्थापनापर्यंत पोहोचविण्याकरिता कार्यशाळा आणि प्रशिक्षण शिबिरे.

१४. नवीन साखर कारखान्याला हवाई अंतर प्रमाणपत्र देताना अस्तित्वातील साखर कारखान्यापासून १५ कि.मी.ऐवजी २५ कि.मी. हवाई अंतर करण्यात आलेले आहे. जेणेकरून साखर कारखान्यांची ऊस उपलब्धतेची गरज आणि संख्या यावर नियंत्रण राहू शकेल.

सन २०२० पर्यंत सुमारे १५० सहकारी साखर कारखाने कार्यक्षमपणे प्रत्यक्ष उत्पादनाखाली कार्यरत राहतील. तसेच खाजगी क्षेत्रामध्ये नवीन साखर उद्योग उभारणीचा सध्याचा वेग विचारात घेता सन २०२० पर्यंत राज्यातील खाजगी साखर उद्योगांची संख्या ३५ वरून १०० ते ११० पर्यंत वाढणे शक्य आहे.

**राज्यातील सहकारी साखर उद्योग भविष्यात अधिक उत्पादनक्षम व किफायतशीर होण्याच्या दृष्टीने खालील उपाययोजना करण्यात येत आहेत.**

१. सहकार क्षेत्रातील आजारी सहकारी साखर कारखान्यांची संख्या निश्चित करून आर्थिकदृष्ट्या किफायतशीर ठरू शकणाऱ्या आजारी सहकारी साखर कारखान्यांचे अर्थिकदृष्ट्या सक्षम साखर कारखान्यामध्ये विलीनिकरण करणे प्रस्तावित आहे.



अर्थिकदृष्ट्या किफायतशीर नसणारे सहकारी साखर कारखाने अवसायनात काढून त्यांचे कामकाज संपुष्टात आणणे प्रस्तावित आहे.

२. सहकारी साखर कारखान्यांकडील वित्तीय संस्थांची थकबाकी कमी करण्यासाठी सर्वंकष एकरकमी परतफेड योजना तयार करून वित्तीय संस्थांची देणी कमी करणे आणि त्याचबरोबर त्या वित्तपुरवठ्यासाठी राज्य शासनाने दिलेल्या थकहमीची शासनाची जबाबदारीदेखील कमी करणे प्रस्तावित आहे.

३. राज्यातील ७५% सहकारी साखर कारखान्यांमध्ये सह वीजनिर्मिती आणि मद्यार्कनिर्मिती प्रकल्प राबविण्यासाठी सहकारी साखर कारखान्यांना उत्तेजन देण्यात येणार आहे. तसेच सह वीजनिर्मिती प्रकल्पांना मंजुरी दिल्यानंतर त्यांच्या प्रकल्प खर्चाच्या ५% शासकीय भाग भांडवल त्यांना देण्यात येणार आहे.

४. सहकारी साखर कारखान्यांकरिता माहिती व्यवस्थापन प्रणाली तयार करून त्याद्वारे त्यांच्या कामकाजावर प्रभावी नियंत्रण ठेवणे प्रस्तावित आहे. तसेच त्यांनी सुयोग्य पद्धतीने उत्पादित केलेल्या मालाच्या विपणनासाठी त्यांना मदत करण्यात येणार आहे. त्याकरिता स्वतंत्र वेबपोर्टल विकसित करण्यात येणार आहे. तसेच ई-ट्रेडिंग आणि ई-टेंडरिंगच्या सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

५. ऊस उत्पादकांना वेळेवर त्यांनी साखर कारखान्यास दिलेल्या उसाचे देयक अदा करण्याकरिता आणि त्याचबरोबर साखर कारखान्याच्या कामगारांना वेळेवर वेतन अदा करण्याकरिता स्वतंत्र वेबपोर्टल विकसित करण्यात येणार आहे.

६. ब्राझीलप्रमाणे महाराष्ट्रातही साखर कारखान्यात ऑटोमेशन करणे, मागणी पुरवठ्याप्रमाणे साखर उत्पादन सीमित ठेवणे, अतिरिक्त उसाचा रस इथेनॉल बनविण्यासाठी वापरणे, इथेनॉलमिश्रित इंधन वाहनासाठी वापरणे, सांडपाणी व्यवस्थापनामध्ये बायोगॅस व कंपोस्ट तंत्रज्ञान वापरणे व को-जनरेशन प्रकल्प राबविण्यात येणार आहेत.

७. राज्यातील साखर उद्योगाच्या सर्वांगीण विकासासाठी शुगर कॉम्प्लेक्स उभारून त्याच्या माध्यमातून साखर उद्योगाला आवश्यक असणाऱ्या सर्व सोयी आणि सुविधा उपलब्ध करून देणे.

८. सन २०२० पर्यंत ऊस उत्पादनामध्ये भरघोस वाढ होण्याच्या दृष्टीने ठिबक सिंचन, सेंद्रिय शेती, सूक्ष्म अन्नद्रव्यांचा वापर आणि अधिक उत्पादन देणाऱ्या उसाच्या सुधारित जातींची लागवड करून तामिळनाडू राज्याइतकी म्हणजेच प्रति हेक्टर १०० टनापर्यंत ऊसाचे सरासरी उत्पादन वाढविणे आणि १२.५० टक्क्यांपर्यंत सरासरी साखर उतारा वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत.

९. उसाचा उत्पादन खर्च मर्यादित ठेवून ऊस उत्पादन खर्चामध्ये काटकसर करण्यासाठी विविध उपाययोजना राबविणे प्रस्तावित आहे.

१०. ऊस उत्पादकांच्या वैयक्तिक ऊस उताऱ्याशी निगडित दर देणे ही काळाची गरज असल्याने भविष्याचा विचार करता असे तंत्र विकसित करण्याबाबत ऊस संशोधन संस्थांना प्रोत्साहित करून त्यांच्याकडून असे तंत्र विकसित करून घेणे प्रस्तावित आहे.

११. ऊसतोडणी व वाहतूक करणाऱ्या यंत्रणांना साखर कारखान्यांनी दिलेल्या ऊसतोडणी ॲडव्हान्सच्या रकमा मोठ्या प्रमाणावर थकल्यामुळे ऊसतोडणी व वाहतूक करणाऱ्या मुकादमांची नोंदणी करून याबाबत स्वतंत्र यंत्रणा विकसित करण्यात येणार आहे.

१२. साखर कारखान्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये प्रायोगिक तत्त्वावर ऊस विकास कार्यक्रम राबविण्याकरिता कृषी विभागाच्या क्षेत्रीय यंत्रणेचा वापर करून पायलट प्रोजेक्ट तयार करण्यात येणार आहे. हा पायलट प्रोजेक्ट राबविण्याकरिता कृषी विद्यापीठांशी सामंजस्य करार (Memorandum of Understanding) करण्यात येणार आहे. योग्य व परिपूर्ण प्रकल्प अहवाल मंजुरीनंतर साखर कारखान्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये कृषी विभागाच्या विविध योजना राबविण्यात येतील.


**विजय सिंघल,**

साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे

**संपर्क :** ८००७००२००१

# सातासमुद्रा-पलीकडचा सहकार



जगातील सहकारात अत्यंत पुढारलेल्या इंग्लंडमधील सहकारी ग्राहक चळवळ अडचणीत आली आहे. रशियासारख्या बलाढ्य देशातील सामुदायिक सहकारी शेतीचे रूपांतर निगम शेतीमध्ये झाले आहे. सहकारी चळवळीतील कार्यकर्ते अभ्यासक आणि सामान्य सभासद यांना आपली सहकारी चळवळ टिकून राहणार का, असा प्रश्न भेडसावत आहे. सहकारी चळवळीसमोर आता दोनच पर्याय शिल्लक आहेत. पहिला पर्याय म्हणजे कमकुवत सहकारी संस्थांनी आपले अस्तित्व नाहीसे करणे अथवा कारभार गुंडाळणे आणि दुसरा पर्याय म्हणजे सहकारी संस्था कशा टिकून राहतील यासाठी नवनव्या व्यवस्थापन कौशल्याचा अंगीकार करून आपली ताकद खाजगी संस्थांबरोबर निर्माण करणे, वाढविणे.

विदेशातील विविध प्रकारच्या सहकारी संस्थांचा अभ्यास केल्यास असे दिसून येते की, आपल्या सहकारी चळवळीला काही किमान गोष्टी अंगीकाराव्या लागणार आहेत. तसे केले तरच सहकारी चळवळीचे अस्तित्व राहील आणि सामान्य सभासदांची सेवा करता येईल. जगात उत्पादनाचे चार प्रकार आहेत. ते म्हणजे स्वयंरोजगार- यामध्ये एकूण रोजगारापैकी सुमारे ९० टक्के लोक गुंतले आहेत; आणि बाकीचे क्षेत्र म्हणजे निगम क्षेत्र, सार्वजनिक क्षेत्र आणि सहकारी क्षेत्र यामध्ये विभागले आहेत. आजच्या परिस्थितीत भारतासारख्या देशाला विदेशातील सहकारी चळवळीपासून काय बोध घेता येईल. जर विविध देशांचा अभ्यास केला तर असे दिसून येते की, सहकारी चळवळ ही खाजगी क्षेत्राला एक चांगला पर्याय होऊ शकेल. त्यासाठी आपण काही देशांतील सहकारी चळवळींचा अभ्यास केला पाहिजे.

कॅनडा आणि अमेरिका या देशांत अद्यापही सहकारी बाजार संस्था यशस्वीपणे काम करीत आहेत. या देशांत 'कृषी बाजार' आणि विजेच्या वितरणाचे काम सहकारी संस्था करीत आहेत. मात्र, काही सहकारी संस्थांनी जागतिकीकरणाच्या धास्तीने आपले रूपांतर सहकारी कंपनीमध्ये करून सभासदांची सेवा अखंडपणे चालू ठेवली आहे. सहकारी चळवळीची सर्व तत्त्वे आचरणात ठेवूनही संस्था कंपनी व्यवहार करू शकते, हे त्या देशांत शक्य झाले आहे.

रशियामध्ये एकेकाळी साम्यवाद असताना तेथे सर्व काम सहकारी पद्धतीने केली जात. या देशात आता राजकीय विभागणी झाल्यामुळे तेथे आता साम्यवाद अस्तित्वात नाही, तरीदेखील पूर्वीची सर्व कार्ये सहकारी पद्धतीवर केली जात आहेत. तेथे अस्तित्वात असलेली सामुदायिक शेती आणि ग्राहक सहकारी संघ संपूर्ण देशभर एकाच सहकारी व्यवस्थापनाखाली काम करून व्यवस्थापकीय खर्चात काटकसर केली आहे. नेमकी ही बाब भारतासारख्या देशात तोट्यात चाललेल्या सहकारी संस्थांच्या कार्यकर्त्यांच्या ध्यानात येऊ नये ही दुर्दैवाची बाब आहे. जपाननेसुद्धा आपले सहकारी चळवळीतील पूर्वीचे स्वरूप बदलून टाकले आहे. जपानमध्ये सुमारे १५,००० बहुद्देशीय सहकारी संस्था विविध गावांमध्ये काम करीत होत्या. आता त्यांचा नफा कमी होऊ लागल्याने त्यांनी या सर्व सहकारी संस्थांचे फक्त ५०० संस्थांमध्ये विलीनीकरण करून त्यांच्या अस्तित्वाला बळकटी दिली आहे. एवढेच नव्हे, तर काही बहुद्देशीय सहकारी संस्थांची संख्या १ लाख ५ हजारपेक्षा जास्त आहे. मात्र, त्यापैकी फक्त २० ते २५ टक्के संस्था अर्थक्षम आहेत. प्रत्येक संस्थेला स्वत:ची इमारत, पूर्णवेळ सचिव यासारख्या बाबींची उणीव भासत आहे. या उणिवांवर मात करावयाची असेल तर भारतात बहुउद्देशीय सहकारी संस्थांची संख्या एका तालुक्याला फक्त एकच अशी ठेवावी लागेल.

आपल्या देशाच्या शेजारी असलेल्या इराण, अफगाणिस्तान, श्रीलंका, नेपाळ, चीन यासारख्या देशांतही जागतिकीकरणानंतर सहकारी चळवळ टिकून आहे. मात्र, या सर्व देशांनी वेळोवेळी आपल्या कामकाजात लवचिकता आणून सहकाराचे अस्तित्व टिकवून ठेवले आहे.

जगात सुमारे ७५ पेक्षा जास्त देशांत सहकारी संस्थांचे अस्तित्व आहे. जगात असा कोणताही एक देश नाही की ज्या देशात सर्व प्रकारच्या सहकारी संस्था अस्तित्वात आहेत. देशाची

**कॅनडामध्ये सहकारी पतसंघ (Credit Unions) अस्तित्वात होते. या संघानेच जगात सर्वप्रथम 'क्रेडिट कार्ड'ची कल्पना व्यवहारात आणली. अमेरिकेत शेती संस्थानी शेतकऱ्यांचा विमा उतरवण्याचे कार्य जोडीला घेऊन आपला फायदा वाढविला आहे. याच देशात काही ग्राहक संस्थांनी आपल्या सहकारी बँका उघडून तेथे मिळणारा पैसा सहकारी ग्राहक संस्थांसाठी वापरला आहे. डेन्मार्कसारख्या कृषी प्रधान देशात जागतिकीकरण येऊन दोन दशके पूर्ण होत असताना देखील त्यांच्या दूध संस्था, कुक्कुटपालन, वराहपालन, लोणी निर्यात संस्था, पशु उत्पादन संस्था पूर्वीच्याच जोमाने कार्यरत आहेत. नेदरलँडस्‌मध्ये एक मोठी 'रोबो बँक' सहकारी पद्धतीने काम करीत आहे. छोट्या छोट्या बँकांचे रूपांतर रोबो बँकेत करून सहकाराचे अस्तित्व टिकविता येते, याची त्या देशाने शिकवण दिली आहे. अशी एक बँक जपानमध्ये नोरीच्युकिन (NORICHUNKIN) या नावाने कार्यरत आहे. ही बँक मल्टीनॅशनल को-ऑप. म्हणून विविध देशांत काम करीत आहे. सहकारी बँकांना अस्तित्व टिकविणे धोक्याचे वाटू लागल्याने त्यांनी आपले रूपांतर खाजगी परंतु पूर्वीच्या सहकारी मार्गानेच टिकविण्याचा प्रयत्न चालू ठेवला आहे. या मार्गाचे अनुकरण भारतातसुद्धा करण्याची वेळ आली आहे. फ्रान्समध्येही कृषी क्षेत्रात एकच मोठी बँक कार्यरत आहे.**

भौगोलिक परिस्थिती, तेथील राजकीय व्यवस्था, आर्थिक संस्थांची उपलब्धता, सरकारचे धोरण यावर सहकारी चळवळीचे अस्तित्व दिसून येते. ज्या देशात सहकारी चळवळ यशस्वीपणे कार्यरत आहे, त्या देशातील सहकारी कार्यकर्त्यांनी आणि तज्ज्ञांनी खरोखरच कार्यक्षम व्यवस्थापनातील काही बाबींचे निश्चितपणे पालन केलेले असले पाहिजे. जागतिकीकरण, आर्थिक मंदी, स्पर्धा, शासकीय

**विदेशातील सहकारी चळवळीमध्ये प्रकर्षाने जाणवणारी एक बाब म्हणजे तेथील सहकारी संस्थांमध्ये महिला व युवकांना दिलेला सहभाग होय. या घटकांचा समावेश जास्तीत जास्त ठेवल्यास सहकारी संस्थेच्या व्यवहार वाढीस मदत होईल. परदेशातील सहकारी संस्थेत काम करणारी एखादी व्यक्ती राजकीय पक्षात प्रवेश केल्यास त्या व्यक्तीचे सहकारातील सदस्यत्व अबाधित असते मात्र त्याची सहकारी व्यवस्थापनातील ढवळाढवळ पूर्णपणे नामशेष होते.**

धोरणे या सर्वांना सामोरे जाऊन सहकारी चळवळ यशस्वी करावयाची असेल तर भारतासारख्या देशात काही उपाययोजना हाती घेतल्या पाहिजेत.

शासकीय मदत जरूर द्यावी पण त्याबरोबर कारण नसताना जाचक बंधने घातली जाऊ नयेत. उत्कृष्टपणे व्यवस्थापन असलेल्या गुजरातमधील अमूल संस्थेवर गुजरात सरकारने कारण नसताना प्रशासकाची नेमणूक केली होती. तर तामिळनाडूत गेल्या २०-२५ वर्षांपासून फायद्यात असलेल्या जिल्हा व राज्य पातळीवरील सहकारी संस्थांच्या निवडणुका न घेता तेथे राजकीय व्यक्तींची प्रशासक म्हणून नियुक्ती केली.

दुसरी आवश्यक बाब म्हणजे सहकारी संस्थांचे व्यवस्थापन 'सहकारी मूल्यांवर' आधारित असले पाहिजे. सहकारी संस्थेचा व्यवस्थापक व्यावसायिक व्यवस्थापनात तज्ज्ञ असला पाहिजे. अमेरिकेत पॉलिसी बोर्ड आणि एक्झ्युकेटिव्ह बोर्ड अशी दोन मंडळे एकाच संस्थेत एकमेकाला मदत करीत असतात. ही पद्धती आपल्या देशातही स्वीकारली तर अधिक हिताचे ठरेल.

तोट्यात चालणाऱ्या सहकारी संस्थांना जर नफ्यात आणावयाचे असेल तर अशक्त संस्थांचे सशक्त संस्थांमध्ये विलीनीकरण केले पाहिजे, अशावेळी दोन्हीही संस्थांच्या संचालकांनी सामान्य सभासदांचे हित लक्षात घेऊन संस्थांचे विलीनीकरण करण्यात मागेपुढे पाहू नये. स्वीडन, नार्वे, डेन्मार्क, जपान या देशांत हा मार्ग स्वीकारून त्या संस्था उत्कृष्टपणे कार्यरत आहेत. ब्राझीलमधील एक सहकारी संघ मोडकळीस आलेल्या सहकारी खरेदी-विक्री संस्थांच्या विलीनीकरणातून उदयास आला असून त्यांनी आता निर्यात व्यवसायात पदार्पण केले आहे. आपल्या देशात ग्राहक सहकार मोडीत निघत आहे, यावर एकत्रीकरण हाच उत्तम उपाय आहे.

**जागतिकीकरणात जर टिकून राहावयाचे असेल तर सहकारातील संस्थांचे रूपांतर कंपनीमध्ये केले पाहिजे. ऑस्ट्रेलियातील एक मोठा सहकारी दूध संघ एका कंपनीत रूपांतर होऊन आपल्या पूर्वीच्याच सभासदांची सेवा सहकारी मार्गानेच घेत आहे.**

सहकारी कायद्याऐवजी कंपनी कायदा अनेक वेळा फायदेशीर ठरतो. जर उपरोक्त उल्लेख केलेले उपाय योजूनही सहकारी संस्था फायद्यात चालत असेल तर संबंधित सहकारी संस्थेने आपल्या व्यवसायास पूरक असे इतर नवीन व्यवसाय

**इराणमध्ये कलाकारांच्या सहकारी संस्था उत्कृष्ट सतरंजीचे उत्पादन करून ते युरोपमध्ये विकत आहेत. तसेच तेथे सहकारी पद्धतीवर दवाखाने अस्तित्वात आहेत. जगात कोठेही अस्तित्वात नसलेली सहकारी पद्धतीवरील आराम बस सेवा १५० गाड्यांच्या ताफ्यासह जनतेच्या प्रवासी वाहतूक सेवेत कार्यरत आहे.**

चालू करावेत. असे केल्यामुळे त्या सहकारी संस्थेला आपल्या उपविभागातून नफा मिळत राहतो. इफको या खत निर्मिती संस्थेने आपल्या खत विक्रीबरोबर ग्रामीण भागात शेतकी बँका स्थापन करून शेतकऱ्यांना कर्जपुरवठा आणि शेतकरी विमा सेवा देण्याचा संकल्प सोडला आहे. एचडीएफसी या गृहकर्ज देणाऱ्या संस्थेने गृहकर्जाबरोबर एचडीएफसी बँक निर्माण करून एका दगडात दोन पक्षी मारले आहेत. अशा चांगल्या घटना सहकारी क्षेत्रात का बरे घडू नयेत? आपणास जर खरोखरच सहकारी संस्था टिकवायच्या असतील तर राजकारणातील सहभाग कमी आणि सहकारी संस्थांतील सहभाग अधिक वाढविणे आणि उत्कृष्ट व्यवस्थापनाचा स्वीकार करणे आवश्यक आहे. आपल्या देशात अमूल, वारणा सहकारी परिसर, प्रवरानगर, तामिळनाडूतील सहकारी सर्पालय आणि सहकारी आयुर्वेद दवाखाने आजच्या जागतिकीकरणाच्या रेट्यातही टिकून आहेत व उत्कृष्टपणे काम करीत आहेत.

**प्रा.डॉ. जे. के. पवार**
संपर्क : ९४२०५८६६२२

❒ ❒

# सहकाराचे सामर्थ्य

आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०१२

(पान १० वरून)

**सहकारातही स्वतंत्र निवडणूक यंत्रणा निर्माण केली जाणार आहे. या बाबत प्रक्रिया सुरु झाली आहे ?**

सहकारी संस्थांच्या निवडणूका तीन प्रकारे घेतल्या जातात. विनिर्दीष्ट सहकारी संस्थांच्या निवडणूका जिल्हाधिकारी यांच्याकडून घेतल्या जातात. अधिसूचित सहकारी संस्थांच्या निवडणुका सहकार विभागाच्या यंत्रणेकडून व इतर सहकारी संस्थांच्या निवडणुका संबंधीत संस्थांकडून घेतल्या जातात. भारतीय राज्य घटनेत ९७ वी घटना दुरुस्ती करण्यात आली असून या घटना दुरुस्तीनुसार निवडणुकीसाठी स्वतंत्र यंत्रणा उभारण्याची तरतूद आहे. तसेच संस्थांच्या व्यवस्थापक सदस्यांची संख्या मर्यादित करण्यात आलेली आहे. अनुसूचित जाती -जमाती तसेच महिलांसाठी आरक्षणाची तरतूद देखील समाविष्ट करण्यात आली आहे. राज्याच्या कायद्यात अशी यंत्रणा उभारण्या संदर्भात आवश्यक त्या सुधारणा करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

**शब्दांकन : मुक्ता पवार**
संपर्क : ९८१९९१९४२३

❒ ❒

# अर्थकारणातील सहकार

*शेतीच्या टप्प्यावर वाड्या, वस्त्या व गावे वसली. गावगाडा बलुतेदारी या श्रमविभागणीवर आधारित सहकारी पद्धतीने चालत राहिला. शेतीची मशागत परस्पर सहकार्याने करणे ही परंपरा झाली. अनेक बैलजोड्या व अनेक शेतकरी एकत्र येऊन सगळ्यांच्या जमिनीची नांगरट करीत. सुगीसाठीदेखील अशाच पैर पद्धतीचा वापर सार्वत्रिक होता. शेतीक्रांतीच्या प्राथमिक टप्प्यावर युरोपमध्ये जी मॅनोरियल पद्धत होती त्यात सहकार अव्याहत होता. महाराष्ट्रामध्ये पश्चिम घाटाच्या डोंगराळ प्रदेशात उंच ठिकाणी पाणी नेण्यासाठी, गुऱ्हाळे चालविण्यासाठी 'फड' पद्धतीचा वापर हा आजच्या सहकारी सिंचन संस्थांचा ऐतिहासिक पूर्वज मानला पाहिजे.*

नव्या आर्थिक धोरणाच्या प्रारंभानंतर व आर्थिक सुधारणांचे विविध कार्यक्रम राबविण्याच्या प्रक्रियेत सहकारी अर्थकारण, प्रकल्प, उपक्रम, तत्त्वज्ञान, शिक्षण, प्रशिक्षण व प्रचार या सर्वच गोष्टींकडे सरकार, नेते, कार्यकर्ते, तज्ज्ञ व ग्राहक या सर्वांचेच वाढते दुर्लक्ष, त्रयस्थपणा, शुष्कता जाणवतील अशा स्वरूपात वाढल्या. सरकारने सहकारातून अंग काढून घेण्याचा प्रयत्न सुरू केला. सहकारी कार्यकर्तेच खाजगी प्रकल्प सुरू करू लागले. त्या काळी पहिला पर्याय म्हणून अयशस्वी संस्थांचे खाजगीकरण अधिकाधिक उघड पद्धतीने करणे हे शिष्टसंमत होऊ लागले. आर्थिक योजनांच्या आराखड्यातून सहकारी अर्थकारणाचे प्रकरण काही परिच्छेदावर येऊ लागले. सहकारी अर्थकारणाऐवजी सार्वजनिक -खाजगी भागीदारींचे नवे प्रस्ताव पुढे येऊ लागले. सहकारी पतसंस्थेऐवजी सूक्ष्मवित्त, स्वयंसाहाय्यता गट एवढेच नव्हे तर बँकिंग करस्पॉडंट सारख्या संकल्पना पुढे येऊ लागल्या. २००४ मध्येच खरेतर महाराष्ट्रात सहकार शताब्दी व सहकार तत्त्वज्ञानावर फेरचिंतन होण्याची गरज होती. काही विद्यापीठांत याबाबतीत मोठ्या पण अपवादात्मक स्वरूपात प्रयत्नही झाले.

कृषी औद्योगिक विकासाचा महाराष्ट्र उभा करण्यासाठी स्व. यशवंतरावजी चव्हाण यांनी दिलेल्या विकासाच्या प्रारूपामध्ये मुख्य प्रेरणाकारक घटक होते- शिक्षण, सहकार व पंचायत राज, म्हणजेच लोकशाही विकेंद्रीकरण शिक्षणातून मानवी भांडवल, उत्पादक कौशल्ये, कल्पक उद्योजक, जबाबदार नेतृत्व, निर्मितीक्षम संशोधक व सामाजिक उत्तरदायित्व जपणाऱ्या नेतृत्वाची निर्मिती. सहकारी अर्थकारण व संघटन सामान्य माणसाच्या कल्याणाच्या निकषावर उत्पादन व वितरण व्यवस्था आयोजित करते व त्यामुळे विकासाचा लाभ जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचतो, असाही चव्हाण साहेबांचा विश्वास होता.

### मुळारंभ

मानवी समाजाच्या उत्क्रांतीचा काळजीपूर्वक आढावा घेतल्यास हे स्पष्ट होते की जगण्याचा संघर्ष करण्यासाठी अतिप्राचीन काळापासूनच माणसाने या ना त्या स्वरूपात सहकाराचा आधार घेतला आहे.




### औद्योगिक क्रांती

खंडप्राय प्रदेशांचा शोध जहाज वाहतुकीमुळे व माणसांच्या धाडस व जिद्दीमुळेच शक्य झाला. पण, या सर्व धाडस व जिद्दीला संघटनात्मक स्वरूप परस्पर सहकार्याच्या भावनेतून प्राप्त झाले हे लक्षात घेणे आवश्यक आहे. व्यापारपेठेचे स्वरूप जागतिक झाले. विस्तार वाढला. स्मिथ तत्त्वाप्रमाणे श्रमविभागणी अधिक व्यापक व अधिक सधन होत गेली. परिणामी, तंत्र वैज्ञानिक स्वरूपाचे अनेक शोध १७५० ते १८०० या मर्यादित काळात समुच्चय (Cluster) पद्धतीने लागले. उत्पादनाचे प्रमाण मोठे झाले. त्यात यंत्रांचे महत्त्व वाढले. मधल्या काळात आर्थिक व्यवहार करण्यासाठी पैशाचा/चलनांचा वापर वाढू लागला. माणसाचे श्रम विकले जाऊ लागले. सहकारी याऐवजी श्रमिक, वेतनावर राबणारा मजूर असे स्वरूप श्रमाला आले. जगण्यातील सहकारी हे स्वरूप जाऊन उत्पादनासाठी लागणारा मजूर अशी भूमिका माणसाच्या वाट्याला आली. उद्योगपती नफ्याच्या कमालीकरणासाठी उत्पादन तयार करू लागले. त्यासाठी सीमान्त उत्पादकतेपेक्षा कमी वेतन देणे, कामाचे तास वाढविणे, स्त्री श्रम व बाल श्रमाचा वापर करणे व अखेरीस ग्राहकाला (त्यात श्रमिक असतातच) अवाजवी किमतीला उत्पादन विकणे या मार्गांचा वापर सर्रास सुरू झाला. श्रमिकांची पिळवणूक हाच भांडवलशाही विकासाचा मार्ग होता हे कार्ल मार्क्स यांनी सिद्ध केले.

औद्योगिक क्रांतीच्या म्हणजेच आधुनिक कारखानदारी व खाण व्यवसाय व कापड व्यवसायाच्या प्राथमिक कालखंडात एका बाजूला कामगाराला कट्टाकट्टी निर्वाह वेतन (Subsistence Wage) दिले जात होते, त्यात

## सहकारी अर्थकारणाचा लाभ

- दुर्बलांचे संरक्षण करण्यासाठी, मक्तेदारीला मर्यादा घालण्याची पर्यायी शक्ती निर्माण करण्यासाठी
- अधिक समावेशक लोकशाही राबवण्यासाठी, अधिक समन्यायी वाटप करण्यासाठी
- आर्थिक पिळवणूक कमी करण्यासाठी
- आर्थिक कृतीचे व सत्तेचे विकेंद्रीकरण करण्यासाठी

वाढ किंवा घट झाल्यास श्रमपुरवठ्यात विरोधी दिशेने बदल होऊन वेतनदर निर्वाह पातळीसच स्थिर होत असे. म्हणूनच याला Iron Law of Wage असे नाव पडले होते. दुसऱ्या बाजूला धान्यविषयक आयातीवर बंधन घालणारे Corn Laws मुळे अन्नाच्या किमती वाढत. औद्योगिक उत्पादन नफ्याच्या किमतीलाच विकण्याचे धोरण असल्यामुळे अन्न, वस्त्र व इतर पूरक वस्तूंच्या किमती कामगारांना त्यांच्या निर्वाह वेतनामुळे, परवडणे शक्य नव्हते. या पार्श्वभूमीवर सहकारी अर्थकारणाच्या, सहकारी संघटन पद्धतीचा जन्म झाला. रॉबर्ट ओवेन या उदारमतवादी कारखानदारास कामगारांची होणारी ही ससेहोलपट लक्षात येत होती. म्हणून त्यांनी कामगारांना वाजवी किमतीस जीवनावश्यक वस्तू मिळाव्यात यासाठी श्रमिकांच्या सहकारातून ग्राहक भांडार चालविण्याचा प्रयत्न केला. खरेतर, १४९८ मध्येच ॲबरर्जन येथे पहिली सहकारी संस्था सुरू झाली होती. १७६९ मध्ये फन्विरु येथे ग्राहक सहकारी संस्था सुरू झाली. त्यातूनच पुढे हार्ट ऑफ इंग्लंड को-ऑपरेटिव्ह सोसायटी निर्माण झाली; त्याचेच रूपांतर नंतर द को-ऑपरेटिव्ह ग्रुप या राष्ट्रव्यापी ग्राहक सहकारी संस्थेत झाले. औद्योगिक क्रांतीच्या यांत्रिकीकरणामुळे व शुद्ध नफेखोरीमुळे कामगार जीवनावर जे प्रतिकूल परिणाम झाले, त्याची प्रतिक्रिया म्हणून सहकारी संघटन अधिक बळकट होत गेले. १८४४ मध्ये रॉशडेल पायोनियर्सनी स्थापन केलेली सोसायटी ऑफ इक्विटेबल पायोनियर्स ही संस्था जर्मनीतील शहरी भागातील शूष्टझ-डेलिटझ्र नागरी सहकारी पतव्यवस्था ग्रामीण भागातील रेफेझन यांची सहकारी पतव्यवस्था या उदाहरणातून भांडवलश-ाही व्यवस्थेत कामगार, मजूर, शेतमजूर यांची होणारी अडचण, त्यांच्यावर होणारे अन्याय दूर करण्यासाठी 'एकीचे बळ' या साध्या सिद्धान्तावर सहकारी अर्थकारण उभे राहिले. रॉबर्ट ओवेन यांच्या सहकारी संघटनाचे महत्त्व, गरज, तत्त्वे, व्यवहार, आयोजन यांचे मार्गदर्शन करण्यासाठी १ मे १८२८ रोजी डॉ. विल्यम किंग यांनी The Cooperator हे मासिक सुरू केले; नंतरच्या काळात इतर युरोपियन राष्ट्रांत जवळजवळ त्याच कारणासाठी ग्राहक, पत, प्रक्रिया व वितरण या क्षेत्रात लोकशाही पद्धतीने सभासदांनी चालविलेली एक आर्थिक कायदेशीर व्यक्ती अशा स्वरूपात सहकारी संस्था उभ्या राहिल्या. वर्गसंघर्ष नाकारून, स्वेच्छापूर्वक सहकार्याच्या आधारावर ग्राहक, पत, प्रक्रिया व वितरण अशा क्षेत्रात सहकारी आर्थिक संघटनाच्या या पद्धतीतून भांडवलशाहीतील आर्थिक अन्याय कमी करण्याचे आर्थिक समाजवादाचे एक प्रारूप तयार झाले.

### भारतातील सहकार-उगम

भारताच्या सहकारी अर्थकारणाचा इतिहास लक्षात घेता, सावकारी पाशातून लहान, सीमान्त, निर्वाह शेतकऱ्याला मुक्त करण्यासाठी, दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी सहकारी संस्थांचा वापर करावा अशी शिफारस डेरेक निकोलसन तसेच दुसऱ्या फेमिन कमिशननेही केली होती. त्यातूनच शेती सहकारी पतसंस्थांचा पहिला कायदा १९०४ ला झाला. १९१२ च्या दुसऱ्या सहकारी कायद्याने बिगर पत शेती सहकारी संस्था व इतर सहकारी संस्थांचाही मार्ग सुकर केला. मंदी, दुसरे महायुद्ध, स्वातंत्र्योत्तर काळातील भाववाढ या प्रेरणांनी भारतामध्ये प्रारंभी राजकीय चळवळीचा एक प्रच्छन्न भाग व स्वातंत्र्योत्तर काळात देशी राजकारणात आर्थिक सामर्थ्याच्या माध्यमातून सत्ता काबीज करण्याची एक व्यूहरचना असा सहकारी संघटन पद्धतीचा वापर झाला. मध्यमवर्गाने या देशात परिणामकारक पद्धतीने ग्राहक सहकार वाढविलेला दिसत नाही. नागरी सहकारी बँका व्यापारी वर्गाने स्वत:च्या सोईसाठी सुरू केल्या.

### सैद्धान्तिक समर्थन

- एकत्रीकरणाच्या या सामर्थ्याचा वापर अनेक छोटे, दुर्बल घटक, कामगार, गरीब, शेतमजूर, लहान व सीमांत शेतकरी यांना घेता येतो. या सर्व दुर्बल घटकांच्या विविध गरजा भागविण्याची व्यक्तिगत क्षमता फारच मर्यादित असते. त्यासाठी त्यांना सर्वांच्या शक्तीचे एकत्रित संघटन करणे आवश्यक ठरते. भांडवलशाही व्यवस्थेत उपरोक्त समाजघटकांची व्यक्तिगत सौदाशक्ती फारच अल्प असते. त्यासाठी त्यांना एकत्र येणे अपरिहार्य आहे.
- भांडवलशाही व्यवस्थेत आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण होण्याची मक्तेदारीची अंगभूत प्रवृत्ती असते. मक्तेदार किंवा केंद्रित अर्थसत्ता नफ्याच्या कमालीकरणाचीच किंमत आकारतात. अशा परिस्थितीत त्यांना स्पर्धा करील असे असंख्य लहानांचे लक्षणीय मोठे सहकारी संघटन मक्तेदारी सामर्थ्यावर मर्यादा घालू शकते व संबंधित वस्तू किंवा सेवा सर्वांनाच, संख्या तोट्यात न आणता, वाजवी किमतीला उपलब्ध करू शकते.
- आकारमानाचे लाभ- सीमान्त किंवा लहान आकाराची शेती करणाऱ्या अनेक शेतकऱ्यांचा सरासरी उत्पादन खर्च जास्त राहतो. पण, अशा अनेक लहान व सीमान्त शेतकऱ्यांनी एकत्रित येऊन २००-४०० एकरांची शेती सलग, संयुक्त कसली तर कसणूक अधिक कार्यक्षम, यंत्राचा वापर, औषधे, कीटकनाशकांचा प्रभावी वापर, सुरक्षित स्वरूप, योग्य वेळी विपणन व अधिक किफायतशीर किंमत असे प्रमाणाचे लाभ मिळविता येतात.

स्पर्धात्मक बाजारपेठेत, संकरित उद्योग वा व्यापारी व्यवस्थेशी स्पर्धा करून, यशस्वी उद्योगसंस्था म्हणून उभे रहावयाचे झाल्यास सीमान्त/ लहान शेतकऱ्यांनी सहकारी शेती तयार करणे, अल्पबचत करणाऱ्या अनेक लहान कुटुंबांनी सहकारी पतसंस्था स्थापन करून त्यांच्या एकत्रीकरणातून जिल्हा बँक किंवा राज्य बँक स्थापन करणे, गवळ्यांच्या ऐवजी सहकारी दूध संस्था व महासंघ तयार करणे, हातमाग किंवा विद्युतमाग कुटुंब पातळीऐवजी सहकारी सूत गिरणी/कापड गिरणी स्वरूपात राबविणे सर्वांच्याच हिताचे आहे.

लहान एककांची आर्थिक शक्ती (बचत, श्रम, जमीन, दुभते, सूत, खरेदी शक्ती, उत्पादन तंत्र पेलण्याची कुवत, विपणन, साठवणक्षमता इ.) मर्यादित, खरेतर अल्प असते. परिणामी, स्पर्धात्मक बाजारात टिकाव धरण्याची त्यांची शक्ती अपुरी पडते. आवश्यक ती पर्याप्त उत्पादन किंवा व्यवहार पातळी गाठण्यासाठी, नफेखोरीऐवजी समान कल्याण कमालीकरण साधण्यासाठी, सर्वसमावेशक, विकेंद्रित, लोकशाही संघटन या अर्थाने सहकारी संघटन सामाजिक न्यायाच्या व समावेशकतेच्या निकषावर अधिक श्रेयस्कर आहे.

**प्रा. डॉ. जे. एफ. पाटील**
संपर्क : ०९४२२०४६३८२

# कर्ज, सवलत आणि शेतकरी



राज्यात कृषी विकासामध्ये संस्थात्मक पतपुरवठा हा महत्त्वाचा घटक आहे. सन २००३-०४ पासून कृषी पतपुरवठ्यासाठी दिलेली उद्दिष्ट्ये पूर्ण झालेली आहेत. राज्याच्या कृषी विकासामध्ये संस्थात्मक पतपुरवठा यंत्रणेची भूमिका महत्त्वाची राहिलेली आहे. राज्यामध्ये महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेसह ३० जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका , २१,३१३ प्राथमिक विविध सेवा सहकारी संस्था, ३० भूविकास (शिखर बँकेसह), २८ राष्ट्रीयीकृत बँका, ८ खाजगी व्यापारी बँका व तीन प्रादेशिक ग्रामीण बँकांमार्फत शेतीसाठी व शेतीपूरक व्यवसायासाठी अल्प, मध्यम व दीर्घ मुदतीचा कर्जपुरवठा करीत आहेत.

- केंद्र शासनाच्या ११ व्या पंचवार्षिक योजनेमध्ये शेतीसाठीचा अर्थपुरवठा वाढवून शेती विकासाचा दर ४ टक्के प्राप्त करण्याबाबत प्रस्तावित केले आहे. 'दृष्टिक्षेप २०१५'मध्ये जिल्हा मध्यवर्ती बँकांमार्फत रु. २० हजार कोटींपर्यंत पीक कर्ज वाटप वाढविण्यासंदर्भात निर्धार केलेला आहे. याबाबत सहकार विभाग प्रयत्नशील असून विभागाच्या प्रयत्नामुळे सन २००७-०८ मध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमार्फत केलेल्या रुपये ४९८९ कोटी पीक कर्ज वाटपामध्ये वाढ होऊन सन २०११-१२ मध्ये ते रु. १०७६१ कोटी झाले आहे. तसेच २००७-०८ मध्ये एकूण कर्ज वाटप (व्यापारी बँका व जिल्हा मध्यवर्ती बँका) रु. ८४६० कोटी होते, ते सन २०११-१२ मध्ये रु. १९७८८ कोटी झालेले आहे.

**राज्यामध्ये ११ व्या पंचवार्षिक योजनेमध्ये पीक उत्पादनासाठी खालीलप्रमाणे बँकांनी कर्जपुरवठा केलेला आहे.** आकडे रु. कोटीत.

| वर्ष | शेतीसाठी कर्जपुरवठा लक्षांक | पैकी पीक कर्ज लक्षांक | पैकी जि.म.स. बँकांमार्फत पीक कर्जवाटप |
|---|---|---|---|
| २००७-०८ | १२११३ | ८४६० | ४९८९ |
| २००८-०९ | ८६८५ | ६४४६ | ३६८३ |
| २००९-१० | २००४३ | १०९३० | ७९८१ |
| २०१०-११ | १८०१८ | १०७५६ | ९८०५ |
| २०११-१२ | ३५६६७ | २१६०६ | १०७६१ |

**संस्थात्मक कर्जपुरवठ्यामध्ये राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचा वाटा नेहमीच मोठा राहिला आहे.**

| वर्ष | तपशील | जि.म.स. बँका | व्यापारी बँका | ग्रामीण बँका | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| २०१२-१३ | लक्षांक | ११९८४ | १२०२७ | १४१८ | २४६२९ |
| | पूर्तता | ९६२५ | ४७२७ | ८६९ | १५२२१ |
| | टक्केवारी खरीप लक्षांकाच्या | ११० | ५३ | ७५ | ८१ |

**पीक कर्ज वाटपासाठी उद्दिष्ट्ये**

मुख्यमंत्र्यांनी दि. १४ जून, २०१२ रोजी राज्यस्तरीय बँकर्स समितीची विशेष सभा आयोजित करून पीक कर्ज वाटपातील व्यापारी बँकांचा सहभाग वाढविण्यासाठी सूचना दिल्या. जिल्हा स्तरावर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली पीक कर्ज वाटपातील सहभाग वाढविण्यासाठी नियोजन केलेले आहे. तसेच पीक कर्जवाटपाच्या अनुषंगाने राज्य शासनानेही दि. १९ ऑक्टोबर, २०११च्या निर्णयान्वये पीक कर्जावरील व्याजात सवलत देण्याबाबत डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेमध्ये सुधारणा केली आहे. त्यानुसार रु. एक लाखापर्यंतचे पीक कर्ज विहित मुदतीत परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यास केंद्र शासनाकडील तीन टक्के व या योजनेखाली तीन टक्के व्याज सवलत मिळून पीक कर्ज बिनव्याजी होईल. तसेच रु. एक ते तीन लाखांपर्यंतचे पीक कर्ज विहित मुदतीत परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यास केंद्र शासनाकडून तीन टक्के व या योजनेअंतर्गत दोन टक्के व्याज सवलत मिळून पीक कर्जावर फक्त एक टक्का व्याज भरावे लागेल.

- राज्यातील शेतकऱ्यांना पीक उत्पादनाच्या दृष्टीने पुरेसे भांडवल मिळण्याच्या हेतूने राज्य शासनाने पीकनिहाय प्रतिहेक्टरी कर्जदर निश्चित करण्यासाठी सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित केली असून या समितीने सन २०१२-१३ साठी २० ते २२ टक्के पीक कर्ज दरात वाढ सुचविली आहे. समितीने निश्चित केलेले पीकनिहाय कर्जदर सर्व जिल्ह्यांना कळविण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे कृषी विभागानेही २०१२-१३ साठी निश्चित केलेले पीकनिहाय कर्जदर सर्व जिल्ह्यांना कळविण्यात आलेले आहेत.

**किसान पतपत्र योजना**

राज्यातील शेतकऱ्यांना करावयाच्या पीक कर्ज पुरवठ्यामध्ये सुलभता आणण्यासाठी किसान पतपत्र योजना (KCC) राबविण्यात येत आहे. या योजनेनुसार राज्यातील ५५ लाखांपेक्षा जास्त शेतकऱ्यांना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमार्फत पतपत्राचे वाटप करण्यात आलेले आहे.

पीक कर्ज पुरवठ्यासाठी व आनुषंगिक कारणासाठी नाबार्डकडूनही अल्प व्याजदराने बँकांना कर्जपुरवठा उपलब्ध होत असल्याने सन २०१२-१३ मध्ये महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने जिल्हा मध्यवर्ती

सहकारी बँकांच्या वतीने नाबार्डकडे रु.४७७० कोटी रुपयांच्या फेरवित्त कर्जाची मागणी केली आहे.

● नाबार्डने सन २०१२-१३ साठी प्राधान्यक्रम क्षेत्रासाठी जिल्हानिहाय क्षमताधिष्ठित आराखडा तयार केला आहे. हा आराखडा रु. ६७१२२ कोटींचा असून अल्पमुदत पीक कर्जवाटपासाठी रु. २७१८६ कोटींचा आराखडा तयार केला आहे.

**कर्जवाटप**

➲ पीककर्ज वाटपाच्या रकमेमध्ये वाढ झाली असली तरी कर्जदार शेतकऱ्यांच्या संख्येमध्ये तुलनेने वाढ झाल्याचे दिसून येत नाही. राज्यामध्ये १ कोटी ३१ लाख खातेदार शेतकरी असून सहकारी यंत्रणांमार्फत साधारणत: ४५ लाख व व्यापारी बँकांमार्फत २० ते २५ लाख याप्रमाणे ६५ ते ७० लाख शेतकरी संस्थात्मक पतपुरवठा यंत्रणेकडून कर्ज घेतात. अद्यापही सहकारी पतपुरवठा यंत्रणेमध्ये सभासद वाढीस वाव असून व्यापारी बँकांनाही जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणे आव्हान ठरणार आहे.

➲ मागील काही वर्षांतील पीक कर्जवाटप पाहता राज्यातील एकूण पीक कर्ज वाटपामध्ये सहकारी यंत्रणेमार्फत झालेल्या पीक कर्ज वाटपाचा वाटा ६५ ते ७०% असून व्यापारी बँकांचा वाटा ३० ते ३५ टक्के आहे. हेच प्रमाण सन २०११-१२ मध्ये ५४ व ४६ टक्के आहे. व्यापारी बँकांनी त्यांचा पीक कर्ज वाटपाचा वाटा जास्तीत जास्त प्रमाणात उचलल्यास जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणे शक्य होईल.

➲ शेतकऱ्यांना अल्प व्याजदराने पीक कर्ज उपलब्ध होण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाने व राज्य शासनाने व्याज सवलतीच्या विविध योजना राबविलेल्या आहेत. या योजनेंतर्गत व्याज सवलतीच्या रकमा गावपातळीवरील विविध कार्यकारी सहकारी संस्थांना विलंबाने प्राप्त होत असल्याने संस्थांच्या उत्पन्नावर अनिष्ट परिणाम होऊन संस्थांचे तोटे वाढत आहेत. याचप्रमाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचा ठेवी उभारण्याचा खर्च १०% पेक्षा जास्त असताना हा खर्च ९ टक्के गृहीत धरून बँकांसाठी व्याज परतावा योजना राबविली जात असल्याने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे आर्थिक नुकसान होत आहे. म्हणून व्याज परतावा व व्याज सवलतीची रक्कम अग्रीम म्हणून अदा करण्याची व व्याज परतावा रकमेत वाढ करण्याची मागणी बँकांकडून सातत्याने होत आहे. याचा विचार होणे आवश्यक आहे.

➲ डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेंतर्गत पीक कर्ज परतफेडीचा अंतिम दिनांक प्रति वर्षी ३० जून असून केंद्र शासनाच्या व्याज सवलत योजनेंतर्गत पीक कर्ज परतफेडीचा अंतिम दिनांक ३१ मार्च आहे. दिनांक ३१ मार्चनंतर परंतु ३० जूनपूर्वी कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना योजनेंतर्गत व्याज सवलतीचा लाभ मिळू शकेल. तथापि, केंद्र शासनाकडून व्याज सवलतीचा लाभ मिळू शकणार नाही. या परतफेडीच्या तारखांमध्ये सुसंगती आणणे आवश्यक आहे.

➲ मागील काही वर्षांमध्ये पीक कर्ज (अल्प मुदत) वाटपाची उद्दिष्टे साध्य झाली असली तरी कृषी क्षेत्राच्या शाश्वत वाढीसाठी अल्प मुदती पीक कर्जाऐवजी मध्यम व दीर्घ मुदतीची गुंतवणूक कर्जे महत्त्वाची आहेत. गुंतवणूक कर्जामुळे शेतीमधील मालमत्ता व भांडवल वृद्धी होण्यास मदत होते. ज्यामुळे उत्पन्नाचा स्रोत पुढील काही वर्षे कायम राहतो. म्हणून बँकांनी गुंतवणूक स्वरूपाच्या कर्ज वाटपास अधिक महत्त्व देणे आवश्यक आहे.

➲ अन्नधान्याच्या उत्पादनाच्या बाबतीत आपण स्वयंपूर्ण असलो तरी कडधान्ये व तेलबियांच्या बाबतीत आपले उत्पादन मागणीपेक्षा कमी आहे. म्हणून कर्जपुरवठा करणाऱ्या बँकांनी अशा पिकांसाठी जिल्हा केंद्रित स्वतंत्र धोरण आखणे गरजेचे आहे. आतापर्यंत बँका शेतकऱ्यांना व्यक्तिगत स्वरूपात कर्जपुरवठा करीत आल्या आहेत. शेतकऱ्यांच्या स्वयंसाहाय्यता समूहांना व संयुक्त जबाबदारी गटांना बँकांनी केलेल्या कर्जपुरवठ्याबाबत कर्जाचा विनियोग व कर्जाची परतफेड याबाबत बँकांचे अनुभव चांगले असून यापुढे बँकांनी शेतकऱ्यांच्या स्वयंसाहाय्यता समूहांना व संयुक्त जबाबदारी गटांना पीक कर्जपुरवठ्याचे आव्हान स्वीकारणे आवश्यक आहे.

**राजगोपाल देवरा,**
सहकार सचिव
**संपर्क : ९४२३७८५९००**




## औद्योगिक सहकारी संस्थांना भागभांडवली अंशदान

योजना केव्हापासून कार्यान्वित आहे? : १९७४, योजनेचा उद्देश व स्वरूप : औद्योगिक संस्थांना आपला आर्थिक पाया मजबूत करण्यासाठी व त्यांच्या अडचणी निवारण्याकरिता महाराष्ट्र शासन १:३ प्रमाणात भागभांडवल देते. औद्योगिक सहकारी संस्थांना वित्तीय संस्थांकडून आवश्यक प्रमाणात कर्ज उभारण्याची पात्रता वाढविण्यासाठी ही योजना कार्यान्वित आहे. या योजनेमध्ये प्रकल्प किमतीच्या ६० % वित्तीय संस्थेचे कर्ज, १० % संस्थेचे भागभांडवल आणि ३० % शासनाचे भागभांडवल असे आर्थिक साहाय्याचे स्वरूप आहे. या योजनेंतर्गत प्रकल्प मर्यादा रु. ५ कोटी इतकी आहे आणि या भागभांडवलाची परतफेड १५ वर्षांमध्ये करावयाची आहे.



लाभार्थी : औद्योगिक सहकारी संस्था. अर्ज कोणाकडे करावयाचा? : सहायक/उपनिबंधक सहकारी संस्था. मंजुरीचे अधिकार : राज्य शासन.

## राज्य सहकारी संघास अनुदान

योजना केव्हापासून कार्यान्वित आहे? : १९७२
योजनेचा उद्देश व स्वरूप : महाराष्ट्रातील सहकार चळवळीमधील कार्यकर्ते, पदाधिकारी आणि अधिकारी यांना प्रशिक्षण देण्यासाठी १०० टक्के केंद्र शासनाच्या अनुदानावर पुणे येथे सन १९४९ मध्ये डॉ. विठ्ठलराव विखे -पाटील सहकारी प्रबंध संस्थानची सुरुवात करण्यात आली. सन १९७२ मध्ये राज्यात डॉ. धनंजयराव गाडगीळ सहकारी प्रबंध संस्थान, नागपूर येथे सुरू करण्यात आले. त्याच्या प्रशासकीय खर्चासाठी केंद्र व राज्य सरकारने प्रत्येकी ५० टक्के निधी उपलब्ध करून देण्याचे ठरविण्यात आले आहे. त्याकरिता महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्या. पुणे यांच्यामार्फत या अनुदान नागपूर येथील सहकार प्रबंध संस्थेस उपलब्ध करून देण्यात येते.

लाभार्थी : सहकार क्षेत्रातील कार्यकर्ते, पदाधिकारी, सहकार विभागातील अधिकारी. मंजुरीचे अधिकार : सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, पुणे.

# वैदर्भीय सहकार

सन १९०४ ला भारतात विधिवत सहकारी चळवळीची सुरुवात झाली. याला अनुसरून सन १९०४ मध्ये आताच्या गडचिरोली जिल्ह्यातील 'पोरला' या गावात विदर्भात पहिल्यांदा प्राथमिक कृषी सेवा सहकारी पतसंस्थेची स्थापना झाली. त्यानंतर इतरत्र प्राथमिक कृषी सेवा सहकारी पतसंस्था स्थापित व्हायला लागल्या. प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थांना त्यांच्या भागात असलेल्या सावकारी व्यवसायाचे उच्चाटन करावयाचे असेल तर या संस्थांना आर्थिक पाठबळाची आवश्यकता होती. या गरजेला अनुसरून भारतात सहकारी क्षेत्रात केंद्रीय बँक स्थापन्याचा पहिला प्रयोग अकोला येथील सहकारी कार्यकर्त्यांनी केला. ५ फेब्रुवारी १९०९ रोजी अकोला को-ऑप बँक पंजीकृत झाली, हिचे आजचे नाव 'दि अकोला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या., अकोला' असे आहे. शिस्तप्रिय बँक म्हणून तिचा नावलौकिक आहे. गृहनिर्माण क्षेत्रात बँकेसारख्या अल्प व मध्यम काळाच्या ठेवी जनतेकडून स्वीकारून सामान्य माणसाला घर बांधणीसाठी दीर्घ काळासाठी कर्ज देणारी अनोखी व वित्तीय व्यवस्थापनाच्या दृष्टिकोनातून आश्चर्य निर्माण करणारी भारतात पहिलीवहिली संस्था कोणती असेल तर ती 'दि विदर्भ प्रिमिअर को-ऑप हाउसिंग सोसायटी लि. नागपूर' ही होय. या संस्थेची स्थापना १९३० मध्ये झाली. हातमाग विणकरांची पहिली संस्था सन १९२५ च्या सुमारास अचलपूर येथे 'अचलपूर इंडस्ट्रीयल विव्हर्स को-ऑप सोसायटी' या नावाने स्थापित झाली. अशा प्रकारे विभिन्न क्षेत्रात संस्था स्थापित होत गेल्या.



सन १९७१ मध्ये विदर्भात केवळ ९६४० विविध प्रकारच्या सहकारी संस्था होत्या. गेल्या ४० वर्षांत जवळजवळ ३ पटीने वाढ होऊन सन २०११ ला ही संख्या २६,७०० पर्यंत पोहोचली. सन १९७१ मध्ये या संस्थांचे भागभांडवल केवळ रुपये १०.०२ कोटी होते. त्यात १४२ पटीने वाढ होऊन ते रुपये १४२५.७७ कोटी झाले. सन १९७१ ला सहकारी संस्थांचे खेळते भांडवल रु. १३९.०५ कोटी होते. ते सन १९११ ला १५०८७.९४ कोटींपर्यंत पोहोचले. गेल्या ५० वर्षांत सरासरी ४० टक्के संस्था नफ्यात असलेल्या दिसतात. तर ६० टक्के संस्था तोट्यात असलेल्या दिसतात.

**गेल्या दशकातील संस्थांची वाटचाल**

विदर्भात सन २००१ मध्ये एकूण १९,३२२ संस्था होत्या. ही संख्या सन २०११ मध्ये २६,७०० वर पोहोचली. गेल्या दशकात पगारदार सेवकांच्या पतसंस्था, नागरी सहकारी पतसंस्था, गृहनिर्माण सहकारी संस्था या शहरी स्वरूपाच्या संस्थांत वाढ झाली असे चित्र दिसून येते. साखर कारखाने, भात गिरण्या, सूत गिरण्या या ग्रामीण विभागाच्या अर्थकारणाशी निगडित असलेल्या संस्थांच्या संख्येत मात्र घट झाली. प्राथमिक कृषी पतसंस्था व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची संख्या स्थिर आहे. सहकारी कारखानदारीचे चित्र विदारक असून केवळ एक कारखाना सद्यःस्थितीत उत्पादनाखाली आहे. त्याच्या खालोखाल वाईट चित्र भात गिरण्या, तेल गिरण्या, सूत गिरण्या व जिनिंग प्रेसींग संस्थांचे आहे. उपसा जलसिंचन, दुग्ध संस्था, हातमाग सहकारी संस्थाच्या संख्येत सकृतदर्शनी वाढ जरी दिसत असली तरी यातील सरासरी ८० टक्के संस्था बंद असून इतर संस्थांचे व्यवहार जेमतेम आहेत.

सध्या विदर्भात २ महसुली विभाग असून ११ जिल्हे आहेत. या जिल्ह्यांत ३१ मार्च २०११ अखेर २६,७०० संस्था कार्यरत आहेत.

विदर्भात अस्तित्वात असलेल्या २६७०० सहकारी संस्थांपैकी सर्वांत जास्त संस्था नागपूर जिल्ह्यात असून त्यांची संख्या ५,१५४ आहे. यात बिगरशेती सहकारी पतपुरवठा संस्था १,०३४, समाजसेवी सहकारी संस्थांची संख्या २,२१६ व उत्पादक संस्थांची संख्या १,३०४ आहे. सर्वांत कमी संस्थांची संख्या गडचिरोली जिल्ह्यात असून केवळ ९४० संस्था अस्तित्वात आहेत. अकोला जिल्ह्याचे विभाजन होऊन अकोला व वाशिम असे दोन जिल्हे झाले असले तरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे विभाजन झालेले नाही. त्यामुळे अकोला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे कार्यक्षेत्र दोन जिल्ह्यांचे आहे.

विदर्भातील सहकारी संस्थांच्या पडझडीचे प्रमाण इतर प्रदेशापेक्षा कमी आहे. नागरी सहकारी बँका, नागरी सहकारी पतसंस्था, प्राथमिक सहकारी कृषी पतसंस्थांमध्ये पडझडीचे प्रमाण अल्पशे आहे तर सहकारी साखर कारखाने, ग्राहक सहकारी भांडार, खरेदी विक्री संस्था, हातमाग सहकारी संस्था या संस्थांच्या पडझडीचे प्रमाण मात्र जास्त आहे. तथापि, विदर्भातील अनेक संस्था अनिष्ठ स्पर्धेच्या संकटातून सावरल्या असून स्थिर झाल्या आहेत. सारासार विचार केल्यास सहकारी क्षेत्र आजच्याही स्थितीत सामान्यांसाठी अभिमानास्पद कार्य करीत असल्याचे आढळून येते. शेतकऱ्यांच्या आत्महत्या गेल्या दशकात मोठ्या प्रमाणात झाल्या. त्याला रोखण्यासाठी केंद्र व राज्य सरकारच्या प्रयत्नात सहकारी संस्थांनी बहुमोल वाटा उचलला. राष्ट्रीयीकृत व सहकारी बँकांना शेती कर्ज वाटपासाठी दिलेल्या लक्षपूर्तीत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व प्राथमिक सहकारी कृषी संस्थांची कामगिरी मोलाची आहे.

शेती कर्ज रकमेत दुपटीने वाढ करणे, शेती कर्जमाफी योजना, किसान क्रेडिट कार्ड या गेल्या आठ वर्षांतील केंद्र सरकारच्या योजना, तर

महाराष्ट्र राज्य सरकारची पंजाबराव देशमुख शेती कर्ज व्याज सवलत योजना तसेच केंद्र सरकारने राष्ट्रीयीकृत बँकांचे तोटे भरून (एनपीए) काढण्यासाठी आणि सहकारी कृषी पतरचनेसाठी वैद्यनाथन् यांनी केलेल्या शिफारशीनुसार अंदाज पत्रकात केलेल्या तरतुदीप्रमाणे (पॅकेजमुळे) शेती कर्ज थकबाकीचे प्रमाण घटले, शेती कर्ज पुरवठ्यात अपेक्षित वाढ झाली. या सर्व योजनांचा व प्रयत्नांचा परिणाम शेती उत्पादनात वाढ होण्यात व शेतकरी आत्महत्येच्या प्रमाणात लक्षणीय घट होण्यात झाला. शासनाच्या या योजना शेतकऱ्यापर्यंत पोहोचविण्याची महत्त्वपूर्ण कामगिरी राष्ट्रीयीकृत बँकांच्या तुलनेत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी व प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थांनी चांगल्या प्रकारे व जबाबदारीने पार पाडली हे स्पष्ट होते. वर्ष २००९-१० मध्ये शेती पीक कर्जपुरवठ्याबाबत राष्ट्रीयीकृत बँकेद्वारा ७६.१६ टक्के लक्ष्यपूर्ती झाली. तर सहकारी क्षेत्राकडून १२७.१९ टक्के लक्ष्यपूर्ती झाली. वर्ष २०१०-११ मध्ये लक्ष्यांक पूर्तीत राष्ट्रीयीकृत बँकेचे प्रमाण ७९.९१ टक्के तर सहकारी क्षेत्राचे ११२.७६ टक्के होते. वर्ष २०११-१२ मध्ये राष्ट्रीयीकृत बँकांनी ७३.९५ टक्के लक्ष्यपूर्ती केली तर सहकारी क्षेत्राद्वारे १०३.२१ टक्के लक्ष्यपूर्ती झाली. यावरून गरीब व सामान्य जनांच्या आर्थिक विकासासाठी व अडचणीच्या काळात मदत करण्यासाठी आणि विशेषत: शेतकऱ्याच्या उद्धारासाठी सहकारी क्षेत्राशिवाय दुसरा रामबाण उपाय नाही याची सत्यता आजही सिद्ध होते.

जागतिकीकरण, खाजगीकरण, व्यावसायिकीकरणाच्या या बाजारात आपले अस्तित्व टिकवून ठेवलेल्या व स्थिर झालेल्या विदर्भातील सहकारी संस्था चांगली कामगिरी पार पाडीत आहेत असे म्हणणे अतिशयोक्तीचे होणार नाही. नागरी सहकारी बँका, नागरी सहकारी पतसंस्था, गृहनिर्माण संस्था, कर्मचारी पतपुरवठा संस्थांमधील काही संस्था तर राज्य व राष्ट्रीय स्तरावर नावलौकिक मिळविण्यात पात्र ठरल्या आहेत. कृषी पत व्यवस्थेत सेवा सहकारी संस्था व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका मोलाचे योगदान देत असून अकोला, यवतमाळ, अमरावती, चंद्रपूर, भंडारा, गडचिरोली व गोंदिया जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका नफ्यात असून त्यांना भारतीय रिझर्व्ह बँकेकडून बँकिंग परवाना प्राप्त झाला आहे. चालू आर्थिक वर्षात या बँकांनी समाधानकारक शेती कर्ज वाटप केले आहे.


**जगदीश किल्लोळ**

**संपर्क : ९४२१८०४४७८**





## सहकार संजीवनी योजना (प्रायोगिक तत्त्वावर)

**योजना केव्हापासून कार्यान्वित आहे? :** वर्ष २०११-१२

**योजनेचा उद्देश व स्वरूप :** १. प्रा. वैद्यनाथन समिती अंतर्गत अल्पमुदत सहकारी पतसंरचनेच्या बळकटीकरणासाठी राबविण्यात आलेल्या पॅकेजचा लाभ मिळण्यासाठी राज्यातील अपात्र ठरविण्यात आलेल्या प्राथमिक सहकारी कृषी पतपुरवठा संस्थापैकी विदर्भातील शेतकरी आत्महत्याग्रस्त अमरावती, अकोला, वाशिम, यवतमाळ, बुलढाणा व वर्धा या सहा जिल्ह्यांत ८०२ संस्थांचे पुनरुज्जीवन / बळकटीकरण करण्यासाठी या संस्थांनी मागील वर्षीच्या (२०१०-११ च्या) तुलनेत चालू वर्षात (वर्ष २०११-१२) मध्ये केलेले वाढीव कृषी कर्जवाटप व मागील वर्षाच्या (२०१०-११) तुलनेत चालू वर्षी (जून २०११ पर्यंत) केलेली कृषी कर्जाची वाढीव वसुली या पोटी संस्थांना प्रोत्साहनपर आर्थिक अनुदान व या संस्थांच्या सचिवांना उत्तेजनार्थ रोख रकमेच्या स्वरूपात बक्षीस देण्यात येते. या योजनेस 'सहकार संजीवनी योजना' असे संबोधण्यात येत आहे.

२. या योजनेत वैद्यनाथन पॅकेजसाठी विदर्भातील अमरावती (४२०), अकोला / वाशिम (५१), बुलढाणा (६०), यवतमाळ (१२९) व वर्धा (१४२) या शेतकरी आत्महत्याग्रस्त सहा जिल्ह्यांतील राज्यस्तरीय मंजुरी समितीने अपात्र ठरवलेल्या संस्थांचा समावेश आहे.

३. ही योजना चालू वर्षात (वर्ष २०११-१२ मध्ये) मागील वर्षीच्या (वर्ष २०१०-११ मधील) कर्जवाटपाच्या तुलनेत केलेल्या वाढीव कृषी कर्ज १५ वाटप व संस्थेच्या येणे कृषी कर्जापोटी मागील वर्षाच्या (२०१०-११) तुलनेत चालू वर्षी (दि. ३० जून, २०११ पर्यंत) करण्यात आलेली वाढीव वसुली यापोटी संबंधित संस्थेला वर्ष अखेरीस प्रोत्साहनपर आर्थिक अनुदान देण्यात येणार आहे. याच पद्धतीने योजना पुढील कालावधीत राबविण्यात येईल.

४. प्रत्येक संस्थेला प्रतिवर्षी संस्थेने केलेल्या वाढीव कृषी कर्ज वाटपाच्या रकमेच्या २ % किंवा अधिकतम रु. ५०,०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम प्रोत्साहनपर अनुदान स्वरूपात देण्यात येणार आहे.

५. प्रत्येक संस्थेला प्रतिवर्षी संस्थेने केलेल्या वाढीव कृषी कर्जवसुली रकमेच्या २ % किंवा अधिकतम रु. ५०,०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम प्रोत्साहनपर अनुदान स्वरूपात देण्यात येणार आहे.

६. प्रत्येक संस्थेच्या सचिवाला त्याने उपरोक्त (वर्ष २०११-१२) कालावधीत संस्थेचे वाढीव कृषी कर्जवाटप व जून २०११ अखेर केलेली वाढीव कृषी कर्ज वसुलीसाठी दिलेल्या योगदानापोटी संस्थेला वाढीव कर्ज वाटप व वाढीव कर्ज वसुलीपोटी संबंधित वर्षात मिळालेल्या एकूण अनुदानाच्या १० % किंवा अधिकतम रु. १०,०००/- प्रतिवर्ष, प्रतिसंस्था यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम उत्तेजनार्थ बक्षीस म्हणून देण्यात येणार आहे.

**क) लाभार्थी :** विदर्भातील अमरावती, अकोला, वाशिम, बुलढाणा, यवतमाळ व वर्धा जिल्ह्यातील प्राथमिक सहकारी कृषी पतसंस्था व या संस्थांचे गटसचिव.

**ड) अर्ज कोणाकडे करावयाचा? :** साहाय्यक निबंधक/उपनिबंधक सहकारी संस्था.

**इ) मंजुरीचे अधिकार :** विभागीय सहनिबंधक.

# मराठवाड्याचा गोडवा



मराठवाड्याच्या सहकारी साखर उद्योगाच्या प्रशासकीय नियंत्रणासाठी शासनाने दोन विभाग पाडलेले आहेत. नांदेड प्रादेशिक विभागात एकूण २९ सहकारी तत्त्वावरील साखर कारखाने असून औरंगाबाद प्रादेशिक विभागात मराठवाड्यातील जिल्ह्यात २१ सहकारी तत्त्वावरील साखर कारखाने आहेत. त्यापैकी नांदेड विभागात १५ सहकारी साखर कारखाने चालू अवस्थेत असून ६ बंद अवस्थेत आहेत. नांदेड विभागातील ८ कारखाने अवसायनात असून त्यापैकी १ कारखाना भाडेतत्त्वावर देण्यात आलेला आहे. तर ४ कारखाने विक्री केलेले आहेत. विक्री केलेल्या कारखान्यापैकी मराठवाडा डोंगरकडा, शंकर वाघलवाडा व बाराशिव हनुमान जवळा बाजार हे सहकारी साखर कारखाने इतर सहकारी साखर कारखान्यांनी आपले विस्तारित युनिट म्हणून खरेदी केले आहेत. तर गोदावरी दुधना हा सहकारी साखर कारखाना खाजगी उद्योजकाने विकत घेतलेला आहे.

औरंगाबाद विभागात १३ सहकारी साखर कारखाने चालू अवस्थेत असून ८ बंद अवस्थेत आहेत. औरंगाबाद विभागातील २ कारखाने अवसायनात आहेत.

**प्रमुख सहकारी साखर कारखाने**

**मांजरा सहकारी साखर कारखाना, (म. विलासनगर, ता. जि. लातूर)** उस्मानाबाद जिल्ह्याचे विभाजन होऊन निर्माण झालेल्या लातूर जिल्ह्यातील परिस्थिती औद्योगिकीकरणासाठी पूरक नव्हती. प्राप्त परिस्थितीच्या मर्यादा लक्षात घेऊन स्वर्गीय विलासरावजी देशमुख यांनी शेतीवर आधारित उद्योगाचा विकास करण्याच्या दृष्टीने ऑगस्ट, १९८० मध्ये लातूर तालुक्यात एक सहकारी साखर कारखाना काढण्याचा मनोदय स्थानिक शेतकऱ्यांसमोर व्यक्त केला होता. परिसरातील शेतकऱ्यांनी दिलेल्या उत्स्फूर्त सहभागामुळे जानेवारी, १९८४ मध्ये मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना अस्तित्वात आला. जानेवारी, १९८७ मध्ये या कारखान्याचा चाचणी गळीत हंगाम होऊन पहिला गळीत हंगाम नोव्हेंबर, १९८७ मध्ये करण्यात आला.

मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना हा मराठवाड्यातील स्थापनेपासून यशस्वीरीत्या चालविलेला कारखाना मानला जातो. त्यासंदर्भात थोडी आकडेवारी बघितल्यास त्याचा प्रत्यय येऊ शकेल. या कारखान्याचा १९८७-८८ या पहिल्या वर्षी फक्त ९.९७ टक्के साखर उतारा आलेला आहे. त्यानंतर मात्र प्रत्येक वर्षी हा उतारा वाढत गेलेला दिसतो. सन २००७-०८ मध्ये तर हा उतारा १३ टक्क्यांच्या पुढेही गेलेला दिसतो. साखर उतारा हा कारखान्याच्या उत्पादकतेचा एक महत्त्वाचा निर्णायक निकष मानला जातो. १० टक्केपेक्षा खाली साखर उतारा आल्यास व्यावसायिकदृष्ट्या कारखाना यशस्वी होऊ शकत नाही, असे तज्ज्ञांचे मत आहे. तसेच या कारखान्याने आपल्या मूळ गाळप क्षमतेच्या सन १९९७-९८ सालात २१३ टक्के वापर केला. सन २००६-०७ मध्ये २२० दिवसांत ८,०६,७३७ मे. टन उसाचे गाळप करून ९,७९,७२० क्विंटल साखरेचे उत्पादन केले आहे. या कारखान्याला आजपर्यंतच्या २४ गळीत हंगामात राज्य आणि देश पातळीवरील ५२ पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. त्यामध्ये राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाने १२ वेळा, वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट, पुणे यांनी ३० वेळा आणि महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ लि., मुंबई यांनी १० वेळा सन्मानित केलेले आहे. या सन्मानामध्ये प्रामुख्याने उच्च साखर उतारा, उत्कृष्ट तांत्रिक कार्यक्षमता, उच्च कार्यक्षमता वापर, राज्यात कमीत कमी वाया तास, उच्चतम ऊस विकासाचे तांत्रिक पारितोषिक, सर्व गुणवत्तेत उत्कृष्ट सहकारी साखर कारखाना, देशातील उच्चतम साखर उतारा पारितोषिक, उत्कृष्ट ऊस विकास पारितोषिक अशा विविधांगी सन्मानांचा समावेश आहे. कारखान्याने विविध बँका आणि संस्थांकडून घेतलेल्या दीर्घमुदती कर्जाचे विहित मुदतीपेक्षा तीन वर्षे अगोदर कर्जफेड करून १९९१ मध्येच हा कारखाना कर्जमुक्त केलेला आहे. त्यानंतर या कारखान्याने रुपये १४२६.१७ लाखाचे यंत्रसामग्री आधुनिकीकरण आणि विस्तारीकरण तसेच रु. ७१२.०० लाखाची अर्कशाळा, बायोगॅस प्रकल्प असे अनेक प्रकल्प स्वनिधीमधून उभे केले आहेत. आज रोजी कारखान्याची गाळप क्षमता २५०० मे. टन प्रति दिवस करण्यात आलेली आहे. विशेष म्हणजे या कारखान्याने आजवर एकही गळीत हंगाम बंद न ठेवता कारखान्याच्या आधुनिकीकरणाची मोहीम अखंडपणे राबविलेली आहे. याशिवाय कारखान्याने साखर उद्योगामध्ये यशस्वी व्हायचे असेल तर



साखर उत्पादनाबरोबरच उपपदार्थांची निर्मिती करणेही आवश्यक आहे, या भूमिकेतून अर्कशाळा, इथेनॉल प्रकल्प, सह वीजनिर्मिती प्रकल्प असे अनेक प्रकल्प साखरेला जोडूनच उभे केले.

या कारखान्याने ऊस विकास करण्यासाठी अनेक कार्यक्रम हाती घेतले आहेत. माती तपासणी, शेती अवजारे पुरवठा योजना, पाणीपुरवठा वाढवण्यासाठी गाळ उपसा योजना, पाइपलाइन, ठिबक व तुषार सिंचन पुरवठा योजना, बेणे पुरवठा, रासायनिक व सूक्ष्म अन्नद्रव्य पुरवठा, खते व कीटकनाशकाची फवारणी इ. विविध योजना आपल्या कार्यकक्षेत मांजरा कारखान्याने राबविल्या. तसेच कारखान्याच्या कार्यक्षेत्रात ऊस परिषदा आणि मार्गदर्शन मेळाव्यांचे शेती तज्ज्ञांमार्फत अनेकदा मार्गदर्शन शिबिरांचे आयोजन केले आहे. जास्तीत जास्त प्रति एकरी ऊस उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्याला दरवर्षी प्रोत्साहनपर बक्षीस सन्मानपूर्वक कारखाना देतो.

आर्थिक शिस्तीचा (Financial Discipline) पूर्णपणे अवलंब करणे ही साखर उद्योगाची नितांत गरज बनली असून तिचा अवलंब न केल्यास संपूर्ण यंत्रणा मोडकळीस येऊ शकते याचे भान ठेवून मांजरा कारखान्याने तातडीने कर्जमुक्त होऊन स्वावलंबनातून नवनवे प्रकल्प उभे केल्याचे दिसते.

### विकास सहकारी साखर कारखाना (वैशालीनगर, निवळी, ता. जि. लातूर)

हा कारखाना इ. स. २००० मध्ये आमदार श्री. अमित देशमुख यांच्या प्रयत्नातून उभा राहिला. या कारखान्याने उच्च व्यवस्थापनाचा मानदंड निर्माण केल्याचे दिसते. सन २०१०-११ या गळीत हंगामात ४.९७ लाख मे. टन उसाचे गाळप करून ५.६८ लाख क्विं. साखरेचे उत्पादन केले आहे. या कारखान्याचा सरासरी साखर उतारा ११.४७ टक्के आहे. या कारखान्याला २०१०-११ या वर्षासाठी सर्वोत्कृष्ट साखर कारखान्याचा पुरस्कार तसेच उत्कृष्ट ऊस विकास पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. या कारखान्याला आतापर्यंत १० वर्षांत एकूण १३ राष्ट्रीय पुरस्कार मिळालेले आहेत. या कारखान्यानेदेखील अर्कशाळा आणि सह वीजनिर्मिती प्रकल्प उभे करून मांजरा कारखान्याची विकासोन्मुख परंपरा पुढे चालविल्याचे दिसते. कारखान्याचा २०१०-११ मधील एकूण नफा ८१८.३६ लाख एवढा आहे.

### रेणा सहकारी साखर कारखाना (दिलीपनगर निवाडा, ता. रेणापूर, जि. लातूर)

या कारखान्याचे भूमिपूजन २९ जून २००२ रोजी झाले आणि २००३-०४ मध्ये कारखान्याचा चाचणी गळीत हंगाम झाला यावरून किती कार्यक्षमतेने या कारखान्याची उभारणी केली गेली हे दिसते. या कारखान्याने ३० जून, २००८ अखेर म्हणजे विहित मुदतीपेक्षा पाच वर्षांपूर्वीच २८५१.२३ लाख कर्जाची परतफेड केली आहे. या कारखान्याला उत्कृष्ट तांत्रिक कार्यक्षमता, उत्कृष्ट आर्थिक व्यवस्थापन अशा गटातले एकूण ५ पुरस्कार प्राप्त झाले आहेत. या कारखान्याचा २०११-१२ मधील साखर उतारा १२.७९ एवढा आहे. कारखान्याने २०११-१२ मध्ये ४,४१,५०९ मे. टन ऊस गाळप केला आणि ५,६४,२५० क्विं. साखरेचे उत्पादन केले आहे. या कारखान्याने शेतकऱ्यांना रु. १७५०/- प्रमाणे पहिल्या उचलीमध्ये दर देऊन शेतकऱ्यांचा विश्वास संपादन केला. याशिवाय कारखान्याने ठिबक, तुषार सिंचन, खत आणि बेणे वाटप, ऊस कार्यशाळा असे अनेक उपक्रम राबविले आहेत.

रेणा कारखान्याने आपल्या परिसरात आंबा, नारळ, शोभिवंत झाडे अशा प्रकारे लागवड करून एक आदर्श निर्माण केला आहे. त्याचबरोबर कारखान्याने ३० हजार लि. प्रतिदिन क्षमतेच्या अत्याधुनिक आसवनी प्रकल्पाची उभारणी केली असून त्यातून इथेनॉल, स्पिरीट व इ.एन.ए. यांचे उत्पादन घेण्याचे काम सुरू आहे. या प्रकल्पासोबतच बायोगॅस व बायोकंपोस्टिंग व इव्हॉपोरेशन प्रकल्पाचे एकत्रितपणे काम पूर्ण केले आहे. महाराष्ट्रात आजपर्यंत उभारणी झालेल्या प्रकल्पांपैकी 'रेणा साखर कारखाना' हा एक परिपूर्ण असा प्रकल्प मानला जातो. या कारखान्याचे संपूर्ण व्यवस्थापन आमदार श्री. दिलीपराव देशमुख यांनी अतिशय समर्थपणे मांजराचा आदर्श समोर ठेवून सांभाळल्याचे दिसते.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर सहकारी साखर कारखाना (केशेगाव, ता. जि. उस्मानाबाद)

उस्मानाबाद जिल्ह्यातील इतर कारखाने अनेकविध कारणांनी अडचणीत आलेले असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर सहकारी साखर कारखाना (केशेगाव, ता. जि. उस्मानाबाद) हा पूर्ण क्षमतेने अखंडपणे चालू असल्याचे दिसते. श्री. अरविंद गोरे यांच्या नेतृत्वाखाली या कारखान्याची उभारणी झाली आहे. सन २०१०-११ मध्ये ७,२९,०३२ मे. टन ऊस गाळप करून ८,५९,०२५ क्विं. साखर या कारखान्याने उत्पादित केली असून



साखर उतारा ११.७९ टक्के आला. या कारखान्याकडे कुठल्याही प्रकारची थकबाकी नसल्याचे दिसते. कारखान्याने अतिशय प्रभावीपणे ऊस विकासाचा कार्यक्रम राबवून सभासदांमध्ये अद्ययावत तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याबद्दल जागृती करण्याचे उपक्रम हाती घेतले आहेत. विशेष म्हणजे कारखान्याने सभासदांसाठी सभासद विमा योजना राबविली आहे. पूर्ण कार्यक्षमतेने आणि व्यावसायिक पद्धतीने चालविलेल्या व्यवस्थापनाचा परिणाम म्हणून या कारखान्याने उसाला प्रति मे. टन रु. २०००/- इतका दर सन २०१०-११ वर्षामध्ये दिला. कारखान्याने कंपोस्ट खत, सह वीजनिर्मिती प्रकल्प, अर्कशाळा प्रकल्प अशा स्वरूपाचे कारखान्याचे सहयोगी प्रकल्प राबविले आहेत. अर्कशाळा प्रकल्पाने हिंदुस्थान पेट्रोलियम, भारत पेट्रोलियम यांच्याशी करार करून १०,९६,००० लिटर्स इथेनॉल पुरवठा केला तसेच सौर ऊर्जा प्रकल्प हा अपारंपरिक ऊर्जास्रोतावर आधारित अतिशय महत्त्वाचा प्रकल्प कारखान्याने उभा करण्याचे काम हाती घेतले आहे. जवाहरलाल नेहरू नॅशनल सोलर मिशन या संस्थेच्या मार्गदर्शनाखाली या प्रकल्पाचे काम चालू आहे. तसेच कारखान्याने राजर्षी शाहू ट्रस्ट स्थापन केला असून शेतकऱ्यांना आंबा, अंजीर, चिक्कू आदी फळझाडांचे वाजवी दरात वाटप करण्यात येत आहे. केवळ ऊस उत्पादनच महत्त्वाचे नसून मराठवाड्यासारख्या प्रदेशात फळबागायतही मोठ्या प्रमाणात वाढावी यासाठी कारखान्याने फळबागायतीला प्रोत्साहन देण्याचे धोरण स्वीकारलेले दिसते.

### माजलगाव सहकारी साखर कारखाना लि. (सुंदरनगर, पो. तेलगाव, ता. माजलगाव, जि. बीड)

माजलगाव सहकारी साखर कारखाना (सुंदरनगर, पो. तेलगाव, ता. माजलगाव, जि. बीड) २५ नोव्हेंबर १९९३ रोजी सुरू झाला. या कारखान्याने सन २०११-१२ च्या गळीत हंगामात ५,९२,८३४ मे. टन उसाचे गाळप केले असून साखर उतारा हा १०.९८ टक्के इतका आहे. या

कारखान्याला उत्कृष्ट सहकारी साखर कारखाना, उत्कृष्ट ऊस विकास, उत्कृष्ट तांत्रिक कार्यक्षमता, जास्तीत जास्त साखर निर्यात असे अनेक महत्त्वाचे पुरस्कार मिळालेले आहेत. या कारखान्याने ऊस विकास कार्यक्रम, गांडूळ खत निर्मिती, ऊस वाहतुकीसाठी रस्ते दुरुस्ती असे अनेक महत्त्वाचे कार्यक्रम राबविले आहेत. तसेच १.५ मेगावॅट क्षमतेचा सह वीजनिर्मिती प्रकल्प कार्यान्वित केला आहे.



**वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना परळी (वै.), ता. परळी (वै.), जि. बीड**

हा कारखाना खा. श्री. गोपिनाथ मुंडे यांच्या नेतृत्वाखाली केवळ ११ महिन्यांत उभा राहिला. २५०० मे. टन दैनिक गाळप क्षमतेचा हा कारखाना असताना या कारखान्याने ३.५ ते ४ हजार मे. टन उसाचे गाळप केलेले आहे. कारखान्याने आतापर्यंत गोदावरी दुधना, पारनेर तालुका, कर्मवीर काकासाहेब वाघ, श्री संत एकनाथ व श्री केदारेश्वर हे सहकारी साखर कारखाने भाडेतत्त्वावर आणि सहभागीदारी तत्त्वावर चालविले आहेत. वैद्यनाथ कारखान्याने देशामध्ये प्रथमच दुय्यम ऊस रसापासून अल्कोहल निर्मितीचा प्रकल्प उभारला व दोन हंगाम काळात पूर्णपणे उसाच्या रसावरच अल्कोहल निर्मिती केली. कारखान्याच्या स्थापनेपासून दोन वर्षांचा अपवाद वगळता कारखाना कायम फायद्यात चालत आलेला आहे. विशेष म्हणजे कारखान्याने प्रथमपासूनच स्पर्धात्मक ऊस दर दिला असून ज्या वर्षी कारखान्याला जास्त फायदा झाला त्या वर्षी एक कोटी रुपये ऊस चढ-उतार निधीमध्ये स्वतंत्रपणे ठेवले आहेत. महाराष्ट्रात सर्वप्रथम ऊस भाव चढ-उतार निधी स्थापन करण्याची संकल्पना या कारखान्याने प्रत्यक्ष अंमलात आणली. त्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या ऊस दरामध्ये सातत्य राखण्यासाठी या निधीचा उपयोग होऊ शकतो. या कारखान्यास आतापर्यंत १६ पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. तसेच या कारखान्याने एक अभियांत्रिकी महाविद्यालय व ग्राहक भांडारे स्थापन केली आहेत. ६० हजार लि. प्रतिदिन अल्कोहल निर्मितीचा आसवनी प्रकल्पही कार्यरत केला असून २१ मेगावॅट सह वीजनिर्मिती प्रकल्प उभारणीचे काम चालू आहे.

**भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखाना लक्ष्मीनगर, ता. अर्धापूर, जि. नांदेड**

भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखान्याची श्री. अशोकराव चव्हाण यांच्या पुढाकाराने जुलै, १९९० मध्ये नोंदणी झाला. या कारखान्याने अल्पावधीतच अर्धापूर, मुदखेड या नांदेड जिल्ह्यातील तालुक्यातील शेतकऱ्यांचा विश्वास प्राप्त केला. या कारखान्याने गाळप हंगाम २०११-१२ मध्ये ५,००,२७१ मे. टन उसाचे गाळप करून ११.३२ इतक्या साखर उताऱ्यासह ५,९४,०६५ क्वि. साखरेचे उत्पादन केले आहे. स्थापनेपासून साखर कारखान्याने अखंडपणे ऊस गाळप केल्याचे आणि शेतकऱ्यांना एफ.आर.पी. प्रमाणे भाव दिल्याचे दिसून येते.

नांदेड जिल्ह्यातील इतर बहुतांश सहकारी साखर कारखाने अडचणीत आलेले असताना, बंद पडत असताना भाऊराव चव्हाण सह. साखर कारखान्याने नांदेड जिल्ह्यातील काही तालुक्यांतील शेतकऱ्यांमध्ये निर्माण केलेला विश्वास हा अतिशय महत्त्वाचा मानावा लागेल. या कारखान्याने बंद पडलेले/अवसायनात असलेले मराठवाडा सह. साखर कारखाना डोंगरकडा व शंकर सह. साखर कारखाना वाघलवाडा असे प्रकल्प खरेदी करून आपले मूळ कारखान्याचे युनिट क्र. २ आणि युनिट क्र. ३ चालू केलेले आहेत. त्यामुळे बंद पडलेल्या साखर कारखान्यांच्या परिसरातील नाउमेद झालेल्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये चैतन्य निर्माण झाल्याचे दिसते.

**पूर्णा सहकारी साखर कारखाना वसमतनगर, ता. वसमत, जि. हिंगोली**

पूर्णा सहकारी साखर कारखान्याची स्थापना सन १९७० मध्ये कै. बाबूराव गोरेगावकर यांनी केली. कारखान्याचा पहिला गाळप हंगाम १९८१ साली चालू झाला म्हणजे स्थापनेपासून तब्बल ११ वर्षांनी हा कारखाना चालू झाला. सुरुवातीला या कारखान्याची गाळप क्षमता १२५० मे. टन प्रतिदिन होती ती १९९१ मध्ये २५०० मे. टन प्रतिदिन करण्यात आलेली आहे. परभणी आणि नांदेड जिल्ह्याच्या सीमेवरील बागायती भागातील हा कारखाना गेल्या कित्येक वर्षांपासून या परिसरातील शेतकऱ्यांचे आशास्थान म्हणून कार्यरत असल्याचा दिसतो. सन २०१०-११ च्या गळीत हंगामात या कारखान्याने ११.६८ एवढा साखर उतारा घेऊन ३,६७,२०० क्विं. साखरेचे उत्पादन केले आहे. श्री. जयप्रकाश दांडेगावकर यांच्या अभ्यासू आणि उत्तम व्यवस्थापकीय दृष्टिकोनाचा फायदा या कारखान्याला झाल्याचे दिसते. कारखान्याने १८.९ मेगावॅट क्षमतेचा सह वीजनिर्मिती प्रकल्प पूर्ण केला आहे. चाचणी काळात २०११ मध्ये १८,१९,२६१ युनिटस् वीजनिर्मिती कारखान्याने केली. तसेच कारखान्याने उपपदार्थ निर्मितीमध्ये अर्कशाळा, इथेनॉल आणि ए.टी.पी. प्रकल्प कार्यरत केले आहेत. तसेच ऊस विकास कार्यक्रमदेखील राबविले आहेत. याशिवाय कारखाना परिसरावर वृक्ष लागवड, शेतकऱ्यांना कंपोस्ट व रासायनिक खत वाटप योजना, टिश्यू कल्चर रोपांवर ५० टक्के अनुदान अशा स्वरूपाच्या अनेक योजना राबविल्या आहेत.

**निष्कर्ष**

कारखाना उभारणीनंतर चार-दोन वर्षे कार्यक्षमतेने चालविणे पुरेसे नसते. कारखाना उभारणीसाठी लागलेले भांडवल, त्याची परतफेड या अनेक गोष्टींत योग्य नियोजन केल्यास ही वर्षे खर्ची पडतात. त्यानंतर वर्षानुवर्षे कारखाना एक यशस्वी उद्योग म्हणून चालू राहिल्यास त्याची फळे जनसामान्यांपर्यंत पोचू शकतात. शेती अर्थव्यवस्थेचे दुखणे हे कित्येक शतकांचे आहे. यामुळे चार-दोन वर्षांत किंवा एखाद्या दशकात कारखाना परिसरातील जनतेचे जीवनमान सकारात्मकदृष्ट्या बदलेल ही अपेक्षा करणे चुकीचे ठरते. यामुळे सहकारी साखर कारखानदारी ही कित्येक दशकांचे आयुष्य असलेल्या दीर्घकालीन यशस्वी उद्योगांचे घटक म्हणून चालणे किंवा स्थिर होणे यासाठी आवश्यक ठरते.

मराठवाड्याचा बहुतांश भाग हा दुष्काळी किंवा दुष्काळसदृश आहे. पर्जन्यछायेखालचा प्रदेश म्हणून वैजापूर, बीड, आष्टी, लातूर, उस्मानाबाद अशा सर्वदूर प्रदेशात मोठ्या प्रमाणात पावसाचे दुर्भिक्ष्य असते. त्यामुळे कृषी संरचनेच्या आमूलाग्र बदलाच्या दृष्टीने साखर कारखानदारीसारख्या सहकारी संरचनेने काय भूमिका पार पाडली हाही प्रश्न निर्माण होतो. जलसंधारण, मृदसंधारण, वृक्ष लागवड, शेतकरी वर्गात भू-जागृती यासारखे अनेक उपक्रम सहकारी उद्योगांमार्फत राबविता येण्यासारखे आहेत.

**श्रीकांत देशमुख**
**संपर्क : ८९८३६९८५८१**

# कोकणचो सहकार...

राज्यातील इतर विभागाप्रमाणे कोकणामध्ये मात्र सहकार विशेष रुजला नाही. याचे मुख्य कारण त्या विभागात जनतेला लाभलेले सहकाराचे महत्त्व समजलेले नेतृत्व कोकणामध्ये उदयास आले नाही. कोकणातील सर्व जिल्हा मध्यवर्ती बँका अतिशय चांगले कामकाज करीत असून याचा अनुकूल परिणाम कोकणातील सहकार चळवळीच्या वाढीवर झालेला दिसून येतो. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कै. शिवराम भाऊ जाधव यांचे कार्य, रत्नागिरी जिल्ह्यामध्ये कै. गोविंदराव निकम तसेच रायगड जिल्ह्यामध्ये कै. प्रभाकर पाटील आणि त्यानंतर आमदार जयंत पाटील यांनी सहकार वृद्धीसाठी संबंधित जिल्ह्यामध्ये केलेले कार्य निश्चित उल्लेखनीय आहे. शेतीप्रमाणे मच्छीमारी व्यवसायावर अवलंबून असणाऱ्या जनतेचे प्रमाण कोकणात मोठे आहे. त्यासाठी रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग, ठाणे जिल्ह्यामध्ये मच्छिमार संस्थांचे महत्त्व फार मोठे आहे. कोकणातील ४ जिल्ह्यांमध्ये किमान १५० ते २०० छोटी-मोठी बंदरे आहेत, मच्छीमारी हा व्यवसाय येथे मोठ्या प्रमाणावर चालतो. देशात, देशाबाहेर अगदी जपान, पश्चिम आशियाई देशामध्ये कोकणातील मच्छिला मोठ्या प्रमाणावर मागणी आहे. मात्र, अनेक ठिकाणी उत्पादित मच्छिची आवश्यकतेनुसार साठवणूक करण्यासाठी शीतगृहे नाहीत. सहकारी तत्त्वावर मच्छिमारांसाठी संस्था निर्माण करून या संस्थांच्या माध्यमातून मोठी शीतगृहे बांधण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे ओल्या मच्छिप्रमाणे सुक्या मच्छिला बाहेर प्रचंड मागणी आहे. परंतु, त्याकरितासुद्धा सुक्या मच्छीवर प्रक्रिया करण्यासाठी अत्याधुनिक प्रकल्प राबविण्याची नितांत गरज आहे. व्यक्तिगत, खाजगी प्रकल्प हे केवळ नफा कमविण्याच्या उद्देशानेच चालविले जात असल्याने सहकारात जनतेचा सहभाग होऊन नफा क्षमतेपेक्षा सर्वांच्या सहभागातून किनारपट्टीवरील मच्छिमारांच्या सोयीसाठी सहकारी प्रकल्पच जास्त उपयोगी ठरू शकतात हे पटल्याने रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये अनेक औद्योगिक सहकारी संस्थांची नोंदणी झाली असून अनेक प्रकल्प या माध्यमातून यशस्वीपणे राबविले जात आहेत.

कोकणामध्ये गायी आणि म्हशींची संख्या मोठी आहे. जवळ जवळ २४ लाखांपेक्षा अधिक गायी, म्हशी कोकणामध्ये आहेत. या सर्व पशुधनाचा योग्य वापर झाल्यास कोकणातील जनतेची गरज भागविण्यास ते पर्याप्त आहे. परंतु, कोकणातील जनतेला त्याचा फायदा होत नाही. राज्यातील श्वेतक्रांतीपासून कोकणातील शेतकरी अजून खूप दूर आहे. शेतकऱ्यांची अल्पभूधारकता तसेच एकपिकी जमीन त्यामुळे शेतीतून मिळणाऱ्या अत्यल्प उत्पन्नाला दुग्ध उत्पादनाचा चांगला पर्याय उपलब्ध असताना कोकणी जनतेने आणि या प्रदेशातील नेतृत्वाने याचा विचार केलेला दिसून येत नाही, कोकणातील चार जिल्ह्यांतील लोकसंख्येचा विचार केल्यास दुधाची गरज आणि आवश्यकता यामध्ये ८० टक्के तफावत आहे. यावरून दुधाच्या उत्पादन वाढीसाठी किती वाव आहे हे आपल्या लक्षात येईल. पश्चिम महाराष्ट्रातून रोज जवळ जवळ पाच लाख लीटर दुधाची आवक कोकणामध्ये होते. कोकणातील उपलब्ध पशुधनाचे योग्य व्यवस्थापन केल्यास तसेच उत्कृष्ट जातीच्या जनावरांची उपलब्धता वाढवून चांगल्या प्रतीचा चारा तसेच योग्य वैद्यकीय सेवांची उपलब्धता वाढवून मोकाट गुरांची समस्या लक्षात घेऊन त्यावर वेळीच योग्य उपाययोजना केल्यास कोकणामध्येसुद्धा श्वेतक्रांती होऊ शकते, यासाठी सहकाराचे माध्यमातून दुग्ध संस्थांची प्रयत्नपूर्वक वाढ केल्यास पावसावर अवलंबून असणाऱ्या शेतीला दुग्ध उत्पादन हा योग्य पर्याय ठरेल.

कोकणामध्ये बागायतीबरोबर शेतीचे महत्त्व फार मोठे आहे. ठाणे, रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग या चार जिल्ह्यांचे १३०० पेक्षा जास्त विविध कार्यकारी संस्थांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना पतपुरवठा केला जातो. मागील अनेक वर्षांपासून कोकणातील शेतकऱ्यांना आवश्यकतेनुसार योग्य पतपुरवठा या विविध कार्यकारी संस्थांच्या माध्यमातून होत असून कर्ज वसुलीचे प्रमाणसुद्धा कोकणामध्ये समाधानकारक आहे.

शेतकऱ्यांसाठी कर्ज वाटप हे प्राथमिक शेती सहकारी संस्थांच्या माध्यमातून जिल्हा मध्यवर्ती बँकांमार्फत प्रामुख्याने स्वनिधीतूनच करीत असल्याने नाबार्ड तसेच राज्य बँकेवर कोकणातील शेतकऱ्यांना विसंबून राहावे लागत नाही. कोकणामध्ये शेतकऱ्यांना अपुऱ्या पतपुरवठ्यामुळे आत्महत्या करावी लागली नाही ही



विशेष बाब लक्षात घेण्यासारखी आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये या शेती संस्था सक्षम होण्यासाठी त्यांच्या एकत्रीकरणाची योजना रायगड जिल्हा बँकेने सहकार खात्याच्या मदतीने यशस्वीपणे राबविली आणि या संस्था आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविल्या. यानंतर नाबार्डने हीच गोष्ट 'रायगड पॅटर्न' म्हणून विशेष गौरविली आणि आता प्रा. वैद्यनाथन् समितीने संस्था सक्षमीकरणासाठी हाच एकत्रीकरणाचा मार्ग सूचविला. रायगड जिल्ह्याने पर्यायाने कोकणाने संस्था एकत्रीकरणाचा सहकारी संस्थांच्या मजबुतीकरणाचा नवीन पर्याय राज्यासमोर आणला. कोकणामध्ये अत्यल्प व अल्प भूधारकांची संख्या फार मोठी आहे. केंद्र शासन तसेच राज्य शासनाच्या व्याज परतावा / व्याज सवलत योजनेमुळे शेतकऱ्यांना एक लाखापर्यंतचे कर्ज वेळेमध्ये परतफेड केल्यास बिनव्याजी मिळणार असल्याने कोकणातील शेतकरी या विविध कार्यकारी संस्थांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर कर्ज उचल करू लागला आहे.

कोकणातील चारही जिल्ह्यांमध्ये अर्बन बँका, नागरी पतसंस्था, पगारदार नोकरांच्या संस्था मोठ्या प्रमाणावर आहेत. ठाणे, रायगड जिल्ह्याचे झालेले शहरीकरण, औद्योगिकीकरण यामुळे अर्बन बँका तसेच नागरी पतसंस्थांचे महत्त्व या जिल्ह्यामध्ये वाढले आहे. एकट्या ठाणे जिल्ह्यांमध्ये ९०६ नागरी पतसंस्था असून २७५ पगारदार नोकरांच्या पतसंस्था आहेत, १७ नागरी बँका आहेत. तर रायगड जिल्ह्यामध्ये १७८ नोकरदार पतसंस्था असून ३०० नागरी, ग्रामीण पतसंस्था आहेत. रत्नागिरी जिल्ह्यातसुद्धा पगारदार नोकरांच्या ८५ पतसंस्था असून २३९ नागरी पतसंस्था आहेत. परंतु, मागील काही वर्षांत भ्रष्ट कारभार आणि चुकीच्या व्यवस्थापनामुळे अनेक सहकारी संस्था अडचणीत आल्याने लाखो ठेवीदार रस्त्यावर आले याचा विपरीत परिणाम कोकणातील सहकारावर होत आहे. सहकार खात्याचे कडक निर्बंध, योग्य लेखा परीक्षण, चुकीच्या व्यवस्थापनावर योग्य वेळी कार्यवाही न झाल्यास कोकणातील तेजीत येत असलेली सहकार चळवळ परत मागे पडू शकते.

महाराष्ट्र शासनाने रत्नागिरी, सिंधुदुर्ग हे पर्यटन जिल्हे म्हणून घोषित केले आहेत. रायगड जिल्हा हा मुंबई, पुण्यापासून हाकेच्या अंतरावर असल्याने तसेच या जिल्ह्यांना लाभलेल्या नितांत सुंदर समुद्रकिनाऱ्यामुळे ते पर्यटकांचे आकर्षण ठरत आहेत. गोव्यापेक्षा पर्यटकांना रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्हे अधिक जवळचे वाटू लागले आहेत. याला अनुसरूनच या तीनही जिल्ह्यांमध्ये अनेक सहकारी पर्यटन संस्था स्थापन होत आहेत. गोव्याप्रमाणे सी.आर.झेड. कायद्यामध्ये काही सुयोग्य बदल घडवून आणल्यास देशी-विदेशी पर्यटक कोकणामध्ये अधिक आकर्षित करण्यास या संस्था मोठे कार्य करू शकतील. सहकाराच्या माध्यमातून पर्यटन विकासात खूप मोठा वाव असून हा व्यवसाय औद्योगिकीकरणामुळे घटणाऱ्या शेती व्यवसायाला सक्षम पर्याय ठरू लागला आहे.

याखेरीज कोकणातील वाढत्या औद्योगिकीकरणामुळे सहकारी मजूर संस्थांचे महत्त्व वाढू लागले आहे. ठाणे, रायगड जिल्ह्यामध्ये १००० पेक्षा जास्त मजूर संस्था असून रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्येसुद्धा या संस्थांची मोठ्या प्रमाणावर नोंदणी झाली असून या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होत आहे. ठाणे जिल्ह्यातील २७,५०० सहकारी संस्थांपैकी २३००० संस्था गृहनिर्माण सहकारी संस्था आहेत, हे ठाणे जिल्ह्याच्या सहकारी चळवळीचे वैशिष्ट्य आहे. यातील अनेक सहकारी गृहनिर्माण संस्था उपविधीप्रमाणे कार्य करीत नाहीत.

**अडचणी**

अनेक शेतीसंस्था फक्त शेतीकर्जाचे वाटप करीत असल्याने आणि सरकारी धोरणामुळे शेती कर्जवाटपामध्ये अत्यल्प मिळणाऱ्या मार्जिनमुळे अनेक शेती संस्था अडचणीत येत आहेत. तसेच शेती संस्थांचे अध्यक्ष, संचालक हे त्या संस्थांच्या कारभारामध्ये आवश्यक तेवढे सहभागी होत नाहीत. शेती कर्जवाटपाबरोबरच ठेवसंकलन इतर व्यवसायाकडे लक्ष केंद्रित करीत नाहीत. शासनाच्या गोदाम योजनेचा फायदा घेऊन गोदाम निर्मिती त्याबरोबरच उत्पादित मालाच्या योग्य साठवणुकीसाठी व्यवस्था उपलब्ध करून देऊन संस्थेच्या नफाक्षमता वाढीकडे या संस्था लक्ष केंद्रित करीत नाहीत ही मोठी समस्या आहे.

सहकारी संस्थांचे कामकाज योग्य उद्दिष्टपूर्तीने चालले आहे हे पाहण्यासाठी शिखर संस्था म्हणून त्या त्या जिल्ह्यातील जिल्हा मध्यवर्ती बँका तसेच सहकार खात्याचे योग्य नियंत्रण असणे अत्यावश्यक आहे. कोकणामध्ये मच्छिमार संस्था मोठ्या प्रमाणावर असल्या तरी अनेक मच्छिमार संस्थांचे सभासद संबंधित संस्थेस मासळी न देता खाजगी व्यापाऱ्यांना जास्त भावाच्या लोभाने चांगली मच्छी देतात त्यामुळे अनेक मच्छिमार संस्था अडचणीत येतात. तसेच कोकणातील औद्योगिकीकरणामुळे बलुतेदार संस्थांच्या सभासदांच्या उत्पादित मालाला मागणी कमी झाली असून या संस्थांद्वारे झालेले कर्ज वाटप धोक्यात आले आहे. त्यामुळे या संस्थांचे अस्तित्वच नष्ट होण्याच्या मार्गावर आले आहे. त्याचप्रमाणे कोकणातील भात, आंबा, काजू, नारळ, सुपारी, भाजी व मत्स्य उत्पादन मोठ्या प्रमाणावर होत असले तरी उत्पादित मालाच्या विक्रीसाठी योग्य वितरण व्यवस्था उपलब्ध नसल्याने या सर्वांसाठी कर्ज वितरण करणाऱ्या संस्थांच्या कर्ज वसुलीवर परिणाम होत असल्याचे दिसते. पर्यायाने या संस्था अडचणीत येतात. अशा अनेक समस्या कोकणातीलच नव्हे, तर एकूणच सहकारी चळवळीला भेडसावत असल्या तरी कोकणातील सहकाराचे चित्र आज निश्चितच निराशाजनक नाही. खाजगी, सार्वजनिक क्षेत्रापेक्षा सहकारात अधिक सर्वसमावेशकता असल्याचे दिसून येते.

**प्रदीप कृष्णाजी नाईक**
**संपर्क :९७३०७६३८१७**



# कर्तृत्वाचे दशक...

गेल्या पन्नास वर्षांच्या तुलनेत गेली दहा-बारा वर्षे ही अधिक वेगवान प्रगतीची आहेत. राज्याचे चित्र भराभर बदलले आहे. गेल्या १२ वर्षांतील, अगदी नेमके सांगायचे तर नव्या शतकाचे पहिले दशक हे महाराष्ट्राच्या दृष्टीने अनेक नवनवी प्रगतीची दालने उघडणारे ठरले. भौतिक सुविधा असतील वा सामाजिक समतेच्या नव्या शक्यता असतील, शैक्षणिक बदलाचे वारे असतील वा औद्योगिक क्षेत्राची निराळी भरभराट असेल, राज्याच्या महसुलाचे अधिक्य असेल वा आर्थिक शिस्तीचे नवे पर्व असेल हे सारे घडलेले आढळले आहे ते गेल्या १० वर्षांत.

२०००-२०१० हा कालखंड महाराष्ट्राच्या सरत्या पन्नास वर्षांचा एक आगळा आणि सळसळता असा कालखंड आहे आणि या साऱ्या कालखंडावर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून विलासराव देशमुख यांचा सरळ सरळ आणि उघड उघड प्रभाव आहे. १९९९ ते २००३ आणि नंतर २००५ ते २००८ असा एक सलग व मोठा कालखंड विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राने व्यतीत केलेला आहे. या साऱ्या कालखंडातील राज्याच्या दृष्टीने बऱ्यावाईट साऱ्याच घटनांची जबाबदारीही साहजिकच त्यांच्यावरच येते. विलासरावांनीही तशी ती जबाबदारी कधीच नाकारलेली नाही. जेव्हा सारे जग हादरवून टाकणारा पाकपुरस्कृत दहशतवादी हल्ला मुंबईवर झाला तेंव्हा त्याची नैतिक जबाबदारी मान्य करून ते पायउतार झाले. काही लोक म्हणतील की काही बड्या लोकांनी मेणबत्या हातात घेत मोर्चे काढले. गेटवेवर प्रक्षुब्ध निदर्शने केली, म्हणून मग दिल्लीतील काँग्रेस नेत्यांना नैतिकतेचे भान आले आणि त्यांनी विलासरावांचा राजीनामा मंजूर केला. अर्थात, त्याच वेळी देशाच्या गृहमंत्र्यांचाही राजीनामा झाला आणि राष्ट्रवादीच्या वतीने तेव्हाचे उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री आर. आर. पाटील हेही राजीनामा मुख्यमंत्र्यांच्या हाती टाकून देऊन थेट सांगलीला निघून गेले होते... पण, जे काही राजकीय नाट्य असेल त्यात मुख्यमंत्रीपदावरून पायउतार होण्याचे धाडस विलासरावांच्या नावे नोंदले गेलेच हे काही कुणाला नाकारता येणार नाही.

विलासराव देशमुखांच्या पहिल्या कारकिर्दीत त्यांना आर्थिक संकटांना तोंड द्यावे लागले होते. त्यांच्या आधी नारायण राणे मुख्यमंत्री होते आणि राणेंच्या आधी होते मनोहर जोशी. सेना-भाजपा युतीने राज्यात अनेक नव्या गोष्टींची सुरुवात केली होती. पण, त्यांच्या कारभारात राज्याची आर्थिक शिस्त ढासळलेली होती. त्यांनी १९९५ मध्ये सत्ता हाती घेतली तेंव्हा राज्यावर कर्जाचा बोजा होता सुमारे १७ हजार कोटी रुपये. राणेंनी मुख्यमंत्रीपद सोडले तेंव्हा राज्यावरचा कर्जाचा बोजा झाला होता ३९ हजार कोटी रुपये. सेना-भाजपा युती हे एक लाडके समर्थन असते की आम्ही कर्जे घेतली ती मोठमोठी धरणांची आणि रस्त्यांची कामे करण्यासाठी... पण, ती कर्जे घेताना त्यांनी आर्थिक व्यवहाराचे तोवर रूढ असणारे सारे शासकीय नियम धाब्यावर बसवले होते. त्यांनी कृष्णा खोरे विकासासाठी खुल्या बाजारातून मोठ्या व्याजाने रकमा उचलल्या. पाच ते दहा वर्षांच्या परतफेडीची ही कर्जे किंवा रोखे सर्वसामान्य माणसाने खरेदी केली होती. त्या साऱ्या रकमांचा परतावा विलासरावांच्या राजवटीत सुरू झाला. त्यांची पहिली काही वर्षे त्या रकमा परत कशा कराव्यात, त्या साऱ्या कर्जांवरचे भले मोठे व्याजाचे दर कमी कसे करून घ्यावेत, अशा विवंचनेत गेली. सरकारने स्वस्त दराने आणखी कर्जे घेतली आणि जादा व्याजाचे जुने बोजे कमी करण्याचे प्रयत्न केले. हे करीत असताना राज्यावरचा कर्जाचा एकूण बोजा वाढत गेला हे खरे; पण, अर्थव्यवस्थेचा आकारही विलासरावांच्या राजवटीत वाढत होता, त्यामुळे सरकारला अधिक कर्जे घेणेही शक्य होत होते. पण, एकूण कर्जे प्रत्येक वर्षी वाढत गेली. बघता बघता ६९ हजार कोटी, पुढे एक लाख कोटी आणि जेंव्हा (स्व.) देशमुखांनी सत्ता सोडली तोवर कर्जाचा आकडा दोन लाख तेरा हजार कोटी रुपये असा अवाढव्य झाला होता. पण, आपल्या वार्षिक योजनेचा आकार युतीच्या राजवटीतही वाढत होता. तो विलासरावांच्या काळात प्रथमच १० हजार कोटी रुपयांची नंतर २० हजार कोटी रुपयांचीही मर्यादा ओलांडून पुढे गेला. आता सध्या आपण ४५ हजार कोटी रुपयांच्या वार्षिक योजनांची चर्चा करतो आहोत.

ही सारी भौतिक प्रगती दिसत असतानाच विलासराव देशमुखांच्या सरकारने परदेशातून थेट गुंतवणूक महाराष्ट्रात यावी यादृष्टीने खास प्रयत्न केले. जगाच्या आर्थिक नकाशावर महाराष्ट्राचे नाव कोरले गेले तेही विलासरावांच्याच काळात. स्वित्झर्लंडमध्ये दरवर्षी भरणाऱ्या डाव्होसच्या जागतिक वित्तीय परिषदेत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री या नात्याने विलासरावांना भाग घेण्यासाठी निमंत्रण आले. त्यांच्या आधी शरद पवारांनी हा मान



# स्मृतींना उजाळा...













छायाचित्रे : अजय बटुळे-पाटील, लातूर

राज्याचे मुख्यमंत्री म्हणून एकदा घेतलेला होता. त्याच काळात त्यांनी अमेरिका व युरोपातील अनेक देशांमध्ये खास गुंतवणूकदारांना भेटण्यासाठी दौरे केले. काही लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकींचे प्रस्तावही त्यांनी मिळवले. त्यातील काही प्रकल्प प्रत्यक्षात आले व सुरूही झाले. मोठे मोटार व इंजिनीअरिंग उद्योग, मोठमोठे आयटी उद्योग म्हणजे बीपीओ, आयपीओ, कॉलसेंटर असे उद्योग राज्यात सुरू झाले. पुण्याजवळचे हिंजवडी आयटी पार्क सुरू झाले आणि तिथली सारी जागा संपूनदेखील गेली.

एकीकडे आर्थिक चित्र सुधारत असताना आणि राज्याला आर्थिक शिस्त लावण्याचे प्रयत्न सुरू असताना विलासरावांना राजकीय आघाडीवर मात्र सतत युद्धाचाच प्रसंग होता. प्रत्येक चार-सहा महिन्यांनी विलासराव देशमुखांना बदलले जाणार अशा बातम्या झळकवल्या जात होत्या. प्रत्यक्षात मात्र त्यांनी साडेतीन-पावणेचार वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केल्यानंतर पक्षश्रेष्ठींनी बदलाचे निर्णय घेतले. त्यात राष्ट्रवादी काँग्रेसचा दबाव मोठा होता, असे म्हणतात. सुशीलकुमार शिंदे राज्याचे मुख्यमंत्री बनले. विलासराव आणि सुशीलकुमार शिंदे हे राजकारणातील आणि व्यक्तिगत आयुष्यातीलही जिगरी दोस्त. 'दो हंसों का जोडा' असे त्यांचे वर्णन केले जाते व ते खरेही आहे. दोघेही हंसांसारखेच डौलदार आणि आकर्षक व्यक्तिमत्त्वाचे. विलासरावजी गेले तेव्हाही सुशीलकुमारजींनी प्रतिक्रिया देताना एक हंस निघून गेला असेच म्हटले होते...! हंसाच्या या जोडगोळीतील दोघांनाही राजहंसांचा 'नीरक्षीरविवेक'ही अवगत होता! पण, एकाचे पद काढून दुसऱ्याला दिले गेले हा थोडा कटूपणाचा भाव कुठेतरी आला असेल. 'दो हंसो का जोडा थोडाफार बिछड गया,' असेही तेव्हा म्हणावे लागले. मुख्यमंत्रीपद नव्हते त्या काळात विलासराव पक्षाच्या कामात व्यस्त होते. निवडणुका समोर आल्या होत्या. आधी २००४च्या लोकसभा आणि पाठोपाठ विधानसभांच्या निवडणुका त्यांनी पक्षासाठी पूर्ण ताकदीने लढवल्या. अनेक सहकारी निवडून आणले. विधानसभा निवडणुकीनंतरच्या राजकीय हालचालीत विलासरावांचे पारडे पुन्हा जड ठरले. सत्ता आणूनही राष्ट्रवादी काँग्रेसपेक्षा काँग्रेसच्या आमदारांची संख्या थोडी कमी भरली होती. त्यात शिंदेंच्या ऐवजी पुन्हा एकदा विलासरावांना मुख्यमंत्रीपदावर संधी मिळाली. त्यांनी राजकीय चतुराई दाखवत प्रमुख विरोधी पक्ष शिवसेनेला खिंडार पाडण्यात यश मिळवले. नारायण राणेंनी २००५मध्ये शिवसेना सोडली. ते स्वतः पुन्हा पोटनिवडणुकीत आरामात विजयी झाले. त्यांच्या समवेत सहा आमदारांनीही पाठोपाठ सेनेच्या आमदारक्या सोडल्या आणि विधानसभेच्या पोटनिवडणुकांचा एक सिलसिलाच विलासरावांच्या नेतृत्वाखाली सुरू झाला. तोही त्यांनी विजयाचे बरेच तुरे पक्षाच्या मुकुटात खोवत यशस्वी केला. एक आमदारकीची व एक खासदारकीची जागा शिवसेनेला राखता आली. बाकी साऱ्या आमदारक्या विलासराव मुख्यमंत्री असताना नारायण राणेंच्या आमदारांनी जिंकल्या.

राज्याची औद्योगिक, आर्थिक, भौतिक प्रगती घडवताना आणि काँग्रेसच्या सत्तेला राजकीय स्थैर्याचे नवे आयाम देतानाच विलासराव देशमुखांनी मुंबई महानगरीसाठीही बरेच काही घडवले. मुंबई जगाची आर्थिक राजधानी बनेल हे पंतप्रधान मनमोहन सिंगांचे भाकीत खरे करायचे तर इथे फार मोठ्या पायाभूत सुविधांची निर्मिती करावी लागणार हे उघड होते. त्यात मोठा अडथळा होता (व आहे) तो म्हणजे सार्वजनिक जागांवर आलेल्या हजारो झोपड्यांचा. या झोपड्या हटवून विकासकामे करतानाच शहराला एक नवे स्वच्छ रूपही लाभणार होते. विलासरावांच्या पहिल्या टर्ममध्येच याचे नियोजन सुरू झालेले होते आणि दुसऱ्या टर्ममध्ये त्यांनी भरपूर कामे प्रत्यक्षात उभी करून दाखवली. त्यात त्यांनी एमएमआरडीएला एक नवे धारधार व लखलखते असे रूपही प्रदान केले. मुंबईतील सर्वांत महत्त्वाची नियोजन व अंमलबजावणीची संस्था अशी झळाळी विलासरावांच्या राजवटीत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास म्हणजेच एमएमआरडीएला लाभली. सुरुवातीला त्यांनी या खास दृष्टीनेच तिथे टी. चंद्रशेखर यांना आणले. चंद्रशेखर हे त्या पदासाठी तसे ज्युनिअर अधिकारी होते. पण, सुरुवातील सुरेश जोशींच्या जोडीने त्यांना सह आयुक्त म्हणून आणले. मग, त्याच जागी महानगर प्राधिकरणाचे आयुक्त अशी बढती चंद्रशेखर यांना दिली. त्यांना पूर्ण अधिकार व पाठिंबा मुख्यमंत्र्यांनी दिल्यामुळेच भराभर पुनर्वसनाचे नवनवे प्रकल्प चंद्रशेखर यांनी राबवले. विकासकामांतील अडथळा ठरणाऱ्या झोपड्या त्यातून दूर झाल्या. एमयूटीपी १ व २ आणि एमयूआयपी असे जे विकासाचे प्रकल्प १०-१५ वर्षांपासून हळूहळू सुरू होते त्यांना या सात-आठ वर्षांत मोठी गती आली. कारण, विलासरावांच्या सरकारने धोरणांत बदल घडवला. झोपड्यांना पक्की घरे देऊ केली. लोकांचे स्थलांतर यशस्वीपणाने घडवले. त्यातून वांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्सचाही विकास झपाट्याने झाला. एमएमआरडीएकडे पैसाही त्यातून भरपूर जमा होत गेला आणि त्यातून विकासाचे एक नवे चक्रच

प्रवर्तीत झाले. त्याने तेंव्हा घेतलेली गती आताही कायमच आहे असे सहज जाणवते. एमयूटीपीच्या नंतर त्यांनी हाती घेतलेले मेट्रो व मोनोरेलचे प्रकल्पही आता आकाराला येत आहेत. वांद्रे-वरळी सागरी पुलाचे काम प्रत्यक्षात आले आहे आणि पुढच्या सागरी मार्गांचे नियोजन सुरू आहे. पन्नास हजार कोटी रुपयांची विकासकामे मुंबई परिसरात सुरू करण्याचे, त्यांना गती देण्याचे श्रेय विलासरावांना जाते हे मात्र कुणालाच नाकारता येणार नाही.

विलासराव देशमुख यांच्यातील हे सारे नेतृत्वाचे, वक्तृत्वाचे व व्यक्तिमत्त्वाचे गुण या काळात प्रकट झाले व त्यांनी बाजी मारली असे म्हणे म्हणेपर्यंत मुंबईवरील कसाब व साथीदारांचा २६ नोव्हेंबरचा २००८चा भीषण हल्ला झाला. त्यानंतर अशोकराव चव्हाणांची राजवट सुरू झाली. निवडणुकीत काँग्रेस पक्षाने अशोकरावांच्या नेतृत्वाखाली उत्तम कामगिरी केली; पण, राजकारणात काही सांगता येते का? बदल हा होतच असतो. अपेक्षितच असतो. अशोकरावांच्या जागी पृथ्वीराज चव्हाणांची निवड राज्याचे नेते म्हणून झाली. त्यांच्या नेतृत्वाखाली विलासरावांनी सुरू केलेले प्रकल्प पूर्णत्वास जात असताना अचानक विलासराव आपल्यातून निघून गेले हा धक्का पचवणे तसे अवघडच आहे. पण, ईश्वरेच्छा बलियसी! दुसरे काय!

**अनिकेत जोशी**
**संपर्क : ९८६९००४४९६**

---

# आठवणीतले विलासराव

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान मंत्री विलासराव देशमुख यांचं १४ ऑगस्ट रोजी चेन्नईच्या ग्लोबल हॉस्पिटलमध्ये गंभीर आजारावर उपचार सुरू असताना निधन झालं. महाराष्ट्राचा एक दिलदार, सदाबहार, हसतमुख, राजबिंडा, हरहुन्नरी, हजरजबाबी नेता साऱ्या महाराष्ट्राला रडवून गेला. त्यांच्या काही मोजक्या प्रातिनिधिक आठवणींमधून त्यांची स्वभाववैशिष्ट्ये रेखाटली आहेत.

**विकास खेचून आणावा लागतो**

मराठवाडा हा मागासलेला भाग म्हणून ओळखला जातो. मराठवाड्याचेच असलेल्या विलासरावांनी ठणकावून सांगितलं की विकास हा कुणी आपल्याला ताटात वाढून देणार नाही, तो खेचूनच आणावा लागेल.

वैधानिक विकास मंडळे ही घटनेच्या ३७१ (२) अन्वये स्थापन झाली. ही मंडळे राजकीय अपरिहार्यतेपोटी स्थापन करावी लागली आणि त्यानुसार मराठवाडा, विदर्भ आणि उर्वरित महाराष्ट्रासाठी वैधानिक विकास मंडळे स्थापन झाली. कोकणासाठी स्वतंत्र मंडळाची मागणी अनेक वर्षांपासून करण्यात येतेय; पण, ती पूर्ण होत नाही. परंतु, विलासरावांचे राजकीय गुरू शंकरराव चव्हाण यांनी या मंडळांना विरोध केला होता. त्या मताशी विलासराव १०० टक्के सहमत होते. कारण, या भागातल्या लोकप्रतिनिधींचे सर्व अधिकार हे मंडळामुळे राज्यपालांकडे केंद्रित होतील असं त्यांचं म्हणणं होतं.

एका पत्रकारानं विलासराव देशमुख यांना आपल्या घरच्या सत्यनारायण पूजेचं निमंत्रण दिलं. ते त्या पूजेला जाऊ शकले नाहीत. त्या पत्रकारानं एका स्टीलच्या डब्यातून सत्यनारायणाचा प्रसाद विलासरावांचे (ते मंत्री असताना) स्वीय सहायक रवी सावंत यांच्याकडे दिला. हा प्रसाद विलासरावांपर्यंत पोहोचला. दोन दिवसांत पूर्ण डबा भरून बदाम त्या पत्रकाराकडे विलासरावांनी आठवणीनं पाठविले.

एकदा सहाव्या मजल्यावरून विलासराव मंत्रालयाच्या पहिल्या मजल्यावर काही पत्रकार व कार्यकर्त्यांसह पायऱ्या उतरून चालत चालत या गल्लीतून त्या गल्लीतून आपल्या दालनात आले. न राहवून पत्रकाराने त्यांना विचारले, ''काय हो विलासराव, तुम्ही तुमच्या दालनात बरोबर कसे जाता?'' हजरजबाबी विलासराव पटकन बोलले, ''काय आहे की ग्रामीण भागात सकाळी जनावरं चरायला सोडली जातात. दिवसभर चरून ती संध्याकाळी बरोबर आपल्या खुंट्याजवळ येतात. त्यांना बांधावं लागत नाही. तसंच आहे आमचं.'' विलासरावांच्या उत्तरानं हास्याचा फवारा उडाला.



विलासरावांनी त्यांना मिळालेल्या प्रत्येक खात्याचा आपल्या लातूरसाठी उपयोग करून घेतला आणि लातूरला महाराष्ट्र व देशाच्या नकाशावर चमकवले. लातूरचा विकास पाहून केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी लातूरचे इंजिनीअर्स बारामतीलाही नेले आणि विलासरावांच्या विकासकामाला एका प्रकारे पावती दिली.

२००५ ची गोष्ट. नागपूर येथे विधिमंडळाचं हिवाळी अधिवेशन होतं. विलासराव मुख्यमंत्री आणि आबा उपमुख्यमंत्री. शिवाजीराव देशमुख हे विधान परिषदेचे सभापती होते तर बाबासाहेब कुपेकर हे विधानसभेचे अध्यक्ष होते. नागपूरमध्ये दहशतवाद्यांच्या हल्ल्याची शक्यता लक्षात घेऊन मुख्यमंत्र्यांच्या रामगिरी आणि उपमुख्यमंत्र्यांच्या देवगिरी या निवासस्थानी पत्रकारांना जाण्यासाठी छायाचित्रासह स्वतंत्र/वेगळे ओळखपत्र पोलिसांकडून घ्यावं लागेल, असं मुरलीधर बंदसोडे यांनी 'सुयोग'वर येऊन मला सांगितलं. मी चक्क नकार दिला. कारणच तसं होतं. १९९१ साली सुधाकरराव नाईक हे मुख्यमंत्री असताना मंत्रिमंडळाच्या एका बैठकीच्या वेळेला जिल्हाधिकाऱ्यांच्या सहीने वेगळा पास घेण्याचा फतवा आला. प्रकाश देशमुख हे मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष आणि मी कार्यवाह होतो. त्यावेळी आम्ही सर्वांनी अधिस्वीकृती पत्रिका एकगठ्ठा सुधाकररावांकडे परत केल्या. सुधाकररावांनी त्याचवेळी निर्णय दिला की राष्ट्रपती व पंतप्रधान यांचे कार्यक्रम वगळता अन्य सर्व कार्यक्रमांना अधिस्वीकृती पत्रिका ग्राह्य राहतील. या निर्णयाची आठवण २००५ साली सुयोगवर करून दिली आणि तत्कालीन कार्यमंत्री राजन पाटकर यांनी वार्ताहर संघाचे पत्र शिवाजीराव देशमुखांकडे दिले. आबांकडे गृहखाते होते. त्यांचे जनसंपर्क अधिकारी जयंत करंजकर आणि वसंत पिटके यांनी आबांच्या कानी ही बाब घातली. आबांनी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची बैठक घेऊन या मुद्द्यावर चर्चा केली. दरम्यान, पत्रकारांची बैठक घेण्यात येऊन सदानंद शिंदे व संजीवन ढेरे यांच्या सूचना व अनुमोदनाने माझी एकमताने निवड झाली.



| | | |
|---|---|---|
| जन्म | : | २५ मे १९४५ |
| जन्मठिकाण | : | बाभळगाव, जि. लातूर |
| शिक्षण | : | बी. एस्सी., बी.ए., एल.एल.बी. |
| ज्ञात भाषा | : | मराठी, हिंदी व इंग्रजी |
| पत्नी | : | श्रीमती वैशाली |
| मुले | : | अमित, रितेश, धीरज |

## प्रगती आणि प्रतिमा

### लातूर/उस्मानाबाद

१९७१ पासून दुष्काळ निवारण समितीचे चिटणीस, सबसिडीवर मजुरांना धान्याचे वाटप, शेतकऱ्यांना तगाई कर्जे मिळवून देण्यासाठी प्रयत्न, उपाध्यक्ष, बलभीम वाचनालय, भारत स्काऊट आणि गाईडच्या लातूर लोकल असोसिएशनचे असिस्टंट कमिशनर म्हणून कार्य; १९७५ सदस्य, लातूर कृषी उत्पन्न बाजार समिती; १९७९ संचालक, उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व १९७९ महाराष्ट्र राज्य सहकारी बँक; १९७४ बाभळगाव ग्रामपंचायतीचे सदस्य व १९७४ ते १९७६ सरपंच; १९७४ ते १९८० सदस्य, उस्मानाबाद जिल्हा परिषद व उप सभापती, लातूर लातुका पंचायत समिती; १९७५ ते १९७८ अध्यक्ष, उस्मानाबाद जिल्हा युवक काँग्रेस, युवक काँग्रेसच्या पाच-कलमी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी यशस्वी प्रयत्न; जिल्ह्यातील युवकांना संघटित करण्याचे कार्य; अध्यक्ष, तालुका इंदिरा काँग्रेस.

### महाराष्ट्र

१९८०-८५, १९८५-९०, १९९०-९५, १९९९-२००४ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; जानेवारी, १९८२ ते फेब्रुवारी, १९८३ कृषी, ग्रामविकास, शिक्षण तंत्रशिक्षण, सहकार, क्रीडा, युवक कल्याण खात्याचे राज्यमंत्री; फेब्रुवारी, १९८३ ते मार्च, १९८५ गृह, सामान्य प्रशासन, माहिती व जनसंपर्क खात्याचे राज्यमंत्री; मार्च, १९८५ ते जून, १९८५ शिक्षण, तंत्रशिक्षण व सेवायोजन खात्याचे राज्यमंत्री (स्वतंत्र कार्यभार); मार्च, १९८६ ते जून, १९८८ पर्यंत महसूल, सहकार, सार्वजनिक बांधकाम, परिवहन, विधान कार्य खात्यांचे मंत्री; जून, १९८८ ते मार्च, १९९० कृषी, फलोत्पादन, पर्यटन, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण (कडा) खात्यांचे मंत्री; मार्च, १९९० ते जानेवारी, १९९१ शिक्षण, तंत्रशिक्षण, पशुसंवर्धन, दुग्धविकास आणि मत्स्यव्यवसाय खात्यांचे मंत्री; जानेवारी, १९९१ ते नोव्हेंबर, १९९२ उद्योग खात्याचे मंत्री; नोव्हेंबर, १९९२ ते मार्च, १९९३ उद्योग व जलसंधारण खात्याचे मंत्री; मार्च, १९९३ ते मार्च, १९९५ महसूल व सांस्कृतिक कार्य खात्याचे मंत्री; १८ ऑक्टोबर, १९९९ ते १८ जानेवारी, २००३ महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, या काळात महाराष्ट्राची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी कठोर निर्णय घेतले. पहिलीपासून इंग्रजी, माहिती तंत्रज्ञानावर भर देणारे नवे औद्योगिक धोरण, जैव तंत्रज्ञान धोरण, जुन्या झोपडपट्ट्यांना कायद्याने संरक्षण, नगराध्यक्षांची थेट निवड करण्याबाबत कायद्यात दुरुस्ती, ग्रामसभांना सर्वाधिकार, राज्य अल्पसंख्याक आयोगाची स्थापना, संजय गांधी निराधार अनुदान योजनेच्या अनुदानात वाढ, मुद्रांक शुल्क आणि नोंदणी कार्यालयाचे संगणकीकरण, नवी मुंबई येथे विशेष आर्थिक क्षेत्र मंजूर, गुटखाबंदी, मुंबईला जागतिक दर्जाचे शहर बनविण्याच्या दृष्टीने प्रत्यक्ष कामाला सुरुवात, राजमाता जिजाऊमाता बाल आरोग्य व पोषण मिशनची स्थापना; ऑक्टोबर, २००४ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड; १ नोव्हेंबर, २००४ रोजी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून शपथ. या काळात शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी विशेष पॅकेज, शासकीय सेवेमध्ये खेळाडूंसाठी ५ टक्के कोटा, शेतकऱ्यांना अल्पव्याजात कर्ज, विदेशी थेट गुंतवणूकीत लक्ष देण्यासाठी विशेष समितीची स्थापना, अनुसूचित जाती/जमातीच्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती दुप्पट, डान्सबार बंदी, अनुसूचित जाती/जमातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात अर्थसंकल्पात तरतूद इ. महत्त्वाचे निर्णय.

### दिल्ली

२८ मे, २००९ ते १९ जानेवारी, २०११ केंद्रीय अवजड उद्योग व सार्वजनिक उपक्रम मंत्री; १९ जानेवारी, २०११ ते १२ जुलै, २०११ केंद्रीय ग्रामीण विकास व पंचायती राज मंत्री; १२ जुलै, २०११ ते १० ऑगस्ट, २०१२ केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान मंत्री; २६ जून, २०१२ ते १० ऑगस्ट, २०१२ केंद्रीय सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्री (अतिरिक्त कार्यभार).

**– संकलन: रविकिरण जोशी** (संपर्क:९८६९००४४९६)

महासंचालक होते भूषण गगराणी. त्यांच्या समवेत आम्ही सायंकाळी 'रामगिरी'वर विलासरावांच्या पत्रकार परिषदेला गेलो. दिवसभर झालेल्या घडामोडींनंतर विलासराव म्हणाले, ''व्वा, त्रिवेदी! प्रश्नही आपणच निर्माण करायचे आणि ते आपणच सोडवायचे. व्वा, क्या बात है!''

**माझ्या रक्तातली काँग्रेस कोण काढणार?**

विलासरावांनी आपल्या राजकीय कारकिर्दीत अनेक चढउतार पाहिले. १९९५ साली झालेल्या पराभवानंतर त्यांनी विधान परिषदेची निवडणूक लढविली. काँग्रेसच्या अधिकृत उमेदवाराच्या विरोधात त्यांची ही निवडणूक लढविण्यात आल्यामुळे त्यांना काँग्रेस पक्षातून निलंबित करण्यात आले. असं असलं तरी ते काँग्रेसीच होते. त्यांना प्रतिक्रिया विचारली असता ते क्षणार्धात उद्गारले, ''मला काँग्रेसमधून काढलं असलं तरी माझ्या रक्तातली काँग्रेस कोण काढणार?'' विधान परिषदेत पराभूत झालेले विलासराव राजकीय घडामोडीनंतर १९९९ साली महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले आणि वसंतराव नाईकांनंतर सर्वात जास्त काळ मुख्यमंत्री पदावर राहण्याचा विक्रम त्यांनी आपल्या नावावर नोंदविला.

**हेच खरे निष्ठावंत**

विलासरावांकडे कोणतेही पद नसताना 'पूर्णा'वरील कार्यालयात ते बसले होते. मोजून चार-पाच कार्यकर्ते त्यांच्यासमवेत गप्पा मारत बसले होते. एका पत्रकाराने ही बाब त्यांच्या निदर्शनास आणली, तेव्हा ते म्हणाले, ''हे चार जणच खरे निष्ठावंत आहेत.'' विलासरावांचं हे वाक्य खरंच सूचक होतं.

**दत्ताजी साळवी आणि विलासरावांची जुगलबंदी**

दत्ताजी साळवी ही शिवसेनेची बुलंद तोफ. ते उत्कृष्ट अभिनेतेही होते. 'बेबंदशाही' या नाटकात त्यांनी भूमिकाही केलेली. विधान परिषदेत दत्ताजी साळवींनी बेबंदशाहीतला एक प्रवेश खडान्‌खडा म्हणून दाखविला. विलासराव सांस्कृतिक कार्यमंत्री होते. या विषयावरच्या चर्चेला विलासरावांनी दिलेलं उत्तर आणि दत्ताजींचा नाट्यप्रवेश ही जुगलबंदी आमदार आणि पत्रकारांना एक मेजवानीच ठरली होती.

**योगेश वसंत त्रिवेदी**
संपर्क :९८२०३५५६१५

# मानसिक बदलाची आवश्यकता

शेतकऱ्यांनी स्वत:च्या मालकीतला व्यवसाय म्हणून शेतीकडे पाहिले आहे. त्यातून केवळ स्वतंत्रपणाचीच नव्हे, तर इतरांची मदत नको असण्याची भावना निर्माण होते. त्यामुळे सहकार, सहकारी संस्था यांचीसुद्धा गरज पटायला अनेकांना कठीण जाते. पण, हे बदलणे व काळाच्या गरजेनुसार सहकाराला अनुकूल असा मानसिक बदल होणे आवश्यक आहे.

**विदर्भ विकास आणि सहकार**

शेती व नैसर्गिक संसाधने यांची उपलब्धता विचारात घेतल्यास विदर्भ हा संपन्न प्रदेश आहे. परंतु, संसाधनांचा विज्ञान-तंत्रज्ञानद्वारा नीट उपयोग न झाल्यामुळे शेतकरी व जंगलाच्या आधाराने राहणारा आदिवासी समाज गरीबच राहिला आहे.

महाराष्ट्रातील ६१,२३९ चौ. कि.मी.च्या जंगलापैकी ५२ टक्के जंगल एकट्या विदर्भात आहे. विदर्भातील सुमारे २८.६ भूभागावर जंगल आहे. विदर्भ वगळल्यास महाराष्ट्रातील फक्त १६.६७ भूभागावर जंगल आहे. विदर्भातही बुलढाणा, वाशिम, अकोला, वर्धा या जिल्ह्यामध्ये जंगलांचे प्रमाण कमी आहे. ते वाढवायलाच पाहिजे.

जंगलापासून ऊर्जा निर्माण करणारे गवताचे प्रकार, पशुखाद्य म्हणून उपयोगी पडणारे गवत व इतर खाद्य वनस्पती, औषधी वनस्पती, विविध प्रकारची फळे, इमारती लाकूड, बांबू इत्यादी मिळतात. परंतु, सध्या तरी जंगलाचा उपयोग वैज्ञानिक व संघटित पद्धतीने होत नाही. त्यामुळे अमरावती जिल्ह्यातील मेळघाट जंगलातील किंवा गोंदिया-गडचिरोली-चंद्रपूर जिल्ह्यातील आदिवासी हे कुपोषितच राहिले आहेत. त्या जंगलाच्या आधारावर वीजनिर्मिती, औषधीनिर्मिती व इतर उद्योग सहकारी तत्त्वावर काढता येऊन स्थानिक लोकांचे रोजगार उत्पन्न-राहणीमान यात निश्चितपणे प्रगती होऊ शकते.

केरळमध्ये आयुर्वेदिक औषधांच्या प्रगत आणि शास्त्रीय निर्मितीकरिता संशोधन संस्था निर्माण केल्या गेल्या आहेत. त्यांना औषधी वनस्पतींची लागवड करून नियमित पुरवठा करण्याकरिता शेतकऱ्यांना व त्या औषधी वनस्पतीवर ग्रामीण मजुरांना संलग्न करून घेतले आहे. त्यामुळे वनस्पती पुरविणाऱ्या जंगलांचा आधुनिक वैज्ञानिक पद्धतीने उपयोग करून व त्यासाठी सध्या हे उत्तम गुणवत्तेची म्हणून उच्च किंमत मिळवत आहेत.

विदर्भात मात्र सध्या जंगलांचा उपयोग पारंपरिक पद्धतीने सागवानाचे फर्निचर करायचे आणि बांबू एकतर कागद कारखान्यास अती स्वस्त भावात द्यायचा किंवा बुरुडांनी सुपे-टोपल्या तयार करायच्या... या पलीकडे मजल गेलेली नाही. स्थानिक आदिवासी, शेतकरी व मजुरांना सहकारी पद्धतीवर संघटित होण्याचे प्रोत्साहन देऊन विदर्भातील जंगलाचा सहकारी पद्धतीने विकास साधून आदिवासींचं जीवन प्रत्यक्षपणे सुधारता येईल.

विदर्भात नागपूर येथील महाराष्ट्र वीज मंडळातून उच्च पदावरून निवृत्त झालेले अभियंता श्री. प्रभाकर कुकडे यांनी ग्रामीण लोकांकरिता अनुदान न मागता अतिशय कमी किमतीत वीज तयार करण्याची योजना मांडली आहे. त्यात शहरी कृषी विद्यापीठाने जास्त ऊर्जा देणाऱ्या यशवंत (नेपियर) गवताच्या आधारे वीजनिर्मितीचे प्रारूप तयार केले आहे. इतर राज्ये जशी रेशीम उत्पादनाकडे प्राधान्याने लक्ष पुरवितात. तसे महाराष्ट्रात विदर्भाकरिता होणे आवश्यक आहे.

**कृषी औद्योगिक प्रक्रिया**

पश्चिम विदर्भात कापूस आणि संत्रा ही दोन महत्त्वाची पिके आहेत व कृषी औद्योगिक प्रक्रियांच्या व सहकाराच्या दृष्टीने शेतकऱ्यांच्या अधिक हिताची आहेत. सोयाबीन पीक वाढत आहे. परंतु, सोयाबीनचे तेल व ढेप विकणे इतकीच प्रक्रिया उपलब्ध आहे आणि त्यात जसे अमेरिका, जपान त्यांच्या गरजा पूर्ण करून घेण्यासाठी भारतात सोयाबीनच्या उत्पादनास प्रोत्साहन देऊन त्यात प्रत्यक्ष भाग घेत आहेत.

जपानमध्ये सोयाबीनपासून टोफू नावाचे व इतर खाद्यपदार्थही तयार केले जातात. म्हणून जपान मध्यप्रदेशाकडून सोयाबीन ढेपेची आयात करतो. विदर्भातील कापसाची व संत्र्याची तशी परावलंबी परिस्थिती नाही. ही पिके त्या प्रदेशात निर्माण झालेली व रुजलेली आहेत.

महाराष्ट्रातील एकूण कापूस उत्पादनापैकी सुमारे ६० टक्के कापूस विदर्भात होतो. वैज्ञानिक माहितीप्रमाणे कापसाच्या पऱ्हाटीपासून म्हणजे बुंद्या व फांद्यापासून कागद, हिरव्या पानापासून रसायने, रुईपासून सूत, सरकीच्या टरफलांवर तंतू शिल्लक राहतात. त्यापासून गन कॉटन व सर्जिकल कॉटन, सरकीच्या टरफलांपासून खत, आतील बियांपासून पौष्टिक असे खाद्यतेल व जनावरांसाठी ढेप वाळलेल्या झाडांपासून पृष्ठ, वाळलेल्या पऱ्हाट्यांपासून रासायनिक प्रक्रिया करून बोर्डस् असे २५ ते २६ प्रकारचे उपपदार्थ तयार होतात.

**कापूस संकुले**

हे सर्व कापसाच्या उपयोगांनुसार सहकारी तत्त्वावर शेतकऱ्यांच्या कापूस प्रक्रिया उद्योगांसाठी कापूस संकुले, कॉटन कँडचे क्लासेस सुरू करणे आवश्यक आहे. अशीच संकुले मराठवाडा व खानदेशासाठी उपयोगी पडली तर त्यातून शेतकऱ्यांकडे कारखान्याच्या मालकीतून वाढणारे उत्पन्न शेतकऱ्यांच्या मुलामुलींना प्राधान्याने तांत्रिक रोजगार आणि २-३ जिल्ह्यांसाठी एक संकुल असे केल्यास मुंबई-पुण्यासारख्या केंद्रित विकास टाळून विकेंद्रित विकास इत्यादी महत्त्वाची उद्दिष्टे गाठता येतील. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये निराशेची भावना निर्माण झाली आहे.

सहकारी संस्था या दुकानासारख्या किंवा कंपनीसारख्या केवळ आर्थिक संस्था नसतात. त्यांचे यश सदस्यांच्या त्यागावर, सरकारच्या आणि क्षमतेच्या संस्कृतीवर अवलंबून असते. म्हणून त्या यशस्वी होण्यास वेळ लागतो. परंतु, जागतिकीकरणाच्या गळेकापू स्पर्धेत शेतकरी, कारागीर इत्यादींना सहकाराशिवाय अंतरही दिसत नाही. तोच एक आशेचा किरण आहे.

**डॉ. श्रीनिवास खांदेवाले**

संपर्क - ९३७२३९२१५७



# सारे काही घरासाठी



**दे**शातील नागरी भागातील लोकसंख्या जसजशी वाढू लागली तसतशी नागरी/शहरी भागातील सदनिकांची/घरांची आवश्यकता वाढू लागली व कमी जागेत जास्तीत जास्त सदनिका उपलब्ध करण्यासाठी विकासकांच्या माध्यमातून गृहनिर्माण प्रकल्प, मोठे टॉवर्स, कॉम्प्लेक्स इ. सुरू झाले. सदनिका खरेदी करताना विकासक व गाळेधारक यांच्यात करार होऊ लागले. सन १९६३ मध्ये यासाठी महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत अधिनियम, अस्तित्वात आला. त्यानुसार सदनिका खरेदीदारांच्या हक्काच्या रक्षणासाठी तरतुदी करण्यात आल्या.

सहकारी गृहनिर्माण संस्थेची नोंदणी करताना संस्थेच्या उपविधीतही संस्थेच्या इमारतीचे व जमिनीचे संस्थेच्या नावे कन्व्हेयन्स करून घेणे हा महत्त्वाचा उद्देश नमूद आहे. तसेच उपविधीत (उपविधी क्र. १५५) मध्ये कन्व्हेयन्ससाठीची पद्धत दिली आहे. त्यानुसार मसुदा खरेदीखत तयार करून ते विकासक व संस्था यांनी मंजूर करून त्यांची नोंदणी करणे आवश्यक आहे. तथापि, विकासक बऱ्याच वेळा संस्था स्थापन करण्यातही पुढाकार घेत नाहीत. म्हणून विकासकांच्या सहकार्याशिवाय सदनिकाधारकांना इमारतीच्या व्यवस्थापनासाठी सहकारी गृहनिर्माण संस्थेची नोंदणी करून घ्यावी लागते. त्याप्रमाणे इमारत व जमिनीचे अभिहस्तांतरण (कन्व्हेयन्स) या बाबींकडेही विकासकांचे लक्ष नसते. आपली ही जबाबदारी पार पाडण्यात विकासक नेहमीच कसूर करतात. म्हणून महाराष्ट्र शासनाने मानीव अभिहस्तांतरण (डीम्ड कन्व्हेयन्स)बाबत मोफा कायद्यात सुधारणा करून यासंबंधी कार्यपद्धती तयार केली आहे.

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत अधिनियम १९६३ चे कलम ५ अ आणि अधिनियमाचे कलम १० व ११ नुसार कार्यवाहीसाठी प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हा उपनिबंधकांना सक्षम अधिकारी म्हणून घोषित केले आहे.**

महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत अधिनियम १९६३ चे कलम १० नुसार विकासक व इमारतीतील सदनिकाधारकांची गृहनिर्माण संस्था स्थापन करीत नसल्यास त्याबाबत सक्षम अधिकारी सदनिकाधारकांचे अर्जास अनुसरून संबंधित निबंधकांना गृहनिर्माण संस्था नोंदणीबाबत निर्देश देतात. या अधिनियम १९६३ चे कलम ११ नुसार गृहनिर्माण संस्थेच्या अर्जानुसार सक्षम अधिकारी मानीव अभिहस्तांतरणाबाबत आदेश व प्रमाणपत्र देतात.

सदनिकाधारकांच्या गृहनिर्माण संस्थेला जमीन व इमारतीचे मालक होण्यास याद्वारे सुलभ होणार आहे.

या कायद्यान्वये मानीव अभिहस्तांतरणासाठी आवश्यक अर्जाचा नमुना व प्रस्तावासोबत द्यावयाची कागदपत्रे निश्चित करून दिली आहेत. ती खालीलप्रमाणे:-

■ कलम ११ (३) अन्वये नमुना ७ मध्ये प्रवर्तक / बांधकाम व्यावसायिक यांनी विक्री केल्याच्या करारनाम्याची स्वाक्षरीसह नोंदणीकृत प्रत. (जागेचा अद्ययावत ७/१२ उतारा आणि गाव नमुना क्र. ६ (फेरफाराच्या नोंदीसह)

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत अधिनियमातील कलम १० व नियम ८ मधील तरतूद व खात्याकडील परिपत्रानुसार ६० टक्केपेक्षा जास्त सदनिकांची विक्री झाल्यानंतर इमारतीच्या व्यवस्थापनाच्या दृष्टीने विकासकाने सदनिकाधारकांची सहकारी गृहनिर्माण संस्था ४ महिन्यांत स्थापन करून देणे आवश्यक केले आहे. या अधिनियमाचे कलम ११ व नियम ९ नुसार सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन झाल्यानंतर ४ महिन्यांत जमीन व इमारतीचे सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या नावे हस्तांतरण करून देणे आवश्यक आहे.**

विहित नमुन्यात अर्ज ■ अर्जास रुपये २,०००/- चा कोर्ट फी स्टॅम्प ■ अर्जासोबत नोटराईज्ड अथवा कार्यकारी दंडाधिकारी यांच्यासमोर केलेले सत्यापन ■ संस्था नोंदणी दाखल्याची सत्यप्रत ■ मूळ मालक व विकासक यांचे पूर्ण नाव व पत्ते ■

**मालमत्ता पत्रक /गाव नमुना नं. २. (खालील नमुन्यात यादी)**

| अ. क्र. | सदनिका क्रमांक | सदनिका खरेदीदाराचे नांव | सदनिकेचे क्षेत्रफळ | भरलेले मुद्रांक शुल्क | दस्त नोंदणी क्रमांक | प्रदान केलेले नोंदणी शुल्क |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |

वरील नमुन्यातील ५, ६ व ७ च्या नोंदणी पावत्या. अभिहस्तांतरण करण्याविषयी संबंधित मूळ मालक व बिल्डर, प्रमोटर यांना दिलेल्या नोटिशीची प्रत. (बिगर शेती आदेश) भोगवटा प्रमाणपत्र. (बांधकाम सुरू करण्याचे प्रमाणपत्र) (अर्जाच्या पृष्ठ्यर्थ इतर कोणत्याही जमिनीशी किंवा इमारतीशी संबंधित दस्तऐवज (टायटल व सर्च) (रिपोर्ट, विकसन करारनामा व मंजूर नकाशा इ.) सोसायटीच्या वतीने दावा दाखल करण्यासाठी सोसायटीच्या व्यवस्थापन मंडळाच्या संमतीने अर्जदारास अधिकार दिलेल्या ठरावाची सत्यप्रत. संस्थेने वकील दिला असल्यास वकालतनामा· अभिहस्तांतरित करावयाच्या जागेच्या क्षेत्रफळाविषयी आर्किटेक्टचा दाखला· डिम्ड कन्व्हेन्सचा ड्राफ्ट. (प्रस्तावातील सर्व दस्तऐवज प्रमाणित करण्यात यावेत.)

**मानीव अभिहस्तांतरण विविध टप्पे**

■ आवश्यक असणारे सर्व दस्त जमा करणे.

■ संचालक मंडळाच्या सभेमध्ये सही करण्याचे अधिकार देण्याचा ठराव करणे.

■ डीम्ड कन्व्हेयन्स प्रक्रियेसाठी संस्थेने अर्ज करणे.

प्रत्येक अर्ज हा अधिनियम, नियम यातील तरतुदीनुसार तयार करावा. अर्ज नमुना ७ मध्ये करणे आवश्यक आहे आणि त्यावर विहित केलेला न्यायालय फी मुद्रांक चिकटवावा तसेच आवश्यक ते चौकशी शुल्क प्रदान करावे. (रुपये२,०००/- कोर्ट फी स्टॅम्प ).

**अर्जाची छाननी**

अर्ज प्राप्त झाल्यावर सक्षम अधिकारी शक्य तितक्या लवकर त्याची छाननी करतील व छाननीनंतर नियमाच्या सर्व तरतुदींना पुष्टी देणारा आहे, याची खात्री करून घेईल. अर्ज अपूर्ण असेल तर संबंधित अर्जदारास त्रुटींची पूर्तता करण्याकरिता पत्र देऊन पूर्ततेनंतर अर्ज परिपूर्ण आहे अशी सक्षम प्राधिकाऱ्याची खात्री पटल्यास तो अर्ज दाखल करून त्याची नोंद नोंदवहीत करील.

**सुनावणीच्या दिनांकाची नोटीस**

अर्ज परिपूर्ण असल्याची सक्षम प्राधिकाऱ्याची खात्री झाल्यानंतर अर्जदार व संबंधित पत्रकारांना नियम १३ (२) प्रमाणे नमुना १० मध्ये अर्जाच्या सुनावणीसाठी निश्चित केलेल्या दिनांकासंबंधीची नोटीस सर्वपक्षकारांना पाठवतील.(अर्जदार संस्था, विकासक व जमीन मालक तसेच इतर संबंधित सर्व घटक)

**उपस्थिती व अनुपस्थिती**

सक्षम अधिकाऱ्याने सुनावणीच्या निश्चित केलेल्या दिनांकास प्रतिपक्ष सक्षम प्राधिकाऱ्यासमोर समक्ष किंवा आपल्या वकिलामार्फत किंवा अधिकृत प्रतिनिधीमार्फत उपस्थित राहील आणि लेखी निवेदन सादर करील, अर्ज सुनावणीच्या वेळी अर्जदार आणि प्रतिपक्ष किंवा प्रतिपक्षापैकी कोणीही उपस्थित राहणार नसेल किंवा अनुपस्थित असेल तर सक्षम प्राधिकारी नैसर्गिक न्याय तत्त्वानुसार मराठी व इंग्रजी वर्तमानपत्रात जाहीर नोटीस प्रसिद्ध केल्यानंतरही प्रतिवादी उपस्थित न राहिल्यास अर्जावर एकतर्फी निर्णय देतील.

**दस्तऐवज सादर करणे व तपासणी करणे**

पक्षकार अर्जामध्ये उल्लेख केलेले दस्तऐवज व मूळ प्रत सादर करील.

**अर्ज सुनावणीची पद्धती**

प्रतिपक्षाचे निवेदन प्राप्त झाल्यावर अर्जदार, बचावाच्या विवादावर भाष्य करील. प्रतिपक्षास तशी इच्छा असेल तरी सुनावणीच्या पुढील दिनांकास बचावाच्या पुष्ट्यर्थ उत्तर दाखल करता येईल. मात्र, कोणत्याही पक्षकारास उलट तपासणीस परवानगी असणार नाही. सक्षम अधिकारी दोन्ही पक्षकारांचा युक्तिवाद ऐकण्यास प्रारंभ करील आणि सुनावणीनंतर आदेशाकरिता, ऐकण्याची कार्यवाही बंद करील. सक्षम प्राधिकारी, वाजवी कालावधीत आणि अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांपेक्षा अधिक होणार नाही अशा रीतीने पक्षकारांना पुरेशी संधी देऊन आणि नैसर्गिक न्यायाची तत्त्वे वापरून यथोचित असा आदेश देईल.

प्रकरण डीम्ड कन्व्हेयन्स करण्यासाठी योग्य आहे अशी खात्री झाल्यास तसे आदेश व प्रमाणपत्र सक्षम प्राधिकारी देईल. हे पत्र व मानीव खरेदीखत सोसायटीने दुय्यम निबंधक यांच्याकडे देऊन दुय्यम निबंधक त्या प्रमाणपत्राची आपल्या दप्तरात नोंद करील आणि सोसायटीला इंडेक्स-२ देईल. हा इंडेक्स मिळणे म्हणजे सोसायटीच्या नावे कन्व्हेयन्स होय. येथे डिम्ड कन्व्हेयन्सची प्रक्रिया बऱ्याच अंशी पूर्ण होईल.

**आदेश व प्रमाणपत्रानंतरची कारवाई**

**मानीव खरेदी खत :** आदेश व प्रमाणपत्र निर्गमित केल्यानंतर सक्षम प्राधिकारी संबंधित संस्थेस मानीव खरेदी खत तयार करून घेण्यास सांगतील. मानीव खरेदी खत तयार झाल्यानंतर सक्षम प्राधिकारी ते योग्य असल्याची खात्री करतील व संबंधित संस्थेस मुद्रांक शुल्काविषयी अभिनिर्णय करून घेण्यास सांगतील.

**अभिनिर्णय :-** मानीव खरेदीखत अभिनिर्णयासाठी तयार झाल्यानंतर मुद्रांक जिल्हाधिकारी हे मानीव खरेदी खतामध्ये समाविष्ट अंतिम सदस्यांची मुद्रांक शुल्क आकारणीच्या दृष्टीने चौकशी करतील; व ते योग्यरित्या मूल्यांकित आहे किंवा नाही याची खात्री करून देतील. आवश्यक वाटल्यास मुद्रांक शुल्काची वसुली दंडासहीत करतील. अधिनियमनुसार देय मुद्रांक शुल्क संस्थेने भरणा करावे.

**मानीव खरेदीखताची नोंदणी :** दस्तऐवज अभिनिर्णय होऊन प्रमाणित झाल्यानंतर तो निष्पादनासाठी सक्षम प्राधिकारी यांच्याकडे सादर केला जाईल.

सक्षम प्राधिकारी अशा पद्धतीने प्राप्त झालेल्या दस्तऐवजावर विकासक/बिल्डर यांच्या वतीने स्वत: अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या प्राधिकाऱ्यामार्फत निष्पादन करतील. निष्पादनाच्या दिनांकापासून ४ महिन्यांच्या आत दस्तऐवज नोंदणीसाठी दुय्यम निबंधकाच्या संबंधित क्षेत्रीय कार्यालयात हजर करावा. हजर करण्यास विलंब झाल्यास नियमाप्रमाणे दंड आकारला जाईल. असा दस्तऐवज नोंदणीसाठी दाखल झाल्यावर नोंदणी अधिकारी नोंदणी अधिनियमाप्रमाणे आवश्यक ती दस्त नोंदणीची कार्यवाही पूर्ण करतील.

**नोंदणीचे शुल्क :-** मानीव खरेदी खतातील सर्व सभासदांनी पूर्वी आपले करार नोंदविले असले तर त्यावर आवश्यक तेवढी नोंदणी फी भरली असल्यास मानीव खरेदी खतास या दस्तऐवजांचा पुरवणी दस्तऐवज धरून रु. १००/- इतकी नोंदणी फी आकारण्यात येते. परंतु, उर्वरितांचा व्यवहार हा प्रथमच दस्तऐवजांच्या स्वरूपात नोंदविला जात असेल तर अशा प्रकरणांत पूर्वी नोंदणी न केलेल्या सभासदांची लाभात हस्तांतरित होणाऱ्या मिळकतीचे एकत्रित खरे बाजारभाव मूल्य विचारात घेऊन त्यावर १०% दराने नोंदणी फीची आकारणी करावी. कोणत्याही परिस्थितीत नोंदणी फी ही नेमून दिलेल्या रुपये ३०,०००/- च्या कमाल मर्यादेपेक्षा अधिक असत नाही.

**७/१२ किंवा मिळकत पत्रिकेवर संस्थेच्या नावाची नोंद करून घेणे :-** मानीव खरेदी खताची फी भरून नोंदणी केल्यानंतर या नोंदणीकृत दस्तऐवजाप्रमाणे संबंधित ७/१२ प्रॉपर्टी कार्डवर संस्थेच्या नावाची नोंद करण्यासाठी तलाठी कार्यालयात संबंधित नगर भूमापन कार्यालयाकडे दस्तऐवज सादर करून मिळकत पत्रिकेवर/ ७/१२ वर संस्थेचे नाव नोंदवून घ्यावे.

**विलास गावडे,**
**संपर्क : ९८३३५६९५८५**

निद्रानाश असलेल्या व्यक्तीस रात्रीचा पहारेकरी व रातांधळेपणा असलेल्यास दिवसाचा पहारेकरी नेमलाय!




राजेंद्र सरग



# संधी आणि समृद्धी

भारतातील एकूण संत्रा पिकाखालील क्षेत्रापैकी सर्वांत जास्त म्हणजे २३ टक्के इतके क्षेत्र हे महाराष्ट्रात केंद्रित झालेले आहे. राज्यामध्ये जवळ-जवळ १.६१ लाख हेक्टर इतके क्षेत्र संत्रा-मोसंबी लागवडीखाली आहे. विदर्भातील नागपूर, अमरावती आणि वर्धा तसेच इतर जिल्ह्यांमध्ये मुख्यत्वे करून संत्रा व मोसंबीचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. त्याचप्रमाणे मराठवाड्यातील नांदेड, औरंगाबाद इत्यादी जिल्ह्यांमध्ये मोसंबीचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर सुरू झाले आहे. महाराष्ट्र राज्यात संत्रा व मोसंबी उत्पादन जरी मोठ्या प्रमाणावर घेतले जात असले तरी प्राप्त परिस्थितीमध्ये उत्पादित होणाऱ्या उत्पादनाची विक्री ही प्रामुख्याने देशांतर्गत बाजारपेठांमधूनच केली जाते. शेतकऱ्यांमध्ये बाजारपेठेचे अपूर्ण ज्ञान तथा संपर्क व नियोजनाचा अभाव यामुळे उत्पादकांना त्यांच्या मालाला (फळाला) योग्य व फायदेशीर बाजारभाव मिळत नाही. सध्याच्या वितरण व्यवस्थेमध्ये उत्पादक ते ग्राहक यामध्ये सुमारे चार मध्यस्थ (दलात) कार्यरत असतात. त्यामुळे उपभोक्त्यांना (ग्राहक) मिळणारे दर हे शेतकरी उत्पादकांना मिळणाऱ्या दरापेक्षा चारपट अधिक दराने उपलब्ध होत असतात. मधला फायदा हा मध्यस्थाच्या खिशामध्ये जात असून मध्यस्थ अधिक संपन्न होत आहेत.

२०० वर्षांपूर्वी राजे रघुजी भोसले यांनी सर्वप्रथम संत्र्याची कलमे आणून त्यांचा प्रचार व प्रसार केला व अजूनही संत्रा लागवडीखाली जास्तीत जास्त क्षेत्र विदर्भातील अमरावती, नागपूर व वर्धा जिल्ह्यात असून आता याची इतरही जिल्ह्यांत काही प्रमाणात लागवड सुरू झालेली आहे.

कुठल्याही पिकाचे अथवा फळ पिकाचे निश्चित नियोजन व धोरण असावे लागले. ज्यामध्ये योग्य जातीची रोपे (कलम) मिळणे आवश्यक असून त्यांच्यासोबत योग्य ते संपूर्ण तांत्रिक ज्ञान, जमिनीची निवड करण्यापासून तर पाणी देण्याच्या पद्धती व येणाऱ्या रोगाचा प्रतिकार करणे ह्या सर्वच गोष्टींबाबतसुद्धा शेतकऱ्यांपर्यंत माहिती पोहोचविणे आवश्यक आहे. पण, दुर्दैवाने नेमके संत्रा व मोसंबीबाबतीत या महत्त्वाच्या गोष्टी घडल्या नाहीत. आजपर्यंत ज्या बागा टिकून आहेत किंवा लागवड सुरू आहे त्यामध्ये शेतकऱ्यांच्या अनुभवाचाच जास्तीत जास्त वापर केला गेला. तुलनाच करावयाची झाल्यास ३०-४० वर्षांपूर्वीचे द्राक्ष आठवले तर जाड सालीचे आणि आत बिया असलेली द्राक्षे मिळायची. चवीला सुद्धा थोडीफार आंबट असायची. पण आता द्राक्षाच्या असंख्य अत्यंत सुंदर जाती तयार झाल्या असून त्यांनी जागतिक बाजारपेठेमध्येसुद्धा आपले स्थान निर्माण केले आहे आणि शेतकऱ्यांनासुद्धा जगातील कुठल्या देशात कशा प्रकारची द्राक्ष आवडतात याची पूर्ण माहिती असून त्याप्रमाणे क्वॉलिटी तयार केली जाते. त्याचवेळी संत्र्याकडे पाहिल्यास कुठल्याही जातीचा नवीन प्रकार किंवा बाजारपेठेचा अभ्यास करून त्याप्रमाणे फळ तयार करण्यापर्यंत शास्त्रशुद्ध तंत्रज्ञान शेतकऱ्यापर्यंत पोहोचलेले नाही.

जगामधील प्रगत देशांमध्ये संत्रा-मोसंबी ज्यूसचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. प्रत्येक देशाच्या आपल्या वेगवेगळ्या संत्रा-मोसंबी जाती आहेत. पण, त्यांचे होणारे उत्पादन फ्रेश ज्यूस किंवा प्रक्रिया केलेला ज्यूस पल्प अशा प्रक्रिया केलेला पदार्थांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. त्यामुळे निश्चित त्या त्या बाजारपेठेमध्ये त्यांच्या फळाला योग्य तो दरसुद्धा मिळतो. जगामध्ये सर्वांत जास्त ज्यूस संत्रा-मोसंबी फळ यांचाच वापरला जातो. येणाऱ्या काळात आपल्या देशातसुद्धा ह्याचा वापर प्रचंड प्रमाणात वाढणार आहे हे निश्चित; पण, अजून आपल्याकडे प्रक्रिया केलेले संत्रा-मोसंबी ज्यूस मिळते. आपल्या येथे झालेल्या फळांपासून नव्हे तर विदेशातून आलेल्या पल्पपासून ते ज्यूस तयार केले जाते. कारण, आज मोठ्या प्रमाणात संत्रा-मोसंबीचा ज्यूस किंवा पल्प करणारा एकही प्रकल्प सुरू नाही. याचा सर्वांत मोठा फटका संत्रा-मोसंबी उत्पादकांना बसत आला आहे. कारण, जवळ-जवळ ३० टक्के फळे ही आकाराने लहान असतात व याला बाजारपेठेमध्ये अत्यंत कमी भाव मिळतो. ही संपूर्ण फळाची बाजारपेठही मध्यस्थांच्या हाती असल्यामुळे संत्रा-मोसंबी-लिंबू उत्पादकांना कधीच योग्य दर मिळालेले नाहीत. विशेष म्हणजे ह्या संत्र्यांचा ज्यूस किंवा पल्प चांगला होत नाही. स्वित्झर्लंड येथील कंपनीने ३०० कोटी रुपयांचा प्रकल्प टाकण्याची तयारी दाखविली. त्यांनी सतत दोन वर्षे अमरावती, नागपूर भागात सर्व बाबींचा अभ्यास केला. त्यामध्ये फळाची क्वालिटी, फळांची उपलब्धता येथील वातावरण, वाहतूक, फळांचा टिकाऊपणा या सर्व बाबींचा अभ्यास केला. वरूड येथे संत्रा परिषदेमध्ये याबाबत चर्चा झाली व लवकरच आम्ही प्लांटचे काम सुरू करू म्हणून त्यांच्या प्रतिनिधीने



सांगितले. महत्त्वाचा मुद्दा म्हणजे त्यांना जेव्हा विचारण्यात आले की, ह्या संत्र्याबद्दल अशी चर्चा आहे की याचा पल्प किंवा ज्यूस चांगले होणार नाही. थोडा कडवटपणा येईल. त्यावेळी त्याच परदेशातील तज्ज्ञ मंडळींनी स्पष्टपणे सांगितले की, आम्ही सर्वच प्रकारच्या टेस्ट केल्या असून हे संत्रे जगातील सर्वांत चांगले संत्रे आहे. संत्रा-मोसंबी फळासाठी हा प्रकल्प वरदान ठरणार आहे हे निश्चित. संत्रा, मोसंबी, लिंबू फळाचे महत्त्व जगातील बाजारपेठेमध्ये मान्य झाले आहे. मोसंबी आणि संत्राची ज्यूस सेंटर या पाच वर्षांतच कितीतरी पटीने वाढली आहेत. हळूहळू शेतकरी आपला माल विकण्याकरिता बाजारपेठेमध्ये उतरत आहेत. शेतकऱ्यांना त्यांच्या फळाचे मिळणारे दर व उपभोक्त्यांना विकतानाचा दर यामध्ये खूप तफावत आहे.

संत्रा-मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांमध्ये आता आलेली नवीन पिढी ही सुशिक्षित असून नवीन शिकण्याची तसेच काही शास्त्रशुद्ध करण्याची व बाजारपेठेमध्ये स्वत: बसण्याची तयारी आहे. त्यांना योग्य ते मार्गदर्शन, सहकार्य, नियोजन व समन्वयाची जोड दिल्यास फार मोठा बदल अपेक्षित आहे. याकरिता उत्पादकांचे संघटन मजबूत होणे आवश्यक असून सर्वांनी मिळून विक्रीचा भाव ठरवल्यास फायदा होऊ शकतो. जो जास्त नफा मध्यस्थांना मिळतो त्याऐवजी तो उत्पादकांना मिळावा याकरिता प्रयत्न करावा लागेल. यातून संत्रा महोत्सव ही संकल्पना सुरू झाली व अल्प प्रमाणात का होईना त्याचा फायदा झाला. जगातील बाजारपेठेमध्येसुद्धा लिंबूवर्गीय फळे लवकरच जास्त प्रमाणात जातील. खरी समस्या संत्रा-मोसंबीमध्ये आहे ती लहान फळाची. मात्र, स्वित्झर्लंड येथील कंपनीचा संत्रा मोसंबीचा प्रक्रिया प्रकल्प हा नांदेड येथे होत आहे व शासनाच्या सहकार्याने शेतकऱ्यांनी तयारी दाखविल्यास होणाऱ्या फळ प्रक्रिया प्रकल्पामुळे ही समस्या दूर झाल्यास संत्रा मोसंबीचे भाव स्थिर राहून शेतकऱ्यांना परवडणारे राहतील. येणाऱ्या नवीन तंत्रज्ञानामुळे फळांचे नुकसान कमी होऊन देशातील व जगातील बाजारपेठेमध्ये चांगला वाव मिळेल. कोल्ड स्टोअरेज व इतर सुविधांचा वापर योग्य रीतीने केल्यास संत्रा मोसंबी वर्षातील आठ महिने बाजारपेठेमध्ये राहू शकते. येणाऱ्या काळात संत्रा मोसंबी लिंबू या फळांच्या किमती ५० ते ७० टक्केपर्यंत वाढू शकतील. बहुतेक हॉटेलमध्ये संत्रा मोसंबी ज्यूस ब्रेकफास्टसोबत दिले जाते.



इस्रायल व आपल्या देशामध्ये काही फळ पिकांच्या तंत्रज्ञान देवाण-घेवाणीबद्दल करार झाले असून त्याची काही प्रमाणात अंमलबजावणीसुद्धा सुरू झाली आहे. त्यामुळे उत्पन्नात व क्वालिटीमध्ये खूप चांगला बदल होऊन आपण जागतिक बाजारपेठेमध्ये टिकाव धरू शकतो.

याकरिता आतापासूनच नियोजनबद्ध पद्धतीने लिंबूवर्गीय फळांच्या उत्पादन व विपणनाची आखणी करणे गरजेचे आहे.

या सर्व बाबीकरिता लिंबूवर्गीय फळांचे धोरण ठरवावे असा आग्रह संत्रा मोसंबी उत्पादकांतर्फे शासनाकडे धरण्यात आला आहे.

**स्पर्धेमध्ये टिकून राहण्यासाठी**

देशांतर्गत स्थानिक बाजारपेठांचा शोध घेऊन स्थानिक विपणन व्यवस्था मजबूत करून मध्यस्थांचा (दलाल) प्रभाव कमी करावा लागेल. संत्रा मोसंबी निर्यातीचा आराखडा तयार करून निर्यात प्रक्रिया राबवावी लागेल. निर्यातक्षम संत्रा मोसंबी उत्पादनासाठी योग्य तंत्रज्ञानाचा वापर करून उच्च प्रतीचे संत्रा उत्पादन करावे लागेल. उच्च प्रतीच्या संत्रा मोसंबी कलमांची निर्मिती करणाऱ्या नर्सरीला योग्य ते तंत्रज्ञान द्यावे लागेल.

संत्रा मोसंबी उत्पादन क्षेत्रात ग्रेडींग, कोटींग, कोल्डस्टोअरेज यासारख्या पायाभूत सुविधा निर्माण कराव्या लागतील. स्थानिक विपणन व्यवस्था मजबूत करावी लागेल. जास्तीत जास्त संत्रा मोसंबी फळ विक्री प्रक्रिया सहकारी संस्थांना निर्यात प्रक्रियेत सामावून घ्यावे लागेल. संत्रा वाहतूक व्यवस्थेंतर्गत सुधारणात्मक प्रयत्न करावे लागतील. रेल्वे वॅगनसच्या उपलब्धतेसाठी प्रयत्न करावे लागतील. संत्र्यासाठी क्रेटस्, कोरोगेटेड बॉक्स, निर्यातीतील वाहतूक खर्चात सबसीडी मिळविण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. रिटेल आऊटलेट, फ्रुट ज्यूस पार्लरची साखळी तयार करून शेतकरी व शेतकरी संस्था यांच्या माध्यमातून उत्पादन ते उपभोक्ता विपणन व्यवस्था निर्माण करावी लागेल.

पुढील काळात मराठवाडा-विदर्भाची ओळख ही मोसंबी संत्रा फळाने होणे जरुरी आहे. याला तंत्रशुद्ध शास्त्राची जोड देणे आवश्यक आहे. पंजाबमध्ये किन्नो या संत्रा वर्गीय फळाकरिता पंजाब सरकारने सिट्रस इस्टेट हे मार्गदर्शक प्रकल्प उभे केले आहे. यामुळे उत्पादकांना कलम लावणीपासून विपणन विक्री व्यवस्थापनापर्यंत सर्व मार्गदर्शन व सहकार्य केले जाते. त्याचप्रकारे प्रगत देशांची तांत्रिक मदत घेऊन संत्रा मोसंबी लिंबू या फळांचे पुढील नियोजन आपल्याला करता येईल. नवीन तंत्रज्ञान वापरून कमी पाण्यात चांगल्या प्रतीच्या संत्रा मोसंबीचे उत्पादन करणे शक्य आहे.

येणाऱ्या काळात पाण्याचे नियोजन, कोल्डस्टोअरची व्यवस्था, ग्रेडींग, कोटींग, या गरजेच्या गोष्टी आहेत. याकरिता शासनाची मदत घ्यावी लागेल. सोबतच शेतकऱ्यांनी एकमेकांच्या संपर्कात राहून आपले संघटन मजबूत करून आपले अनुभव व ज्ञान इतरांना देणे व इतरांकडून घेणे आवश्यक आहे. विदर्भातील विविध भागातील संत्रा, मोसंबी उत्पादक शेतकरी व शासनाच्या कृषी विभाग व पणन विभागाच्या सहकार्याने नागपूर, पुणे, मुंबई, दिल्ली, बंगलोर येथे संत्रा महोत्सव घेतले होते. त्यामध्ये महाऑरेंजने समन्वयकाची भूमिका घेतली. या महोत्सवामध्ये ग्राहकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला व शेतकऱ्यांनासुद्धा चांगला भाव मिळाला. ज्या दिवशी शेतकरी सामूहिकरीत्या देशांतर्गत व परदेशातील बाजारपेठेमध्ये स्वत: संत्रा, मोसंबी लिंबूची विक्री करेल तेव्हापासून आपल्या प्रगतीला कुणीही रोखू शकणार नाही. सध्या असलेले लागवडीखालील क्षेत्र अपुरे पडेल. याकरिता नियोजन केल्यास येणाऱ्या काळात जागतिक बाजारपेठेत मराठवाडा-विदर्भातील संत्रा, मोसंबी, लिंबू अग्रणी स्थान मिळवेल यात शंका नाही.

संत्रा मोसंबी निर्यात क्षेत्राच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाची नोडल एजन्सी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाने संत्रा मोसंबी उत्पादकांना सोबत घेऊन राष्ट्रीय कृषी विकास योजना, निर्यात केंद्र व देशांतर्गत बाजारपेठेमध्ये संत्रा मोसंबी लिंबू यांच्या विक्रीकरिता नियोजनपूर्वक प्रयत्न केल्यास महाऑरेंज व संलग्न संस्थांना सहकार्य केल्यास निश्चित नवीन दिशा मिळेल.

**श्रीधर ठाकरे**
**संपर्क : ९८२२२२८५३३**

# परिवर्तनाच्या टप्प्यावर

## सहकारी संस्था स्थापण्यास मूलभूत अधिकाराचा दर्जा देणारी ९७ वी घटनादुरुस्ती

२०११ मध्ये केंद्र शासनाने 'सहकारी संस्था' प्रधान ठरवून संपूर्ण देशात सहकार कायद्याबाबत एकवाक्यता येण्याच्या दृष्टीने भारतीय राज्यघटना (९७ वी दुरुस्ती) कायदा २०११, संमत केला.

प्रथमच घटनेमध्ये सहकार विषयक तरतुदी करणारी घटनादुरुस्ती करून देशाच्या अर्थव्यवस्थेत सहकार क्षेत्राला असलेले अनन्यसाधारण महत्त्व केंद्र शासनाने अधोरेखित केले आहे. सहकारी संस्था बळकट करण्यासाठी ही घटनादुरुस्ती करण्यात आली.

सहकारी क्षेत्राने राष्ट्रीय अर्थव्यवस्थेतील अनेक क्षेत्रांत अतिशय महत्त्वाचे योगदान करून मोठी प्रगती केली आहे. तथापि, सभासदांच्या व्यापक हितरक्षणासाठी व संस्थेच्या उद्देशपूर्तीसाठी या सहकारी संस्था पुरेशा सक्षम राहिल्या नाहीत. काही संस्थांच्या निवडणुका वर्षानुवर्षे स्थगित झाल्यामुळे या संस्थांचा कारभार नियुक्त पदाधिकारी अथवा प्रशासकाच्या माध्यमातून होताना दिसून येतो. याचाच परिणाम म्हणून संस्थांचे व्यवस्थापन हे सभासदांप्रती जबाबदार राहिले नसल्याचेही दिसून येते. व्यावसायिक व्यवस्थापना अभावी या संस्था हळूहळू कमकुवत होताना दिसून येत आहेत.

राज्यात सध्या अस्तित्वात असलेल्या सुमारे २,२५,००० सहकारी संस्थांचे भांडवल सुमारे ९०,००० कोटी रुपयांच्या घरात आहे. मात्र, या सर्व संस्थांच्या नफा-तोटा पत्रकाचा एकत्रित मेळ घातल्यास ७०० कोटी रुपयांचा तोटाच दिसतो. या पार्श्वभूमीवर नवीन कायदा अस्तित्वात आल्यानंतरचे चित्र कसे असेल याचा विचार न करता ते कसे असावे याचाच विचार करणे अधिक योग्य वाटते

पूर्वी सहकारात नफ्यापेक्षा सभासदांच्या गरजेला जास्त महत्त्व होते. नफा ही बाब दुय्यम होती. सध्याच्या वातावरणात मात्र नुसता नफा नव्हे, तर जास्तीत जास्त नफा या संकल्पनेस महत्त्व आले आहे. त्यामुळे सहकारी संस्थांचे व्यवस्थापन हे व्यावसायिकांच्या हाती असावे अथवा व्यवस्थापनाने व्यावसायिकतेचा अंगीकार करणे गरजेचे झाले आहे. सहकारी उद्योगांमध्ये देखील व्यावसायिकतेचा अभाव दिसतो. या पार्श्वभूमीवर तोट्यातील सहकारी संस्थांचे निर्गुंतवणुकीमध्ये रूपांतर होऊ नये याची काळजी सर्वांनी घेणे आवश्यक आहे.

यासाठीच संसदेने मंजूर केलेल्या ९७ व्या घटना सुधारणेचा फार उपयोग होणार आहे. सहकार हा विषय राज्याच्या अखत्यारीत असला तरी घटनासुधारणामुळे प्रथमच मार्गदर्शक तत्त्वाच्या आधारे सहकाराचा समावेश घटनेमध्ये झाला आहे. त्यामध्ये प्रथमच सहकारी संस्थांची व्याख्या केली आहे. राज्याच्या सहकार कायद्यातही आजपर्यंत ही व्याख्या अस्तित्वात नव्हती. घटनेतील या नवीन व्याख्येनुसार स्वेच्छापूर्वक स्थापना, लोकशाही मार्गाने सभासदांचे नियंत्रण, सभासदांचा थेट सहभाग आणि संपूर्ण स्वायतत्ता या सहकारातील तत्त्वांना अनुसरून स्थापन झालेल्या संस्थांची नोंदणी होणार आहे. यामध्ये सभासदाने लोकशाही मार्गाने केलेले नियंत्रण ही प्रमुख अट असल्याने या संस्थांचे भविष्यात निर्गुंतवणुकीकरण होणार नाही. तसेच व्यावसायिक भागीदारांना घेऊनही या संस्था चालविता येणार नाहीत. त्यामुळे आपल्या सक्षमीकरणाचे मार्ग या संस्थांनाच शोधावे लागणार हेदेखील निश्चित.

सध्याचा 'सहकार' म्हणजे व्यक्तींचे संघटन मानले जाते. परंतु, व्यावसायिकतेच्या संकल्पनेमुळे पुढील काळात व्यक्तींपेक्षा भांडवलाला महत्त्व येणार आहे. त्यामुळे उच्च अधिकार समितीने शिफारस केल्यानुसार 'क्रियाशील सभासद' ही संकल्पना अस्तित्वात येईल. त्यामुळे घटना सुधारणेमध्ये नमूद केल्यानुसार सभासदांचा संस्थेच्या व्यवसायात थेट सहभाग आवश्यक ठरणार आहे. त्याद्वारे संस्थेमध्ये प्रत्येक सभासदाचे थेट व्यावसायिक हितसंबंध गुंतल्यामुळे खरोखरच या संस्था अशा क्रियाशील सभासदांकडूनच नियंत्रित केल्या जातील. यामुळे क्रियाशील नसलेल्या सभासदांचे संस्थेवरील अनावश्यक नियंत्रण आपोआपच नष्ट होणार आहे. त्यामुळे पुढील चित्र आशादायी असणार यात शंकाच नाही. घटनासुधारणेनुसार सहकारी संस्थांना पूर्ण स्वायतत्ता देण्यात येणार असल्याने सक्षम निर्णय प्रक्रियेसाठी व्यावसायिक व्यवस्थापनाची तरतूद या घटनादुरुस्तीत सुचविली आहे. त्यामुळे भविष्यात सहकारी संस्थांचे व्यवस्थापन हे जास्तीत जास्त व्यावसायिक व सभासदाभिमुख होईल. अशा प्रकारे सहकार हे सामाजिक परिवर्तनाचे साधन ठरणार हे निश्चित. मुक्त अर्थव्यवस्थेतील या स्पर्धात्मक वातावरणात सहकारी संस्थांमधील परस्पर सहकार (Co-operation amongst co- operatives) भविष्यात अत्यंत महत्त्वाचा ठरणार असून, समव्यावसायिक सहकारी संस्था एकत्र येऊन इतरांशी स्पर्धा करताना आपणास निश्चित पाहावयास मिळतील.

सर्व निर्णय घेण्यासाठी या संस्थांना स्वायतत्ता देणे आवश्यक वाटल्याने केंद्र सरकारने हे क्रांतिकारक पाऊल उचलले आहे. सहकाराच्या वाढीसाठी त्यांना स्वायतत्ता देणे जसे महत्त्वाचे आहे तसेच या क्षेत्राचे राजकीयकरणही थोपविणे आवश्यक आहे. त्यासाठी सभासदांचे लोकशाही नियंत्रण, संचालकांची संख्या मर्यादित करणे, वेळच्या वेळी निवडणुका घेणे, व्यावसायिकतेसाठी "Functional Directors" ची नियुक्ती करणे अशा अनेक महत्त्वाच्या तरतुदींचा समावेश या घटनासुधारणेमध्ये केला आहे.

व्यावसायिक पद्धतीने सहकारी संस्थांचे व्यवस्थापन होण्यासाठी संबंधित संस्थेत आर्थिक व व्यावसायिक सहभाग असलेल्या सभासदांनीच आपल्यातील योग्य सभासदांना संचालक म्हणून निवडून देण्यासाठी क्रियाशील सभासदत्वाची तरतूद या घटनादुरुस्तीत केली आहे. तसेच आपापल्या संस्थांमधील व्यवसायाची पूर्ण माहिती होण्यासाठी त्यांना प्रशिक्षण दिल्याने आणि क्रियाशील सभासदच संस्थेच्या व्यवस्थापनावर योग्य तो अंकुश ठेवणार असल्याने कायद्याचा सतत बडगा दाखविण्याची वेळ येणार नाही; कारण, सहकाराच्या मूळ तत्त्वांनुसार ज्याला गरज आहे व ती गरज भागविण्याची क्षमता ज्या सहकारी संस्थेत आहे, अशी व्यक्तीच त्या संस्थेचा सभासद होऊ शकते व स्वत:चे व्यावसायिक संबंध असणारी व्यक्ती आपल्या व संस्थेच्या हिताचे रक्षण करण्यासाठी योग्य व्यक्तीचीच निवड व्यवस्थापनावर करेल. त्यामुळे या दुरुस्तीमुळे सहकाराचे राजकीयीकरण होण्याची प्रक्रिया थांबेल, असे वाटते.

**(पान ४७ वर)**

# सहकाराचे गुरुकुल

## वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी प्रबंध संस्था, पुणे

१९६४ साली सहकार क्षेत्रातील अर्थतज्ज्ञ व विचारवंत प्रा.डॉ. धनंजयराव गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखालील एका समितीने स्थापन केलेल्या सहकारी संस्थांच्या व्यवसाय, व्यवस्थापन व संशोधनासाठी एक राष्ट्रीय संस्था असावी असे निदर्शनास आणले. त्यानंतर केंद्रीय ग्राहक व्यवसाय व व्यवस्थापन संस्था आणि राष्ट्रीय सहकारी प्रशिक्षण महाविद्यालय या दोन संस्था एकत्रित करण्यात आल्या. राष्ट्रीय सहकारी प्रशिक्षण संस्था, पुणे येथे १५ जुलै १९६७ रोजी सुरू झाली व त्याचे सध्याचे नाव वैकुंठ मेहता राष्ट्रीय प्रबंध संस्थान असे आहे. ही राष्ट्रीय पातळीवरील प्रशिक्षण व संशोधन संस्था असून सहकार व ग्रामीण विकासाशी संबंधित संस्थांच्या पदाधिकारी व अधिकाऱ्यांसाठी विविध प्रकारच्या प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करते. सहकारी संस्थांमध्ये काम करणाऱ्या अधिकारी व पदाधिकाऱ्यांची कार्यकुशलता वाढावी, त्यांचा दृष्टिकोन व्यापक व्हावा यासाठी चर्चासत्रे, कार्यशाळा, संशोधन व सल्ला इत्यादी कार्यक्रम हाती घेतल जातात.

### संस्थेचे कार्य

- **सहकारी क्षेत्रातील पदाधिकारी व अधिकाऱ्यांची निर्णय क्षमता व व्यावसायिक क्षमता वाढविण्यासाठी अल्प व दीर्घ मुदतीचे प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे.**
- **सहकारी व्यवस्थापन पदविका पाठ्यक्रम राबविणे, त्याचप्रमाणे कृषी व्यवसायामध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रम चालविणे.**
- **सहकार व ग्रामीण विकासाशी निगडित उपयोजित संशोधन प्रकल्प हाती घेणे व संशोधन नियतकालीक प्रकाशित करणे (को-ऑपरेटिव्ह पर्स्पेक्टीव्ह)**
- **सहकारी संस्थांना व्यावसायिक सल्ला देणे.**
- **सहकार क्षेत्राच्या विकासासाठी कालानुरूप धोरण तयार करणे.**
- **राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील सहकारी संस्थांशी संयुक्तिकरीत्या कार्य करणे.**

**संस्थेचे शिक्षण, प्रशिक्षण संशोधन व सल्ल्याचे कार्य ५ केंद्रांमार्फत केले जाते.**

**डॉ. एम.आर. जोशी, (संपर्क :९९२२६८७३३५)**

## वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट, पुणे

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री कै. वसंतदादा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी डेक्कन शुगर इन्स्टिट्यूट ही संस्था १९७५ साली स्थापन केली. वसंतदादा पाटील यांच्या निधनानंतर या संस्थेचे वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट असे नामकरण करण्यात आले. साखर कारखानदारी आणि तत्संबंधी उपपदार्थ या संबंधीचे सर्व प्रकारचे शास्त्रीय, तांत्रिक आणि शैक्षणिक कार्य या संस्थेमध्ये करण्यात येते. साखर उद्योगाच्या प्रगतीसाठी कटिबद्ध असलेली शेतकऱ्यांनी स्थापन केलेली जगातील अशा प्रकारची एकमेव संस्था आहे.

संशोधन व विकास, विस्तार व सल्ला सेवा आणि प्रशिक्षण या तीन माध्यमांद्वारे साखर आणि पूरक उद्योगांची सर्वांगीण प्रगती करण्याचे प्रयत्न या संस्थेमार्फत केले जातात. साखर आणि पूरक उद्योगांच्या सांप्रत आणि भविष्यकाळातील गरजा पूर्ण करण्याच्या दृष्टीने संस्थेचा संशोधन आणि विकास कार्यक्रमांचा आराखडा तयार करण्यात येतो आणि तो राबविण्याचा प्रयत्न केला जातो.

संस्थेमध्ये मनुष्यबळ विकास विभागातर्फे दरवर्षी निरनिराळ्या प्रशिक्षण वर्गांचे आयोजन करण्यात येते. या प्रशिक्षणामार्फत साखर उद्योगासाठी लागणाऱ्या तज्ज्ञ मनुष्यबळाची गरज भागविली जाते. संस्थेमार्फत शुगर टेक्नॉलॉजी, इंडस्ट्रियल फर्मेंटेशन अँण्ड अल्कोहोल टेक्नॉलॉजी, शुगर इंजिनीअरिंग डिप्लोमा, शुगर इंस्ट्रुमेंटेशन टेक्नॉलॉजी, एनव्हायर्नमेंटल सायन्सेस, शुगर इंजिनीअरिंग सर्टिफिकेट, शुगर मॅन्युफॅक्चरिंग सर्टिफिकेट, शुगर बॉयलिंग सर्टिफिकेट, ज्यूस सुपरव्हिजन डिप्लोमा आणि सर्टिफिकेट प्रशिक्षण अभ्यासक्रम राबविले जातात. संस्थेमधून प्रशिक्षण घेऊन उत्तीर्ण झालेले विद्यार्थी साखर उद्योग आणि अन्य संलग्न उद्योगांमधे विविध पदांवर काम करीत असून संस्थेने दिलेले प्रशिक्षण साखर उद्योगाला निश्चितच फायदेशीर ठरत असल्याचे दिसून आले आहे. याशिवाय अल्प मुदतीचे प्रशिक्षण वर्ग, विशेष प्रशिक्षण वर्ग, परदेशातील विद्यार्थ्यांसाठी विशेष प्रशिक्षण वर्ग आणि शेतकऱ्यांसाठी ज्ञानयोग आणि महिला शेतकऱ्यांसाठी ज्ञान लक्ष्मी प्रशिक्षण वर्ग घेतले जातात. पुणे विद्यापीठ आणि शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांची संस्थेला संशोधन संस्था व पीएच.डी. अभ्यासक्रमाचे केंद्र म्हणून मान्यता मिळालेली आहे. पुणे विद्यापीठाने पर्यावरण शास्त्र आणि वाईन तंत्रज्ञान अभ्यासक्रमाला संलग्नता दिलेली आहे. येथील अभ्यासक्रमाचे एक वैशिष्ट्यपूर्ण अंग म्हणजे संस्था व कारखाने यांत असलेला सुसंवाद. संस्थेने सातत्याने वाढविलेली शैक्षणिक गुणवत्ता आणि उच्च दर्जाचे अध्यापन. या वैशिष्ट्यांमुळे संस्थेस नावलौकिक प्राप्त झाला आहे. आशिया आणि आफ्रिका खंडातील अनेक विद्यार्थी संस्थेत प्रशिक्षणासाठी प्रवेश घेतात. साखर कारखाने व त्याचे उपपदार्थ निर्माण करणारे कारखाने यामध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी कारखान्यांच्या गरजेनुसार एक ते तीन आठवड्यांचे अल्प मुदतीचे अभ्यासक्रम संस्थेमार्फत घेतले जातात. महाराष्ट्र, गुजरात, तामिळनाडू, कर्नाटक, हरियाणा आणि उत्तर प्रदेश या राज्यांतून प्रशिक्षार्थी पॅन बॉयलिंग, ज्यूस क्लॅरिफिकेशन, बॉयलर अटेंडंट, डिस्टीलरी ऑपरेटर्स, रिपेअर अँण्ड मेंटेनन्स ऑफ इन्स्ट्रुमेंटस, ॲनॅलिटीकल इन्स्टुमेंटस आणि प्रोसेस केमिकल्स या अभ्यासक्रमांत सहभागी होतात.

**शिवाजीराव देशमुख**
**संपर्क क्र.९८२२५५२१००**

## धनंजयराव गाडगीळ सहकारी प्रबंध संस्थान, नागपूर

धनंजयराव गाडगीळ सहकारी प्रशिक्षण महाविद्यालय, नागपूरची स्थापना दि.२८ एप्रिल १९७२ रोजी झाली. एका राज्यात दुसरे महाविद्यालय स्थापित झाल्याची ही देशातील पहिली घटना होय. प्रामुख्याने विदर्भ व मराठवाडा विभागातील सहकारी क्षेत्रात कार्य करणाऱ्या मध्यमश्रेणी अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षण विषयक गरजा भागविण्याची जबाबदारी या महाविद्यालयाची आहे. मूळचे नागपूरचे असलेले, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे अर्थतज्ज्ञ व सहकार तपस्वी धनंजयराव गाडगीळ यांची आठवण चिरकाल टिकावी म्हणून त्यांचे नाव या महाविद्यालयाच्या स्थापनेपासून देण्यात आले. भारत सरकारने सन १९९१ ला खुले आर्थिक धोरण घोषित केले. व्यावसायिक व्यवस्थापनाला चालना देण्यात आली. राष्ट्रीय सहकारी प्रशिक्षण परिषदेने या बाबीचे महत्त्व लक्षात घेऊन देशातील सर्व सहकारी प्रशिक्षण महाविद्यालयांच्या नावात व प्रशिक्षण कार्यक्रमात बदल केले. तेव्हापासून या महाविद्यालयाचे नाव धनंजयराव गाडगीळ सहकारी प्रबंध संस्थान असे आहे.

**एम.बी.ए. अभ्यासक्रम**

**व्यावसायिक व्यवस्थापनाच्या या युगात सहकारी क्षेत्रांतील बँका व संस्थांना व्यावसायिक व्यवस्थापन आणि सहकारी व्यवस्थापन या विषयातील तज्ज्ञ अधिकारी उपलब्ध व्हावेत यासाठी सन-२००९ पासून एम.बी.ए. अभ्यासक्रम सुरू केला आहे. या अभ्यासक्रमाला ए.आय. सी.टी.ई. व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाची मान्यता मिळविण्यात आली असून अभ्यासक्रमाची क्षमता सध्या ६० आहे.**

**प्रशिक्षण कार्यक्रमात क्रांती**

सहकारी क्षेत्राच्या प्रशिक्षण विषयक गरजांची त्यांना नेहमीच जाण असे. अत्यंत क्लिष्ट विषय सोपे करून देण्यासाठी व सहकारी क्षेत्राच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या विषयावर प्रशिक्षण कार्यक्रमाची आखणी करण्यावर त्यांनी जोर दिला. महाराष्ट्रातील सहकार क्षेत्राची विशेष गरज लक्षात घेऊन स्वत:च्या लेखणीतून मराठी भाषेत प्रशिक्षण साहित्य तयार करण्याचे त्यांनी अविरत प्रयत्न केले. त्यामुळे ४० पाठ्यक्रमांचे व ६०० अधिकारी प्रशिक्षित करण्याचे लक्ष्य ते पहिल्या ४-५ महिन्यांतच ओलांडायचे.

**ए. एच. पाटील**
माजी सदस्य (न्यायाधीश)
महाराष्ट्र राज्य सहकारी अपिलेट कोर्ट,
**संपर्क :९८२३१४२५१०**

---

## यशवंतराव चव्हाण विकास प्रबोधिनी, पुणे

यशदाचे सहकार प्रशिक्षण व संशोधन केंद्र ७ एप्रिल, २००४ पासून राज्यातील सहकारी संस्थांचे संचालक व अधिकारी यांच्याकरिता प्रशिक्षणाचे कार्यक्रम आयोजित करीत आहे. यशदाच्या या प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत एप्रिल, २००६ ते जुलै २०१२ या कालावधीत २० हजारांहून जास्त प्रशिक्षणार्थींनी सहभाग घेतला आहे.

स्पर्धेच्या वातावरणात आंतरराष्ट्रीय स्तरावर उपलब्ध होणारे प्रगत तंत्रज्ञान आणि आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये होणारे बदल, वेगाने होणाऱ्या सुधारणा (Reform) व्यावसायिक व्यवस्थापन आणि गतिमान सुधारणांबरोबरच येणाऱ्या जोखमा (Risk) यांचा दैनंदिन कामकाजामध्ये पडणारा प्रभाव सहकारी संस्थांच्या व्यवस्थापनाला ज्ञात व्हावा यादृष्टीने प्रशिक्षणाच्या कार्यक्रमाची रचना करण्यात आलेली आहे. कायद्यातील झालेल्या सुधारणा, नवीन तंत्रज्ञानाने खुले झालेले ज्ञानाचे भांडार, शासन/ रिझर्व्ह बँक/सहकारी खात्याकडून वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या परिपत्रकी सूचना, आदेश आणि प्रत्यक्ष काम करताना येणाऱ्या अडीअडचणी इ. चा परामर्श प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये विषयसूची निवडताना करण्यात आला आहे.

**ध्येय**

प्रशिक्षण, संशोधन व सल्ला सेवामाध्यमातून सहकारी क्षेत्राचा मानवी विकास घडवून आणणे हे सहकार प्रशिक्षण व संशोधन केंद्राचे ध्येय आहे.

**कार्य व उद्दिष्टे**

- सहकारी क्षेत्रातील व सहकार खात्याच्या प्रशिक्षण गरजा ओळखणे व त्यानुसार कार्यक्रमाची आखणी करणे हे मुख्य उद्दिष्ट आहे.
- सहकारी क्षेत्रातील व सहकार खात्याच्या अधिकाऱ्यांना /संस्थांच्या पदाधिकाऱ्यांना /अधिकाऱ्यांना क्षमतावृद्धी विकास व्यवस्थापन प्रशिक्षण देणे.
- सहकार क्षेत्रात संशोधन विषयक प्रकल्प घेणे.
- सहकार क्षेत्रातील उत्तम प्रशासनाचा अभ्यास घेणे.
- सहकार क्षेत्रातील विविध विभागांसाठी सल्लासेवा पुरविणे.
- आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०१२ च्या निमित्ताने सहकारी संस्थांच्या पदाधिकाऱ्यांसाठी एक किंवा दोन दिवसांच्या कार्यशाळा घेणे.
- संस्थांच्या मागणीवरून यशदाबाहेर बहिस्थ प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन.
- यशदामधील सॅटेलाईट सेवेचा लाभ घेऊन सहकारी संस्थांच्या सभासद/संचालक/अधिकारी व सेवकांसाठी सहकार क्षेत्रातील मान्यवर तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन/ चर्चा व संवाद कार्यक्रमांचे आयोजन.
- क्षमतावृद्धी करण्याच्या उद्देशाने सी.आय.टी. लॅबमध्ये 'मायक्रोसॉफ्ट वर्ड/ एक्सेलमधील उपयुक्त आणि प्रगत कमांडस् विषयक' उपयुक्त संगणकीय प्रशिक्षणाचे आयोजन.
- सहकारी संस्था उदा. जिल्हा /नागरी सहकारी बँका, पतपेढ्या, कृषी उत्पन्न बाजार समिती, दुग्ध/बलुतेदार/आदिवासी संस्था, साखर कारखाने इत्यादी संस्थांच्या अधिकारी/पदाधिकाऱ्यांसाठी पुरस्कृत कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.
- राज्य प्रशिक्षण धोरणाअंतर्गत सहकार खात्यातील प्रशासन/लेखापरीक्षण विभागातील अधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.
- नागरी बँकाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसाठी प्रत्येक महिन्याला एक याप्रमाणे चालू घडामोडीवर आधारित एकदिवसीय कार्यशाळा अयोजित करण्यात येत आहेत.
- सहकार खात्याच्या अधिकाऱ्यांसाठी ग्रामीण विकास व्यवस्थापन विकास विषयक प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.
- सहकार खात्याच्या अधिकाऱ्यांसाठी तांत्रिक शिक्षण विषयक प्रशिक्षण कार्यक्रम/ राज्यातील सर्व जिल्ह्यांतील सहकारी संस्थांसाठी पथदर्शक प्रशिक्षण कार्यक्रम/ राज्यातील सर्व जिल्ह्यांतील सहकारी बँका/ पतसंस्था/ बाजार समित्यांच्या पदाधिकाऱ्यांसाठी क्षमतावृद्धी विषयक प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

# गुरुजींची बँक

एका शिक्षकाने मुलीच्या लग्नाकरिता सावकाराकडून रु. ६७५/- कर्ज घेणे, सहा महिन्यांत त्याची परतफेड न केल्यामुळे सावकाराने शाळेत येऊन सर्वांसमक्ष त्यांचा असभ्य अपमान करणे व परिणामी त्या शिक्षकाने आत्महत्या करणे. ही घटना शिक्षकांना बेचैन करून गेली आणि नागपूर जिल्ह्यातील काही शिक्षकांनी एकत्र येऊन बँक निर्माण करण्याचा निर्णय घेतला. अण्णाजी मेंडजोगे यांची मुख्य प्रवर्तक म्हणून निवड करण्यात आली. शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांना सोबत घेऊन भाग भांडवल जमा करण्याचे कार्य जोमाने सुरू झाले. शिक्षकांनी निर्माण केलेली व शिक्षकांकरिताच चालवायची असे तिचे स्वरूप ठेवून दिनांक ०१ जानेवारी १९७९ रोजी बँकेच्या प्रत्यक्ष कामकाजाची सुरुवात झाली.

शिक्षक सहकारी बँक मागील ३३ वर्षांपासून अविरत बँकिंग सेवा प्रदान करीत आहे. शिक्षकांनी शिक्षकांच्या आर्थिक गरजांच्या पूर्ततेसाठी १९७९ मध्ये स्थापन केलेल्या या बँकेचे दालन पुढे लवकरच सर्व जनसामान्यांसाठी उघडण्यात आले. बँकेने १९८७ पासून व्यावसायिक कर्जे देण्यास सुरुवात केली. बँकेस सर्व जनसामान्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद प्राप्त होत होता. सर्वांचे स्वप्न होते 'शेड्युल्ड बँक' दर्जा प्राप्त करण्याचे! यासाठी ठेवींचा आकडा रु. १०० कोटींपर्यंत नेणे आवश्यक होते. वर्ष १९९६-९७ मध्ये बँकेने हे उद्दिष्ट पूर्ण केले आणि दि. २२ मे १९९९ रोजी बँकेस शेड्युल्ड बँकेचा दर्जा प्राप्त झाला. सध्या बँकेच्या नागपूर व चंद्रपूर जिल्ह्यात एकूण १९ शाखा आहेत. तसेच बँकेच्या कार्यक्षेत्रामध्ये नागपूर, चंद्रपूर, वर्धा, यवतमाळ, भंडारा व गडचिरोली या जिल्ह्यांचा समावेश आहे.

बँकेने नागपूर व चंद्रपूर जिल्ह्यांत बरीच व्यावसायिक व औद्योगिक कर्जे दिलेली आहेत. असंख्य लघुउद्योग, कुटीरोद्योग, वाहतूक यंत्रणा, स्वयंरोजगार, छोटे कारागीर, लहान व्यापारी, नोकरदार मंडळी व एकूण समाजातील दुर्बल घटक यांना अर्थसाहाय्य करण्याचे काम बँक करीत आहे. सामान्यजनांकडून अल्पबचतीच्या रूपात ठेवी गोळा करून अशा ठेवींचा विनियोग त्या क्षेत्रातील छोटे उद्योगधंदे वाढीसाठी कर्जे देऊन केला जातो व आर्थिकदृष्ट्या कमकुवत लोकांचे जीवनमान सुधारण्याचे महत्त्वाचे कार्य बँक करीत आहे. तसेच बँकेने वेळोवेळी सामाजिक दायित्वाचे पालन करून नैसर्गिक आपदांमधील गरजू सभासदांना देणगी स्वरूपाने सहकार्य केले आहे.

बँकिंग क्षेत्राला अधिक बळकटी यावी या उद्देशाने भारतीय रिझर्व्ह बँकेने आपल्या धोरणामध्ये आमूलाग्र बदल केला आणि यामुळे बऱ्याच बँकांना त्यांच्या ताळेबंदाची स्थिती मजबूत ठेवणे कठीण झाले. याचा अनुभव शिक्षक सहकारी बँकेसही आला व कर्जापोटी कराव्या लागणाऱ्या तरतुदीमुळे तोटा सहन करावा लागला. बँकेने युद्धपातळीवर वसुली अभियान राबवून थकीत कर्जाची वसुली केली.

सहकारी बँकांसमोर अनेकानेक समस्या उपस्थित केल्या जात आहेत. अशातून अनेक अफवांचा जन्म होतो आहे. त्याचा दुष्परिणाम ११ ऑगस्ट २००६ रोजी शिक्षक सहकारी बँकेविषयी उडालेल्या अफवेतून साऱ्या शहराने पाहिला आहे. जवळपास रु.१४००० कोटींच्या ठेवी परत कराव्या लागल्या परंतु बँकेचे संचालक मंडळ, कर्मचारी डगमगले नाहीत. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. मुंबई यांचे मोलाचे सहकार्य त्या काळात प्राप्त झाले आणि त्या वादळातून शिक्षक बँक सुखरूप बाहेर निघाली आणि आपली सेवा त्याच तत्परतेने देते आहे.

सहकारावर आमचा विश्वास आहे हे ठणकावून सांगण्याकरिता शिक्षक सहकारी बँकेने दि. २३ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २००६ या कालावधीत 'सहकार विश्वास पर्व' साजरे केले आणि ग्राहकांनी नवीन १० हजार खाती उघडल्याने बँक पुनश्च एकवार प्रगतीपथावर आरूढ झाली.

**शिक्षक सहकारी बँक ही अवघ्या वीस वर्षांच्या कालावधीमध्ये शेड्युल्ड बँकेचा दर्जा प्राप्त करणारी एकमेव बँक ठरली. सन १९९९-२००० मध्ये ठेवींच्या प्रतिस्पर्धेत बँकेने संपूर्ण भारतातून २० वा क्रमांक पटकाविला तसेच विदर्भात प्रथम क्रमांक मिळवला. सन २०००-२००१ मध्ये ठेवींच्या प्रतिस्पर्धेत संपूर्ण भारतातून १९ वा क्रमांक पटकाविला व विदर्भात प्रथम क्रमांक मिळवला.**

बँकेचे भाग भांडवल वाढविणे गरजेचे असल्यामुळे दिनांक १२ जुलै २००७ रोजी सहकार स्थैर्यता अभियान राबवून बँकेने रु. १.५० कोटीचे भाग भांडवल गोळा केले.

बँकेने भारतीय रिझर्व्ह बँक व सहकार खाते यांच्या परवानगीने दि. १३ फेब्रुवारी ते ३१ मार्च २००९ या कालावधीमध्ये 'एसएसबी सहभाग' ही दीर्घ मुदत ठेव योजना राबविली. या योजनेंतर्गत रु. २० कोटींचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. या योजनेस भरपूर प्रतिसाद प्राप्त होऊन बँकेने उपरोक्त कालावधीमध्ये रु.१९.१५ कोटींच्या ठेवींचे संकलन केले. शिक्षक सहकारी बँक विदर्भामध्ये अशी योजना राबविणारी पहिली बँक होय. तसेच बँकेतर्फे RTGS/ NEFT सेवा तसेच विविध ठेव योजनांतर्गत स्पर्धात्मक व्याजदर देण्यात येत आहे.

बँकेने नुकतेच विविध कर्ज योजनांतर्गत जनसामान्यांसाठी विविध कर्ज पर्याय उपलब्ध करून दिलेले आहेत. त्यामध्ये महिला बचत गटांना आर्थिक सहकार्य उपलब्ध करून देण्यासाठी 'एसएसबी स्वयंसिद्धा' कर्ज योजना व अल्प उत्पन्न गटातील व्यक्तींना आर्थिक सहकार्य उपलब्ध करून देण्यासाठी 'एसएसबी आधार' कर्ज योजना यांचा प्रामुख्याने समावेश आहे. बँकेने २०११-२०१२ या आर्थिक वर्षात वसुलीस्तव केलेल्या विविध उपाययोजना, संचालक मंडळाचे योग्य मार्गदर्शन-सहकार्य, कर्मचाऱ्यांचे अखंड परिश्रम तसेच भागधारक, ठेवीधारकांचा विश्वास या बळावर बँकेने एकूण रु. १२०० कोटींचा व्यवसाय केलेला आहे.

**(पान ५० वर)**

# साताऱ्याची सुवर्णमुद्रा

**राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँकेमार्फत (नाबार्ड) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना दिला जाणारा राष्ट्रीय पातळीवरील 'सर्वोत्कृष्ट कार्यक्षमता पुरस्कार' सलग सहावेळा देऊन सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला मिळाला आहे.**

**स्टेट बँक्स असोसिएशन लि. मुंबई यांच्यामार्फत कै. वैकुंठ मेहता उत्कृष्ट जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक हा प्रथम क्रमांकाचा पुरस्कार सलग ९ वेळा तर सलग ३ वर्षे उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल सन २००८ मध्ये पुरस्कार दिला आहे. आंतरराष्ट्रीय मानक संस्थेच्या निकषानुसार बँकेचे असणारे दर्जात्मक कामकाज, गुणवत्ता व ग्राहकाभिमुख सेवा यामुळे बँकेस आयएसओ ९००१ : २००८ हे बँकिंग सेवा क्षेत्रातील मानांकन प्राप्त झाले आहे. बँकिंग क्षेत्रातील देश पातळीवर काम करत असलेल्या 'बँकिंग फ्रंटीयर' मुंबई या संस्थेने बँकेस ४ पुरस्कार मिळाला आहे.**




सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेने सुवर्णमहोत्सवी वाटचाल संपवून हीरक महोत्सवी वर्षाकडे वाटचाल सुरू केलेली आहे. या वाटचालीत बँकेचा आलेख सोनेरी पानावर कोरला आहे. सातारा जिल्ह्यातील सुमारे पाच-सहा हजार सहकारी संस्थांची मातृसंस्था म्हणून सातारा जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँक कार्यरत आहे. जिल्ह्याची अर्थवाहिनी असणाऱ्या या बँकेने प्रगतीचे अनेक गड सर केले आहेत. आपल्या कार्यप्रणवतेचा ठसा उमटवून कार्यकतृत्त्वाचा ध्वज भारताच्या राजधानीत नेला; तसेच बँकेने सहकार पर्वाची सुवर्णमुद्रा उमटविल्यामुळे साऱ्या महाराष्ट्राने गौरवावे असे देदीप्यमान कार्य या बँकेमार्फत घडले.

सहकारातून समृद्धी घडविणारे स्वर्गीय यशवंतरावजी चव्हाण या बँकेचे मुख्य प्रवर्तक होते.

समाज परिवर्तन करण्यासाठी शेतकरी आर्थिकदृष्ट्या मजबूत केला पाहिजे या भूमिकेतून व त्याच सहजतेने व गरजेनुसार माफक व्याजदाराने कर्ज उपलब्ध व्हावे यासाठी मध्यवर्ती सहकारी बँक स्थापन करावी हे विचार त्यांनी कार्यकर्त्यांसमोर मांडले व त्या प्रेरणेतून शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी व त्याची सावकारी पाशातून मुक्तता करण्यासाठी ११ नोव्हेंबर १९५० रोजी या बँकेची स्थापना करण्यात आली.

दोन लाख रुपयांच्या भागभांडवलावर सुरू झालेल्या बँकेकडे दि. ३१ मार्च २०१२ अखेरच्या वर्षाखेरीस रक्कम रु. ७,५९६.५६ लाखांचे भागभांडवल आहे. पहिल्या अहवाल वर्षाखेरीस रक्कम रु. ८.७२ लाखांच्या ठेवी होत्या. मार्च २०१२ अखेरीस रु. २,८९,४३४.३७ लाखांच्या ठेवी आहेत. तसेच पहिल्या वर्षी रु. ६.०० लाखांचा कर्जव्यवहार होता. तो या वर्षाअखेरीस रक्कम रु. १९,३५३०.२२ लाखांचा कर्ज व्यवहार आहे. बँकेस दि. ३१ मार्च २०१२ अखेरीस रक्कम रु. ६,७८४.०० लाखांचा करपूर्व विक्रमी ढोबळ नफा झाला असून, निव्वळ नफा रक्कम रु. १६००.०० लाखांचा झाला आहे. तसेच बँकेच्या कर्जाची १०० टक्के कर्जवसुली झाली. बँकेची सभासद संख्या २,७७१ आहे.

पहिल्या वर्षी बँकेकडे ८ सेवक होते. आज बँकेकडे अधिकारी वर्ग व सेवक १,५५७ आहेत; तसेच निरनिराळे विभाग कार्यरत आहेत. जिल्ह्यातील ११ तालुक्यांमध्ये २५७ व २३ विस्तारित कक्षांमार्फत अविरत बँकिंग सुविधेसह सहकाराच्या माध्यमातून बँक समृद्धीकडे वाटचाल करीत आहे.

सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची आर्थिक स्थिती अत्यंत भक्कम असून बँकेस सतत ऑडीट 'अ' आहे. तसेच नाबार्डच्या तपासणी रिपोर्टमध्ये बँकेस 'अे' रेटींग सतत प्राप्त झालेले आहे.

सातारा जिल्ह्याच्या ग्रामीण भागात बँकिंग सेवा उपलब्ध झाल्याने शेतकऱ्यांची मोठी सोय झाली आहे. बचतीच्या सवयीबरोबरच ग्रामीण विकास सहकारी सोसायट्यांमार्फत होणाऱ्या कर्जव्यवहारात सुलभता प्राप्त होऊन गरजेप्रमाणे व वेळेवर कर्जवाटप होऊ लागले. ग्रामीण जनतेच्या वाढत्या गरजा अशा बाबींना मूर्त स्वरूप दिल्यामुळे शेती उत्पन्नात वाढ होऊन, जनजीवन सुधारण्यास मदत झाली आहे.

या बँकेने आर्थिक परिवर्तन घडवून रचनात्मक कार्य निर्माण केले आहे. अनेक सहकारी पाणीपुरवठा योजना सक्षमपणे कार्यान्वित करून हजारो एकर जमीन बागायती करण्यात आली आहे. खेडोपाडी निर्माण केलेल्या वि.का.स. सोसायट्या शेतकऱ्यांच्या कल्याणकारी योजनाद्वारे मित्र झाल्या आहेत.

पीक उत्पादनासाठी होणारा खर्च विचारात घेऊन पिकनिहाय कर्जधोरण ही बँक ठरविते. कृषी बँक किसान क्रेडिट कार्डाद्वारे कर्जाचे वाटप करून सुलभता आणण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. बँकेने अलीकडेच व्यक्तिगत थेट कर्ज पुरवठ्याचे धोरण अंगीकारले असून, स्ट्रॉबेरी लागवडीचा गुंतवणूक खर्च मोठ्या प्रमाणावर असल्याने सामान्य शेतकऱ्यांस स्ट्रॉबेरी लागवड करता यावी यासाठी बँकेच्या कर्ज धोरणात बदल

## हायटेक अॅग्रीकल्चर विभाग

सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेने १९९६ साली हायटेक अॅग्रीकल्चर विभागाची निर्मिती केली असून इस्रायलप्रमाणे हायटेक विभागाच्या माध्यमातून 'ग्रीन हाउस', 'पडीक जमीन विकास', 'कृषी यांत्रिकीकरण' या योजनांसाठी कर्ज पुरवठा व प्रकल्प उभारणीसाठी मार्गदर्शन केले जाते. शेतकरी मेळाव्याचे आयोजन करून तांत्रिक माहिती उपलब्ध करून दिली जाते. याचा परिणाम म्हणून शेतकऱ्यांनी बँकेकडे संपर्क साधून ग्रीन हाउस उभारणीची संकल्पना मांडली. बँकेच्या संचालक मंडळाने त्यास मान्यता देऊन ग्रीन हाउस उभारणीसाठी कर्ज पुरवठा करण्याचे धोरण स्वीकारले व कर्ज पुरवठा सुरू केला. बँकेने तयार केलेल्या ग्रीन हाऊससारख्या उच्च तांत्रिक शेतीचे प्रयोग जिल्ह्यात यशस्वी झाले; त्यामुळे सातारा जिल्हा हा 'ग्रीन हाऊसचा जिल्हा' म्हणून ओळखला जाऊ लागला आहे.

## बँकेची सामाजिक बांधिलकी

- स्वयंसाहाय्यता बचत गटाची निर्मिती
- शेतकरी मंडळाची स्थापना
- जिल्ह्यातील शेतकऱ्यांची संघटना- विचारमंच
- सातारा जिल्ह्यातील रेशीम उत्पादकांचा संघ
- अजिंक्यतारा फळे, फुले, भाजीपाला, सहकारी संस्था
- दुष्काळी भागातील द्राक्ष बागेसाठी पाणीपुरवठ्यासाठी कर्ज
- उसावरील लोकरीमावा नियंत्रणासाठी आर्थिक साहाय्य
- दुष्काळी भागातील जनावरांच्या छावणीसाठी अर्थपुरवठा
- रक्तदान
- नैसर्गिक आपत्ती, कारगील युद्ध यासाठी अर्थसाहाय्य

करून मोठ्या प्रमाणात कर्जपुरवठा सुरू केला आहे. त्यामुळे महाबळेश्वर तालुक्या-शिवाय अन्य तालुक्यातही स्ट्रॉबेरीची लागवड होऊन, सातारा जिल्हा स्ट्रॉबेरीचा जिल्हा म्हणून ओळखू लागला आहे.

सहकारी संस्थांच्या माध्यमातून पाणी उपसा व पाणी संस्था स्थापन करण्यात साखर कारखान्यांनी पुढाकार घेतला व या बँकेच्या अर्थसाहाय्यातून अनेक संस्था उभ्या राहिल्या. यामुळे धवल क्रांती होऊन उसाच्या क्षेत्रात वाढ झाली व साखर कारखान्यांच्या उसाच्या गरजेचा प्रश्न सुटण्यास मदत झाली. कोरडवाहू क्षेत्र बागायती झाले. सहकारी साखर कारखान्यांच्या या विकासात बँकेचा मोठा वाटा आहे. आर्थिक प्रगतीबरोबरच सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून बँकेचे काम चालते.

**बचत गट ग्राम**

महिला सबलीकरणाच्या दृष्टीने जिल्ह्यात सहकाराच्या माध्यमातून १५,००० स्वयंसाहाय्यता बचत गटांची स्थापना करण्यात आली आहे. आर्थिक उन्नतीसाठी त्यांना व्यावसायिक प्रशिक्षण देऊन त्यांच्यात अधिक कुशलता प्राप्त करण्यासाठी बँकेमार्फत विशेष प्रयत्न करण्यात येऊन व्यवसाय वृद्धीसाठी केवळ ४ टक्के प्रमाणे कर्जपुरवठा करण्यात येत आहे. त्यामुळे जिल्ह्यातील महिलांच्या बचतीच्या सवयीत वाढ होऊन प्रत्येक महिलेचे बचत खाते बँकेच्या शाखेतून उघडण्याची मोहीम राबवून महिलांचे खाते सुरू करण्याचा उपक्रम हाती घेतला असून बँकेने 'बचत गट ग्राम' ही संकल्पना रुजवली आहे.

फळबाग लागवड व त्याची शास्त्रोक्त देखभाल व विक्री व्यवस्था याबाबतचे मार्गदर्शन शेतकऱ्यांना दिले जाते. त्याचप्रमाणे नॅशनल हॉर्टिकल्चर मिशन व नॅशनल हॉर्टिकल्चर बोर्ड यांच्या योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यात बँक यशस्वी झाल्यामुळे फळबागा लागवडीस चालना मिळाली आहे.

पडीक जमीन विकासास जिल्ह्यात असलेला वाव विचारात घेऊन, जमिनीचा सर्व्हे केला आहे. या पडीक जमिनीवर लक्ष केंद्रित करून जमिनीच्या विकासाचा कालबद्ध कार्यक्रम आखलेला आहे.

**जिल्ह्यातील गटसचिवांच्या मदतीने व सहकार्याने बँक कर्जाची वसुली १०० टक्के करून सातत्याने राज्यात प्रथम क्रमांक मिळवून एक नवीन आदर्श निर्माण करून इतिहास घडविला आहे.**

ठेवीदार/ कर्जदार यांना घरपोच बँकिंग सेवा देण्याची कार्यवाही सुरू झाली आहे. बँकेच्या सर्व शाखा संगणकीकृत करण्यात आलेल्या आहेत. बँकेने संगणकाद्वारे तत्पर व जलद सेवा देण्याची कार्यवाही सुरू केली असून लवकरच कोअर बँकिंग प्रणालीद्वारे सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यामध्ये एटीएम/ एसएमएस बँकिंग / आरटीजीसी / व्हाईस / नेट बँकिंग / टेलिफोन बँकिंग या अत्याधुनिक सुविधा सुरू करण्यात येणार आहेत.

**कृषी बँक किसान क्रेडिट कार्ड**

केंद्र व राज्य शासनाच्या धोरणानुसार वेळेत कर्जफेड करणाऱ्या शेतकरी सभासदांना पीक कर्जावर रक्कम रु. १ लाखापर्यंत ० टक्के व्याजदर.

रक्कम रुपये १ लाख ते ३ लाखांपर्यंत पीक कर्ज घेणारे व वेळेत परतफेड करणाऱ्या सभासदांना १ टक्का व्याजात म्हणजेच रु. ३ लाखांपर्यंत ० टक्के व्याजदर

मध्यम/दीर्घ मुदत कर्ज वेळेत परत फेड करणाऱ्या सभासदांना चालू वर्षाच्या वसूल पात्र हप्त्यावर १० टक्के व्याज सवलत.

वेळेत परतफेड करणाऱ्या जिल्ह्यातील २ लाख २० हजार कर्जदारांना व त्यांच्या एका कुटुंबीयाकरिता रक्कम रु. ५० हजारपर्यंत आजारनिहाय विनामूल्य बँकेच्या सौजन्याने शेतकरी ग्रुप मेडिक्लेम विमा योजना.

किसान क्रेडिट कार्डधारक कर्जदार सभासदांना रक्कम रु. ५० हजारपर्यंत व्यक्तिगत अपघात विमा योजना लागू.

जिल्ह्यातील कायम रहिवासी असलेल्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी देण्यात आलेल्या कर्जावरील तीन वर्षांवरील व्याजाची माफी. ग्रामोद्योग मंडळाच्या कारागीर सभासदांना व्याज सवलत योजना लागू.

**विशेष योजना**

सामाजिक बांधिलकी स्वीकारून बँकेने जिल्ह्यातील शेतकऱ्यांकरिता 'शेतकरी ग्रुप मेडिक्लेम योजना' पॉलिसी उतरविली आहे. या योजनेंतर्गत कर्जदार सभासद व पत्नी अथवा कुटुंबातील एक व्यक्ती यांच्याकरिता रु. ५०,०००/-पर्यंत वैद्यकीय मदत दिली जाणार आहे. या योजनेंतर्गत आत्तापर्यंत १४,१०४ सभासदांना रु. १०५४.१८ लाख इतकी मदत मिळालेली आहे. तसेच किसान क्रेडिट कार्ड योजनेंतर्गत पात्र कर्जदार सभासदांना वैयक्तिक अपघात विमा योजनेखाली रु. ५०,०००/- विमा संरक्षण उपलब्ध आहे.

**अंकुशराव नलावडे,**
मुख्य कार्यकारी अधिकारी
**संपर्क: ९८२२७५२६८०**

# वारणा मॉडेल

वारणा खोऱ्याच्या सर्वांगीण विकास-क्रांतीसाठी तात्यासाहेब कोरे यांनी हरित-धवल क्रांतीचे स्वप्न पाहिले. त्यांच्या प्रयत्नांमुळे वारणाकाठी कृषी-उद्योगाची प्रयत्नभागा साकारली... वारणानगर हे कृषी-औद्योगिक क्रांतीचे यशस्वी अधिष्ठान ठरले.


१ नोव्हेंबर १९६९ रोजी श्री वारणा सहकारी साखर कारखान्याची तत्कालीन मुख्यमंत्री मा. यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते सुरुवात झाली. पण, त्याने फक्त २० टक्के ऊसकरी शेतकऱ्यांचे भाग्य बदलले. इतर ८० टक्के ग्रामवासीयांना भाग्याची दिशा तात्यासाहेबांना दाखवायची होती. जिराईत जमिनीशी झुंज देणारे भूधारक, भूमीहिन शेतमजूर यांना सुरक्षिततेचे उत्पन्न देणाऱ्या कुक्कुटपालनाची आणि अमृत वर्षाव करणाऱ्या दुग्ध प्रकल्पाची योजना त्यांनी मांडली. आणि साखर नगरीबरोबरच दुग्ध प्रकल्पाची अमृतनगरी इथे उदयास आली.

खासगी सावकाराच्या बलदंड जाळ्यात कुटुंबच्या-कुटुंब पिढ्यान्‌पिढ्या गुरफटली असल्याचे दृश्य तात्यासाहेब अस्वस्थ मनाने पाहत होते. ही परिस्थिती बदलण्यासाठी समाजातील दुर्बल घटकांना माफक व्याजात कर्ज देणारी, सहकारी तत्त्वे जपणारी बँक उभी करण्याचे स्वप्न तात्यासाहेबातील लोकसेवकाने प्रत्यक्षात उतरविले.

त्यांनी वारणा बझार या सहकार भांडाराची निर्मिती केली आणि उत्तम व विनयशील सेवेला पारख्या असणाऱ्या ग्रामवासीयांना आपल्या आवडीच्या वस्तू स्वहस्ते खरेदी करताना निर्धास्तपणाचे सुख लाभले. युवाशक्तीला संधी देण्यासाठी श्री वारणा विभाग शिक्षण मंडळाची स्थापना केली.

श्री वारणा सहकारी साखर कारखान्याची निर्मिती हे ग्रामीण विकासातील तात्यासाहेबांनी टाकलेले ठाम पाऊल होते. याबरोबरच सामाजिक विकास आणि सामाजिक कल्याण हाच आपल्या साऱ्या शक्तीचा ध्रुवतारा असला पाहिजे यासाठी त्यांनी वारणा नदीवर धरण बांधले आणि उपसा जलसिंचन योजना, ग्राम आणि शेतीविकास प्रतिष्ठान, महात्मा गांधी हॉस्पिटल, सत्कार्य संवर्धक मंडळ, शारदा वाचन मंदिर, वारणा व्यायाम मंडळ याबरोबरच लहान मुलांच्या अंगी असणाऱ्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी जगप्रसिद्ध वारणा बालवाद्यवृंदाला चालना देऊन तात्यासाहेबांनी सहकाराची एक जीवनपद्धती वारणानगरमध्ये निर्माण करून सर्वांगीण विकास साधला.

आमदार विनय कोरे (सावकार) यांनी राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय स्तरावर सहकार चळवळीतील मानदंड असणाऱ्या वारणा समूहाच्या संख्यात्मक आणि गुणात्मक वाढीला चालना दिली.




प्रतिदिनी ९,००० मे. टन गाळप क्षमता (१९५९ साली प्रतिदिनी १००० मे. टन गाळप क्षमतेने सुरुवात, १९८६ साली ३००० मे. टन गाळप क्षमतेने पहिला विस्तार, १९८७ साली ४००० मे. टन गाळप क्षमतेने दुसरा विस्तार व २००४ साली ९००० मे. टन गाळप क्षमतेने पाचवा विस्तार), सहकारी तत्त्वावरील देशातील पहिला सर्वांत मोठा ४४ मेगावॅट को-जनरेशन प्रकल्प, कागद प्रकल्प, शुगर रिफायनरी, डिस्टीलरी, जर्मन तंत्रज्ञानावर आधारित कॉम्प्रेस्ड बायोगॅस (सीएनजी), लिग्नोसल्फोनेट प्रकल्प, वारणा ज्युट, बायोअर्थ प्रकल्प, माती परीक्षण प्रयोगशाळा, जिवाणू /सेंद्रिय/गांडूळ खत असे अनेकविध प्रकल्प या मातृसंस्थेद्वारे कार्यान्वित. उर्वरित महाराष्ट्रातील पाच बंद /आजारी सहकारी साखर कारखाने भाडेतत्त्वावर चालवून तेथील स्थानिक प्रगतीस चालना. आशिया खंडातील पहिला वारणा वायर्ड व्हिलेज प्रकल्प, कारखाना निधीतून वारणा नदीवर १९७५ साली ४ धरणे (केटी वेअर्स) कार्यान्वित, ६७ सहकारी उपसा जलसिंचनाद्वारे (लिफ्ट इरिगेशन स्कीम्स) वारणा कार्यक्षेत्रातील २०,००० एकर जमीन ओलिताखाली, वारणा शुगर्स लि. या कंपनीची स्थापना, जगप्रसिद्ध वारणा बालवाद्यवृंद, शारदा वाचन मंदिर, वारणा मुद्रणालय, ग्राम आणि शेती विकास प्रतिष्ठान. भारत सरकारचा स्टार एक्सपोर्ट हाउस दर्जा, आयएसओ आणि फूड सेफ्टी ॲण्ड स्टॅण्डर्स ऑथॉरिटी ऑफ इंडियाचे मानांकन, युरोपियन देशामध्ये साखरेच्या थेट निर्यातीसाठी कोशर सर्टिफिकेशन व मुस्लीम देशांमध्ये साखरेच्या थेट निर्यातीसाठी हलाल सर्टिफिकेशन प्राप्त.

**श्री तात्यासाहेब कोरे वारणा सहकारी नवशक्ती (वीज) निर्माण संस्था**

बीओटी तत्त्वावरील विविध धरणांवर या संस्थेच्या वतीने सहकारी तत्त्वावरील देशातील पहिलेच जलविद्युत प्रकल्प कार्यान्वित. नजीकच्या काळात इतर पारंपरिक / अपारंपरिक ऊर्जा स्रोतापासून वीज निर्मिती प्रकल्पांचा संकल्प. श्री वारणा सहकारी विविध उद्योग व शिक्षण समूहाची सहकारी संस्था.

**श्री वारणा सह. दूध उत्पादक प्रक्रिया संघ लि. वारणानगर**

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री मा. स्व. वसंतदादा पाटील यांच्या सहकार्याने वारणा ब्रॅण्डने वारणेची दुग्धजन्य उत्पादनाच्या विक्रीस १९८१ साली प्रारंभ. प्रतिदिनी ७ लाख लिटर्स दूध संकलन, वारणानगर तसेच नवी मुंबई येथे दूध, दही, ताक, तूप, लस्सी, श्रीखंड, आम्रखंड, दूधपावडर, चीज, बटर, पनीर, फ्लेवर्ड मिल्क, बोर्नव्हिटा, स्टॅमिना, बाईट्स, बिस्कीट्स, आइसक्रीम इ. दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादन, टेट्रापॅक्ड ऊस / इतर रसांचे उत्पादन, पशुखाद्य प्रकल्प, कॅडबरी प्लँट, दूध वाढीसाठी अद्ययावत दुभत्या जनावरांचे गोठे, वासरे संगोपन केंद्र, वारणा डेअरी ॲण्ड ॲग्रो इंडस्ट्रीज लि. वारणा, मिल्क ॲड मिल्क प्रॉडक्ट्स लि., नाशिक येथील प्रकल्पाबरोबरच बार्शी, मुधोळ, जत, गडहिंग्लज, करमाळा, गणेशवाडी आदी प्रकल्प कार्यरत, नवी मुंबई (नेरूळ) येथील वारणा कामगार संकुल. भारतीय लष्करासह देश-विदेशात उच्च गुणवत्तेचे दुग्धजन्य पदार्थ पुरविण्याचा सन्मान. भारत सरकारचा स्टार एक्सपोर्ट हाउस दर्जा, आयएसओ व एचएसीसीपी मानांकन

**श्री वारणा विभाग सह. ग्राहक मंडळ लि. (वारणा बझार)**

सर्व गृहोपयोगी व इतर वस्तू एकाच छताखाली देणारी, ५७ शाखा व ३ फ्रँचाईजी आणि वार्षिक १३२ कोटींहून अधिक उलाढाल तसेच ८० % हून अधिक महिला सभासद असणारी संस्था. वारणा बझारमार्फत लोकांचे जीवनमान उंचावण्यास /समृद्धीस सहकार्य.

**श्री वारणा सहकारी बँक लि. वारणानगर**

५१५ कोटींहून अधिक ठेवी व ८५० कोटींपेक्षा अधिक व्यवसायाबरोबर महानगरांसह २८ शाखा असणारी तसेच उच्च कार्यक्षमतेबद्दल रिझर्व्ह बँकेचे ग्रेड वन मानांकन मिळालेली बँक.

**वारणा महिला उद्योग**

महिलांसाठी महिलांकडून चालविल्या जाणाऱ्या संस्था, लिज्जत पापड उत्पादन, हॅण्डमेड पेपर, बचत गट, विविध खाद्य पदार्थांचे उत्पादन, वारणा चैतन्य मतिमंद मुलांची शाळा, वारणा गारमेंट उद्योग, दुर्गम भागातील कुटुंबासाठी अभिनव पद्धतीने शेळ्यांचे वाटप. विविध महिला सहकारी उद्योग व उपक्रमांद्वारे परिसरातील महिलांचे सक्षमीकरण व आर्थिक स्वावलंबन.

**श्री वारणा महिला सहकारी पतसंस्था**

५३ कोटी खेळते भागभांडवल व ४५ कोटींहून अधिक ठेवी असणारी महिलांची अग्रेसर संस्था.

**वारणा व्यायाम मंदिर**

अद्ययावत व्यायामशाळा, मल्लविद्येचे प्रशिक्षण, शरीरसौष्ठवास प्राधान्य, देशी खेळाला प्रोत्साहनासाठी वारणानगर येथे दरवर्षी आंतरराष्ट्रीय कुस्ती मैदानाचे २ लाखांहून अधिक कुस्ती शौकिनांच्या उपस्थितीत आयोजुन.

**जीवनकुमार शिंदे**
संपर्क :९८२३२४२१२१

## डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना




(पीककर्ज वेळेत परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना १ लाखापर्यंत ० टक्के व्याजदर)




योजना केव्हापासून कार्यान्वित आहे? : १९९१

योजनेचा उद्देश व स्वरूप : रु. १००,०००/- पर्यंतचे अल्प मुदतीचे पीक कर्ज घेणाऱ्या आणि विहित मुदतीत परतफेड कणाऱ्या शेतकऱ्यांना ३ टक्के वार्षिक दराने व रु. १,००,०००/- पेक्षा जास्त पण रु. ३.०० लाखांपर्यंत अल्प मुदतीचे पीक कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांना २ टक्के वार्षिक दराने व्याजाची सवलत लागू राहील. या पीक कर्जाची संपूर्ण परतफेड प्रतिवर्षी ३० जूनच्या आत करणे आवश्यक आहे.

लाभार्थी : विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांचे, राष्ट्रीयीकृत बँकांचे, प्रादेशिक ग्रामीण बँकांचे व खासगी बँकांचे नियमित परतफेड करणारे कर्जदार तसेच या योजनेंतर्गत, अनुसूचित जाती व नवबौद्ध कर्जदार सभासदांना विशेष घटक योजनेंतर्गत उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे लाभ देण्यात येतो.

अर्ज कोणाकडे करावयाचा? : साहाय्यक निबंधक/उपनिबंधक सहकारी संस्था, मंजुरीचे अधिकार : जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था

## विशेष घटक योजना (जिल्हास्तरीय)




योजना केव्हापासून कार्यान्वित आहे? : १९९१

योजनेचा उद्देश व स्वरूप : सर्वसधारण सभासदांप्रमाणे

लाभार्थी : अनुसूचित जाती बौद्ध कर्जदार सभासद विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांचे, राष्ट्रीयीकृत बँकांचे प्रादेशिक ग्रामीण बँकांचे व खासगी बँकांचे नियमित परतफेड करणारे कर्जदार तसेच या योजनेंतर्गत,अनुसूचित जाती व नवबौद्ध कर्जदार सभासदांना- विशेष घटक योजनेंतर्गत उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे लाभ देण्यात येतो.

अर्ज कोणाकडे करावयाचा? : साहाय्यक निबंधक/उपनिबंधक सहकारी संस्था

मंजुरीचे अधिकार : जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था.

सुवर्णमहोत्सवी

# गोकुळ

कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्या., कोल्हापूर (गोकुळ) हा देशातील एक अग्रमानांकित व यशस्वी सहकारी दूध उत्पादक संघ आहे. गोकुळने आपल्या दुग्ध व दुग्धजन्य उत्पादनामध्ये सातत्याने राखलेल्या योग्य गुणवत्ता व शुद्धतेमुळे गोकुळ ब्रॅण्ड म्हणजे गुणवत्ता व शुद्धता हे ग्राहकांच्या मनामध्ये ठसविण्यात यशस्वी झाला आहे. जिल्ह्यातील दूधव्यवसाय वाढावा, जनावरांची दूध उत्पादकता वाढावी व याद्वारे ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास व्हावा यादृष्टीने गोकुळ नेहमीच वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रम राबवित आहे. यामध्ये जातिवंत मादी वासरे संगोपन योजना व गोकुळ ग्राम योजनेचा विशेष उल्लेख करता येईल. या अभिनव योजनांमुळे गोकुळ ही देशात व महाराष्ट्रात एक आदर्श सहकारी संस्था बनली आहे.

### गोकुळचा इतिहास

१६ मार्च १९६३ रोजी गोकुळ दूध संघाची स्थापना करण्यात आली. या संघाने २२ दूध उत्पादक संस्थांपासून ५०० लि. दूध प्रति दिनी संकलित करण्यापासून सुरुवात केली.

सन १९७८ मध्ये नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्डाने कोल्हापूर जिल्ह्याची ऑपरेशन फ्लड प्रोग्रॅमसाठी निवड केली व गोकुळ दूध संघासाठी एका नवीन पर्वाची सुरुवात झाली. या ऑपरेशन फ्लड प्रोग्रॅममधून एन.डी.डी.बी.च्या आर्थिक साहाय्याने २ लाख लिटर प्रति दिन क्षमतेचा डेअरी प्रोजेक्ट गोकुळ शिरगांव येथे तर गडहिंग्लज व बिद्री येथे ७५ हजार व ५० हजार लि. प्रति दिन क्षमतेची दोन चिलिंग सेंटर उभारण्यात आले. ऑपरेशन फ्लड प्रोग्रॅम - ३ मधून गोगवे व तावरेवाडी येथे दोन चिलिंग सेंटर उभारण्यात आले. सन १९९२ मध्ये एन.डी.डी.बी.च्या आर्थिक साहाय्याने पशुखाद्य कारखान्याची क्षमता १०० मेट्रीक टन प्रति दिनवरून २०० मेट्रीक टन प्रतिदिनपर्यंत वाढविण्यात आली.

सन १९८५ मध्ये एन.डी.डी.बी.च्या प्रयत्नाने शासकीय दूध योजना गोकुळ दूध संघाकडे वर्ग करण्यात आली. यावेळी संघ ६७६ प्राथमिक दुग्ध व्यवसायिक संस्थांमार्फत सरासरी ११४८३६ लि. प्रति दिन दूध संकलन करीत होता. यानंतर संघाच्या दूध संकलनामध्ये वेगाने वाढ होत गेली. सन २०११-१२ मध्ये संघाचे दूध संकलन सरासरी ६.२४ लाख लि. प्रति दिन असून, फ्लश सिझनमध्ये सरासरी प्रति दिनी दूध संकलनाचा आकडा ८ लाख लिटरपर्यंत पोहोलचा आहे. संघाचे वाशी, (नवी मुंबई) येथे स्वत:चे पॅकेजिंग स्टेशन आहे; तसेच पुणे येथेही पॅकेजिंग स्टेशन आहे.

संघाला आय.एस./ आय.एस.ओ.: ९००१:२००८ व आय.एस./ आय.एस.ओ.: २२०००:२००५ मानांकन मिळाले आहे. तसेच एक्सपोर्ट कौन्सिल ऑफ इंडियाचे एक्सपोर्ट सर्टिफिकेट मिळालेले आहे व संघाने अरब देशात तसेच युरोपीयन देशात लोणी व दूध पावडरची निर्यात केली आहे.

### गोकुळची वैशिष्ट्ये

- १४ नॅशनल प्रॉडक्टीव्हीटी ॲवॉर्डने सन्मानित.
- शाश्वत जातिवंत गाय-वासरू संगोपन योजना शेतकऱ्याच्या गोठ्यात राबविली.
- प्रत्येक १० दिवसांत दुधाचे बिल. महिन्याला रु. ५१ कोटी दुधाचे बिल दिले जाते.
- गोकुळ ग्राम विकास योजना, एक परिपूर्ण गाव विकासाची योजना.
- दूध उत्पादनासाठी प्रॉव्हिडंट फंड योजना.
- दूध उत्पादकांच्या कुस्तीगीर मुलांसाठी मानधन, जास्त दूध देणाऱ्या गाय व म्हशीसाठी स्पर्धा घेऊन गोकुळ श्री ॲवॉर्ड, १५०० महिला बचत गटांची स्थापना, एकूण फंड रु. ५ कोटी, टर्न ओव्हर रु. १५ कोटी, दूध संस्था व दूध उत्पादकांसाठी दूध उत्पादन वृद्धीसाठी विशेष अनुदान.
- गोकुळचे जिल्ह्यातील दूध व्यवसाय वृद्धीसाठी व सामाजिक - आर्थिक विकासातील योगदान

### संस्था बांधणी

गोकुळने दूध व्यवसायाच्या संगठीकरणासाठी जिल्ह्यात प्राथमिक सहकारी दूध उत्पादक संस्थांचे जाळे निर्माण केले आहे. यामुळे जिल्ह्यातील ग्रामीण भागात सहकाराची बीजे खोलवर रुजण्यास मदत झाली आहे.

### दूध संकलन व मार्केटिंग

संघाच्या योग्य मार्केटिंग व्यवस्थेमुळे जिल्ह्यातील दूध उत्पादकांच्या दुधासाठी एक शाश्वत बाजारपेठ निर्माण करून दिली आहे. संघ ७ लाख लिटर प्रति दिनी प्रमाणे दुधाची विक्री मुंबई, पुणे, कोल्हापूर, कोकण भाग व गोवा राज्यात करीत आहे.

### पशुवैद्यकीय सेवा

संघाच्या पशुवैद्यकीय विभागामार्फत २९ पशुवैद्यकीय केंद्रांकडील ४० फिरत्या पशुवैद्यकीय दवाखान्यांमार्फत १२ महिने २४ तास पशुवैद्यकीय सेवा पुरविली जात आहे. ही सेवा ५६ पदवीधर पशुवैद्यकांमार्फत नाममात्र शुल्कावर पुरविली जाते. यामुळे दूध उत्पादकांचा जनावरांच्या औषध उपचारावरील खर्च कमी झाला आहे.

### वैरण विकास

दूध उत्पादकांच्या जनावरांना सकस वैरण उपलब्ध व्हावी यादृष्टीने संघामार्फत नामांकित कंपनीच्या सुधारित चारा पिकांचे बियाणे व कांड्यांचा सबसिडीवर



पुरवठा केला जातो; तसेच सुधारित चारा पिकांचे प्रात्यक्षिक प्लॉट तयार करून शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले जाते.

**पशुसंवर्धन**

जिल्ह्यातील दूध उत्पादन वाढावे, जनावरांची उत्पादकता व उत्पादन काळ (Productive Life) वाढावी यासाठी संघामार्फत - सामूहिक जंत निर्मूलन कार्यक्रम, सामूहिक व मोफत लसीकरण कार्यक्रम, ओरिएन्टल इंशुरन्स कंपनीच्या संयुक्त विद्यमाने किसान विमा पॅकेज, जनावरासह शेतकरी कुटुंबासाठी विमा संरक्षण यांचा समावेश आहे.

मायकोट्रेनिंग सेंटर- दूध उत्पादकांना, दूध उत्पादकाच्या गोठ्यात दूध उत्पादकाकडून प्रात्यक्षिक प्रशिक्षण मिळावे यासाठी संघाने जिल्ह्यात तीन मायकोट्रेनिंग सेंटर उभारणी केली आहेत. या मायकोट्रेनिंग सेंटरवर दूध उत्पादकांसाठी दुधाळ जनावरांच्या व्यवस्थापनावर एक दिवसाच्या प्रशिक्षण वर्गाचे आयोजन केले जाते. ऑक्टोबर २००९ ते मार्च २०१२ पर्यंत ३२,००० दूध उत्पादकांनी या प्रशिक्षणाचा लाभ घेतला असून त्यांच्या जनावरांच्या व्यवस्थापनामध्ये सुधारणा दिसून आली आहे.


**पशु पैदास**

जिल्ह्यामध्ये उच्च वंशावळीची व जास्त दूध देणाऱ्या जनावरांची पैदास व्हावी या हेतूने संघामार्फत जिल्ह्यामध्ये कृत्रिम रेतनची सेवा ४२५ फिरत्या कृत्रिम रेतन केंद्रांमार्फत व प्रशिक्षित कृत्रिम रेतन सेवकांमार्फत राबविली जाते. जिल्ह्यामध्ये पंढरपुरी म्हैस संवर्धन कार्यक्रम राबविला जात आहे.

**जनावरांचा आहार**

दूध उत्पादकांच्या जनावरांना सकस व पौष्टिक पशुखाद्य योग्य किमतीत उपलब्ध होण्यासाठी संघाने दोन पशुखाद्य कारखाने (२०० व ३०० मेट्रीक टन प्रति दिन क्षमता) उभारले आहेत.

**अरुण द. नरके**
**संपर्क :९८२३१४९९२७**



## गायी-वासरे संगोपन

**या महत्त्वाकांक्षी व यशस्वी योजनेची सुरुवात १ ऑक्टोबर २००५ पासून झाली. या योजनेचा महत्त्वाचा उद्देश कृत्रिम रेतनाने पैदास झालेली उच्च वंशावळी वासरांचे जतन होऊन ही जनावरे दुधात यावीत हा आहे. आतापर्यंत या योजनेमध्ये १.६० लाख वासरांची नोंद झाली आहे. या योजनेची यशस्वीता म्हणजे भविष्यात १.३६ लाख जनावरे दूध उत्पादनात येणार असून याद्वारे ५४४ कोटींचे पशुधन जिल्ह्यात निर्माण झाले आहे. तसेच यापासून मिळणाऱ्या दूध उत्पादनामुळे दूध उत्पादकांच्या मिळकतीत वाढ होणार आहे व काही अंशी दुधाच्या मागणीची गरज भागणार आहे.**

# परिवर्तनाच्या टप्प्यावर

**(पान ३८ वरून)**

९७ व्या घटनादुरुस्तीच्या आनुषंगाने जशा काही व्याख्यांचा समावेश करणे गरजेचे ठरणार आहे तसेच संचालकांच्या संख्येवर २१ ची मर्यादा आणल्याने आणि राखीव जागांमध्ये बदल केल्याने अनेक संस्थांना आपल्या उपविधीमध्ये आवश्यक ते बदल करणे भाग पडणार आहे. तसेच सहकारी संस्थांच्या निवडणुकीमध्ये पारदर्शीपणा आणण्यासाठी आणि वेळेवर निवडणुका होण्यासाठी स्वतंत्र 'राज्य सहकारी निवडणूक आयोगाची' स्थापना करणे गरजेचे ठरणार आहे. या कायद्यातील सर्वांत महत्त्वाची तरतूद म्हणजे शासकीय भागभांडवल अथवा मदत न घेणाऱ्या सहकारी संस्थांचे संचालक मंडळ बरखास्त अथवा निलंबित करण्याचे अधिकार शासनास राहणार नाहीत. त्यामुळे या संस्थांच्या सभासदांवर फार मोठी जबाबदारी येऊन पडणार आहे. स्वायत्ततेबरोबरच जबाबदारी ही या संस्थांनाच म्हणजे पर्यायाने सभासदांनाच घ्यावी लागेल. त्यामुळे भविष्यकाळात या संस्थांच्या व्यवस्थापनातील सभासदांचा सहभाग वाढून त्या निश्चित 'लोकाभिमुख' होतील.

सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षणात जरी संस्थांना स्वायतत्ता दिलेली असली तरी वर नमूद केल्यामुळे या स्वायत्ततेमुळे सभासदांची जबाबदारी वाढली आहे. परंतु, या लेखापरीक्षण अहवालाची आवश्यकतेनुसार तपासणी (Inspection) करण्याचे अधिकार शासन स्वत:कडे घेऊन अशा उपाययोजना या घटनेच्या अनुच्छेद १९(४) मध्ये नमूद केल्यानुसार वाजवी निर्बंध या व्याख्येमध्येच ठेवण्याची कसरत शासनास करावी लागणार आहे. अशा प्रकारे देशाच्या आर्थिक विकासात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या सहकार क्षेत्राला जास्तीत जास्त स्वायत्तता देण्यासाठी व संस्थांचा कारभार लोकशाही तत्त्वांवर व्यावसायिक पद्धतीने व आर्थिक सक्षमतेने सभासदांच्या हितासाठी होण्याच्या दृष्टीने अंमलात आलेल्या या ९७ व्या घटनादुरुस्तीमुळे मरगळलेल्या सहकार क्षेत्राला नवसंजीवनी मिळेल, यात शंकाच नाही.

**मधुकर चौधरी**
सहकार आयुक्त,
**संपर्क : ७३५०१११११००**

# प्रयोगातून प्रगतीकडे

**चिकलठाण या छोट्याशा गावातील सहकारी संस्थेची वाटचाल राज्यातील इतर संस्थांना प्रेरणादायी व मार्गदर्शक अशीच आहे. या ठिकाणी विश्वास व व्यावसायिकतेच्या बळावर सहकाराचा प्रयोग यशस्वी झाला आहे.**

मराठवाड्याच्या औरंगाबाद जिल्ह्यातील कन्नड तालुक्यातले चिकलठाण हे निसर्गसंपन्न गाव. महामार्गापासून १५ ते २० कि.मी. थोडं आडबाजूला वसलेल्या जवळपास सहा हजार लोकवस्तीच्या गावाचा शेती हा मुख्य व्यवसाय. या गावातील चिकलठाण विविध कार्यकारी सेवा सहकारी (विकास) सेवा संस्थेने शेतकऱ्यांना भक्कम आर्थिक आधार दिला.

सामान्य सभासद व शेतकरी सहकारी चळवळीपासून दुरावतो की काय असे वाटू लागले असताना चिकलठाण विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्थेने शेतीशी संबंधित उपक्रम राबवले. संस्था आर्थिकदृष्ट्या भक्कम राहावी यासाठी पावलं उचलली. गावाच्या विकासात योगदान दिले. शेतकऱ्यांना पीककर्ज, खते, बी-बियाणे, कृषी औषधे, कीटकनाशके, पाइप पुरवठा आदी सेवा देताना व्यावसायिकता व कल्पकता जपली. संस्थेने गोदामांची उभारणी केली. रासायनिक खते, बियाणे यांचा पुरवठा करण्यासाठी इफको, कृभको, महाराष्ट्र राज्य कृषी विकास महामंडळ यांच्या उत्पादनांची विक्री गावात सुरू केली. पाइप्सची खरेदी करून ते भाडेतत्त्वावर पुरवठा करण्याबरोबरच विविध योजना अंमलात आणल्या.

### अडचणींवर मात

या संस्थेसमोरही आर्थिक अडचणी आल्या होत्या. २००२ पासून २००७ पर्यंत चार वेळा कमी पावसामुळे शेतीचे उत्पन्न घटल्याने कर्ज परतफेड कमी झाली. नफा शून्यावर आला. कर्जवसुली व संस्थेच्या शेतीपूरक व्यवसायांवरही परिणाम झाला. यावेळी संस्था चालू राहण्यासाठी सहकारी, सभासद यांचा विश्वास महत्त्वाचा होता. संस्थेच्या सभासदांची संख्या १९९० मध्ये ६०६ होती. सभासदांचा विश्वास संपादन करताना प्रत्येक वर्षी त्यामध्ये वाढ होत होती. ती संख्या आज १२७४ वर पोहोचली. गावातील एकूण १२८५ खातेदार शेतकऱ्यांपैकी १२७४ शेतकरी सभासद झाल्याने संस्था गावातल्या प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत पोहोचणारी ठरली.

चिकलठाण गावाच्या २००० एकर शेती क्षेत्रामध्ये कापूस, मका, ऊस या मुख्य पिकांसह हळद, आलं, भाजीपालाचे उत्पादन घेतले जाते. या पिकांसाठी दरवर्षी नियमितपणे अल्पमुदतीचे कर्ज घेतले जाते. कर्ज उपलब्ध झाले नाही, तर शेतीचे आर्थिक गणितच बिघडते. कर्जफेड करण्यासाठी शेतमालाला मिळणारा बाजारभाव महत्त्वाचा ठरत असल्याने बाजारभाव कमी झाला की शेतकरी अडचणीत येतो आणि कर्ज परतफेड करणे अवघड होऊ लागते.

शेतकऱ्यांच्या या अडचणींचा विचार करून शासनाने ६ टक्के व्याजदराने पीक कर्ज पुरवठ्याचा निर्णय घेतला आहे. चिकलठाण संस्थेने पीककर्ज पुरवठा करताना सहकार विभागाच्या निर्देशानुसार कामकाज करतानाच कर्ज वसुलीवर योग्य पद्धतीने लक्ष दिले. पीक कर्जासाठी असलेले अनुदान शेतकऱ्यांपर्यंत लवकर पोहोचण्यासाठी प्रयत्न केले गेले. अनुदानामुळे ६ टक्के व्याज दरापैकी पात्रतेनुसार २ व ४ टक्के रकमेचा परतावा दिला. लाभार्थी शेतकऱ्यांना शासनाच्या कर्जमाफीचा लाभ पोहोचवण्यामध्ये वेळेत कार्यवाही केली.

### नफ्याकडे वाटचाल

२०११-१२ मध्ये त्या आधीच्या वर्षातील वाटप कर्जाची वसुली ३ कोटी २५ लाख रुपये अशी होती. याच वर्षात संस्थेने ४ कोटी ३ लाख रुपयांचे पीककर्ज वाटप केले. जवळपास ९९१ शेतकऱ्यांना त्यांच्या गरजेनुसार कर्ज वाटप केले. या वर्षी संस्थेने इतर व्यवसायांसह केलेला एकूण नफा ३ लाख ४६ हजार रुपये इतका झाला. शासनाने या संस्था स्थापन करताना घालून दिलेले नियम हे नफा कमावणाऱ्या संस्था ठराव्यात यासाठी नसल्याने एकूण कर्ज व्यवसायाच्या तुलनेत नफ्याची ही रक्कमसुद्धा संस्थेचं मोठं यश आहे. मागील वर्षांच्या आर्थिक चढउतारातही संस्थेचा आजपर्यंतचा साठलेला नफा ३४ लाख ८४ हजार रुपये आहे.

शेतकऱ्यांच्या गरजांचा विचार करताना खते, बी-बियाणे यांची उपलब्धता राहावी, तुटवडा भासू नये यासाठी संस्थेने ४०० मेट्रीक टन क्षमतेची दोन गोदामे निर्माण केली.

(पान ५० वर)



# आदिवासींसाठी दीपस्तंभ

आदिवासी भूमिहीन मजूर यांची आर्थिक पिळवणूक थांबवून त्यांचा आर्थिक विकास करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाची स्थापना १९७२ मध्ये झाली.

महाराष्ट्रात आदिवासींची लोकसंख्या ८५.७७ लाख असून एकूण लोकसंख्येशी त्याची टक्केवारी ८.८५ % आहे. दारिद्र्यरेषेखालील आदिवासी कुटुंबाची टक्केवारी ही ९१.११ % आहे, यावरून आदिवासींच्या बिकट आर्थिक परिस्थितीची जाणीव आपल्याला होते. राज्यात दुर्गम व अतिदुर्गम भागात एकूण ९३८ आदिवासी विविध कार्यकारी संस्था कार्यरत असून, आदिवासी विकास महामंडळ ही त्यांची शिखर संस्था आहे, या महामंडळातर्फे आदिवासी भागात आदिवासींच्या विकासासाठी विविध योजना राबवण्यात येतात.

**१) कृषी पत पुरवठा :**

महामंडळाच्या सभासद आदिवासी विकास सहकारी संस्थांनी आदिवासी शेतकऱ्यांना शेतीसाठी अल्प, मध्यम व दीर्घ मुदत कर्ज पुरवठा करून त्यांची सावकाराच्या आर्थिक पिळवणुकीपासून मुक्तता केली आहे. सर्वसाधारणपणे या संस्था दरवर्षी रुपये ३५० कोटींचे पीक कर्ज वाटप करीत आहेत.

**२) किमान आधारभूत खरेदी योजना :**

या योजनेंतर्गत मंडळाने राज्यातील दुर्गम भागात एकूण ४१० खरेदी केंद्रे सुरू केलेली आहेत. या योजनेमुळे शेतकऱ्यांना त्यांच्या मालाचा दर्जा, गुणवत्ता व वजनानुसार त्वरित माल विक्रीची रक्कम धनादेशाद्वारे मिळत असते.

**३) एकाधिकार खरेदी योजना :**

१९७७-७८ मध्ये महाराष्ट्रातील आदिवासी उपयोजना क्षेत्रात ७ तालुक्यांत एकाधिकार खरेदी योजना प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्यात आली. ही योजना तिचे महत्त्व तिला मिळालेला प्रतिसाद लक्षात घेऊन तिची व्याप्ती आतापर्यंत १५ जिल्ह्यांतील ७३ तालुक्यांत करण्यात आली. एकाधिकार खरेदी योजनेंतर्गत प्रचलित बाजारभावाचा आधार घेण्यासाठी नजीकच्या कृषी उत्पन्न बाजार समितीतील बाजारभावाचा आधार घेऊन बाजारभावावर आधारित खरेदी दर आठवड्यातून किमान दोनदा संबंधित जिल्हाधिकारी यांच्यामार्फत दर मंजूर करण्याचे अधिकार शासनाने दिले आहेत. एकाधिकार खरेदीसाठी उपअभिकर्ता म्हणून आदिवासी विविध कार्यकारी संस्थेचे व महामंडळाचे स्वत:चे केंद्र मिळून एकूण ४१० खरेदी केंद्रांवर शेतकऱ्यांनी विक्रीसाठी आणलेला माल खरेदी केला जातो. महाराष्ट्र शासनाचा दि. ०७ मार्च,२००८ च्या निर्णयानुसार एकाधिकार खरेदी सद्यःस्थितीत स्थगित केली असून ती पुनश्च नवीन सुधारित स्वरूपात सुरू करण्याची शासनाची भूमिका आहे.

**४) खावटी कर्ज वाटप योजना :**

१९७८ पासून खावटी कर्ज योजना सुरू करण्यात आली आहे. यासाठी शासनाकडून आदिवासी विकास महामंडळास निधी उपलब्ध करून दिला जातो. लाभार्थ्यांना वाटप केलेल्या कर्जावर ३०% अनुदान दिले जाते.

**५) वीजपंप / तेलपंप योजना :**

आदिवासी शेतकऱ्यांना वैयक्तिक सहभाग व अनुदान तत्त्वावर वीजपंप संच पुरवठ्याची योजना ०२ नोव्हेंबर १९७३ पासून सुरू करण्यात आली. तर अतिदुर्गम भागात विद्युत पुरवठा होत नसल्याने दि. १७ जानेवारी १९७७ पासून अशा भागातील आदिवासी शेतकऱ्यांना तेलपंप देण्याची योजना सुरू केली.

ही योजना कार्यान्वित करण्याची जबाबदारी सन १९८०-८१ वर्षापासून या महामंडळाकडे सोपविण्यात आली आहे. योजनेअंतर्गत सन २००३-०४ पासून तेलपंपाचा पुरवठा करण्यात येत आहे. सन १९८०-८१ ते २००९-१० दरम्यान राज्यातील २४ प्रकल्पांत एकूण ५५,६४४ वीजपंप व सन १९८०-८१ ते २०१०-११ दरम्यान एकूण ८१,८५९ तेलपंप आदिवासी शेतकऱ्यांना मंजूर करण्यात आले आहेत. दिनांक ३१ जुलै २०१२ अखेर त्यापैकी ५५२४७ वीजपंप व ८०४२० तेलपंप आदिवासी शेतकऱ्यांच्या शेतातील पाण्याच्या साधनावर बसवून देण्यात आले आहेत.

या योजनेंतर्गत सन २०११-१२ दि. १६ ऑगस्ट १२ अखेर ४,६९६ तेलपंपांचा पुरवठा झालेला आहे.

**६) दारिद्र्यरेषेखालील आदिवासी कुटुंबांना स्वयंपाक गॅस युनिट पुरवठा :**

२० ऑक्टोबर, २००६ पासून राज्य योजनेतून दारिद्र्यरेषेखालील १,००,००० आदिवासी कुटुंबांना स्वयंपाक गॅस युनिट पुरवठा योजना राबविण्यास शासनाने मंजुरी दिलेली आहे.

गॅस युनिट पुरवठा योजनेतील गॅस सिलिंडर व रेग्युलेटरचा पुरवठा सरकारी क्षेत्रातील तेल कंपनी करणार असून संपूर्ण गॅस युनिट संच लाभार्थ्यांपर्यंत पुरवठ्याचे काम महामंडळामार्फत करण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत ३१ जुलै २०१२ अखेर ८७६१६ लाभार्थ्यांना योजनेचा प्रत्यक्ष लाभ देण्यात आला आहे.

**द्वार वितरण योजना**

शासनाने सन १९९२-९३ पासून द्वार वितरण योजना सुरू केली. या योजनेमार्फत शिधावस्तू तहसील गोदामातून थेट स्वस्त धान्य दुकानापर्यंत द्वारपोहोच करण्याचे काम महामंडळाकडे सोपविण्यात आले. महामंडळाकडे सुपूर्त केलेल्या वाहनांद्वारे वाहतूक करून शिधावस्तू द्वारपोहोच केली जात असल्याने दुर्गम व आदिवासी उपयोजना कार्यक्षेत्रात शिधा वस्तू वेळेवर व मुबलक प्रमाणात मिळू लागल्या आहेत.



**महामंडळाची आर्थिक परिस्थिती**

महामंडळाकडे ३१ मार्च २०१२ अखेर केंद्र शासनाचे १२.१४ कोटी, राज्य शासनाचे ६१.६१ कोटी व आदिवासी विविध कार्यकारी संस्थांचे रुपये १.२१ लाख असे एकूण ८१.७६ कोटी भागभांडवल आहे. महामंडळाचे अध्यक्ष ना. श्री. बबनरावजी पाचपुते (मंत्री, आदिवासी विकास), उपाध्यक्ष ना. श्री. राजेंद्रजी गावीत (राज्यमंत्री आदिवासी विकास) व व्यवस्थापकीय संचालक श्री. विलास ठाकूर (भा. प्र. से.) या सर्वांच्या नेतृत्वाखाली महामंडळ प्रगतिपथावर आहे. महामंडळ राबवित असलेल्या व भविष्यकालीन योजना पाहता राज्यातील आदिवासींसाठी विकासाचे एक दीपस्तंभ आहे असेच म्हणावे लागेल.

## आदिवासींसाठी दीपस्तंभ- संपर्क

| कार्यालयाचे नाव | संपर्क |
|---|---|
| विभागीय कार्यालय, नागपूर (गोंडवन)<br>आदिवासी विकास भवन, २ रा माळा,<br>गिरीपेठ, अमरावती रोड, नागपूर-१० | ९४२२९४६३९६ |
| प्रादेशिक कार्यालय, नाशिक<br>आदिवासी विकास भवन, ३ रा माळा,<br>जुना आग्रारोड, गडकरी चौक, नाशिक-२ | ९४२२९४६३९० |
| प्रादेशिक कार्यालय, जुन्नर<br>महसूल भवन, नवीन एसटी स्टॅण्ड<br>जवळ, जुन्नर, जि. पुणे.<br>msctdcjnr@gmail.com | ९४२२९४६३८८ |
| प्रादेशिक कार्यालय,जव्हार.<br>पंचायत समिती जवळ, जव्हार, जि. ठाणे. | ९९७५४७८७४७<br>९४२२९४६३८४ |
| प्रादेशिक कार्यालय, नंदुरबार<br>बालाजी वाडा, टिळकरोड, नंदुरबार. | ९६३७२०२५३५<br>८२७५०२२७५५<br>९४०५२०२१४३ |
| प्रादेशिक कार्यालय, यवतमाळ<br>दंडवते निवास, दर्डानगर, पाण्याच्या<br>टाकीजवळ, यवतमाळ. | ९४२२९४६३८६<br>८७८५८७६९३३ |
| प्रादेशिक कार्यालय, भंडारा साईकृपा बंगला,<br>नागपूर नाक्याजवळ, भंडारा. | ९४२२९४६३९२ |
| प्रादेशिक कार्यालय, चंद्रपूर जैन कॉम्प्लेक्स,<br>मुलरोड, बंगाली कॅम्प, चंद्रपूर. | ९४२२९४६३९४<br>९४०४३४३२३२ |
| प्रादेशिक कार्यालय, गडचिरोली<br>चार्मोशी रोड, जिल्हा परिषद<br>हायस्कूलजवळ, गडचिरोली. | ९४२२९४६३९६ |
| प्रादेशिक कार्यालय,<br>धारणी, ता. धारणी (मेळघाट),<br>जि. अमरावती. | ९४२२९४६३८७ |
| उप प्रादेशिक कार्यालय,अहेरी<br>ता.अहेरी, जि.गडचिरोली. | ९४२२९४६३९२ |

### महामंडळाच्या भविष्यातील योजना

- साठवणूक क्षमता वाढीसाठी प्रयत्न
- गौणवनोपज कृषी प्रक्रिया उद्योग सुरु करणे.
- आदिवासी युवक/युवतींकरिता अनुदानावर स्वयंरोजगार योजना राबविणे.
- खावटी कर्ज वाटप केलेल्या लाभार्थ्यांना सौर कंदिल वाटप करणे.
- आदिवासी शेतकऱ्यांना तेलपंपाबरोबर एच.डी.पी. /
- पी.व्ही.सी. पाईप पुरवठा योजना राबविणे.

**विलास ठाकूर,** व्यवस्थापकीय संचालक **संपर्क :**(०२५३)२५७६८६०




## प्रयोगातून प्रगतीकडे

(पान ४८ वरून)

पहिले गोदाम १९८६ मध्ये व दुसरे गोदाम १९९० मध्ये बांधले. त्यांचा परिणामकारक उपयोग केला. शेतकऱ्यांना गरज असणारी मिश्र खते मागवून साठवणूक करून वेळोवेळी पुरवठा केला. यामुळे केंद्र सरकारच्या 'कृभको'ने संस्थेला दत्तक सहकारी संस्था म्हणून निवड करून गौरव केला.

पिकांची उत्पादकता वाढावी यासाठी इफको, कृभको यांच्या सहकार्याने दरवर्षी तीन दिवस माती परीक्षणाची सोय गावात उपलब्ध करून देण्याचा संस्थेचा प्रयत्न असतो.

**भाडेतत्त्वावर पाइप**

संस्थेची भाडेतत्त्वावर पाईप पुरविण्याची योजनादेखील लोकप्रिय ठरली आहे. शेतकऱ्यांना गुंतवणूक न करता हंगामामध्ये पाइप कमी खर्चात वापर करता येत असल्याने पाइपांना मागणी राहते. २० फूट लांबीचा एक पाईप २ रुपये एका दिवसाला या दराने भाडेतत्त्वावर दिला जातो. संस्थेला ठरावीक गुंतवणुकीतून नियमित उत्पन्न देणारी ही योजना ठरली. संस्थेकडून मिळालेल्या कर्जातून दुभती जनावरे, गाई, म्हशी घेऊन दुग्धव्यवसायाला शेतकऱ्यांनी सुरुवात केली आहे. १० वर्षांपूर्वी गावात ५०० लीटर दूध उत्पादन दररोज होते ते आता ४,००० लिटरवर पोहोचले. त्यातून येणाऱ्या पैशाने राहणीमान उंचावले.

पक्क्या घरांची संख्या गावात वाढू लागली. राज्य शासनाचे अधिकृत विक्रेते म्हणून संस्थेने स्वस्त धान्य दुकान सुरू केले. संस्थेच्या कार्यात वाढ होत असल्याने संस्थेने गोदामांपाठोपाठ, गावात सहा दुकाने गाळे उभारून ते भाडेतत्त्वावर दिले, संस्थेचे कार्यालय स्वत:च्या पक्क्या दुमजली इमारतीमध्ये सुरू केले. भविष्यातील योजनांसाठी ४५०० चौ. फुटांची जागा खरेदी केली आहे. मराठवाड्यातील इतर संस्थांना चिकलठाण विविध कार्यकारी सहकारी (विकास) संस्थेची वाटचाल मार्गदर्शक असल्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी नमूद केले आहे.

**किरण वाघ**
**संपर्क :** ९८५०५४९७९७

## गुरुजींची बँक

(पान ४१ वरून)

बँकेने रु.१३.०० कोटींची वसुली केली; तसेच भागभांडवलात झालेली वाढ, जुन्या थकीत कर्जखात्यांमध्ये झालेली वसुली आणि बँकेला झालेला निव्वळ नफा यामुळे बँकेची स्थिती सक्षम झाली आहे. बँकेने रु.१६.०४ कोटी नफा कमवून बँकेची आर्थिक स्थिती मजबूत केलेली आहे. सन २०१२-२०१३ या आर्थिक वर्षात ही बँक, रिझर्व्ह बँकेचे सर्वच निकष पूर्ण करेल. वर्षाअखेर बँकेच्या ठेवी रु.७५०.०० कोटी आणि कर्जे रु.५२५.०० कोटी असतील आणि बँकेच्या प्रगतीचा हा आलेख आणखी उंचावला जाईल.

**प्रदीप दीक्षित**
**संपर्क :** ९८२२५७८८७०

# औरंगाबाद नवी झळाळी

एकेकाळी औरंगाबाद शहर हे युवा चळवळींसाठी प्रसिद्ध होते. मोठ्या संख्येने इथे विद्यार्थीवर्ग राहतो. विशेषत: ग्रामीण भागातील जनसामान्यांतून आलेल्या विद्यार्थ्यांची संख्या शहरात मोठी आहे. होस्टेल्स, वसतिगृहेही भरपूर आहेत. अर्थात, विद्यार्थ्यांना रास्त दरात भोजन-निवासाच्या सुविधा शहरात पुरेशा आहेत असे म्हणता येणार नाही. पूर्वीच्या औरंगाबाद शहरातील खानावळी, 'मेस', हॉटेल्स, लॉन्ड्री, कटिंग सलून, टेलरिंग व अन्य अनेक सेवा उद्योगांची मदार असे ती प्रामुख्याने या विद्यार्थीवर्गावर. गेल्या तीस वर्षांत शहरात अनेक नवनवीन महाविद्यालये सुरू झाली. अभियांत्रिकी, दंतचिकित्सा, फार्मसी, नर्सिंग, फॅशन डिझायनिंग, संगणकीय अभ्यासक्रम, मेडिकल अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांची संख्या वाढली. परप्रांतीय विद्यार्थ्यांची संख्या वाढली. या परप्रांतीय विद्यार्थ्यांसोबत त्या त्या प्रांतांची भाषा, संस्कृती, गुणदोष हेही सगळे शहरात आले. विदेशातूनही विशेषत: आफ्रिकन देशातून इथे मोठ्या संख्येने उंच, तगड्या बांध्याचे कृष्णवर्णीय विद्यार्थी आले. मध्यंतरीच्या काही वर्षांत शहरात जॉर्डन, लेबनॉन इकडून आलेल्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी होती. 'कोचिंग क्लासेस' संस्कृती शहरात वेगाने फोफावली. पूर्वीच्या घरगुती 'ट्युशन्स' घेणाऱ्यांना बाजूला सारत भव्य हॉल्स, फर्निचर इत्यादींनी सुसज्ज असे अनेक कोचिंग क्लासेस शहरात सुरू झाले. त्याच्या स्थानिक पेपरातून पानपानभर जाहिराती, स्वतंत्र पुरवण्या सुरू झाल्या. औरंगाबादेत सुरुवात झालेल्या 'चाटे कोचिंग क्लासेस'ने तर मुंबईसह महाराष्ट्रातील सर्व प्रमुख शहरांतून, प्रमुख सडकांवर, उच्च वस्त्यांतून आपल्या शाखा एकापाठोपाठ एक सुरू करण्याची धडाडी दाखवली.



नवीन रेल्वे स्टेशन


विमानतळ

'मीडिया' अर्थात प्रसारमाध्यमांच्या संदर्भात औरंगाबादेत गेल्या काही दशकांत बरेच काही घडले. स्वातंत्र्यापूर्वी इथे निझामी काळात एक रेडिओ स्टेशन होते. कविवर्य वा. रा. कांत त्याच्याशी संबंधित होते. ते केंद्र स्वातंत्र्योत्तर इतरत्र हलविले गेले. नंतर इथे 'आकाशवाणी' केंद्र सुरू व्हायला १९७६ साल उजाडावे लागले. त्या अगोदर काही वर्षे परभणी येथे केंद्र सुरू झाले होते. पण, ते केवळ कृषी कार्यक्रम देत असे. आकाशवाणी औरंगाबाद-परभणी केंद्राने कृषी-ग्रामीण विकास याबाबत उत्तम काम केले. करते आहे.

'प्रेस' अर्थात वृत्तपत्रसृष्टीत आज औरंगाबाद हे राज्यातील एक अत्यंत जागृत आणि महत्त्वाचे केंद्र झाले असले तरी प्रचलित वृत्तपत्रांतून आज ज्येष्ठ पदावर काम करणाऱ्या सगळ्याच मंडळींनी पत्रकारितेचे धडे 'अजिंठा', 'मराठवाडा'मध्येच गिरविलेले आहेत. आज मराठीतील अफाट खपाच्या आघाडीच्या दैनिकांची मुख्यालये या शहरात आहेत. अन्य प्रमुख दैनिकांच्या स्वतंत्र आवृत्त्या इथून निघतात. मराठी वृत्त वाहिन्यांचे प्रतिनिधी या शहरात आहेत. प्रसारमाध्यमांच्या वाढत्या मनुष्यबळाच्या गरजा पुरविण्यात विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या विभागाचा मोलाचा वाटा आहे. महाराष्ट्र शासनाच्या जनसंपर्क विभागालाही औरंगाबादेतील वृत्तपत्र विद्या विभागाने मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळ पुरविलेले आहे. विद्यापीठाखेरीज आज शहरातीलही काही महाविद्यालयांतून पत्रकारिता, जनसंपर्क इत्यादी विषयांचे अभ्यासक्रम सुरू झाले आहेत. अर्थात, प्रसारमाध्यमांचे बदलते स्वरूप, बदलते तंत्रज्ञान इत्यादी लक्षात घेता शहरात इलेक्ट्रॉनिक्स माध्यमांचे अद्ययावत होणे गरजेचे आहे. तसेच सुसज्ज 'स्टुडिओज्' सुरू होणे गरजेचे आहे. मराठीखेरीज इंग्रजी भाषेतून उत्तम शिक्षण देणाऱ्या शिक्षकवृंदाची मोठी गरज आहे.

विद्यापीठाचा नाट्यशास्त्र विभाग १९७४ च्या सुमारास सुरू झालेला आहे. म्हणजे त्याला आता चाळीस वर्षे होताहेत. या काळात अन्य काही महाविद्यालयांतूनही नाट्यशास्त्र हा विषय सुरू झाला हे खरे. मराठी-हिंदी सिने-नाट्यसृष्टीत उत्तम कामगिरी करणाऱ्या अनेक कलावंतांनी या विषयाचे शिक्षण औरंगाबादेत घेतलेले आहे. परंतु, व्यावसायिक रंगभूमीचे केंद्र अजूनही औरंगाबाद होऊ शकले नाही. व्यावसायिक गाजतील अशी 'प्रॉडक्शन्स' औरंगाबाद देऊ शकलेले नाही.

### सांस्कृतिक

सांस्कृतिक आघाडीवर औरंगाबादेत आता सतत काही ना काही ॲक्टीव्हिटीज चालू असतात. विद्यापीठ व अन्य ठिकाणचे नाट्यशास्त्र अभ्यासक्रम यांचे दरवर्षी नाट्यमहोत्सव, एकांकिका महोत्सव होतात. 'सकाळ' दैनिकातर्फे दरसाल एकांकिका स्पर्धा होतात. राज्य नाट्यस्पर्धेचे, कामगार कल्याण नाट्यस्पर्धेचे हे शहर गेली अनेक वर्षे एक महत्त्वाचे केंद्र आहे. या स्पर्धांमधून मात्र हल्ली कमी संघ भाग घेताहेत. पर्यटन विभागातर्फे दरवर्षी 'एलोरा फेस्टीव्हल' होतो, त्याला देशातील नामवंत नर्तक, गायक, वादक हजेरी लावतात. पूर्वी हा महोत्सव कैलास लेणे परिसर वेरुळ येथेच होई. पण, नंतर तो विद्यापीठ परिसरातील 'सोनेरी महाल' नामक ऐतिहासिक वास्तूच्या मैदानात होऊ लागला. त्यात स्थानिक कलावंतांनाही सहभाग मिळू लागला. पण, या महोत्सवाबाबत सातत्य आज संपलेले आहे. ही परंपरा खंडित होऊ नये असेच औरंगाबादकर रसिक आणि कलावंत म्हणतात. शहरातील आघाडीच्या चार-पाच वृत्तपत्रांनीही नियमित 'इव्हेंटस्' अर्थात



मकाई गेट



भडकल गेट



पैठण गेट

जंगी कार्यक्रम करणे सुरू केले आहे. त्यासाठी वाचकांना सभासद करून एक संघटित प्रेक्षकवर्ग उभा केला आहे. युवावर्गासाठी अनेक सांस्कृतिक कार्यक्रम ज्यामध्ये पथनाट्य स्पर्धा, काव्यवाचन, अभ्यासक्रमांबाबतचे प्रदर्शन इत्यादींचा समावेश असतो. औद्योगिक क्षेत्रातील नाथ उद्योग समूह गेली वीस वर्षे मराठवाड्यातील ज्येष्ठ कवी बी. रघुनाथ यांच्या स्मृत्यर्थ 'काव्यसंध्या' कार्यक्रमाचे आयोजन करीत असतो. उर्दू शायरांचे मुशायरे होतात. हिंदी हास्यकवी संमेलन असते. शहरामध्ये कलासागर, परिवर्तन व अन्य सामाजिक-सांस्कृतिक संस्था आहेत. त्यांच्या तर्फेही कार्यक्रम होत असतात. गेल्या काही वर्षांत औरंगाबादेत गाण्यांचे कार्यक्रम करणारे अनेक ग्रुप्स उभे राहिले आहेत. त्या सर्वांची 'म्युझिकल असोसिएशन ऑफ औरंगाबाद' नामक एक संस्थाही तयार झाली आहे, जिचे जवळपास तीनशे सभासद आहेत. औरंगाबादेत 'ऑडिओ स्टुडिओ'ही अनेक सुरू झालेत. त्यात इंद्रनील ओक, राजेश सरकटे, मनोज टिकारिया, अतुल दिवे, दंताळे इत्यादी मंडळी आघाडीवर आहेत. या सर्वांचे ऑर्केस्ट्रा म्हणजे वाद्यवृंदही आहेत. या 'स्टुडिओज्'मुळे ध्वनिमुद्रणाच्या सुविधा शहरात उभ्या झाल्या. तिथे अनेक कलावंत आपल्या गायनाचे, वादनाचे 'अल्बम' तयार करू लागलेत. त्यात ग्रामीण भागातील कलावंतांचा उत्साह कौतुकास्पद आहे. शेकडो नवीन 'ऑडिओ सीडीज्' आता औरंगाबादेहून निघू लागल्यात. भजने, निवडणूक प्रचार, लोकसंगीत, हास्यसंगीत अशा विविध प्रकारच्या संगीताच्या सीडीज त्यात असतात. जाहिरातींच्या 'जिंगल्स' वगैरेही इथेच तयार होतात. अगदी हृदयनाथ मंगेशकर, सुरेश वाडकर यांसारख्या दिग्गजांना घेऊन इथली मंडळी गाणी कंपोज करताहेत. शहरात आता दोन 'एफ एम रेडिओ' कार्यरत आहेत, रेडएफएम आणि रेडिओमिर्ची. अशा प्रकारे साहित्य, काव्य, नाट्य, संगीत, चित्र अशा अनेक कलाप्रकारांचे अनेक कार्यक्रम शहरामध्ये होत असल्याने औरंगाबाद शहरातील सर्व नाट्यगृहे, हॉल्स, कार्यालये नेहमीच 'बुक' असतात असे चित्र दिसू लागले आहे. मराठवाडा साहित्य परिषदेतही अनेक कार्यक्रम चालू असतात. सिडको भागात संत तुकाराम नाट्यगृह नामक एक भव्य नाट्यगृह नव्यानेच सुरू झाले आहे. काळाच्या ओघात सामाजिक चळवळी मागे पडल्यात, मंदावल्यात असे आढळते. प्रश्न सुटलेत असे नाही; पण, लोकांनाच आता प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी रस्त्यावर यावे, लढे उभारावेत, संघर्ष करावा असे जणू वाटेनासे झालेय.

शहरात अनेक मोठे 'मॉल्स' उभे राहिले. 'प्रोझोन' नामक मॉल त्याच्या सर्व टप्प्यांचे काम पूर्ण झाल्यावर आशिया खंडातील सर्वांत मोठा मॉल ठरेल असे सांगितले जाते. 'मल्टीप्लेक्सेस'ही शहरात उभी राहिली आहेत. अर्थात, रेस्टॉरंटस्, मॉल्स, मल्टीप्लेक्सेस आणि करमणुकीच्या सुविधा वाढत असल्या तरी त्या तूर्ततरी पुरेशा नाहीत, असेच अनेकांचे म्हणणे आहे. पूर्वी सगळ्या शहरासाठी मिळून एकच मध्यवर्ती बसस्थानक होते. आता दोन बसस्थानके झालीत. पुणे-मुंबई, पश्चिम महाराष्ट्रासाठीचे बसस्थानक मीलकॉर्नर भागात आहे तर प्रामुख्याने विदर्भ, मराठवाडा, खानदेशात जाणाऱ्या गाड्यांसाठी सिडको बसस्थानक झालेय. याखेरीज 'मनमंदिर' म्हणून एक खाजगी ट्रॅव्हल गाड्यांचेही सुसज्ज बसस्थानक आहे. खाजगी ट्रॅव्हल्सच्या औरंगाबादेहून आता थेट अहमदाबाद, इंदूर, हुबळी, गोवा अशा अनेक लांबवरच्या बड्या शहरांना आरामगाड्या धावतात. एस.टी. महामंडळानेही लांब पल्ल्याच्या बसेस सुरू केल्यात. 'शिवनेरी' ही वातानुकूलित बससेवा पुणे-मुंबईसाठी सुरू केलीय. पूर्वी पुण्या-मुंबईत मोजक्याच बसेस जात. आता दिवसभरातून पुण्यासाठी शे-दीडशे बसफेऱ्या होतात. बसस्थानकांवर कधीही जा 'पुणे गाडी' उभी असतेच. एक नव्हे, अनेकदा तर तीनतीन बसेस उभ्या असतात. वाहतुकीबाबत हे शहर पर्यटनस्थळ असल्यामुळे बऱ्यापैकी सुविधा इथे होत्याच. आता त्याचा पसारा अफाट वाढलाय. एकापेक्षा एक भारी गाड्या 'टॅक्सी' म्हणून मिळतात. बाकी जनसामान्यांसाठी वैध, अवैध अशा दोन्ही प्रकारच्या 'कालीपीली' गाड्या, जीपा धावत असतातच. या सर्वांचा अर्थात सडकांवर खूप ताण येतो. आरटीओ, ट्रॅफिक पोलीस यांच्यावर ताण येतो. क्रांतीचौक भागात एक मोठा उड्डाणपूल नुकताच सुरू झालाय. 'सेव्हनहील' भागात दुसरा उड्डाणपूल आहे. रेल्वे क्रॉसिंगसाठी स्टेशनजवळ उड्डाणपूल आहे. आणखीही काही उड्डाणपूल निर्माणाधीन, विचाराधीन आहेत. ते लवकर उभे राहिले पाहिजेत. कारण, ज्या वेगाने वाहनांच्या संख्येत भर पडतेय त्या मानाने सडका कमी पडतात. गेल्या वर्ष-दीड वर्षात महानगरपालिका आयुक्तांनी शहरात रस्ते रुंदीकरण मोहीम राबवली.

संतमहंतांचा वारसा लाभलेला असल्याने प्रार्थना करण्यात औरंगाबादकर कधीच मागे नसतात. वेळ पडल्यास लढेही उभारतात. 'ब्रॉडगेज' रेल्वे अशा प्रार्थना, विनंत्या आणि नंतर लढे उभारूनच मिळालेली आहे. आता देशातील महत्त्वाच्या शहरांशी ब्रॉडगेज रेल्वेने औरंगाबाद शहर थेट जोडले जाणे गरजेचे आहे. विमानतळावरूनही आंतरराष्ट्रीय उड्डाणे व नियमित सेवा सुरू होणे गरजेचे आहे.

**नवीन बांधकामे :** औरंगाबाद शहरात होत असलेल्या बदलांमध्ये आवर्जून नोंद केली पाहिजे ती शहरात होत असलेल्या व्यापारी संकुले, संस्था, कार्यालये, नाट्यगृहे अशा बांधकामांची. 'सिडको', 'हडको' वसाहतींमुळे शहराच्या मूळ सीमा केव्हाच ओलांडून औरंगाबाद शहर चहूबाजूंनी वाढते आहे. शहरात आता 'फ्लॅट संस्कृती' उदयाला आली आहे. 'छोटे फ्लॅट्स' जे मध्यमवर्गीयांना परवडणारे आहेत, तसेच आलिशान महालासारखे बंगले अशा सर्व प्रकारच्या बांधकामांनी शहर गजबजून गेले आहे. बांधकाम व्यवसायाशी संबंधित सर्व प्रकारचे पूरक व्यवसाय, सेवासुविधा या सर्वांमध्ये प्रचंड वाढ झालेली आहे.

### औद्योगिक बदल

राज्य सरकारने या प्रदेशात उद्योगधंदे काढणाऱ्यांसाठी 'पॅकेज स्कीम ऑफ इन्सेंटिव्हज' गेली काही दशके राबविली. त्या अंतर्गत अनेक आर्थिक व करविषयक सवलती, फायदे उद्योजकांना मिळू लागले. त्यामुळे बाहेरचे अनेक

**सुमारे चारशे कोटींची वार्षिक उलाढाल करणाऱ्या 'आर. जे. ग्रुप' यांची नोंद आवर्जून केली पाहिजे. उदगीर (जि. लातूर)सारख्या छोट्या ठिकाणी शिक्षक परिवारात जन्मलेले राघवेंद्र जोशी हे या पिढीचे एक उत्तम उदाहरण आहे. टायर रिमोल्डिंग, कुक्कुटपालन उद्योग, संकरित बी-बियाणे उद्योग, खत उद्योग या क्षेत्रात लक्षणीय काम करणाऱ्या राघवेंद्र जोशी यांच्या उद्योगधंदे, कारखान्यांचा व्याप औरंगाबादसह कर्नाटकातही पसरलेला आहे. तर श्रीकांत बडवे या तरुण अभियंत्याने बजाज ऑटोसाठी सुटे भाग तयार करण्याचा जेमतेम १५-२० वर्षांपूर्वी सुरू केलेला 'बडवे इंजिनीअरिंग' या उद्योग समूहाची वार्षिक उलाढाल सात-आठशे कोटी रूपयांच्या घरात गेलेली आहे. अनेक पुरस्कार त्यांना मिळालेले आहेत. पंतनगर (उत्तरांचल) येथेही त्यांचे कारखाने आहेत. श्री. उमेश दाशरथी यांचा 'ऋचा ग्रुप ऑफ इंडस्ट्रिज' हा उद्योग समूहही शेकडो कोटींची उलाढाल करणारा आहे. आरंभी दाशरथी इथल्या एका शिक्षणसंस्थेत प्राध्यापक होते. मग, त्यांनी स्कूटरचं सर्व्हिसिंग वर्कशॉप सुरू केलं. नंतर बजाजचे पार्टस् बनवायला सुरुवात केली. आज ते 'नॅनो' मोटारगाडीसाठीही पार्टस् बनवितात. 'आयकिया' नामक आंतरराष्ट्रीय कंपनीसही पार्टस् पुरवितात. श्री. मिलिंद केळकर 'ग्राईंड मास्टर' नामक उद्योगाद्वारे धातूस पॉलीश करणाऱ्या विशिष्ट प्रकारच्या मशिन्सची निर्मिती करतात. त्यांची मशिन्स अमेरिकेसह अनेक देशांना निर्यात केली जातात. 'त्रिमूर्ती फूडस्' या उद्योगाचे श्री. अतुल बनगिनवार यांची यशकथा खूप प्रेरक आहे. छंद, हौस म्हणून त्यांनी घरगुती स्तरावर चॉकलेटस् बनविली. ती हातोहात खपली. चॉकलेटस्च्या जोडीला त्यांनी मग अन्य अनेक प्रकारचे 'रेडी टू ईट' म्हणजे खाण्यास तयार असे 'स्नॅक्स' बनवायला आणि विकायला सुरुवात केली. आज ते आपले हे नाना प्रकारचे तयार खाद्यपदार्थ निर्यात करतात. परदेशातून दोनशे आऊटलेटस्द्वारे त्यांची उत्पादने विकली जातात. त्यांचीही उलाढाल शंभर कोटींच्या वर आहे. गंमत म्हणजे अतुल बनगिनवार यांनी फूड टेक्नॉलॉजी वा तत्सम शिक्षण घेतलेले नाही. श्री. शंतनू मनोहर देशपांडे या तरुणाचा विशिष्ट प्रकारच्या पॉलिफिल्मस् तयार करायचा उद्योग आहे. ही फिल्म विमानातून जे खाद्यपदार्थ दिले जातात त्यांना गुंडाळण्यासाठी वापरली जाते. आज अनेक अग्रगण्य एअर लाइन्सच्या केटरिंगचे पॅकिंग शंतनूच्या फिल्मद्वारे केले जाते. ही फिल्म तो निर्यातही करतो. सुनील पाठक, प्रसाद कोकीळ, शिरडकर हे तीन मित्र. त्यांनी सुरुवातीला नोकरी केली. अनुभव घेतला. पैसे जमविले. त्यातून त्यांच्या संजय प्लॅस्टिक्स् या उद्योगाने आकार घेतला. अनेक प्लॅस्टिक्स् पार्टस् ते विविध अग्रगण्य कंपन्यांना पुरवितात.**

उद्योजक इथे आले. आरंभीच्या काळात इथे जे मोठे उद्योग आले, त्यामध्ये गरवारे, क्रॉम्प्टन ग्रीव्हज, एपीआय, लुपीन अशांचा उल्लेख केला पाहिजे. त्याच सुमारास सर्वश्री जालान, नानासाहेब भोगले, बारवाले, कागलीवाल अशी स्थानिक मंडळी सक्रिय झाली होती. पण, तरीही स्थानिकांचा सहभाग औद्योगिकीकरणाच्या एकूण प्रक्रियेत कमीच होता.

नंतर १९८६ मध्ये बजाज ऑटोने औरंगाबादेत महत्त्वाकांक्षी स्कूटर प्रकल्प सुरू केला. बजाज ऑटोमुळे येथील औद्योगिकीकरणाला आणि अन्य पूरक क्षेत्रांना वेग आला. त्याचवेळी मराठी तरुणांनी उद्योजकतेकडे वळावे, यासाठी त्यांना शास्त्रशुद्ध प्रशिक्षण देणारी, 'तयार' करणारी एम.सी.ई.डी. अर्थात महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र यासारखी संस्था सुरू झाली. तिला उद्योजकतेबाबत कमालीची आस्था आणि दृष्टी असणारा (कै.) सु. ल. सोमण यांच्यासारखा कार्यकारी संचालक मिळाला. त्यांनी उद्योजकतेबाबतची जागरूकता आणि आवश्यक ते मार्गदर्शन देणे सुरू केले. तरुणांना प्रेरित करणे सुरू केले. त्यासाठी 'उद्योजकीय साहित्य संमेलन' यासारखे उपक्रम राबविले. 'उद्योजक' नावाचे एक मासिक सुरू केले. स्थानिक विद्यापीठाने या विषयाचे महत्त्व आणि आवश्यकता लक्षात घेऊन 'उद्योजकता' हा विषय पदवी अभ्यासक्रमात समाविष्ट केला.

**मानसिकता बदलली**

जागतिकीकरणाची कास धरल्यानंतर म्हणजे १९९० नंतर गेल्या वीस वर्षांत तर औरंगाबादेतील उद्योग आणि उद्योजक यांनी प्रशंसनीय झेप घेतल्याचे चित्र दिसते आहे. जी घराणी उद्योगक्षेत्रात कार्यरत होती, त्यांनी आपल्या उद्योगधंद्यांचा विस्तार केला. उदाहरणार्थ 'निर्लेप' उद्योग समूह देशभरात 'नॉनस्टिक' भांडी बनविण्याची मुहूर्तमेढ रोवणारा उद्योग म्हणून ओळखला जात होता, त्यांनी इंडस्ट्रियल कोटिंग, ऑटो पार्टस्, इत्यादीत पदार्पण केले. नॅनो, होंडा, बॉश अशा कंपन्यांना ते माल पुरवितात. त्यांच्या स्वतःच्या उद्योगासाठी लागणाऱ्या सर्व कच्च्या मालाचीही निर्मिती (ॲल्युमिनियम, बॅकेलाईट, पेंट इत्यादी) त्यांनी सुरू केली. याला बॅकवर्ड इंटिग्रेशन म्हटले जाते.

औरंगाबादेतील राजकीय, सामाजिक जीवनातील प्रतिष्ठित 'मुळे' कुटुंबीय यांचा संकरित बी-बियाणे उद्योग दीडशे कोटींचा झालाय; तर सचिन मुळे यांनी बोगदे, धरणे, सडका, पूल अशा स्पेशलाईज्ड आणि पायाभूत महत्त्व असलेल्या इन्फ्रास्ट्रक्चर उद्योगात, बांधकाम उद्योगात आघाडी घेऊन पाचशे कोटींचा पल्ला ओलांडला आहे. राधावल्लभ धूत यांनी परिवारातील नवीन पिढीचे प्रतिनिधी श्री. मनीष धूत, राहुल धूत यांनी ऑटोकॉम्पोनंटमध्ये अनेक कारखाने औरंगाबाद व इतरत्र उभारले आहेत. मूळचे चित्रपट वितरण-प्रदर्शन तसेच बांधकाम व्यावसायिक असणाऱ्या (माजी खासदार) श्री. मोरेश्वर सावे यांचे चिरंजीव कमांडर अनिल सावे यांनी त्यांच्या भारतीय नौसेनेतील नोकरीनंतर आता औषधनिर्मिती क्षेत्रात यशस्वी आघाडी घेतली आहे.

**माहिती तंत्रज्ञान**

इथल्या चिकलठाणा औद्योगिक वसाहतीत एसटीपीआय अर्थात सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्क ऑफ इंडिया म्हणून स्वतंत्र भाग आहे. इमारत आहे तिथे बसून आपली बुद्धिमत्ता आणि तांत्रिक कुशलता यांच्या बळावर जगभरच्या अनेक नामवंत कंपन्यांसाठी, कंपन्यांसोबत काम करणारे पाच पंचवीस युनिटस् आहेत. बीपीओच्या धर्तीवर केपीओ म्हणजे नॉलेज प्रोसेस आऊटसोर्सिंगचा एक फार चांगला आणि प्रेरक वस्तुपाठ या एक्सपर्ट सोल्युशन्सने घालून दिला आहे. मुकुंद भोगले यांनी निर्लेपचे सगळे व्यवहार ऑनलाइन करून टाकलेत. परदेशस्थ भारतीयांना घरपोच निर्लेपची भांडी ऑनलाइन व्यवहाराद्वारे पोहोचविली जातात.


**महिला उद्योजक**



क्रांती चौकातील नवीन उड्डानपूल.

मोहिनी केळकर या उच्चविभूषित विदुषीने जर्मनीच्या एका कंपनीच्या सहकार्याने 'लिपर्ट युनिपॉल' नामक कारखाना सुरू केलाय. त्यात ते धातूंचा पृष्ठभाग घासणारे, त्यांना चमकविणारे विशिष्ट प्रकारचे स्क्रबर्स बनवितात. अनेक देशांना निर्यात करतात. वैद्यकीय शिक्षण घेतलेल्या रोहिणी काचोळे यांनी अनेक उपयुक्त गुणकारी वनस्पतीजन्य सौंदर्य प्रसाधने, तेले, लेप यांचे उत्पादन सुरू केलेले आहे. ही उत्पादने निर्यातही केली जातात. शरयु हर्बल प्रॉडक्टस् हे त्यांच्या उद्योगाचे नाव. अंजली देशपांडे या रेणू प्रिंट या आपल्या कारखान्याद्वारे विविध प्रकारची लेबल्स आणि स्टीकर्स अनेक नामवंत कंपन्यांना तयार करून देतात. परशुराम प्रिंटस्च्या सौ. आनंदी बर्वे कॅलेंडर्स, लिफलेटस्ची ऑफसेट प्रेसवर छपाई करून देतात. सौ. यशश्री कंक, या ऑटोरिक्षाचे चॅसिस व अन्य धातूचे भाग तयार करतात. सौ. श्यामल भोगले पावडर कोटिंग व्यवसाय सांभाळतात. सौ. जोशी यांच्या आदिश्री गृहउद्योगाचे तयार मसाले, पीठे, खाद्यपदार्थ, चटण्या इत्यादी व्यापक प्रमाणावर लोकप्रिय आहे. सौ. मकरंद देशपांडे यांनी पॅकेजिंग उद्योगात आपल्या कामगिरीने पुरस्कार मिळविलेले आहेत तर सौ. निर्मला कांदळगावकर यांचा व्यवसाय आगळावेगळाच म्हटला पाहिजे. गांडूळखत तयार करण्याचे संयंत्र याने त्यांनी आपल्या उद्योगाची सुरुवात केली. आता घनकचऱ्याचे व्यवस्थापन, घनकचऱ्यापासून ऊर्जानिर्मिती या क्षेत्रात त्या अनेक नगर परिषदा, महापालिका यांना मार्गदर्शन करीत असतात. किशोरी भालेराव भेटवस्तू आणि हॅण्डीक्राफ्ट या क्षेत्रात कार्यरत आहेत. पारंपरिक कलावस्तू, वारली पेंटिंग्ज् ही त्यांची खासियत. याखेरीज डीटीपी युनिट, परदेशी भाषेचे प्रशिक्षण, केटरिंग, बाटिकप्रिंटिंग, आयुर्वेदिक औषधी, पाळणाघरे व अन्य प्रकारचे उद्योग आणि सेवा देण्यात अनेक महिला उद्योजक आघाडीवर आहेत. ज्योती दाशरथी शिक्षणाने संस्कृत भाषेच्या पीएच.डी. आहेत. त्या ब्रोकीली व अन्य परदेशी भाज्या पिकवतात.


बिबीका मकबरा


पानचक्की

**ॲडव्हान्टेज औरंगाबाद**

इथे उद्योगधंदे, व्यवसाय सुरू करण्यात नाना प्रकारचे फायदे आहेत. पुण्या-मुंबईची गर्दी तेथील जमिनीचे, घरांचे आकाशाला भिडलेले भाव, प्रदूषण, गुंतागुंत इत्यादी नाना अडचणींविषयी वेगळे लिहायची गरज नाही. त्या कोणत्याही अडचणी इथे नाहीत. जमीन, घरे, फ्लॅटस् मिळतात. भरपूर बांधकामे, फ्लॅटस्, रो-हाउसेस, टाऊनशिप्स बांधलेली आहेत, बांधताहेत. इथल्या गृहबांधकाम क्षेत्राचे वैशिष्ट्य म्हणजे या क्षेत्रात कुणीही बाहेरचा बिल्डर नाही. जे आहेत ते सर्व स्थानिक आहेत. जायकवाडी प्रकल्पामुळे पाणी भरपूर आहे. शाळा, कॉलेजेस, विद्यापीठ विविध अभ्यासक्रम, दर्जेदार शिक्षण संस्था हे सगळे आहे. सामाजिक ताणतणाव नाही. शहर व नागरिक सुस्वभावी आणि शांतिप्रिय आहेत. सहकार्य करणारे आहेत. रेल्वे, सडका यांनी औरंगाबाद सर्व महत्त्वाच्या केंद्राशी जोडलेले आहेत. विमानतळ आंतरराष्ट्रीय स्तराच्या गरजा पूर्ण करणारा आहे. करमणुकीसाठी मल्टीप्लेक्स थिएटर्स, मॉल्स, क्लब्ज, पिकनिकसाठी निसर्गरम्य स्थळे, हॉटेले इत्यादी आवश्यक त्या सर्व सुविधा आहेत. आरोग्य सेवेसाठी अत्याधुनिक सुसज्ज इस्पितळे आहेत.


स्कोडा उद्योग



आधुनिक मॉल

येत्या वर्षात शेंद्रा येथील औद्योगिक वसाहतीत अनेक नामवंत कंपन्या येताहेत. 'बजाज'चा चारचाकी प्रकल्पही सुरू होणार आहे. नंदकिशोर कागलीवाल यांच्या पुढाकाराने 'फूडपार्क' आणि व्यवस्थापनशास्त्र शिक्षण देणारी उत्कृष्ट संस्था सुरू होणार आहे. स्कोडा, सिमेन्स, स्टरलाईट, ॲन्ड्रेहौजर व अन्य अनेक कारखान्यांचे एक्स्पांशन होणार आहे. इंटरनॅशनल कन्व्हेंशन सेंटर उभे राहत आहे. जपान सरकारच्या मदतीने या शहराला 'स्मार्ट सिटी' केले जाणार आहे. हे सर्व लक्षात घेता पुण्या-मुंबईचा नाद परदेशस्थ भारतीयांनी सोडून औरंगाबादला त्यांनी जवळ केले पाहिजे.

भविष्यात औरंगाबाद हे औद्योगिक-आर्थिक संदर्भात देशातील एक महत्त्वाचे केंद्र बनेल यात वाद नाही. मोहंमद-तुघलकाच्या काळात काही वर्षे संपूर्ण भारतवर्षाची राजधानी दौलताबाद-औरंगाबाद होती. येत्या काळात राजकीय नसली तरी औद्योगिक-आर्थिक-सांस्कृतिक-साहित्यिक-सामाजिक संदर्भात औरंगाबाद नव्या तेजाने देशात झळाळेल.

**सुधीर सेवेकर**
**संपर्क : ९७६६५६८२९०**

# भ्रमती

# भूमी पराक्रमाची

मुघलांचं दक्षिणेतील आक्रमण रोखण्याचं पहिल्यांदा धाडस दाखवणारी शूर सुलताना चांदबिवी जिथे प्राणपणाने लढली, पंडित जवाहरलाल नेहरूंनी जिथे 'भारताचा शोध' 'द डिस्कव्हरी ऑफ इंडिया' ग्रंथ लिहिला, कोल्हापूरच्या चौथ्या छत्रपती शिवाजी महाराजांना जिथे हौतात्म प्राप्त झाले तो नगरचा ऐतिहासिक भुईकोट किल्ला, ताजमहल बांधण्याची कल्पना शहाजहानला ज्या वास्तूवरून सुचली तो फराहबखक्ष ताजमहाल, शहाजीराजांच्या पराक्रमाचा साक्षीदार असलेला भातोडीचा तलाव, मराठ्यांना नेस्तनाबूत करण्यात अपयशी ठरल्यानंतर परत निघालेल्या औरंगजेब बादशहाने जिथे शेवटचा श्वास घेतला ते 'आलमगीर', भारतातील एकमेव असं रणगाडा संग्रहालय, राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजींचं स्मारक 'आनंदधाम', अवतार मेहेरबाबांची समाधी असलेले 'मेहेराबाद', देशातील सर्वांत मोठं दत्तमंदिर असलेलं 'वेदान्त देवस्तान' या गोष्टी पाहायच्या असतील तर तुम्हाला अहमदनगरला भेट द्यावीच लागेल.

**अहमदनगर किल्ला**

अहमदनगरचा किल्ला हा भारतातील सर्वांत महत्त्वाच्या अभेद्य भुईकोट किल्ल्यांमध्ये गणला जातो. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यासह बारा राष्ट्रीय नेत्यांच्या वास्तव्याने पुनित झालेल्या या किल्ल्यात 'द डिस्कव्हरी ऑफ इंडिया' हा जगप्रसिद्ध ग्रंथ पंडितजींनी शब्दबद्ध केला.

मौलाना आझाद यांनी लिहिलेल्या पत्रांचा 'गबारे खातीर' हा संग्रह प्रसिद्ध आहे. आचार्य नरेंद्र देव यांनी 'बौद्ध धर्मदर्शन' नावाचा ग्रंथ अनुवादित केला. हरेकृष्ण मेहताब यांनी 'हिस्ट्री ऑफ ओरिसा' हा ग्रंथ लिहिला. घोष यांनी 'एरान्ट सिव्हिलायझेशन ऑफ इंडिया' हा ग्रंथ शब्दबद्ध केला.

अहमदनगरचा किल्ला आधी 'कोट बाग निजाम' या नावाने ओळखला जात असे. लंबवर्तुळाकार असलेली ही तटबंदी सुमारे दोन किलोमीटर लांबीची असून त्यात २२ अर्धवर्तुळाकार बुरूज (त्यातील एक तिहेरी) आहेत. कोटाभोवती ३० ते ४० मीटर रुंदीचा भलामोठा खंदक आहे.

नगरचा किल्ला हा सुलताना चांदबिबीच्या अतुलनीय धैर्याचा, स्वाभिमानाचा आणि पराक्रमाचा साक्षीदार आहे. छत्रपती संभाजी महाराजांच्या पत्नी येसूबाई, मुलगा शाहू, आरमारप्रमुख तुळाजी आंग्रे, सदाशिवराव भाऊ पेशव्यांचा तोतया, मोरोबादादा फडणवीस, नाना फडणवीस, सरदार सखाराम हरी गुप्ते, सरदार चिंतो रायरीकर असे अनेक जण या किल्ल्यात बंदिवासात होते. कोल्हापूरचे चौथे छत्रपती शिवाजी यांना ब्रिटिशांनी याच किल्ल्यात ठेवले होते. इथेच त्यांना हौतात्म्य (२५ डिसेंबर १८८३) प्राप्त झाले.

नगरचा किल्ला सध्या भारतीय लष्कराच्या ताब्यात आहे. सन २००७ मध्ये तत्कालीन जिल्हाधिकारी उमाकांत दांगट यांच्या पुढाकाराने लष्कराच्या एसीसी ॲण्ड एस आस्थापनेशी सामंजस्य करार करून किल्ला पर्यटन विकासाला सुरुवात झाली.

**फराहबाख्श महाल**

निजामशाहीत सन १५८३ मध्ये बांधण्यात आलेला हा दुमजली अष्टकोनी गुलाबी रंगाचा जलमहल एकेकाळी शाही पाहुण्यांच्या मनोरंजनाचं केंद्र होता. तलावाच्या मध्यभागी

**किल्ल्याच्या प्रवेशद्वाराजवळ असलेला तिरंगा हा भारतातील सर्वांत मोठ्या आकाराच्या ध्वजांपैकी एक आहे. किल्ल्यात प्रवेश करताना दोन्ही बाजूंना ठेवलेल्या तोफा हॉवित्झर कंपनीच्या असून ब्रिटिशांनी त्या येथे आणल्या आहेत. किल्ल्याच्या पूर्वेकडे असलेला झुलता पूल सन १८३२ मध्ये कर्नल जेकब याने तयार केला. हा किल्ला ब्रिटिशांनी सन १८०३ मध्ये घेतला. त्यावेळी सैन्याचे नेतृत्व करणारे जनरल आर्थर वेलस्ली पुढे ड्युक ऑफ वेलिंग्टन झाले. इंग्लंडचे पंतप्रधानपदही त्यांनी भूषवले. जनरल वेलस्लीने किल्ल्यात प्रवेश करण्यापूर्वी खंदकाशेजारी असलेल्या चिंचेच्या झाडाखाली ब्रेकफास्ट केला होता. त्याची आठवण म्हणून तेथे तोफ ठेवण्यात आली आहे. तिथे सध्या एकूण ३ तोफा असून मधली बांगडी तोफ रुमा खान दख्खनी याने नगरमध्ये गाळलेली तोफ आहे. याच रुमा खानने जगातील सर्वांत मोठी मलिक-ए-मैदान (मुलूखमैदान) तोफ नगरमध्ये बनवली होती. सध्या ही तोफ विजापूरच्या किल्ल्यावर आहे. ब्रिटिशांनी या किल्ल्याला आपले दक्षिणचे मुख्यालय बनवले होते. त्यांचे घोडदळ, पायदळ येथे होते. या किल्ल्यात काडतुसांचा कारखाना होता. रायफल चालवण्याचे प्रशिक्षण इथे दिले जात असे.**



भुईकोट किल्ला



इथे लिहिला गेला 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया'



दमडी मशिद

असलेल्या या महालात होडीतून जावं लागत असे. विशाल कमानी, कारंजी, प्रकाश व वायुविजनाच्या उत्तम व्यवस्थेबरोबर वास्तू थंड राखण्यासाठी दुहेरी छताची व्यवस्था हे या महालाचं वैशिष्ट्य.

**रणगाडा संग्रहालय**

जगभरात गेल्या शंभर वर्षांत झालेल्या महत्त्वाच्या युद्धांमध्ये अग्निगोलांचा वर्षाव करीत थरकाप उडवणारे काही रणगाडे आता अहमदनगरच्या कॅव्हेलरी टँक म्युझियमच्या हिरवळीवर विसावले आहेत. भारताच्या 'विजयंता'बरोबरच बांगला युद्धात पाकिस्तानकडून जिंकून घेतलेले पॅटन, पॅनला नामोहरम करणारे बहादूर सेंच्युरियन, जालियनवाला बाग हत्याकांडातील जनरल डायरने वापरलेल्या वाहनाची आठवण करून देणारे 'सिल्व्हर घोस्ट', हिटलरच्या नाझी सैन्याचा आवडता पॅंझर सैनिकांनी काडेपेटीची उपमा दिलेला 'व्हॅलेंटाईन', जपानचा 'चिन्हा आणि हो-गो', अमेरिकेचा 'स्टुअर्स' असे सुमारे ५० प्रकारचे रणगाडे व चिलखती वाहने या संग्रहालयात आहेत.

**चांदबिबीचा महाल (सलाबतखान मकबरा)**

१५८० मध्ये बांधण्यात आलेली ही सत्तर फूट उंचीची चिरेबंदी दगडांची वास्तू चार शतकांनंतरही काळाच्या कराल दाढांतून बचावत खंबीरपणे उभी आहे. निजामशाहीतील कर्तबगार वजीर सलाबतखान व त्याच्या बेगमेची कबर तळघरात आहे. या वस्तूच्या छतावर जाण्यासाठी भिंतीतून जिना आहे. तिथून सुमारे तीस किलोमीटरचा परिसर न्याहाळता येतो. पावसाळ्यात एकावेळी २० तलाव तिथून दिसतात. तेथून पुढे सहा किलोमीटर अंतरावर सन १६२४ मध्ये मुघल व विजापूरच्या आदिलशाही फौजेविरुद्ध गनिमी कावा वापरत शहाजी आणि मलिक अंबरने जिंकलेल्या लढाईची आठवण करून देणारा भातोडीचा तलाव आहे. तेथील नृसिंह मंदिर व कलावंतीण महाल पाहण्यासारखा आहे.

**आनंदधाम**

राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषी यांचे स्मारक असलेले आनंदधाम जैन धर्माचे मोठे शिक्षण केंद्र आहे.

**मेहेराबाद**

अवतार मेहेरबाबा (१८९५-१९६९) यांची समाधी असलेले मेहेराबाद नगर शहरापासून सहा किलोमीटर अंतरावर दौंड रस्त्यावर आहे. मेहेरबाबांचा जन्मोत्सव २५ फेब्रुवारीला तर अमरतिथी उत्सव ३१ जानेवारीला साजरा केला जातो. भाविकांची राहण्याची - जेवणाची व्यवस्था इथे होऊ शकते.

**वेदान्त देवस्थान**

श्रीरामकृष्ण क्षीरसागर महाराजांनी स्थापन केलेल्या वेदान्त देवस्थानातील दत्तात्रेय मंदिर हे भारतातील सर्वांत मोठे दत्तमंदिर बनले आहे. येथील पाठशालेत चारही वेद शिकविले जातात.

**विशाल गणपती**

नगरच्या माळीवाडा वेशीजवळ शहराचे ग्रामदैवत असलेल्या विशाल गणपतीचे देखणे मंदिर आहे. हे मंदिर बसस्थानकापासून अवघ्या पाच मिनिटांच्या अंतरावर आहे.

**ऐतिहासिक वस्तू संग्रहालय**

विविध प्रकारच्या मूर्ती, चित्रे, शस्त्रे तसेच अनेक वैशिष्ट्यपूर्ण वस्तू असलेले ऐतिहासिक वस्तुसंग्रहालय जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ आहे. दायमाबाद तसेच नेवासे येथील उत्खननात सापडलेल्या वस्तू, भोसले घराण्याचा वंशवृक्ष, छत्रपती संभाजीराजांचे अस्सल चित्र, अंगठीतील मोहरीएवढ्या खड्यावर रेखाटलेले रामपंचायतन, २०० फूट लांबीची जन्मपत्रिका, तो मी नव्हेच नाटकाचा फिरता रंगमंच, चेनविरहित सायकल अशा अनेक गोष्टी इथे आहेत.

**महावीर कलादालन**

नगरच्या स्टेशन रस्त्यावर असलेल्या महावीर कलादालनात भारतातील ५०० महान व्यक्तींचे दर्शन तुम्ही इथे एकाच वेळी घेऊ शकता.

**दमडी मशीद**

नगर-बुऱ्हाणनगर रस्त्यावर असलेली दमडी मशीद निजामशाहीत सन १५६७ मध्ये मजुरांनी दिलेल्या पैशांतून बांधण्यात आली. फक्त दगडांचा वापर करून बांधलेल्या या वास्तूवर कोरलेली कमळाची फुले, कुराणातील आयाते तसेच नक्षीकाम अविस्मरणीय आहे. दमडी मशिदीपासून थोडे पुढे शहाशरीफ दर्गा आणि बुऱ्हाणनगरच्या देवीचे मंदिर आहे.

**जिल्ह्यातील महत्त्वाची पर्यटन स्थळे**

धार्मिक, ऐतिहासिक आणि निसर्गरम्य स्थळांबरोबरच सामाजिक कार्याचा मानदंड ठरलेली अनेक महत्त्वाची स्थळे अहमदनगर जिल्ह्यात आहेत.

**शिर्डी :** साईबाबांच्या वास्तव्याने पुनित झालेल्या शिर्डीला आज आंतरराष्ट्रीय तीर्थस्थळाचं स्वरूप प्राप्त झालं आहे. समाधी मंदिर, गुरुस्थान द्वारकामाई, लेंडीबाग, चावडी, साईबाबांनी पेटवलेली धुनी, ते बसत असलेली शिळा, खंडोबा मंदिर या स्थानांबरोबर साईबाबा संस्थानने उभारलेले साईबाबांच्या वस्तूंचे संग्रहालय बघावे असे आहे.

**शनिशिंगणापूर :** उघड्या चौथऱ्यावर असलेले शिळारूपी शनैश्वर लाखो भाविकांचे श्रद्धास्थान आहे. शिर्डीहून हे स्थळ तासाभराच्या अंतरावर आहे. येथून जवळच बेल्हेकरवाडी येथे रेणुका मंदिर आहे.

**श्रीक्षेत्र नेवासे :** अमृतवाहिनी प्रवरेकाठी वसलेल्या नेवासे गावात संत ज्ञानेश्वरांनी सन १२९० मध्ये ज्ञानेश्वरी सांगितली. ज्या खांबाला टेकून ज्ञानेश्वर बसत, तो पैस खांब ज्ञानेश्वर मंदिरात आहे. या मंदिरामागे लाडमोड टेकडीवर ताम्रपाषाण काळातील संस्कृतीचे अवशेष सापडले आहेत. नेवाशात अर्धनारीनटेश्वराचे मोहिनीराज मंदिर आहे. याच तालुक्यात प्रवरा आणि गोदावरी नदीचा संगम झालेले प्रवरासंगम आणि किसनगिरी महाराजांची समाधी असलेले श्रीक्षेत्र देवगड आहे. तेथील दत्तात्रयाचे मंदिर प्रसिद्ध आहे.

**सिद्धटेक :** उजव्या सोंडेच्या सिद्धिविनायकाचे उत्तराभिमुख मंदिर कर्जत तालुक्यातील सिद्धटेक येथे आहे. भाविकांना इथं नौकानयनाचा आनंदही घेता येतो. हलत्या दीपमाळेसाठी प्रसिद्ध असलेलं राशीनचं जगदंबा मंदिर आणि छत्रपती संभाजी महाराजांच्या जाज्वल्य स्वाभिमानाचा साक्षीदार असलेला पेडगावचा बहादूरगड येथून जवळच आहे.

## कसे जाल?

**अहमदनगरला येण्यासाठी रेल्वे, एसटी व खासगी बस सेवेची चांगली व्यवस्था आहे. दौंड-मनमाड मार्गावरील रेल्वेगाड्या अहमदनगरला थांबतात. भेट देण्यासाठी ऑगस्ट ते फेब्रुवारी हा काळ उत्तम. अहमदनगर-पुणे अंतर १२० तर अहमदनगर-औरंगाबाद अंतर ११० किलोमीटर आहे. पुण्याहून शिर्डी, शनिशिंगणापूरला जाताना तुम्ही अहमदनगरला थांबू शकता.**

**शासकीय विश्रामगृह दूरध्वनी क्रमांक - ०२४१ - २४२१६१४, २४२८४६३**

**चौंडी :** पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे जन्मस्थळ असलेले चौंडी गाव जामखेड तालुक्यात आहे. सीना नदीकाठी असलेल्या या गावात अहिल्याबाईंच्या वडिलांची गढी, तसेच अहिल्येश्वर व चौंढेश्वर मंदिर आहे. अलीकडेच तिथं अहिल्याबाईंचे जीवनदर्शन घडवणारी शिल्पसृष्टी उभारण्यात आली आहे. पद्मभूषण डॉ. रजनीकांत व डॉ. मेबल आरोळे यांनी उभारलेला ग्रामीण आरोग्य प्रकल्प व खर्ड्याचा भुईकोट किल्ला जामखेड तालुक्यातच आहे.

**मढी :** भटक्यांची पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मढी (ता. पाथर्डी) येथे कानिफनाथांची समाधी आहे. होळी ते गुढीपाडवा या दरम्यान तेथे भरणाऱ्या यात्रेतील गाढवांचा बाजार प्रसिद्ध आहे. नाथपंथाचे आदिपीठ वृद्धेश्वर, मच्छिंद्रनाथांची समाधी असलेले मायंबा (सावरगांव), मोहटादेवी, भगवानगड ही स्थळे येथून जवळ आहेत.

**राळेगणसिद्धी :** ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी राबवलेले पाणलोट विकास व ग्रामविकासाचे विविध प्रयोग इथे पाहायला मिळतात. पारनेर येथील सेनापती बापट यांचे जन्मस्थळ, पारनेरकर महाराजांचे पूर्णवाद भवन, भालचंद्र गणेश व सिद्धेश्वर मंदिर, निघोज येथील कुकडी नदीपात्रातील रांजणखळगे, टाकळी ढेकेश्वर येथील लेणी असलेली गुहा, वडगावदर्याचे लवणस्तंभ, कोरठण खंडोबा, पळशीचे विठ्ठलमंदिर ही प्रेक्षणीय स्थळे पारनेर तालुक्यात आहेत. सुप्याजवळचा पवनऊर्जा प्रकल्प तुम्ही पाहू शकता.

**कोपरगाव :** पेशवे राघोबादादांचा वाडा व समाधी, संत जनार्दन मौनीगिरी महाराजांची समाधी, संवत्सर येथील नारदीच्या समाधी, बेट भागातील कचेश्वर व शुकलेश्वरमंदिर, कोकमठाणचे विष्णुमंदिर, धामोरीचा विशाल गोरख चिंचेचा वृक्ष, पोहेगावचे मयूरेश्वर, विश्वात्मक जंगली महाराज आश्रम अशी अनेक स्थळे कोपरगाव तालुक्यात आहेत.

**राहुरी :** राहुरीजवळ असलेले महात्मा फुले कृषी विद्यापीठ हे देशातील अग्रगण्य कृषी संशोधन केंद्र आहे. तेथून जवळच मुळा धरण (ज्ञानेश्वर सागर) व महिपती महाराजांचे ताहाराबाद आहे.

**श्रीरामपूर :** श्रीरामपूर तालुक्यातील हरेगावची मतमाउली, बेलापूरचे केशव गोविंद, डोमगाम येथील शीख व चक्रधर मंदिर, खंडाळ्याचे गणपती मंदिर प्रसिद्ध आहे. दायमाबाद येथील उत्खननात गोदाप्रवरा संस्कृतीतील शहर सापडले होते.

**शेवगाव :** घोटण येथील मल्लिकार्जुन मंदिर, आव्हाणे येथील निद्रिस्त गणपती, कांबीची महालक्ष्मी, राक्षसाची पूजा केले जाणारे दैत्य नांदूर, मलिक अंबरचा मृत्यू झालेले अमरापूर, जायकवाडी बॅकवॉटर पक्षी अभयारण्य शेवगाव तालुक्यात आहे.

**कर्जत :** काळविटांसाठी प्रसिद्ध असलेले रेहेकुरी अभयारण्य कर्जतपासून १० किलोमीटर अंतरावर आहे. कर्जतचे गोदड महाराज मंदिर, दूरगावचे दुर्योद्धन मंदिर वैशिष्ट्यपूर्ण आहे.

**श्रीगोंदे :** शिंदेकालीन वाडे व मंदिरांसाठी प्रसिद्ध असलेल्या श्रीगोंद्यात संत शेख महंमद महाराजांची समाधी आहे. कोळगावचा सय्यदबाबांचा दर्गा, मांडवगणचे सिद्धेश्वर मंदिर, देवदैठण येथील निंबराज समाधी मंदिर, विसापूरचा तलाव व कारागृह ही ठिकाणे प्रसिद्ध आहेत. देशातील सर्वांत मोठा जलसेतू हंगे येथे आहे.

**संगमनेर :** शहाजी राजांनी केलेल्या राज्याभिषेकासाठी प्रसिद्ध असलेला पेमगिरीचा किल्ला, त्यांच्या पायथ्याशी असलेला विशाल वटवृक्ष, समनापूरचा गणपती, निझर्णेश्वर, मुक्तांगण प्रकल्प आवर्जून पाहावा असा आहे.

**अकोले :** महाराष्ट्रातील सर्वोच्च शिखर असलेले कळसुबाई, प्रवरा नदीवर बांधलेले भंडारदा धरण त्यावरून पडणारा धबधबा, हरिश्चंद्रगड, रतनगड, मलंग, कुलंग, मदन, अजोबा, पट्ट हे डोंगरी किल्ले, कोकणकडा, घाटघर, सांदण येथील घळ, रतनवाडीचे अमृतेश्वर मंदिर, टाकाहरीचे जगदंबा मंदिर, अकोल्यापून अगस्त्यऋषींचा आश्रम व सिद्धेश्वर मंदिर प्रसिद्ध आहे. आदिवासी संस्कृतीचे दर्शन अकोले तालुक्यात घडते. विविध प्रकारचे वन्य पशूपक्षी असलेल्या कळसूबाई हरिश्चंद्र अभयारण्याचा बिबट्या राजा आहे. राजूरचा पेढा खवय्यांना नक्की आवडेल. कोहणे, पुरुषवाडी, कोथळे येथील निसर्गवैभव अवश्य पाहावे.

**भूषण देशमुख**
संपर्क : ९८८१३३७७७५



चांदबिबी महाल



पैस खांब, नेवासा



वेदान्त देवस्थान मंदिर

## वाचू आनंदे

# आपलं राज्य : आपली माणसं

महाराष्ट्र राज्य निर्मितीच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त शासनाच्या गॅझेटिअर विभागाने 'महाराष्ट्र : लॅण्ड ॲण्ड इटस् पिपल' या गॅझेटिअरच्या सुधारित इंग्रजी आवृत्तीचे प्रकाशन केले आहे.


लोकजीवनाच्या विविध पैलूंचे ऐतिहासिक दृष्टिकोनातून दर्शन घडविण्याच्या जाणिवेतून १९६८ मध्ये विभागाने डॉ. इरावती कर्वे लिखित 'महाराष्ट्र : लॅण्ड ॲण्ड इटस् पिपल' या ग्रंथाच्या प्रथम आवृत्तीचे प्रकाशन केले. नंतरच्या काळात झालेल्या संशोधनानुसार वंशवादी सिद्धान्ताची नव्याने झालेली मांडणी तसेच जनगणना अहवालातून स्पष्ट होणारी वस्तुस्थिती विचारात घेता काळाच्या ओघात झालेले परिवर्तन नोंदविण्यासाठी डॉ. अरुणचंद पाठक यांनी मूळ ग्रंथाच्या सुधारित आवृत्तीचे संपादन केले आहे. तर कै. डॉ. टी. एन. वाळुंजकर, डॉ. सुधा काळदाते, डॉ. कि. का. चौधरी, डॉ. वर्षा शिरगावकर, डॉ. व्ही. एस. फडके, डॉ. दीप्ती मुखर्जी या तज्ज्ञ लेखकांचा ग्रंथ लेखनामध्ये सहभाग लाभला आहे.

एकूण आठ प्रकरणांतून महाराष्ट्राचे भौगोलिक, सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक जीवन उलगडणाऱ्या या ग्रंथात फक्त ढोबळ वैशिष्ट्यांचा विचार न करता बारीकसारीक तपशील नोंदविल्याचे दिसते. 'लोक' या प्रकरणात राज्यातील विविध प्रदेशांची प्रादेशिक वैशिष्ट्ये नोंदविताना खानदेशात बोलली जाणारी अहिराणी भाषा ही मराठी, गुजराती, हिंदीसह प्राचीन मागधी, सौराष्ट्री, सौरसेनी, लाटी, महाराष्ट्री, प्राकृत आणि पैशाची या भाषांच्या सुरेख संगमाने तयार झालेली बोली भाषा आहे असे तपशीलदेखील दिलेले आढळतात. ग्रंथातील प्रथम प्रकरण भौगोलिक वैशिष्ट्यांशी संबंधित असून आजच्या महाराष्ट्राविषयीची शास्त्रीय तसेच ऐतिहासिक माहिती देण्यात आली आहे. जातीनिहाय जनगणनेची आवश्यकता जाणून केंद्र सरकारद्वारे २०११ पासून जातीनिहाय जनगणना मोहीम राबविण्यात आली. जाती-जमाती आणि विविध धार्मिक गट यांचे लोकसंख्येच्या दृष्टीने असलेले स्थान, त्यांचे व्यवसाय, साक्षरता, सामाजिक दर्जा यांचा जनगणनामध्ये अगदी सुरुवातीच्या काळापासून आढावा घेण्यात येत असे. जाती व्यवस्था प्रतिगामी असल्यामुळे व या व्यवस्थेत सर्वांना समान न्यायाचे तत्त्व लावले जात नसल्यामुळे जातींची दखल जनगणना करताना घेतली जाऊ नये असा विचार समाजसुधारक आणि राज्यकर्त्यांमध्ये प्रभावी झाल्याने १९३१ च्या जनगणनेनंतर, मागासलेल्या दलित जाती आणि आदिवासी जमातींव्यतिरिक्त इतर जातींची नोंद न करण्याचा निर्णय घेण्यात आला. १९३१ ची जनगणना ही जातीविषयक माहिती उपलब्ध करून देणारी शेवटची जनगणना ठरली होती, यासारखे संदर्भ आपल्याला या ग्रंथाद्वारे मिळतात. तसेच काही ठरावीक वर्षांच्या अंतराने २००१ पर्यंतच्या जनगणनेच्या माहितीबरोबरच पारंपरिक व्यवसाय करणाऱ्या जातींचे तपशील देणारे तक्ते देण्यात आले आहेत. येथे घडून आलेल्या आर्थिक व सामाजिक स्थित्यंतराबरोबरच विवाह, कुटुंब तसेच नातेव्यवस्थांच्या दक्षिणोत्तर रूढ झालेल्या विविध प्रकारांचे वर्णन ग्रंथामध्ये केलेले आहे. समाजाची धार्मिक अधिष्ठाने व प्रार्थना पद्धती यामधून झालेली समाजाची धार्मिक जडणघडण 'धर्म' या प्रकरणातून मांडण्यात आली आहे.

ग्रामीण समाजाचे मूलभूत घटक असलेल्या कसबा, मौजे, चावडी, गावपांढरी, बलुते, मेहेत्तर, मिराशी यासारख्या पूर्वापार संज्ञांची आजच्या पिढीला ओळख असलेली दिसून येत नाही. मात्र, या ग्रंथाने आपल्या आजच्या पिढीला या शब्दांच्या अर्थाबरोबरच त्यांची काळानुरूप पार्श्वभूमीदेखील अगदी सोप्या शब्दांत उपलब्ध करून दिली आहे.

'कला व संस्कृती' या प्रकरणामध्ये विविध कला आणि मान्यवर कलाकारांच्या नोंदी आणि दलित नाट्य चळवळीचादेखील थोडक्यात परामर्श घेतलेला आहे.

महाराष्ट्राची संस्कृती व लोकजीवन जागतिक पातळीवर नेण्याच्या दृष्टिकोनातून या सुधारित आवृत्तीची निर्मिती करण्यात आली आहे. वाचकांना मराठी संज्ञा आणि संकल्पनांचे सहज आकलन होण्याकरिता ग्रंथाच्या शेवटी




'ग्लोसरी' (संज्ञा कोश) देण्यात आली. आदिवासी समाजाच्या उत्सवांतून वापरण्यात येणारे विविध मुखवटे, वाद्ये आणि एका गोंड स्त्रीचे रेखाचित्र अशा आरेखनांचा प्रकरणाच्या शेवटी केलेला वापर लोकसंगीत, लोकनृत्य आणि लोककलेचे महाराष्ट्राच्या संस्कृतीमधील महत्त्व पटवून देते. एकूणच ग्रंथातील माहितीला पूरक असे नकाशे, उत्तम छायाचित्रे आणि सुबक मांडणीमुळे सुवर्णमहोत्सवी वर्षाचे हे विशेष शासकीय प्रकाशन एखाद्या व्यावसायिक प्रकाशनाच्या तोडीचे झाले आहे. विशेष म्हणजे ग्रंथाची ई बुक आवृत्तीदेखील उपलब्ध करून देण्यात आली आहे. समाजशास्त्र, इतिहास आणि कला या विषयांचा अभ्यास करणाऱ्या या संशोधक आणि अभ्यासू वाचकांबरोबरच हौशी वाचकांनादेखील निश्चितच आवडेल असा हा ग्रंथ आहे.

### पुस्तक कुठे मिळेल?

**१. संचालक, शासन मुद्रण, लेखनसामग्री, प्रकाशन संचालनालय, नेताजी सुभाष मार्ग, मुंबई- ४००००४, दूरध्वनी : २३६३१४३३, २३६३१७९९**

**२. व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, व ग्रंथकार, फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी.पी.ओ.नजीक, पुणे ४११००१. दूरध्वनी : २६१२५८०८**

**३. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व ग्रंथकार, सिव्हिल लाइन्स, नागपूर-४४०००१. दूरध्वनी : २५६२६१५**

**४. सहायक संचालक, शासकीय मुद्रणालय, औरंगाबाद -४३१००१, दूरध्वनी क्र. २३३१५२५. ५. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६००३. दूरध्वनी क्र. २६५०३९५, २६५०४०२.**

**महाराष्ट्र : लॅण्ड ॲण्ड इटस् पिपल**
**पुस्तकाचे संपादक - डॉ. अरुणचंद शं. पाठक**
**ग्रंथ सर्व शासकीय मुद्रणालयातून उपलब्ध**
**एकूण पृष्ठे - ५०४,किंमत -रु.३९५/-**

**सौ. चारुशीला बा. चंदनशिवे**
**संपर्क : ७७३८८४८६८०**

# राज्य सहकारी प्रशिक्षण संस्था



**सहकार क्षेत्राशी संबंधित कार्यपद्धतीचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण देण्यासाठी राज्यातील विविध ठिकाणी राज्य सहकारी प्रशिक्षण संस्था कार्यरत आहेत. राज्यभरात विविध जिल्ह्यांमध्ये चालविल्या जात असलेल्या या सहकार प्रशिक्षण केंद्रातून सहकार विषयक प्रशिक्षणाचे वेगवेगळ्या पद्धतीचे, अभ्यासक्रम राबविले जातात.**

- सहकार प्रशिक्षण केंद्र, अहमदनगर
४३, चाहुराणा बु.मार्केटयार्ड पाठीमागे,
अहमदनगर- ४१४००१, दू.क्र.०२४१-२४५१९१४
- तात्यासाहेब मोहिते सहकार प्रशिक्षण केंद्र,
कोल्हापूर श्री.शाहू मार्केट यार्ड, पुणे-बेंगलोर रोड;
कोल्हापूर-४१६००५ दू.क्र.०२३१-२६५१५७३
- गुलाबराव पाटील सहकार प्रशिक्षण केंद्र,
सांगली, सहकार भवन मार्केटयार्ड, सांगली, ४१६४१६
दू.क्र.०२३३-२६७०४९७
- भाऊसाहेब भोकरे सहकार प्रशिक्षण केंद्र,
अमरावती, कॅम्प रोड,अमरावती- ४४४६०२
- काकासाहेब दीक्षित सहकार प्रशिक्षण केंद्र,
अकोला, मूर्तिजापूर रोड, नवीन नाक्याचे मागे,
एम.आय.डी.सी. फेज-२, कुक्कुटपालन
सह.संस्थेजवळ;अकोला-४४४००४
दू.क्र.०७२४-२२५८२३२६;
- सहकार प्रशिक्षण केंद्र, चंद्रपूर जलनगर रेल्वे
माल धक्याजवळ; चंद्रपूर-४४२४०१,
दू.क्र.०७१७२-२५२८५९
- रामचंद्र पाटील नागदकर सहकार प्रशिक्षण केंद्र,
औरंगाबाद-४३१००१- दू.क्र.०२४०-२३२५५९७
- पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील सहकारी प्रबंध
संस्थान, पुणे, ४६/१६,एरंडवणा, नळस्टॉप, कर्वे रोड,
पुणे- दू. क्र. ०२०-२५४३३८१६.
- वैकुंठ मेहता राष्ट्रीय प्रबंध संस्थान, पुणे
दू.क्र. ०२० -२५५३७९७४;
- सहकार प्रशिक्षण केंद्र, जळगांव प्लॉट
नं.२२,जळगांव को-ऑप.हौसिंग सोसा., सिव्हिल
कोर्टाचे मागे, जळगांव - ४२५००१
- सहकार प्रशिक्षण केंद्र नाशिक टिळकवाडी,
शरणपूर रोड, नाशिक-४२२००२
दू.क्र.०२५३ -२५७२५५६
- सहकार प्रशिक्षण केंद्र, पुणे,
५ बी.जे.रोड, ४११००१- दू. क्र ०२०-२६१२२८०१
- सहकार प्रशिक्षण केंद्र, लातूर,
टिळकनगर, महसूल कॉलनी, एस.टी डेपोच्या मागे,
लातूर-४१३५३१ दू.क्र.०२३८२-२४५१८४
- एन.एल.राव,सहकार प्रशिक्षण केंद्र, नागपूर
सहकार मंदिर, टिळक रोड, महाल. नागपूर-४४००३२.
दू.क्र. ०७१२ -२७२९०६५.
- सहकार प्रशिक्षण केंद्र, मुंबई
२०५, विकास, २ रा मजला, न्यायमूर्ती जी.एन.वैद्य
मार्ग, फोर्ट, मुंबई-४००००१.
दू.क्र. ०२२-२२२६२९२५ . (संकलन: वंदना थोरात)

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MH/MR/South - 210/2012-14
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, September 2012.
Date of Publication : 10th of every Month




O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ

लोकराज्य LOKRAJYA

प्रति / To :

प्रेषक / From

दिगंबर वा. पालवे
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
महाराष्ट्र शासन, बरॅक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४०० ०२१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक प्रमोद त्र्यं. नलावडे, महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी एच. टी. मीडिया लि. प्लॉट नं. ६, टी. टी. सी. एम. आय. डी. सी. इंडस्ट्रियल एरिया, दिघे, ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई - ४०० ७०८ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक : प्रमोद त्र्यं. नलावडे